PRAYAAS

INSTITUTE OF EXCELLENCE



# भारतीय समाज

क्लास नोट्स

PRAYAAS
INSTITUTE OF EXCELLENCE

© Prayaas Institute Pvt.Ltd.
All rights reserved.

**Published by**

**Prayaas Institute Pvt. Ltd.**

Ramashree, Near Muralidhar Veg.
No. 279, N. C. Kelkar Road,
Narayan Peth, Pune - 30
+ 91 9894998421
www.prayaas.in

**UPSC MAINS**

# भारतीय समाज

## (क्लास नोट्स)

**Year 2022 - 23**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | भारतीय समाजाची ठळक वैशिष्ट्ये | १ |
| २. | भारतातील महिलांची भूमिका आणि स्थिती | १८ |
| ३. | लोकसंख्या आणि संबंधी समस्या | २५ |
| ४. | गरिबी आणि विकासाशी निगडित समस्या | ३६ |
| ५. | शहरीकरण आणि समस्या | ४६ |
| ६. | भारतीय समाजावर जागतिकीकरणाचे होणारे परिणाम | ५४ |
| ७. | सांप्रदायिकता/जातीयवाद | ६५ |
| ८. | प्रादेशिकता/प्रदेशवाद | ७० |
| ९. | धर्मनिरपेक्षता | ७८ |

# भारतीय समाजाची ठळक वैशिष्ट्ये

**भारतीय समाज – एक परिचय :**

भारतात सामाजिक जीवनाच्या शब्दशः प्रत्येक पैलूमध्ये थक्क व्हावे अशी विविधता पाहायला मिळते. वांशिक, भाषिक, प्रादेशिक, आर्थिक, धार्मिक, वर्ग आणि जातीय गटांची विविधता भारतीय समाजाला एक तिरका छेद देताना दिसते. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शहरी–ग्रामीण फरक आणि लिंगभेद देखील झिरपताना दिसून येतात.

भारतीय समाज हा बहुलवादी समाज आहे. भाषा, प्रांत, धर्म, जात, चालीरीती अशा विविधतेने भरलेला भारतीय समाज आधुनिकीकरणाकडे वाटचाल करत आहे. समानता, स्वातंत्र्य आणि सार्वत्रिक मताधिकार या तत्त्वांवर आधारित लोकशाहीच्या स्थापनेने भारतीय समाजाची पारंपारिक रचना बदलली.

**ऐतिहासिक दृष्टीकोन :**

भारतीय समाज हा खूप जुना, गुंतागुंतीचा, बहुसंख्य आहे आणि त्याला मोठा इतिहास आहे. तो विविध धार्मिक गट, वांशिक गट आणि सांस्कृतिक फरक/मतभिन्नता असलेलया गटांनी बनला आहे. भारतीय इतिहासाच्या प्रदीर्घ कालखंडात जगाच्या विविध भागांतून विविध गट त्यांच्या स्वत:च्या सामाजिक–सांस्कृतिक आणि वांशिक वैशिष्ट्यांसह भारतात दाखल झाले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सिंधू संस्कृती. नंतरच्या टप्प्यात इंडो–आर्य आले आणि त्यांनी भूमीच्या पूर्वीच्या रहिवाशांशी संवाद साधला. त्यांची स्वतःची सामाजिक–सांस्कृतिक जीवनशैली होती. ते स्वतःला श्रेष्ठ समजत. त्यांनी वेगवेगळ्या सामाजिक गटांसाठी त्यांच्या स्वत:च्या श्रेणीसह आणि बाहेरील लोकांसाठी नियम आणि प्रथा विकसित केल्या. हा तो टप्पा होता जेव्हा वर्णांची (वर्णव्यवस्था) उत्पत्ती झाली.

ख्रिस्ती आणि इस्लाम या दोन्ही धर्मांचा भारतीय समाजव्यवस्थेवर प्रभाव होता. या दोन्ही धार्मिक गटांनी भारतीय समाजव्यवस्थेवर केवळ प्रभावच टाकला नाही तर, प्रचलित सामाजिक परिस्थितीचाही प्रभाव या दोन्हीवर पडला. त्यामुळे त्यांनी भारतीय वातावरणात काही विशेष वैशिष्ट्ये आत्मसात केली.

**भारतीय समाजाची वैशिष्ट्ये :**

- बहु वांशिक : जगाच्या विविध कोपऱ्यांमधून स्थलांतराच्या लाटांनी हा देश विविध वंशांचे घर बनवला आहे. भारत हा विविध वंशांचे मिश्रण आहे. भारतीय लोकसंख्येमध्ये जगातील सर्व प्रमुख वंश आहेत.

- बहुभाषिक : भारतातील भाषिक विविधतेचे उत्तम प्रकारे वर्णन करणारी एक लोकप्रिय म्हण आहे : 'कोस–कोस पर बदले पानी, चार कोस पर बानी' (भारतात बोलली जाणारी भाषा दर काही किलोमीटरवर बदलते, पाण्याच्या चवीप्रमाणे).

- धार्मिक बहुलवाद : भारत हे बहु–सांस्कृतिक आणि वैविध्यपूर्ण राष्ट्र आहे, ज्यामध्ये हजारो वर्षांपासून भरभराटीला आलेल्या बहुलवादाचा इतिहास आहे. येथे प्रतिनिधित्व केलेल्या अनेक धर्मांपैकी हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन धर्म आहेत.

- जमाती : जमात हा एक भारतीय गट आहे ज्यामध्ये समान वैशिष्ट्ये आणि गुण आढळतात, ज्यामुळे तो इतर घटकांपेक्षा वेगळा ठरतो. ते रीतिरिवाज, विधी, श्रद्धा, नातेसंबंध, सामाजिक पद, राजकीय संघटना इत्यादींनी एकत्र बांधले गेलेले असतात. एका अधिकृत अहवालानुसार, देशात ७०५ अनुसूचित जमाती आहेत आणि भारताच्या एकूण लोकसंख्येच्या त्या सुमारे ६% आहेत.

- गतिमान आणि समक्रमित : एक देश म्हणून भारतामध्ये भूतकाळात विविध संस्कृती, धर्म (हिंदू, मुस्लिम, जैन, शीख), परंपरा (सूफी, भक्ती, वैष्णव), भिन्न राज्यकर्ते (मुघल, मराठा, ब्रिटीश) यांचे एकत्रीकरण करण्यात आणि त्यांना सामावून घेण्यास मुक्त हस्ते मोकळीक होती. भारत किंवा भारतीय हे या सर्वांच्या मिश्रणाचे परिणाम आहेत.

- विविधतेत एकता : भारतामध्ये शारीरिक गुण, त्वचेचा रंग, जाती, पंथ, सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा इत्यादींमध्ये भिन्नता आहे. या फरकांकडे समाज आणि संपूर्ण राष्ट्र सुधारणाऱ्या बाबी म्हणून पाहिले जाते.

- जात आणि वर्ग : सामाजिक विषमता जगभर अस्तित्वात आहे, परंतु कदाचित भारतीय जाती–संस्थेत जेवढी आहे तेवढी असमानता इतकी विस्तृतपणे कुठेही बांधली गेली नाही. भारतात, समाजात विविध वर्ग आहेत. हा वेगवेगळा वर्ग आर्थिक फरकांवर आधारित आहे. हा फरक

शिक्षण, मालमत्ता, व्यवसाय आणि कामाशी संबंधित इत्यादी गोष्टींवर आधारित आहे. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांच्या मते, माणूस हा वर्गीय प्राणी आहे.

- कुटुंब : भारतीयांसाठी समाजात कुटुंबाला खूप महत्त्व आहे आणि ती व्यक्तीच्या जीवनात एक प्रमुख संस्था आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या आणि अनेकदा तीन किंवा त्याहून अधिक पिढ्या एकाच छताखाली एकत्र राहत असणे, हे दाखवून देते की या देशात कौटुंबिक जीवनाला किती महत्त्व आहे. ही कौटुंबिक रचना भारतातील सध्याच्या कामकाजाच्या परिस्थितीला अगदी अनुकूल आहे आणि बहुतेकदा कुटुंबाद्वारे चालवणारे व्यवसाय हे इतर कोणापेक्षाही आपल्या कुटुंबातीलच सदस्यांना कामावर ठेवण्यास प्राधान्य देतात.

- विवाह : संपूर्ण भारतामध्ये, विवाह हे प्रथेनुसार आयोजित केले जातात. भागीदारांची निवड जातीमधून (आपल्याच जातीतून ) केली जाते. अगदी जवळच्या नातेवाईकांच्या काही नातेसंबंधांना वगळता हे विवाह आपल्याच जातीत होत असतात. नातेसंबंधांचा विस्तार आणि त्यांचे अधिक घट्ट होणे, या दोन गोष्टी विवाहबंधनांद्वारे घडत असतात.

- नातेसंबंध : नातेसंबंधाची व्यवस्था म्हणजे, व्यक्ती आणि गटांमधील संबंध ज्या पद्धतीने आयोजित केले जातात, अशी व्यवस्था होय. सर्व मानवी समाजांमध्ये या प्रकारच्या व्यवस्थेने मध्यवर्ती स्थान व्यापलेले आहे. नातेसंबंध हे सामाजिक संघटना आणि एकत्रीकरणाचे मूलभूत तत्त्व आहे. ही अशी एक गुंतागुंतीची संकल्पना आहे की, ज्यात नातेसंबंध व्यवस्थेच्या संबंधित मूल्ये आणि मानदंडांच्या बाबतीत ताठरपणा आणि लवचिकता या दोन्ही बाबी एकमेकांच्या आजूबाजूने अस्तित्वात असतात.

- पितृसत्ता : भारतीय समाजात, पितृसत्ताक विचारधारा कायदे, रीतिरिवाज आणि विधींद्वारे औपचारिक केली जाते आणि अंमलात आणली जाते. घरांमधील सत्तासंबंधांद्वारे ते स्पष्टपणे दिसूनही येते. उदाहरणार्थ, भारतातील बहुसंख्य कुटुंबांचे प्रमुख पुरुष आहेत, भारतातील एकूण कुटुंबांपैकी केवळ १५% कुटुंबांमध्ये महिला कुटुंबप्रमुख आहेत.

- ग्रामीण आणि कृषी : देशातील जवळपास ६५% लोकसंख्या खेड्यांमध्ये राहते. ते त्यांच्या जगण्यासाठी पूर्णपणे शेती आणि संबंधित कामांवर अवलंबून आहेत.

- परस्पर आदर आणि सहिष्णुता : भिन्न श्रद्धा आणि विश्वास असलेल्यांचा परस्पर आदर आणि सहिष्णुता आपल्या सामाजिक मूल्यांमध्ये अंतर्भूत आहे. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या सहिष्णुता आणि परस्पर आदराच्या अनुकूल मूल्यांमुळे भारतीय समाज विविधतेला तोंड देत आजवर टिकून आहे.

- अध्यात्म आणि भौतिकवाद : भारतीय समाजात अध्यात्म आणि भौतिकवाद या दोन्हीची वैशिष्ट्ये आहेत. अध्यात्मवाद मानवी आत्म्याशी संबंधित आहे आणि हे एक तत्त्व आहे ज्याचे उद्दीष्ट मानवी आत्म्याचा प्रवास सुकर करणे आहे. भारत हे जगामध्ये अध्यात्माचे केंद्र म्हणून ओळखले जाते. दुसरीकडे, भौतिकवाद सांसारिक (ऐहिक) वस्तू आणि सेवांना महत्त्व देतो. हे तत्त्वज्ञान जगातील भौतिक गोष्टींचे मूल्य महत्त्वाचे मानते. महागड्या/चैनीच्या वस्तू बाळगण्याला हे तत्वज्ञान पाठबळ देते. भारतात, तुम्हाला हे दोन्ही तत्वज्ञान शांततेने एकत्र राहताना दिसतील. भारतीय समाज त्यांच्यामध्ये परिपूर्ण संतुलन साधतो.

- पारंपारिकता आणि आधुनिकतेचे सह-अस्तित्व : जागतिकीकरणाने स्वतःसोबत कदाचित आधुनिक मूल्ये आणि प्रथांची लाट आणली असेल, परंतु भारतात परंपरावाद अजूनही प्रचलित आणि संरक्षित आहे. भारतीय समाजाच्या परंपरांनीही जागतिकीकरणाच्या त्याच वेशीतून बाहेरच्या जगात प्रवेश केला आहे. उदा. मॉडर्न जिम आणि योगा, वेस्टर्न मेडिसिन्स आणि आयुष

- सामूहिकता आणि सामंजस्य : भारतीय सामान्यतः त्यांच्या समुदायाशी आणि नातेवाइकांशी मजबूत संबंध ठेवत इतरांशी सुसंवाद आणि ऐक्य ठेवण्याला महत्त्व देतात. एकसंध आणि परस्परावलंबी समुदाय किंवा कुटुंब एक असा आधार देणारी व्यवस्था निर्माण करतात, ज्यावर एक व्यक्ती विसंबून राहू शकते.

- विनयशीलता आणि पुराणमतवादीपणा : नम्रता/विनयशीलता हे भारतीय संस्कृतीतील मुख्य मूल्यांपैकी एक आहे. भारतीय लोक जीवनाच्या बहुतेक पैलूंमध्ये, विशेषतः ग्रामीण भागात खूप पुराणमतवादी असतात. हे विशेषतः लोकांच्या वागण्यातुन आणि पेहरावातुन लक्षात येते. कपडे सामान्यतः पारंपारिक असतात, परंतु संपूर्ण देशात पुरुषांसाठी आणि शहरी भागात महिलांसाठी पाश्चात्य शैलीतील कपडे पाहणे सामान्य आहे.

- अनुकूलता आणि मनमोकळेपणा : कल्पक आणि उद्योजकतेच्या भावनेसह विविधता साजरी केली जाते. या अर्थाने, बरेच भारतीय विविध गोष्टींशी जुळवून घेण्यात खूप अनुकूल आणि सर्जनशील आहेत. त्यामुळे अनेकदा त्यांना स्वतःसाठी, त्यांच्या लोकांसाठी आणि देशासाठी मोठ्या संधींची शक्यता निर्माण होते. समस्या सामान्यतः आनंदी, सहकार्यात्मक आणि नाविन्यपूर्ण रीतीने हाताळल्या जातात आणि मनमोकळेपणाने त्यांना सामोरे जातात, ज्या समस्या एरवी नैराश्याने ग्रासू शकतात.

**सामाजिक व्यवस्थेत सातत्य राखण्यासाठी पुढील घटक जबाबदार आहेत :**

- मोठ्या प्रमाणावर भारतीय सनातनी आणि परंपरेने बांधलेले आहेत. ते हिंसक बदलांच्या बाजूने नाहीत.
- प्रत्येक संस्थेची काही सामाजिक मुळे असतात. एकात कोणताही बदल केल्यास त्याचा विपरीत परिणाम दुसऱ्यावर होतो, ज्यासाठी समाज तयार नाही.
- भारतातील बहुतेक संस्था ईश्वराच्या कल्पनेशी जोडलेल्या आहेत. त्यांना धार्मिक अभिमुखता दिली जाते आणि असे मानले जाते की, कोणत्याही सामाजिक संस्थेचे उल्लंघन हे देवाला नाराज करण्यासारखे आहे.
- समाजात, बदलांचे प्रवाह हे चुकीच्या हितसंबंधांमुळे थांबून जातात. अशावेळी स्वतःला योग्य वाटेल त्या पद्धतीने ते घडवले जातात.
- निःसंशयपणे प्रत्येक सामाजिक संस्थेचे स्वतःचे फायदे आहेत, ज्याचे महत्त्व कदापि कमी समजून चालायचे नाही.
- भारतातील बहुसंख्य लोकसंख्या निरक्षर आहे आणि त्यामुळे त्यांना दुष्ट/समाजविघातक सामाजिक संस्थांच्या निर्मूलनाची गरज पटवून देणे कठीण होते.
- भारतातील बहुसंख्य लोकांसाठी पोट भरण्याचा संघर्ष हा रोजच्या रोज असतो, त्यामुळे ते सामाजिक समस्या समजून घेण्यास प्रतिकूल असतात.
- भारत हा एक विशाल देश आहे आणि लोक अनेकदा दुर्गम भागात राहतात जिथे कित्येकदा अनेक गोष्टी मिळणे कठीण असते. आपल्या सामाजिक आणि धार्मिक नेत्यांना लोकांपर्यंत पोहोचणे कठीण होते, विशेषतः जेव्हा वाहतूक आणि दळणवळणाची साधने उपलब्ध नसतात. आपल्या परकीय राज्यकर्त्यांनी जनतेला त्यांच्या सामाजिक समस्यांची जाणीव करून देण्यासाठी कुठलेही प्रयत्न केले नाहीत. समाजातील दुष्कृत्ये दूर करण्याचे काही प्रयत्न या परकीय राज्यकर्त्यांनी केल्याचे तर दूरच! स्वतंत्र भारतातील आपल्या नेतृत्वाने आणि स्वातंत्र्यलढ्याच्या काळातही भूतकाळाशी पूर्ण फारकत घेतली नाही. भारतीय नेतृत्वाचा नेहमीच असा विश्वास राहिला आहे की, कोणत्याही क्षेत्रातील आमूलाग्र आणि कठोर बदल हे समाजात चांगल्यापेक्षा नुकसानच अधिक करतात.

**भारतीय समाजात कालांतराने होणारे बदल :**

- भारतीय समाजात सातत्य आणि बदल यासाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. बदल हा अनुकूलन (जुळवून घेणे) किंवा एकत्रीकरणाद्वारे होऊ शकतो. जेव्हा विद्यमान संस्था नवीन गरजा पूर्ण करण्यासाठी पुन्हा जुळवून घेतात, तेव्हा अनुकूलन घडते. जेव्हा एखादा समाज नवीन घटक स्वीकारतो आणि त्याला स्वतःचा भाग बनवतो, तेव्हा एकीकरण घडते.
- आपल्या समाजाला अनुकूलन साधण्यात/एकात्मीकरण करण्यात उपयुक्त ठरलेल्या किंवा यात अयशस्वी झालेल्या विविध घटकांपैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे : राजकीय स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांचे अस्तित्व, औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणातील वाढ, वैधानिक उपाय, जातीव्यवस्थेतील सामाजिक बदल आणि सामाजिक चळवळी आणि स्त्रीवाद, जागतिकीकरण आणि जातीवादविरोध.
- काही वांशिक गटांना त्यांची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी राजकीय स्वातंत्र्य हवे आहे. धार्मिक गटांना त्यांच्या सदस्यांना काही मूल्ये आणि उपसांस्कृतिक नियम शिकवण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. या सर्व इच्छा आणि मागण्यांचा परिणाम गेल्या पाच दशकांत आपल्या देशातील सामाजिक बदलाच्या स्वरूपावर आणि आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेवर झाला आहे.
- शहरीकरण हा समाजावर परिणाम करणारा आणखी एक घटक आहे. कुटुंब, नातेसंबंध, जात आणि विवाह इत्यादी ह्या शहरी भागातील व्यवस्था केवळ रचनाच नव्हे तर विचारधारा आणि कार्यपद्धतीतही ग्रामीण भागापेक्षा भिन्न आहेत.

- शहरांमधील बदल इतर अनेक सामाजिक व्यवस्थांमध्येही दिसून येतात. शहरी भागातील नातेसंबंध ग्रामीण भागांइतके घनिष्ठ नसतात. शहरांमध्ये फक्त प्राथमिक आणि दुय्यम नातेवाइकांचेच जिव्हाळ्याचे संबंध असतात, तर खेड्यांमध्ये हे संबंध मोठ्या प्रमाणावर तृतीय आणि दूरच्या नातेवाइकांपर्यंत विस्तारलेले असतात. शहरी भागातील जातिव्यवस्था ग्रामीण भागासारखी ताठर नाही.
- आर्थिक क्षेत्रात, औद्योगिकीकरणामुळे कामातील विशेषता, व्यावसायिक गतिशीलता, अर्थव्यवस्थेचे मुद्रीकरण आणि नातेसंबंध आणि व्यावसायिक संरचनांमधील दुवा खंडित झाला आहे; सामाजिक क्षेत्रात, याचा परिणाम ग्रामीण भागातून शहरी भागात लोकांचे स्थलांतर, शिक्षणाचा प्रसार आणि एक मजबूत केंद्रीकृत राजकीय संरचना झाली आहे; सांस्कृतिक क्षेत्रात, त्याने श्रद्धांचे धर्मनिरपेक्षीकरण केले आहे. एकात्मिक आर्थिक उपक्रमात कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र काम करण्याऐवजी, काही पुरुष सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी घराबाहेर पडतात. याचा परिणाम केवळ संयुक्त कुटुंबाच्या पारंपारिक रचनेवरच नाही तर सदस्यांमधील नातेसंबंधांवरही झाला आहे.
- शिक्षणाने केवळ लोकांच्या वृत्ती, श्रद्धा, मूल्ये आणि विचारसरणीतच बदल घडवून आणला नाही तर, व्यक्तिवादी भावना निर्माण आणि जागृत केल्या आहेत. वाढत्या शिक्षणामुळे केवळ स्त्री-पुरुषांच्या जीवनातील तत्त्वज्ञानातच बदल होत नाहीत तर स्त्रियांना रोजगाराचे नवीन मार्गही मिळतात. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्यानंतर, स्त्रिया कौटुंबिक बाबतीत जोरकसपणे आपली भूमिका आणि मतं मांडू लागतात आणि त्यांच्यावरील कोणाचेही वर्चस्व स्वीकारण्यास नकार देतात. हे दर्शविते की, शिक्षणामुळे कुटुंबातील नातेसंबंधात कसे बदल होतात, अखेरीस ज्याने संरचनात्मक बदल देखील होतात.

**भारतातील विविधता :**

**जात व्यवस्था :**

प्रत्येक समाज हा स्तरीकृत (विविध स्तरांत विभागलेला) आहे. हे अगदी बरोबरच म्हटले गेले आहे की, अस्तरीकृत समाज, ज्यामध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये वास्तवात समानता नांदते आहे, हे खरंतर केवळ एक मिथक आहे!'' मानवजातीच्या इतिहासात हे कधीही लक्षातच येऊ शकलेले नाही. स्वरूप आणि प्रमाण भिन्न असू शकतात, परंतु त्याचे सार मात्र कायम आहे. भारतीय समाजव्यवस्था तीन स्तंभांवर अवलंबून आहे : जातिव्यवस्था, संयुक्त कुटुंब व्यवस्था आणि ग्रामसमाज. यापैकी, जातिव्यवस्था हे भारतीय समाजाचे त्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेवरील परस्परावलंबित्वामुळे सर्वात लक्षणीय वैशिष्ट्य असल्याचे दिसते. किंबहुना, भारतीय समाजाचे वर्णन 'जातिय समाज' म्हणून केले गेले आहे. भारतात आपल्याला जन्मावर आधारित सामाजिक स्तरीकरणाची एक दुर्मिळ व्यवस्था आढळते, जी जगात इतरत्र आढळत नाही.

**अर्थ आणि व्याख्या :**

'जात' (इंग्रजीत 'कास्ट') हा शब्द पोर्तुगीज शब्द 'कास्टा' वरून आला आहे ज्याचा अर्थ जात, वंश किंवा गट असा होतो. आधीच म्हटल्याप्रमाणे, जाती या ठराविक गोष्टींनी ओळखले जाणारे गट आहेत. अशा प्रकारे मुळात जात म्हणजे एकाच जातीचे लोक. एखाद्या व्यक्तीचा जन्म जातीत होतो आणि हा दर्जा सामान्यतः कायमस्वरूपी असतो. जरी जातीचे घटक भारताबाहेरही आढळतात, तरी केवळ भारतातच असंख्य जाती आढळतात. जाती ह्या स्वतःपुरत्या एक छोटे आणि पूर्ण स्वरूपाचे सामाजिक जगच असतात. त्या एका मोठ्या समाजव्यवस्थेचा भाग असल्या तरी एकमेकांच्यापासून निश्चितपणे वेगवेगळ्या अशा चिन्हांकित केलेल्या असतात.

**जातिव्यवस्थेची वैशिष्ट्ये :**

**१. समाजाचे विभागीय विभाजन :** जातिव्यवस्थे अंतर्गत, समाज अनेक लहान सामाजिक गटांमध्ये विभागला जातो ज्याला जाती म्हणतात. यातील प्रत्येक जात हा एक सुविकसित सामाजिक गट आहे, ज्याचे सदस्यत्व जन्मावर आधारित आहे. प्रत्येक जातीची स्वतःची पारंपारिक सामाजिक स्थिती, व्यवसाय, चालीरीती, नियम आणि कायदे असतात. जातीच्या नियमांची अंमलबजावणी करणारी जात परिषद किंवा 'जात पंचायत' नावाची स्वतःची एक प्रशासकीय संघटना असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जातीचे सदस्य हे त्यांच्या दैनंदिन कामात मदत आणि सहकार्याच्या परस्पर जबाबदाऱ्यांनी एकत्र बांधलेले असतात. अशा प्रकारे प्रत्येक जात स्वतः एक सामाजिक जग आहे.

**२. पदानुक्रम :** जातिव्यवस्था नेहमीच श्रेणीबद्ध (पदानुक्रमित) व्यवस्थेद्वारे दर्शविली जाते. याचा अर्थ असा होतो की, काही जाती इतरांपेक्षा श्रेष्ठ मानल्या जातात. जातीतील सदस्यत्व जन्मावर आधारित असते आणि कमी-अधिक प्रमाणात निश्चित असते. पारंपारिकपणे ही वर्चस्व आणि अधीनतेच्या विविध टप्प्यांनुसार असणारी जातीची श्रेणीबद्ध मांडणी आहे.

**३. परस्परसंवादावर बंधने :** जातिव्यवस्थेमध्ये परस्परसंवादावर अनेक बंधने आहेत. एका जातीचे सदस्य दुसऱ्या जातीच्या सदस्यांशी मुक्तपणे मिसळू शकत नाहीत किंवा फिरू शकत नाहीत. ही परस्परसंवादावरील बंदी अधिकच कठोर होते, जेव्हा श्रेष्ठ जातीच्या सदस्यांनी कनिष्ठ जातीच्या सदस्यांसोबत मिसळण्याचा प्रश्न समोर येतो. प्रत्येक जात सुस्थापित चालीरीती आणि परस्परसंवादाचे सु-परिभाषित नियमांचे पालन करते.

**४. सामाजिक आणि धार्मिक अडथळे :** जातिव्यवस्थेमध्ये, उच्च जातीचे सदस्य इतर जातींवर काही अडथळे आणि निर्बंध लादतात.

**५. समानतेवर निर्बंध लादणे :** प्रत्येक जात समूहाचे स्वतःचे कायदे आहेत जे सदस्यांच्या आहाराच्या सवयी नियंत्रित करतात.

**६. शुद्धाशुद्धतेची विचारधारा :** उच्च जातीचे लोक शुद्ध आणि खालच्या जातीचे लोक अशुद्ध मानले जातात. खालच्या जातींना कमी शुद्ध आणि जास्त 'प्रदूषित' मानले जाते.

**७. व्यवसायांवरील निर्बंध :** विविध जाती सहसा पारंपारिक व्यवसायांशी संबंधित असतात.

**८. वैवाहिक निर्बंध :** जातिअंतर्गत विवाहाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते ज्यामध्ये प्रत्येक जातीचे सदस्य त्यांच्या स्वतःच्या जातीतच विवाह करतात. आंतरजातीय विवाहास बंदी आहे.

**९. वंशानुगत स्थिती :** जातिव्यवस्था ही दर्जाधारित पद्धतीवर आधारित आहे, ज्याचा अर्थ असा होतो की, एखाद्या विशिष्ट जातीतील व्यक्तीच्या जन्माने त्याची जात आणि समाजातील त्याची स्थिती ठरवली जाते. पात्रता किंवा अपात्रता प्राप्त करूनही स्वतःची जात बदलणे सहसा कठीण किंवा अशक्य असते, विशिष्ट जातीचे सदस्यत्व चालू राहते आणि त्यात कोणताही बदल होत नाही.

**जातिव्यवस्थेचे फायदे :**

- या व्यवस्थेने भारताची पारंपारिक सामाजिक संघटनात्मक वाटचाल चालू ठेवली.
- या व्यवस्थेने अनेक समुदायांना सामावून घेतले आहे आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाकडे उपजीविकेच्या विशिष्ट साधनांची मक्तेदारी असेल, याची खातरजमा देखील केली आहे.
- व्यक्तींना सामाजिक सुरक्षा आणि सामाजिक मान्यता प्रदान केली. ती व्यक्तीची जातच असते, जी लग्नासाठी उमेदवारास निवडीची मुभा देते, राज्य-मंडळाची भूमिका निभावते, अनाथाश्रम आणि समाजाच्या फायद्याची भूमिका बजावते. याशिवाय, ती व्यक्तीला आरोग्य विम्याचे फायदे देखील प्रदान करते. व्यक्तीच्या अंत्यसंस्काराचीही तरतूद जात करते.
- जातीने वंशानुगत व्यवसायाचे ज्ञान आणि कौशल्य एका पिढीकडून दुस-या पिढीकडे सुपूर्द केले आहे, त्यामुळे संस्कृतीचे जतन होण्यास मदत झाली आहे आणि उत्पादनाची खात्री झाली आहे.
- व्यक्तींना त्यांच्या समाजाची संस्कृती आणि परंपरा, मूल्ये आणि नियम शिकवून समाजीकरणाच्या प्रक्रियेत जात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.
- जाती व्यवस्थेने जजमानी नातेसंबंधांद्वारे विविध जातींमध्ये परस्परावलंबी संवाद देखील निर्माण केला आहे. जातीने कामगार संघटना म्हणून काम केले आणि तिच्या सदस्यांचे शोषणापासून संरक्षण केले.
- राजकीय स्थैर्याला प्रोत्साहन दिले, कारण क्षत्रियांना सामान्यतः जातिव्यवस्थेद्वारे राजकीय स्पर्धा, संघर्ष आणि हिंसाचारापासून संरक्षण होते.
- अंतःविवाहाद्वारे वांशिक शुद्धता राखली.
- स्पेशलायझेशनमुळे (विशेषीकरण) वस्तूंचे दर्जेदार उत्पादन झाले आणि त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळाली. उदा : भारतातील अनेक हस्तकला वस्तूंना यामुळे आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली.

**जाती व्यवस्थेचे तोटे :**

**१. सामाजिक प्रगतीमध्ये अडथळा आणते :** जातिव्यवस्था ही सामाजिक प्रगतीमध्ये अडथळा आहे कारण ती समाजात सहजपणे बदल घडवून आणू देत नाही. जातिव्यवस्थेच्या अंतर्गत, व्यक्ती ही स्वतंत्र नसते. व्यक्तीला तिच्या जातीच्या जुन्या चालीरीतींचे पालन करणे भाग असते. हे पालन करण्यात जराही हयगय झाल्यास त्याचे कठोर परिणाम होतात. जात व्यवस्थेच्या या ताठरपणाने हिंदू समाजाला जवळजवळ पंगू बनवले आहे. त्यात नाविन्याला स्थान नाही.

**२. आर्थिक प्रगती खुंटते :** जातिव्यवस्था ही आर्थिक विकासाच्या मार्गात अडथळा होऊन बसते. व्यवसाय हे जातीव्यवस्थेत करारापेक्षा स्थिती व दर्जानुसार ठरवले जात असल्याने, कामगाराला त्याच्या आवडीचे व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नाकारले जाते. यामुळे श्रमाची गतिहीनता आणि अकार्यक्षमता वाढीस लागते आणि त्यामुळे आर्थिक मागासलेपणा येतो.

**३. राजकीय मतभेद होतात :** जातिव्यवस्थेच्या अंतर्गत एखाद्या व्यक्तीने इतर कोणत्याही गटापेक्षा त्याच्या जातीशी अधिक निष्ठावान असणे आवश्यक असते. त्यामुळे लोकांमध्ये राष्ट्रवादापेक्षा जातीयवाद वाढतो. त्यामुळेच भारतीयांना राष्ट्रवाद विकसित करता आला नाही आणि परकीय आक्रमणांविरुद्ध एकजूट होऊ शकली नाही. किंबहुना, भारतीयांमधील मतभेद आणि देशभक्तीच्या अभावामुळे अनेक परदेशी लोकांना भारतावर आक्रमण करण्यास प्रोत्साहित केले.

**४. सामाजिक असमानता टिकवून ठेवते :** उच्च जातींना समाजात त्यांचे स्वतःचे विशेषाधिकार टिकवून ठेवता यावेत, यासाठी जातीव्यवस्थेने उच्च जातींच्या हातातील एक साधन म्हणून काम केले आहे. त्यामुळे उच्चवर्णीयांची हुकूमशाही प्रस्थापित झाली आणि खालच्या जातीतील लोकांच्या मनात हीनतेची आणि असुरक्षिततेची कायमची भावना निर्माण झाली.

**५. स्त्रियांवर कष्ट लादते :** या व्यवस्थेचा आणखी एक दोष म्हणजे ती स्त्रियांवर कष्ट/त्रास लादते. जातिव्यवस्थेच्या अंतर्गत, जातीच्या उतरंडीत आपला दर्जा वाढवू इच्छिणाऱ्या जातीने बालविवाह, विधवा पुनर्विवाह बंदी आणि स्त्रियांना एकांतवास यासारख्या काही प्रथा पाळल्या पाहिजेत, ज्यामुळे स्त्रियांना त्रास होतो.

**६. अस्पृश्यता निर्माण करते :** व्यवस्था मोठ्या संख्येने लोकांना एका आभासी गुलामगिरीत ठेवते. ते दुर्दैवी अस्पृश्य आहेत, ज्यांना सर्व प्रकारचे अपंगत्व आले आहे. अस्पृश्यता ही जातिव्यवस्थेची सर्वात कुरूप अभिव्यक्ती आहे.

**७. ही व्यवस्था लोकशाहीच्या विरोधात उभी राहिली :** जातिव्यवस्था लोकशाहीच्या भावनेच्या विरुद्ध होती. लोकशाही मानवी समानतेची अपेक्षा करते, परंतु जातिव्यवस्था असमानतेवर विश्वास ठेवते. या व्यवस्थेत एक श्रेणीबद्ध व्यवस्था होती, ज्यामध्ये ब्राह्मण शीर्षस्थानी होते, तर शुद्र शिडीच्या सर्वात खालच्या पायरीवर होते.

**जातिव्यवस्थेतील बदल :**

**१. ब्राह्मणांचे वर्चस्व कमी होणे :** पारंपारिक जातिव्यवस्थेत, ब्राह्मण हे सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर होते आणि त्यामुळे त्यांना इतरांवर वर्चस्व प्राप्त होते. परंतु धर्मनिरपेक्षीकरण आणि पाश्चिमात्यीकरणाच्या प्रक्रियेमुळे ब्राह्मणांचे अधिकार हळूहळू कमी होत गेले आणि त्यांना समाजातील पारंपारिक आदर आणि सन्मान मिळणे बंद झाले.

**२. जातीच्या पदानुक्रमात बदल :** पारंपारिकपणे, प्रत्येक जात आपली स्वतःची जीवनशैली राखत होती आणि उच्च जाती इतरांपेक्षा चांगले जीवन जगत होत्या. पण कालांतराने संस्कृतीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. संस्कृतीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे, ज्यामध्ये सामाजिक स्तरीकरणाच्या व्यवस्थेत वरच्या दिशेने गतिशीलतेची आकांक्षा असणारा जातीचा गट (स्टेटस ग्रुप) उच्च जातींच्या जीवनशैलीचे अनुकरण करतो. खालच्या जातींनी त्यांच्या सामाजिक स्थितीत बदल घडवून आणण्यासाठी संस्कृतीकरणाचा अवलंब केला.

**३. स्थितीतील बदल :** धर्मनिरपेक्षीकरण, पाश्चात्यीकरण आणि व्यक्तींच्या भौतिकवादी वृत्तीमुळे जातींचे कार्य दर्शविणाऱ्या स्थितीमध्ये बदल झाला आहे.

**४. व्यावसायिक बदल :** जातीने ग्रस्त असलेल्या समाजात, व्यवसाय हे वंशपरंपरागत होते आणि एखाद्या व्यक्तीचा विशिष्ट जातीत जन्म झाल्यामुळे त्याचा व्यवसाय कायमचा ठरत असे. पण जेव्हा जातीव्यवस्थेचा ताठरपणा मोडला, तेव्हा व्यावसायिक बदलही खुणावले गेले.

**५. संस्कृतीच्या क्षेत्रात बदल :** यामुळे विविध जाती समूहांची जीवनशैली, त्यांच्या राहणीमान, उपासनेच्या पद्धती आणि संस्कार आणि विधी, चालीरीती आणि पारंपारिक पद्धती बदलल्या आहेत.

**६. समानतेत बदल :** लोक आता त्यांच्या मूळ स्थानापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. ते वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत आणि त्यामुळे खाण्याच्या सवयींशी संबंधित निर्बंधांना चिकटून राहणे खूप कठीण आहे. विशेषत: शहरी ठिकाणी जिथे अनोळखी लोक हॉटेल्समध्ये जेवतात, तिथे निर्बंध पाळणे अशक्य आहे. विविध कार्यालये आणि काम करणाऱ्या संस्थांमध्येही अशीच शिथिलता दिसून येते. कर्मचारी परस्पर जेवणासाठी एकत्र जमतात.

**७. मनोवृत्तीतील बदल :** व्यवस्थेमध्ये जातींबद्दलच्या दृष्टिकोनात बदल दिसून आला आहे.

**पुढे काय :**

**१. आधुनिक शिक्षण :** धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे असणारे आधुनिक शिक्षण हे धर्माच्या विरोधात नसले तरी त्याबाबत उदासीन नक्कीच आहे. हे एकीकडे समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यांसारख्या लोकशाही मूल्यांवर आधारित आहे आणि दुसरीकडे तर्क आणि निरीक्षणासारख्या वैज्ञानिक मूल्यांवर आधारित आहे. त्यामुळे, आधुनिक शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच, जातीची दैवी उत्पत्ती, कर्म आणि जातीव्यवस्थेला नैतिक औचित्य प्रदान करणाऱ्या 'कर्माचे फळ' या समजुती लोकांच्या मनात दिवसेंदिवस कमकुवत होत चालल्या आहेत. आधुनिक शिक्षण सहसा सह-शैक्षणिक संस्थांमध्ये दिले जात असल्याने, ते सुशिक्षित तरुण-तरुणींमध्ये प्रेमावर आधारित आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देते. अशा प्रकारे, आधुनिक शिक्षण हे भारतातील जातिव्यवस्थेच्या विरोधात एक अतिशय शक्तिशाली शक्ती म्हणून काम करते.

**२. औद्योगिकीकरण :** संयुक्त कुटुंबाप्रमाणेच जात ही ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. त्यामुळे, औद्योगिक अर्थव्यवस्था जाती आणि संयुक्त कुटुंब या दोन्हींना तिरका छेद देते. मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरणासमोर व्यावसायिक जाती टिकू शकत नाहीत. उदाहरणार्थ, विणकाम करणाऱ्या जातींच्या सदस्यांना त्यांचे पारंपारिक जातीय व्यवसाय पाळणे अत्यंत कठीण जात आहे कारण, त्यांना खुल्या बाजारात कापड गिरण्यांशी स्पर्धा करणे शक्य नाही. औद्योगीकरणाचा परिणाम म्हणून जातीय व्यवसाय पुढे नेण्याची परंपरा मोडीत निघाली आहे.

**३. शहरीकरण :** जीवनाच्या शहरी परिस्थितीत, जातीच्या 'अशुद्धतेच्या' संकल्पना प्रत्यक्षात आचरणात आणणे शक्य नसते.

**४. वाहतुकीची आधुनिक साधने :** वाहतुकीच्या आधुनिक साधनांमुळे लोकांची स्थानिक गतिशीलता वाढली आहे आणि त्यामुळे भौगोलिक विलगता संपुष्टात आली आहे, जी भारतातील जातिव्यवस्था निर्माण करण्यासाठी आणि चालू ठेवण्यासाठी अनुकूल परिस्थिती होती. शिवाय, बस, ट्रेन या आधुनिक वाहतुकीच्या साधनांनी प्रवास करताना, खाणे, पिणे आणि सामाजिक आंतरक्रमांबाबत जातीचे नियम पाळणे अशक्य आहे.

**५. संपत्तीचे महत्त्व वाढणे :** आपल्या सध्याच्या युगात, सामाजिक प्रतिष्ठेचा आधार म्हणून जन्माची जागा संपत्ती घेत आहे. परिणामी, जन्मावर आधारित असलेली जात ही आता सामाजिक प्रतिष्ठेचा आधार राहिलेली नाही.

**६. नवीन सामाजिक चळवळी :** भूतकाळात, जातिव्यवस्थेच्या विरोधात अनेक चळवळी सुरू केल्या गेल्या, परंतु त्यापैकी एकही यशस्वी होऊ शकली नाही, कारण त्या मुख्यतः त्यांच्या ध्येयामध्ये सुधारणावादी होत्या. त्यांनी कधीही सनातनीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही. परंतु राजा राम मोहन रॉय, दयानंद सरस्वती आणि इतरांनी सुरू केलेल्या सामाजिक चळवळी पूर्वीच्या चळवळींपेक्षा वेगळ्या होत्या, कारण त्या सनातनी ग्रंथांऐवजी तर्काच्या अधिकारावर आधारित होत्या. अशाप्रकारे, त्यांच्या विचारांचा देशातील बुद्धिजीवी वर्गावर जाती आणि समाजातील इतर वाईट गोष्टींविरुद्ध प्रभाव पडू शकला.

**<u>जातिव्यवस्थेच्या सातत्य/शाश्वततेची कारणे :</u>**

- जातिव्यवस्था ही त्यामुळे अंतर्गत रचना आणि कार्ये यांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात लवचिकता असलेली एक गतिशील वास्तव आहे.
- जातिव्यवस्थेचे सातत्य आणि त्याची कारणे तपासण्यासाठी आपल्याला या व्यवस्थेची उच्च पातळीची लवचिकता लक्षात घेण्याची गरज आहे.
- स्वातंत्र्योत्तर भारतीय राज्याला वारसा मिळाला आणि त्यात काही विरोधाभास दिसून आले. एकीकडे राज्य जाती निर्मूलनासाठी कटिबद्ध होते आणि राज्यघटनेत हे स्पष्टपणे लिहिले होते. दुसरीकडे, ज्यामुळे जातीय विषमतेच्या आर्थिक आधारास सुरुंग लागला असता, अशा मूलगामी सुधारणांना पुढे ढकलण्यास राज्य असमर्थ होते आणि इच्छुकही नव्हते.
- आणखी एका टप्प्यावर, राज्याने असे गृहीत धरले की, जर ते जाती-आंधळे पद्धतीने कार्य करत असेल, तर यामुळे आपोआपच जातीवर आधारित विशेषाधिकार कमी होतील आणि जात-संस्था अखेरीस संपुष्टात येईल. उदाहरणार्थ, सरकारी नोकऱ्यांवरील नियुक्तींमध्ये जातीचा विचार केला गेला नाही, अशा प्रकारे सुशिक्षित उच्च जाती आणि अशिक्षित किंवा बहुधा निरक्षर निम्न जातींना समान अटींवर स्पर्धा करण्यासाठी सोडले गेले. याला अपवाद फक्त अनुसूचित जाती आणि जमातीच्या आरक्षणाच्या स्वरूपात होता. दुसर्या शब्दांत सांगायचे तर, स्वातंत्र्यानंतर लगेचच काही दशकांत राज्याने उच्चवर्णीय आणि खालच्या जाती आर्थिक आणि शैक्षणिक दृष्टीने समानतेपासून खूप दूर असल्याच्या वस्तुस्थितीला सामोरे जाण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत.

- जात किती लवचिक असू शकते, हे अनेकदा उल्लेखनीयरित्या पाहायला मिळाले. औद्योगिक नोकऱ्यांमध्ये भरती, मग ते मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये (तेव्हाचे बॉम्बे), कोलकात्याच्या (तेव्हाच्या कलकत्ता) ज्यूट मिल्समध्ये असो किंवा इतरत्र, जात आणि नातेसंबंधाच्या आधारे केली जात होती. कारखान्यांसाठी कामगार भरती करणार्या मध्यस्थींचा कल त्यांच्या स्वतःच्या जातीतून आणि प्रदेशातून भरती करण्याकडे होता, जेणेकरून कारखान्यातील विशिष्ट विभागांवर त्या-त्या विशिष्ट जातींचे वर्चस्व राहील. अस्पृश्यांविरुद्धचा पूर्वग्रह बराच मजबूत होता आणि तो शहरापासूनही दूर नव्हता, जरी तो खेड्यात असू शकतो तितका टोकाचा नसला तरी.

- हे सारे पाहता ही आश्चर्याची गोष्ट मुळीच नाही की, सांस्कृतिक आणि देशांतर्गत क्षेत्रात जात ही सर्वात मजबूत बाब म्हणून सिद्ध झाली आहे. एंडोगॅमी, किंवा जातीमध्ये विवाह करण्याची प्रथा, आधुनिकीकरण आणि बदलानंतरही मुख्यत्वे अप्रभावित राहिली. आजही, जरी आंतरजातीय विवाह जास्त आहेत, तरी बहुतेक विवाह जातीच्या मर्यादेत होतात.

- कदाचित, बदलाचे सर्वात घडामोडींचे आणि महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे राजकारण. स्वतंत्र भारतात अगदी सुरुवातीपासूनच, लोकशाही राजकारणाला जातीचे घट्ट वलय नेहमीच राहिले आहे.

- तथाकथित अनुसूचित जाती आणि जमाती आणि मागासलेल्या जातींसाठी, जात ही अतीच दृश्यमान झाली आहे. खरंच त्यांच्या जातीने त्यांच्या ओळखीच्या इतर आयामांना ग्रहण लावले आहे. त्यांच्याकडे वारसाहक्काने मिळालेले शैक्षणिक आणि सामाजिक भांडवल नसल्यामुळे, आणि त्यांना आधीच बळकावलेल्या उच्चवर्णीय गटाशी स्पर्धा करणे आवश्यक असल्याने, त्यांना त्यांची जातीय ओळख सोडणे परवडणारे नाही कारण ही त्यांच्याकडे असलेल्या काही सामूहिक मालमत्तेपैकी एक आहे. शिवाय, त्यांना विविध प्रकारच्या भेदभावाचा सामना करावा लागतो. राजकीय दबावाला प्रतिसाद म्हणून राज्याने स्थापन केलेल्या आरक्षणाची आणि इतर प्रकारच्या संरक्षणात्मक भेदभावाची धोरणे त्यांची जीवनरेखा म्हणून काम करतात. परंतु या जीवनरेषेचा वापर केल्याने त्यांची जात सर्व-महत्त्वाची बनते आणि अनेकदा त्यांच्या ओळखीचा हा एकमेव पैलू जग ओळखतो.

**नवीन ओळखी प्रस्थापित करणारी जात व्यवस्था :**

- राज्याची विकासकामे आणि खाजगी उद्योगाच्या वाढीमुळे घडणाऱ्या आर्थिक बदलाच्या गतीने आणि तीव्रतेनेही अप्रत्यक्षपणे जातीवर परिणाम झाला. आधुनिक उद्योगाने सर्व प्रकारच्या नवीन नोकऱ्या निर्माण केल्या, ज्यासाठी कोणतेही जातीचे नियम नव्हते. शहरीकरण आणि शहरांमधील सामूहिक राहण्याच्या परिस्थितीमुळे सामाजिक परस्परसंवादाच्या जाती-विभाजित पद्धती टिकून राहणे कठीण झाले. एका वेगळ्या स्तरावर, आधुनिक सुशिक्षित भारतीयांनी व्यक्तिवाद आणि गुणवत्तेच्या उदारमतवादी विचारांकडे आकर्षित होऊन, अधिक टोकाच्या जाती प्रथा सोडून देण्यास सुरुवात केली.

- समकालीन काळातील जातिव्यवस्थेतील सर्वात लक्षणीय तरीही विरोधाभासी बदलांपैकी एक म्हणजे ती उच्चवर्णीय, शहरी मध्यम आणि उच्च वर्गासाठी 'अदृश्य' बनत गेली आहे. वसाहतोत्तर कालखंडातील विकासात्मक धोरणांचा सर्वाधिक फायदा झालेल्या या गटांसाठी, जातीचे महत्त्व लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून आले आहे कारण, जातीने तिचे कार्य खूप चांगले केले आहे. जलद विकासामुळे मिळणाऱ्या संधींचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी या गटांकडे आवश्यक आर्थिक आणि शैक्षणिक संसाधने आहेत, हे सुनिश्चित करण्यासाठी त्यांची जात स्थिती महत्त्वपूर्ण होती. विशेषत: उच्च जातीतील उच्चभ्रू लोकांना अनुदानित सार्वजनिक शिक्षण, विशेषत: विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यक आणि व्यवस्थापन या क्षेत्रातील व्यावसायिक शिक्षणाचा लाभ घेता आला. त्याचवेळी, स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या दशकात सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांच्या विस्ताराचाही त्यांना लाभ घेता आला. या सुरुवातीच्या काळात, उर्वरित समाजावर (शिक्षणाच्या बाबतीत) त्यांनी घेतलेल्या या आघाडीने हे सुनिश्चित केले की, त्यांना कोणत्याही गंभीर स्पर्धेचा सामना करावा लागणार नाही! दुस-या आणि तिसर्या पिढ्यांमध्ये त्यांचा विशेषाधिकार दृढ झाल्यामुळे, या गटांना असे वाटू लागले की, त्यांच्या प्रगतीचा जातीशी फारसा संबंध नाही. निश्चितपणे या गटांतील तिसर्या पिढ्यांसाठी त्यांचे आर्थिक आणि शैक्षणिक भांडवल पुरेशे आहे, ज्यामुळे ते जीवनाच्या शक्यतांच्या बाबतीत सर्वोत्तम मिळवत राहतील. या गटासाठी, आता असे दिसते की जातीचा त्यांच्या सार्वजनिक जीवनात कोणताही संबंध नाही, आणि ती धार्मिक प्रथा किंवा विवाह आणि नातेसंबंध या वैयक्तिक क्षेत्रापुरती मर्यादित राहिली आहे. तथापि, हा एक भिन्न स्वरूपाचा गट असण्याच्या वस्तुस्थितीमुळे आणखी एक गुंतागुंत निर्माण झाली आहे. जरी एक गट म्हणून विशेषाधिकार असलेले लोक हे मोठ्या प्रमाणावर उच्च जातीचे असले तरी, सर्व उच्च जातीचे लोक विशेषाधिकारप्राप्त नाहीत. काही गरीबही आहेत.

- भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप अजूनही सामाजिक जीवनात जातीय अस्मितेला प्रभावित करते. एखाद्याच्या उत्थानात तसेच एखाद्या व्यक्तीचा गैरवापर करण्यात ती महत्त्वाची भूमिका बजावते.
- आंतरजातीय आणि आंतर-धर्मीय विवाहांच्या वाढत्या प्रमाणामुळे भारतातील सामाजिक विणीची व जडणघडणीची गतिशीलता बदलली आहे.

**आधारभूत/प्रोत्साहनपर कृती :**

**अर्थ :**

आधारभूत/प्रोत्साहनपर कृती म्हणजे अशी धोरणे, जी वंचित गटांच्या सदस्यांना आधार देतात, ज्यांना यापूर्वी कोणत्या न कोणत्या स्वरूपात भेदभावाचा सामना करावा लागला आहे. आधारभूत/प्रोत्साहनपर कृती धोरणांचे स्वरूप प्रदेशानुसार बदलते आणि हे स्वरूप काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मदत देण्यापासून (राखीव कोटा पद्धत) तर, काही ठिकाणी केवळ वाढीव सहभागासाठी प्रोत्साहनापर्यंतच्या विविध टप्प्यात पाहायला मिळते. काही देश कोटा व्यवस्था वापरतात, ज्याद्वारे सरकारी नोकऱ्या, राजकीय पदे आणि शाळेतील रिक्त जागा ठराविक गटाच्या सदस्यांसाठी राखीव असणे आवश्यक असते; याचे उदाहरण म्हणजे भारतातील आरक्षण व्यवस्था होय.

**गरज/फायदे :**

- भारत ब्रिटिश साम्राज्यवादापासून आपल्या स्वातंत्र्यासाठी झगडत होता, तेव्हापासून स्वातंत्र्य सैनिकांच्या मनात जी अनेक उद्दिष्टे होती, त्यात जातीव्यवस्थेचे वाईट परिणाम निर्मूलन हे प्रमुख उद्दिष्ट होते. म्हणून, संविधान निर्मात्यांनी खालील तरतुदी केल्या :
- समानतेच्या मूलभूत अधिकारांमध्ये कायद्यासमोर समानता (अनुच्छेद १४), सामाजिक समानता आणि सार्वजनिक क्षेत्रात समान प्रवेश (अनुच्छेद १५), सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत समानता (अनुच्छेद १६) आणि अस्पृश्यता निर्मूलन (अनुच्छेद १७) यांचा समावेश होतो.
- जे खालच्या जातीतील लोकांचा छळ करतात, शोषण करतात किंवा भेदभाव करतात त्यांना शिक्षा करण्यासाठी, भारत सरकारने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ लागू केला.
- खालच्या जातीतील लोकांना शिक्षण आणि नोकऱ्या सुलभ करण्यासाठी, शैक्षणिक संस्था आणि रोजगाराच्या संधी इत्यादी ठिकाणी आरक्षणाच्या तरतुदी आहेत.
- अनुसूचित जाती आणि जमातींच्या कल्याणासाठी समाज कल्याण विभाग आणि राष्ट्रीय आयोगांची स्थापना, हे खालच्या जातीतील लोकांच्या उन्नतीसाठी उचललेले आणखी एक पाऊल आहे.
- राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील सरकारे वेळोवेळी मागासलेल्या जाती आणि दलितांच्या कल्याणासाठी कल्याणकारी योजना सुरू करतात. यांपैकी काही उपक्रमांमध्ये शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या योजना आणि इतरांचा समावेश आहे.

**तोटे :**

**उलट दिशेने होणारा भेदभाव :** 'उलट दिशेचा भेदभाव' ही एक अशी धारणा आहे, ज्यात विविध प्रकारच्या आधारभूत कृतींमुळे गैर-वंचित पार्श्वभूमीतून आलेल्या व्यक्ती आणि गटांविरुद्ध मात्र भेदभाव होतो, असे मानले जाते. प्रतिभावान व्यक्तींना समान संधी दिली जाऊ शकत नाही कारण, ते अल्पसंख्याक गटाचा भाग नाहीत. यामुळे बहुसंख्य आणि अल्पसंख्याक गटांमध्ये द्वेष निर्माण होऊ शकतो.

**गुणवत्तेचा अभाव :** गुणवत्ता ही एक महत्त्वाची व्यवस्था आहे, जिचा उद्देश अधिक सक्षम व्यक्तींना उच्च शिक्षणाच्या ठिकाणी पोहोचवणे आहे, जेणेकरून त्यांना जगात महत्त्वाचे बदल करण्यासाठी आवश्यक संसाधने आणि ज्ञान मिळू शकेल. एखाद्या विशिष्ट वंशाच्या, राष्ट्रीयत्वाच्या किंवा लिंगाच्या अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास विद्यापीठांना प्रोत्साहन देऊन, आधारभूत कृती ह्या शैक्षणिक संस्थांमधील गुणवत्तेला परावृत्त करू शकतात.

**खऱ्या चांगल्या कामगिरीचे/यशाचे महत्त्व कमी करणे :** अल्पसंख्याक गट आणि इतर वंचित गटातील व्यक्तींनी प्राप्त केलेल्या यशाला त्यांच्या स्वत:च्या मेहनतीपेक्षा आणि गुणवत्तेपेक्षा त्यांच्यासाठी लागू केल्या गेलेल्या आधारभूत कृतीचे परिणाम म्हणून मानले जाऊ शकते, जे त्यांच्या खर्या चांगल्या प्रयत्नांचे आणि त्यांच्या क्षमतेवरील आत्मविश्वासाचे महत्त्व कमी करण्यासारखे ठरू शकते.

**पुढे काय ? :**

ज्यांना त्यांच्या जातीची ओळख वापरायची नाही, अशा सर्वांसाठी सरकारने जात नाही अशी लोकांची श्रेणी तयार करणे आवश्यक आहे. आंतरजातीय विवाहांतून जन्मलेली मुले या श्रेणीत असणे आवश्यक आहे. लोकांनी त्यांची जात आणि जातीवर आधारित आडनावे सोडावीत यासाठी सामाजिक चळवळ सुरू केली जाऊ शकते. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्याची गरज असू शकते. एखाद्या व्यक्तीची जात विचारणे हा दखलपात्र गुन्हा ठरवला जाऊ शकतो आणि सर्व जाती-आधारित संघटनांवर बंदी घातली पाहिजे. आधारभूत कृतीची कारणे वगळता जातीचे सर्व उल्लेख काढून टाकले पाहिजेत.

या सर्व सामर्थ्यशाली शक्तींच्या परिणामामुळे भारतातील जातीच्या किल्ल्याच्या भिंतींना रुंद भेगा पडायला सुरुवात झाली आहे. पण जाती व्यवस्थेचा तो किल्ला पूर्णपणे कोलमडला आहे, असे समजणे मोठी चूक ठरेल.

**परिचय :**

सामान्यतः विविधता म्हणजे फरक. तथापि, आपल्या हेतूंसाठी याचा अर्थ फक्त फरक किंवा भेदांपेक्षा जरा अधिक आहे. याचा अर्थ सामूहिक फरक, म्हणजे, फरक जे लोकांच्या एका गटाला दुसर्या गटापासून वेगळे करतात. हे फरक कोणत्याही प्रकारचे असू शकतात : जैविक, धार्मिक, भाषिक इ. जैविक फरकांच्या आधारावर, उदाहरणार्थ, आपल्याकडे वांशिक विविधता आहे. तसेच धार्मिक भेदांच्या आधारावर, आपल्याकडे धार्मिक विविधता आहे. येथे लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा आहे की, विविधता सामूहिक फरकांना सूचित करते.

जेव्हा आपण म्हणतो की, भारत हे महान सांस्कृतिक विविधतेचे राष्ट्र आहे, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की येथे विविध प्रकारचे सामाजिक गट आणि समुदाय राहतात. हे भाषा, धर्म, पंथ, वंश किंवा जात यासारख्या सांस्कृतिक चिन्हांद्वारे परिभाषित केलेले समुदाय आहेत.

**विविधतेची उदाहरणे :**

**धार्मिक विविधता :** २०११ च्या जनगणनेनुसार धार्मिक समुदायांच्या लोकसंख्येच्या आकडेवारीनुसार, हिंदू ९६.६३ कोटी (७९.८%); मुस्लिम १७.२२ कोटी (१४.२%); ख्रिश्चन २.७८ कोटी (२.३%); शीख २.०८ कोटी (१.७%); बौद्ध ०.८४ कोटी (०.७%); जैन ०.४५ कोटी (०.४%) हे संपूर्ण देशात विखुरलेले आहेत आणि त्यांचे सांस्कृतिक कप्पे आहेत.

**वांशिक विविधता :** बहुतेक समकालीन मानववंशशास्त्रज्ञ भारतीयांना वांशिक मिश्रणाशी संबंधित म्हणून वर्गीकृत करतात. मंगोलॉइड्स मुख्यत्वे उत्तर-पूर्व प्रदेशात मर्यादित आहेत तर नेग्रिटो अंदमान बेटांवर आढळतात.


**भारतीय समाजाची रचना :**

बहुलता आणि बहुविधता हे भारतीय समाज आणि संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. भारताने आपल्या वाढत्या संस्कृतीत विविध बाह्य घटकांना सामावून घेतले आहे आणि आत्मसात केले आहे. तथापि, ते कधीही असे 'विरघळून जाणारे' नव्हते, ज्यामध्ये सगळ्यांचे सर्व मतभेद विसर्जित झाले आणि एकसमान ओळख निर्माण झाली. उलट, भारत हे एखाद्या 'सॅलड बाऊल'चे एक स्पष्ट उदाहरण आहे, ज्यामध्ये वेगवेगळे घटक त्यांची वैयक्तिक ओळख टिकवून ठेवतात आणि तरीही एकत्रितपणे राहत जणू ते एक वेगळी पाककृती तयार करतात. या अर्थाने भारत हा विविधतेत एकता आहे, ज्यात सहिष्णुता आणि परस्पर आदराच्या तत्त्वाचे पालन आहे.

**वांशिक विविधता :**

भारतीय लोकांची वांशिक आणि भाषिक आधारावर चार प्रमुख गटांमध्ये विभागणी केली जाऊ शकते. पहिल्या गटात निओलिथिक आणि पॅलेओलिथिक पुरुषांचा समावेश आहे, जे या देशात दुर्गम भूतकाळापासून राहत होते. लोकांचा दुसरा गट मंगोलॉइड प्रकारातील असून, ते भूतान, सिक्कीम आणि नेपाळमध्ये आढळतात. तिसरा गट देशाच्या दक्षिण भागात राहणारे द्रविड म्हणून ओळखला जातो. चौथ्या गटात भारताच्या उत्तर-पश्चिम भागात राहणार्या उंच आणि गोऱ्या रंगाच्या इंडो-आर्यांचा समावेश होतो. हळूहळू त्यांनी संपूर्ण गंगेचे खोरे हे आपली वसाहत बनविले. कालांतराने द्रविड आणि आर्य एकमेकांच्या जवळ आले. पर्शियन, ग्रीक, कुशाण आणि हूण यांसारख्या इतर जाती वेगवेगळ्या कालखंडात

भारतात आल्या आणि देशात कायमस्वरूपी स्थायिक झाल्या. सातव्या शतकापासून मुस्लिम आक्रमकांनी भारताला आपले शिकारस्थान बनवले. अरब, तुर्क आणि मुघल भारतात येऊन स्थायिक झाले. अशा प्रकारे वांशिक विविधता भारतीय समाज आणि संस्कृतीत महत्त्वाची भूमिका बजावतात.




**भाषिक विविधता :**

भारताचे यथायोग्य वर्णन 'बहूभाषांवर प्रभूत्व असणारा देश' – अनेक भाषांचा देश असे केले जाते. भारतात १२१ भाषा आहेत ज्या १०,००० किंवा त्याहून अधिक लोक बोलतात.

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी, ९६.७१ टक्के लोकांची मातृभाषा अनुसूचित भाषांपैकी एक आहे. उर्वरित ३.२९ टक्के इतर भाषांतील आहेत. भारतीय संघराज्यातील प्रत्येक राज्यात भाषिक वैविध्य आढळते, हे नमूद केले पाहिजे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना झाली हे खरे आहे, परंतु या पुनर्रचनेने राज्यांचे व्यक्तिगत असे बहुभाषिक चारित्र्य मात्र पुसले गेले नाही.




**धार्मिक विविधता :**

भारत हा अनेक धर्मांचा देश आहे. ज्यापैकी बरेच लोक अजूनही पूर्व–धार्मिक शत्रुत्व आणि जादूच्या अवस्थेतच राहत आहेत, अशा आदिवासी समाजांव्यतिरिक्त, भारतीय लोकसंख्येमध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध आणि जैन आहेत.

हिंदू स्वतः वैष्णव, शैव, शाक्त, स्मार्त इत्यादी अनेक पंथांमध्ये विभागले गेले आहेत. त्याचप्रमाणे, मुस्लिम हे शिया, सुन्नी, अहमदिया इत्यादी पंथांमध्ये विभागले गेले आहेत.

त्याचप्रमाणे, लिंगायत, कबीरपंथ, राधास्वामी, स्वामी नारायणी, आर्य समाज आणि ब्राह्मो समाज यांसारख्या अनेक चळवळी ह्या चुकीने एक स्वतंत्र धर्मच म्हणून मानल्या गेल्या आहेत. त्या अर्थाने हिंदू धर्म हा काही एकाच मोठ्या आणि संपूर्ण खंडाच्या स्वरूपात बनलेला नाही. तो त्याच्या अनुयायांना उपासनेसाठी निवडलेल्या कोणत्याही मार्गाचे अनुसरण करण्यास अनुमती देतो.

भारतात इस्लामच्या आगमनाने देशातील धर्मांच्या बहुलतेमध्ये भर पडली.

इसवी सनाच्या पहिल्या शतकात केरळमध्ये ख्रिश्चन धर्माची ओळख झाली, जेव्हा प्रेषित सेंट थॉमस तेथे आले आणि मलबार किनारपट्टीवर त्यांनी सात चर्चची स्थापना केली. त्यांच्या वंशजांना 'सीरियन ख्रिश्चन' म्हणतात. ख्रिश्चन देखील रोमन कॅथलिक आणि प्रोटेस्टंट यांच्यात विभागलेले आहेत.

भारतात पारशी आणि ज्यूंचे छोटे धार्मिक गटही आहेत. पारशी लोक इसवी सन ८व्या शतकात पर्शियातून आले आणि पश्चिम किनार्यावर स्थायिक झाले. पारशी धर्माचे पालन करणारे, पारशी गुजराती बोलतात आणि भारतीय छाप असलेला वेगळा पोशाख घालतात. केरळमधील कोची आणि महाराष्ट्रात कोकणात ज्यू एकवटले होते.




**जातीची विविधता :**

भारत हा जातींचा देश आहे. जात हा शब्द साधारणपणे दोन अर्थाने वापरला जातो : कधी वर्ण या अर्थाने तर कधी जात या अर्थाने. वर्ण म्हणजे कार्यात्मक निकषावर आधारित हिंदू समाजाच्या चतुष्भाग विभागणीचा एक भाग. चार वर्ण (चातुर्वर्ण) म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. त्यांचे विशेष कार्य म्हणजे शिक्षण, संरक्षण, व्यापार आणि हाताने/स्वकष्टाने दिल्या जाणाऱ्या सेवा. वर्णानुक्रम संपूर्ण भारतात स्वीकारला जातो. जात म्हणजे विशिष्ट पारंपारिक व्यवसाय करणारा आणि आनुवंशिक अंतर्विवाह पद्धतींनी जगणारा गट. भारतात ३,००० पेक्षा जास्त जाती आहेत. वेगवेगळ्या धर्मांमध्ये त्या पदानुक्रमानुसार वेगवेगळ्या प्रकारे वर्गीकृत आहेत. जातिव्यवस्थेची प्रथा केवळ हिंदूंपुरती मर्यादित नाही. मुस्लिम, ख्रिश्चन, शीख तसेच इतर समुदायांमध्येही जाती आढळू येतात.

**सांस्कृतिक विविधता :**

सांस्कृतिक नमुने प्रादेशिक भिन्नता दर्शवतात. लोकसंख्येच्या विविधतेमुळे, भारतीय संस्कृतीत विविध संस्कृतींचे मिश्रण असल्याने प्रचंड विविधता आहे. विविध धर्म, जाती, प्रांत आपापली परंपरा आणि संस्कृती पाळतात. अशा प्रकारे, कला, वास्तुकला, नृत्य प्रकार, नाट्य प्रकार, संगीत इत्यादींमध्ये भिन्नता आहे.

**भौगोलिक विविधता :**

३.२८ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रफळावर पसरलेला भारत हा कोरडे वाळवंट, सदाहरित वने, उंच पर्वत, बारमाही आणि बारमाही नसणाऱ्या नद्या, लांब किनारे आणि सुपीक मैदाने यासारख्या भौतिक वैशिष्ट्यांच्या विविधतेसह एक विशाल देश आहे.

भारतामध्ये विशाल भौगोलिक प्रदेशामध्ये उंच पर्वत आणि सखल मैदाने, उत्तरेकडील गोठवणारी थंडी आणि दव असलेले क्षेत्र आणि दक्षिणेकडील उष्णकटिबंधीय उष्णता, चेरापुंजी सारखी जास्त पावसाची ठिकाणे आणि राजस्थानची कोरडवाहू भूमी अशी विविधता आहे. प्रादेशिक आणि हवामानातील विविधता त्या भागातील समुदायाच्या सांस्कृतिक पद्धतीवर प्रभाव टाकतात. अर्थात, या सर्व विविधतेसह, या लोकांमध्ये एकतेची भावना विकसित झाली आहे, ज्यामुळे आपल्याला आपल्या संस्कृतीत सातत्य आढळते.




वर वर्णन केलेल्या विविधतेच्या प्रमुख प्रकारांव्यतिरिक्त, आपल्याकडे इतर अनेक प्रकारची विविधता आहे ,जसे की वस्तीचे स्वरूप – आदिवासी, ग्रामीण, शहरी; धार्मिक आणि प्रादेशिक चौकटींसह विवाह आणि नातेसंबंध यांचे प्रकार इ. अशा प्रकारे संपूर्ण भारतीय उपखंडात विविधता पसरलेली आहे. अर्थात, अशी ही विविधता हे काही भारतीय संस्कृतीचे मुख्य वैशिष्ट्य नाही तर, या सर्व विविधतेला सामावून घेणारी एकता हा खरंतर भारतीय संस्कृतीचा खरा मुख्य गाभा आणि वैशिष्ट्य आहे.

**विविधतेची कारणे :**

- भारतीय उपखंडात त्याच्या राष्ट्रीय सीमेअंतर्गत विविध भौगोलिक वैशिष्ट्यांचा समावेश होतो. भूगोलातील फरकामुळे लोकांच्या जीवनशैलीत आणि नित्य पद्धतींमध्ये मोठा फरक येतो.
- हिमालयाजवळ राहणाऱ्यांचे अन्न, पीक उत्पादन, नोकऱ्या, वाहतुकीची साधने इ. हे थारच्या वाळवंटात राहणाऱ्या लोकांपेक्षा वेगळे असतील. यातून भूगोलामुळे विविधता कशी येते हे दिसते.
- ऐतिहासिकदृष्ट्या बोलायचे झाल्यास, वेगवेगळ्या राज्यकर्त्यांनी वेगवेगळ्या कालखंडांत भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांवर कब्जा केला आणि अशा प्रकारे विविध संस्कृती आणल्या. मग ते मुघल असो, मराठे असो, राजपूत असो किंवा नंतर इंग्रजही असो– प्रत्येक शासकाने आपल्याबरोबर संस्कृती, वंश आणि वारसा यांचे वेगळेपण आणले, जे पूर्णपणे पुसले जाऊ शकत नाही. अशा प्रकारे, इतिहास पुन्हा विविधतेची हाक देतो.
- आधुनिक काळाबद्दल बोलायचे तर, जागतिकीकरणाच्या शिखरावर असताना, व्यवहारातील बदलांचे हस्तांतरण वेगाने वाढले आहे. विशेषत: परदेशी व्यापार आणि पर्यटनास सुरुवात झाल्यापासून हे अधिक वेगाने घडले. आज आपला व्यापार केवळ वस्तू आणि सेवांपुरता मर्यादित नाही. आपण पारंपारिक पद्धतींचा व्यापारही कधीकधी नकळतपणे करत असतो.
- अशा प्रकारे विविधता निर्माण झाली आहे, कारण भारत जगाच्या प्रत्येक भागातून आलेल्या लोकांसाठी खुला आहे. जेव्हा लोक एखाद्या ठिकाणी आणि ठिकाणाहून प्रवास करतात, तेव्हा ते त्यांच्यासोबत जुन्या परंपरा आणि नवीन प्रथा आणतात.

**विविधतेचे फायदे आणि तोटे :**

**भारतातील विविधतेमध्ये एकता :**

एकता म्हणजे एकात्मता. ही एक सामाजिक मानसिक स्थिती आहे. ही एक असण्याची भावना, 'आपण'त्वाची भावना दर्शवते. हा एक बंध आहे, जो समाजातील सदस्यांना एकत्र ठेवतो. विविधतेत एकता म्हणजे एकरूपतेशिवाय एकता आणि विखंडनाविना विविधता. विविधता मानवी परस्परसंवादाला समृद्ध करते, या कल्पनेवर आधारित ही संकल्पना आहे. तीव्र आर्थिक आणि सामाजिक विषमतेतूनही राष्ट्रीय एकात्मता आणि अखंडता टिकून राहिली आहे. अशा प्रकारे, भारत एकाच एकात्मिक सांस्कृतिक चौकटीत दुर्मिळ अशी बहुसांस्कृतिक परिस्थिती दर्शविते.

**भारतातील विविधतेतून एकतेकडे नेणारे घटक :**

**भौगोलिक एकता :**

भारतात, तो आकाराने खूप मोठा असला तरी, नैसर्गिक सीमांसह भौगोलिक एकता आहे. त्याला एका बाजूला भव्य अशा हिमालयाने वेढलेले आहे आणि दुसऱ्या बाजूला मोठ्या समुद्रांनी वेढलेले आहे. या नैसर्गिक सीमा भूभागाला भौगोलिक एकता देतात. 'भारत वर्ष' या शब्दाचा अर्थ, भारताने नेहमीच उत्तरेकडील हिमालयापासून दक्षिणेला केप कोमोरिनपर्यंत आणि पूर्वेला ब्रह्मपुत्रेपासून पश्चिमेला सिंधूपर्यंत पसरलेल्या या विशाल विस्ताराचा संदर्भ दिला आहे. धार्मिक विचारवंत, राजकीय तत्त्वज्ञ, कवी, राज्यकर्ते, आणि राजे यांनी नेहमीच भारतवर्षाची कल्पना या अर्थाने केली आहे. आजही भारत माता म्हणजे ही अफाट पसरलेली भूमी.

**राजकीय एकता :**

धार्मिक आणि सांस्कृतिक ऐक्याचा एक भाग असणारी राजकीय एकता ही भारतीयांसाठी अज्ञात गोष्ट नाही. संपूर्ण देशाला एका केंद्रीय अधिकाराखाली आणण्याचा विचार हा भारतातील महान राजे आणि राज्यकर्त्यांसाठी नेहमीच प्राधान्याने राहिला आहे. 'चक्रवर्ती' ही संकल्पना स्पष्टपणे एका अधिकाराखाली भारताच्या राजकीय एकीकरणाच्या कल्पनेला सूचित करते. भूतकाळातील अनेक राजे हे 'चक्रवर्ती' पदवी मिळविण्याच्या महत्त्वाकांक्षेने पेटलेले असत. त्यासाठी त्यांनी युद्धे लादली आणि संपूर्ण भूमीवर वर्चस्व प्रस्थापित केले. प्राचीन भारतीय साहित्यात आपल्याला दिलीप, सागर, ययाती, मांधाता आणि युधिष्ठिर यांसारख्या राजांचा उल्लेख असलेल्या कथा आढळतात, ज्यांनी चक्रवर्ती म्हणून हे अत्यंत प्रतिष्ठित स्थान प्राप्त केले होते. नंतरच्या काळातील चंद्रगुप्त मौर्य, अशोक, समुद्र गुप्त आणि इतर राजांनीही हा सार्वभौम अधिपती होण्याचा मान मिळवला. भूतकाळात राजे ही पदवी मिळविण्यासाठी इतर कोणत्याही उद्देशाशिवाय इतरांविरुद्ध युद्ध घोषित करत असत. अश्वमेध यज्ञासारख्या धार्मिक पद्धतींचा प्रसार केवळ एका केंद्रीय अधिकाराखाली भारताच्या राजकीय एकीकरणाच्या कल्पनेला दिलेला धार्मिक पाठिंबा दर्शवतो.

**घटनात्मक ओळख :** संपूर्ण देशाचा कारभार एकाच राज्यघटनेद्वारे चालतो. बहुतेक राज्ये तीन स्तरीय सरकारी संरचनेच्या सामान्यीकृत योजनेचे अनुसरण करतात, अशा प्रकारे राष्ट्रीय शासनाच्या चौकटीत एकसमानता प्रदान करते. पुढे, संविधान सर्व नागरिकांना त्यांचे वय, लिंग, वर्ग, जात, धर्म इत्यादीच्या पल्याड जात काही मूलभूत अधिकारांची हमी देते.

**धार्मिक सहअस्तित्व :** धर्म सहिष्णुता हे भारतातील धर्मांचे अद्वितीय वैशिष्ट्य आहे ज्यामुळे भारतात अनेक धर्म सहअस्तित्वात आहेत. धर्मस्वातंत्र्य आणि धार्मिक आचरणाची हमी राज्यघटनेनेच दिली आहे. शिवाय, कोणताही राज्यधर्म नाही आणि राज्याकडून सर्व धर्मांना समान प्राधान्य दिले जाते.

**आंतर–राज्य गतिशीलता :** संविधान अनुच्छेद १९ (१) (व) अंतर्गत संपूर्ण भारताच्या प्रदेशात फिरण्याच्या स्वातंत्र्याची हमी देते, त्यामुळे जनतेमध्ये एकता आणि बंधुत्वाची भावना वाढीस लागते. इतर घटक जसे की कायद्याची एकसमान रचना, दंड संहिता आणि प्रशासकीय कामे (उदा. अखिल भारतीय सेवा) हे गुन्हेगारी न्याय व्यवस्था, धोरण अंमलबजावणी इ. मध्ये एकसमानता आणतात.

**आर्थिक एकात्मता :** भारतीय राज्यघटनेने कलम ३०१ अंतर्गत भारताच्या प्रदेशात व्यापार, वाणिज्य आणि परस्परसंबंधांचे स्वातंत्र्य सुरक्षित केले आहे. पुढे, वस्तू आणि सेवा कर (ऋडढ) ने 'एक देश, एक कर, एक राष्ट्रीय बाजारपेठ' साठी मार्ग मोकळा केला आहे. अशा प्रकारे विविध क्षेत्रांमध्ये एकता निर्माण होते.

**तीर्थक्षेत्र आणि धार्मिक प्रथा :** भारतात धर्म आणि अध्यात्माला खूप महत्त्व आहे. उत्तरेला बद्रीनाथ आणि केदारनाथ ते दक्षिणेला रामेश्वरम, पूर्वेला जगन्नाथ पुरी ते पश्चिमेला द्वारकापर्यंत धार्मिक तीर्थस्थानं आणि पवित्र नद्या देशभर पसरलेल्या आहेत. तीर्थक्षेत्राच्या जुन्या संस्कृतीचा त्यांच्याशी

जवळचा संबंध आहे, ज्याने नेहमीच लोकांना देशाच्या विविध भागात हलवले आणि त्यांच्यामध्ये भौगोलिक-सांस्कृतिक एकतेची भावना वाढवली.

**मेळे आणि सण :** देशाच्या सर्व भागांतील लोक त्यांच्या स्वतःच्या स्थानिक रीतिरिवाजानुसार ते साजरे करतात म्हणून ते एकात्मिक घटक म्हणून देखील कार्य करतात. उदा. दिवाळी हा सण देशातील हिंदू सर्वत्र साजरी करतात; त्याचप्रमाणे ईद आणि ख्रिसमस हे अनुक्रमे मुस्लिम आणि ख्रिश्चन साजरे करतात. भारतात आंतरधर्मीय सणही साजरे केले जातात.

**मान्सूनद्वारे हवामान एकात्मता :** संपूर्ण भारतीय उपखंडातील वनस्पती आणि प्राणी, कृषी पद्धती, लोकांचे जीवन आणि त्यांचे सण भारतातील पावसाळ्याच्या आसपास असल्याचे दिसून येते.

**क्रीडा आणि चित्रपट :** देशातील लाखो लोक त्यांचे अनुसरण करतात, अशा प्रकारे, भारतभर ते लोकांना घट्ट धरून ठेवणारे बंधन म्हणून काम करतात.

**भारताच्या एकात्मतेला धोका निर्माण करणारे घटक :**

**प्रादेशिकता :** प्रादेशिकता ही राष्ट्रीय हितसंबंधांपेक्षा विशिष्ट प्रदेश/प्रदेशांचे हित अधोरेखित करते. त्याचा राष्ट्रीय एकात्मतेवरही विपरीत परिणाम होऊ शकतो. प्रादेशिक मागण्या आणि त्यानंतरच्या आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेला खीळ बसली आहे.

**फुटीरतावादी राजकारण :** काहीवेळा, राजकारणी मते मिळविण्यासाठी जात, धर्म इ. यासारख्या ओळखींचा वापर करतात. या प्रकारच्या फुटीरतावादी राजकारणामुळे हिंसा वाढू शकते तसेच अल्पसंख्याकांमध्ये अविश्वास आणि संशयाची भावना निर्माण होऊ शकते.

**विकासातील असमतोल :** सामाजिक-आर्थिक विकासाचे असमान स्वरूप, अपुरी आर्थिक धोरणे आणि परिणामी येणारी आर्थिक विषमता, यामुळे क्षेत्र मागासले जाऊ शकते. परिणामी, याची निष्पत्ती हिंसाचारात होऊ शकते, स्थलांतराच्या लाटा सुरू होऊ शकतात आणि अलिप्ततावादाच्या मागण्यांनाही वेग येऊ शकते. उदाहरणार्थ, ईशान्य प्रदेशाच्या आर्थिक मागासलेपणामुळे, या प्रदेशात फुटीरतावादी मागण्या आणि अलिप्ततावादी प्रवृत्तींची अनेक उदाहरणे उगवली आहेत.

**वांशिक भेदभाव आणि राष्ट्रवाद :** वांशिक भेदभावामुळे बर्याचदा वेगवेगळ्या वांशिक गटांमध्ये भांडणे होतात, विशेषत: नोकरीची स्पर्धा, मर्यादित संसाधने, ओळखीला निर्माण झालेला धोका इत्यादी कारणांमुळे हे घडते. उदा. आसाममध्ये बोडो आणि बंगाली भाषिक मुस्लिमांमध्ये वारंवार संघर्ष होत आहेत. हे भूमिपुत्र तत्वसिद्धांताच्या परिप्रेक्ष्यात दिसून येते, ज्यात लोकांना त्यांच्या जन्मस्थानाशी जोडले जाते आणि त्यांना काही फायदे, अधिकार, भूमिका आणि जबाबदाऱ्या प्रदान केल्या जातात, जे इतरांना लागू होणार नाही.

**भौगोलिक विलगता :** भौगोलिक विलगता ही देखील स्वतंत्र ओळखीचे प्रश्न आणि फुटीरतावादी मागण्या निर्माण करू शकते. ईशान्य भारत भौगोलिकदृष्ट्या देशाच्या इतर भागापासून वेगळा आहे कारण तो एका अरुंद कॉरिडॉरने म्हणजेच 'सिलीगुडी कॉरिडॉर'ने देशाच्या इतर भागाशी जोडलेला आहे. या प्रदेशात अपुरी पायाभूत सुविधा आहेत, देशाच्या इतर भागाच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या अधिक मागासलेला आहे. याचा परिणाम म्हणून त्याने अलिप्ततावाद आणि सीमापार दहशतवादाच्या अनेक घटना अनुभवल्या आहेत.

**आंतर-धार्मिक संघर्ष :** आंतर-धार्मिक संघर्ष केवळ भीती आणि अविश्वास पसरवून दोन समुदायांमधील संबंधांमध्ये बाधाच आणत नाहीत, तर देशाच्या धर्मनिरपेक्ष विणीपुढेही अडथळा आणतात.

**आंतरराज्य संघर्ष :** यामुळे प्रादेशिकतेशी संबंधित भावनांचा उदय होऊ शकतो. हे परस्परविरोधी राज्यांमधील व्यापार आणि दळणवळणावर देखील परिणाम करू शकते. उदाहरणार्थ, कर्नाटक आणि तामिळनाडूमधील कावेरी नदीचा वाद.

**विविधतेतील एकतेचे फायदे आणि तोटे :**

**फायदे :**

विविधतेतील एकता कामाच्या ठिकाणी, संस्था आणि समुदायातील व्यक्तींचे मनोबल वाढवते.

- हे सहकार्य, नातेसंबंध, लोकांमधील परस्परसंवाद वाढवण्यास मदत करते, ज्यामुळे कामाची गुणवत्ता, उत्पादकता आणि जीवनशैली सुधारते.

- हे अत्यंत कठीण परिस्थितीतही संवाद वाढण्यास मदत करते.
- लोकांना सामाजिक वितुष्टांपासून दूर ठेवते आणि यामुळे संघर्ष अधिक सहजपणे व्यवस्थापित करण्यात मदत होते.
- हे निरोगी मानवी संबंधांना प्रोत्साहन देते आणि सर्व लोकांच्या समान हक्कांचे संरक्षण करते.
- विविधतेतील एकता भारतासाठी पर्यटनाचा स्त्रोत प्रदान करते. सर्व स्तरातील लोक, संस्कृती, धर्म आणि वेष हे जगभरातील अनेक अभ्यागत आणि पर्यटकांना आकर्षित करतात.
- हे सर्व, जरी एकमेकांपासून वेगळे असले तरी, याचा जगातील लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेचा सराव होण्यात मदत होते.
- हे देशाचा समृद्ध वारसा आणि शिवाय भारताचा सांस्कृतिक वारसा मजबूत आणि वर्धित करते.
- हे कृषी क्षेत्रात जैवविविधतेलाही वाव देते. शिवाय, कृषी क्षेत्राच्या आर्थिक अपेक्षांनाही पूर्ण करण्यात मदत करते.
- देशाच्या विविध भागांमध्ये कुशल आणि विकसनशील व्यावसायिकांचा स्त्रोत यातून निर्माण होतो.

**तोटे :**

- यामुळे विविध राज्यांमध्ये आणि भाषिक मूळाच्या लोकांमध्ये अनेक सामाजिक तणाव निर्माण होऊ शकतात.
- यामुळे देशातील अनेक क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचार आणि निरक्षरता निर्माण होते.
- अविकसित पाया, विजेची कमतरता, रस्ते इत्यादी हे विविध खेड्यांच्या क्षेत्रांतील खराब जीवनशैलीचे मूळ असू शकते.

विविधतेमुळे निर्माण झालेली आव्हाने असूनही, भारतीय समाज टिकवून ठेवण्यात आणि विकसित करण्यात सामाजिक-सांस्कृतिक विविधतेने बजावलेल्या भूमिकेवर कुठलीही शंका असू शकत नाही. समस्या विविधतेची नाही, तर भारतीय समाजातील विविधतेच्या हाताळणीची आहे. प्रादेशिकता, सांप्रदायिकता, वांशिक संघर्ष इत्यादी समस्या निर्माण झाल्या आहेत, कारण विकासाची फळे समान प्रमाणात वाटली गेली नाहीत किंवा काही गटांच्या संस्कृतींना योग्य मान्यता दिली गेली नाही.

****

# भारतातील महिलांची भूमिका आणि स्थिती

भारतातील महिलांची भूमिका आणि स्थिती हा एक अतिशय चर्चेचा मुद्दा आहे ज्यावर दररोज उत्कटतेने चर्चा केली जाते, कारण अधिकाधिक महिलांना त्यांच्याबाबतच्या असमानतेची आणि पक्षपातीपणाची जाणीव होत आहे. जगभरातील, दारिद्र्य आणि हिंसाचार यांच्याशी लढण्यासाठी महिला एक न वापरलेले संसाधन आहेत.

**भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महिलांची भूमिका :**

भारताचा स्वातंत्र्यलढा हा इतिहासातील एक असा एक प्रसंग आहे, ज्यात लोक आणि वसाहतवादी राज्य यांच्यातील संघर्षादरम्यान महिलांनी गृहनिर्माण, माता आणि पत्नी या त्यांच्या नियमित भूमिकेतून बाहेर पडून नवीन राष्ट्राची संकल्पना साकारण्याची जबाबदारी स्वीकारली होती. हे घडत असताना त्या आपल्या पुरुष- जोडीदारांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या होत्या आणि जनतेने या उद्देशासाठी उभे राहावे याच्या प्रयत्नात होत्या. रॅली काढण्यासाठी, गोळ्यांचा सामना करण्यासाठी, दुकाने फोडण्यासाठी, प्रचारात सहभागी होण्यासाठी त्या सज्ज होत्या. त्यांनी स्वयंपूर्णतेला मूर्त रूप दिले, जसे गांधींनी चरखा (घरगुती कापड कताईसाठी कताईचे यंत्र) वापरून कताईच्या कौशल्याद्वारे प्रथम स्वयंपूर्णतेची कल्पना केली होती.

आदर्शवत परिस्थितीत चरख्याचा उपयोग करून कापड कातणे, हा स्त्रियांनी घरांत बसून करण्याचा व्यवसाय मानला जातो, मात्र हाच चरखा आणि त्यावरून कापड कातणे हे लोकांमधील स्वातंत्र्य-प्रेरणेसाठीचे एक महत्त्वाचे प्रतीक बनले. स्त्रियांनी सरावलेल्या कताईच्या कलेसारख्या घरातून निर्माण होणाऱ्या आदर्शांमध्ये भारताचा पाय रोवला गेला आहे, हे लक्षात घेता, नुकतेच जन्माला आलेले राष्ट्र आपल्या महिलांना न्याय्य समाजाचे उदाहरण म्हणून उभे राहण्यासाठी सक्षम करण्याची गरज लक्षात ठेवेल, हे साहजिक होते.

स्वतंत्र व प्रजासत्ताक भारताच्या राज्यघटनेने या अपेक्षेची निराशा केली नाही आणि निश्चितपणे, स्त्रियांना त्यांचे हक्क कागदावर, कायदे आणि घटनात्मक तरतुदींमध्ये एकत्रित करून दर्जेदार जीवनाची व्याख्या करणार्या सर्व पैलूंसाठी समान अधिकार संविधानात दिलेले आढळले.

**राष्ट्र उभारणीत भारतीय महिलांची भूमिका :**

देशाची वाढ ही त्याच्या अर्थव्यवस्थेवर अवलंबून असली तरी, देशातील महिला किती यशस्वी आहेत, हा देशाची वाढ मोजण्याचा खरा मार्ग आहे. गेल्या काही दशकांत, भारतामध्ये आयटी, उद्योग, बँकिंग, औषध, रिअल इस्टेट, कापड इ. सारख्या विविध क्षेत्रांवर राज्य करणाऱ्या महिलांच्या संख्येत वाढ झाली आहे.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात स्त्रियांच्या स्थितीला अनुकूल वळण मिळाले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर नेहरूंसह गांधी. डॉ. राजेंद्र प्रसाद अशा बहुतेक राष्ट्रीय नेत्यांना स्त्री मुक्ती आवश्यक आहे, याची जाणीव झाली. त्यांना हेही लक्षात आले की, जोपर्यंत स्त्रियांच्या परिस्थितीत सुधारणा होत नाही आणि त्यांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा मिळत नाही, तोपर्यंत भारताची प्रगती होऊ शकत नाही. देशाच्या लोकसंख्येत अंदाजे ४०% महिला आहेत. तिला देशाच्या विकासाचे काम दिले तर ती आश्चर्यचकित करणारी कामगिरी करू शकते. ती अधिक समर्पित, अधिक मेहनती, अधिक प्रामाणिक, अधिक समर्पित आहे. अनेक सामाजिक दुष्कृत्ये जसे; हुंडाबळी, स्त्रियांमधील निरक्षरता, गर्भातच मुलीची हत्या, स्वच्छताविषयक मुल्यांकडे दुर्लक्ष, पोलिओ इत्यादी समस्यांना महिलांच्या सक्रिय सहभागाने हाताळता येईल. अनेक महिलांनी स्वतःला गतिमान, चैतन्यशील, प्रामाणिक आणि अनेक क्षेत्रात परिपूर्ण सिद्ध केले आहे.

१९९२ मध्ये पारित झालेल्या ७३व्या आणि ७४व्या घटनादुरुस्ती कायद्याने देशाच्या विकासाला गती देण्यासाठी आपल्या देशातील महिलांवर अधिक जबाबदारी टाकली आहे. या सुधारणांमुळे पंचायत राजमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्यात आले आहे. पंचायत आणि नगरपरिषदांमध्ये महिला आरक्षणामुळे निवडून आल्या. स्वतःचे स्थान ठासून मांडू लागल्या. आता स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिला पाणी, आरोग्य सुविधा, कुटुंब नियोजन, पोलिओ निर्मूलन या मूलभूत प्रश्नांना अधिक गंभीरपणे, अधिक प्रामाणिकपणे घेत आहेत. आता त्या त्यांच्या कार्यक्षेत्राच्या विकासात, खेडे असो की नगरपालिका, अधिक चांगली भूमिका बजावू शकतात, ज्यामुळे राज्याचा आणि संपूर्ण देशाचा सर्वांगीण विकास होईल. स्त्रिया त्यांच्या कर्तव्याप्रती अधिक समर्पित असतात आणि स्वभावाने पुरुषापेक्षा जास्त संयमी आणि विनयशील असतात.

राष्ट्र उभारणीत स्त्रियांनी खूप महत्त्वाची भूमिका बजावली होती यात शंका नाही, पण पुरुष अजूनही त्यांना त्यांचे अधिकार देण्याच्या बाजूने नाहीत.

उदा- महिलांना ३० टक्के आरक्षण देणारे महिला आरक्षण विधेयक राज्य विधानसभा आणि संसदेत आले तरी अद्याप त्याचा कायदा आजवर झालेला नाही. १९९६ पासून हे विधेयक अनेकवेळा मांडण्यात आले परंतु ते आतापर्यंत कायद्याचे स्वरूप घेऊ शकले नाही. महिलांचे सक्षमीकरण स्वतःचे स्वतः महिलांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान देऊ शकत नाही. महिलांकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन बदलणे ही खरी काळाची गरज आहे. हुंडा, स्त्रियांमधील निरक्षरता, स्त्री भ्रूणहत्या यांसारखी अनेक सामाजिक दुष्कृत्ये ही पूर्णपणे उपटून टाकणे आवश्यक आहे. छेडछाड, बलात्कार यासारखे महिलांबाबत घडणारे गुन्हे कठोरपणे हाताळले जाणे आवश्यक आहे. परंतु सरकार या दिशेने पुरेशा ठामपणे आणि निर्धाराने पावले उचलत नाही. तरीही महिलांना तळागाळातून राष्ट्र उभारणीत सहभागी करून घेण्यासाठी राजकारण्यांकडून सामाजिक दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे.

**खालील सामाजिक वास्तव आज भारतातील स्त्रियांची स्थिती स्पष्टपणे दर्शवतात :**

- अजूनही मुलीपेक्षा मुलाला प्राधान्य दिले जाते;
- लिंग-आधारित भूमिकांचे तेच ते परंपराधिष्ठित आकलन आताही होते;
- राष्ट्रीय स्तरावरील आकडेवारीतही तिचे घरातील काम बेहिशेबीच राहते;
- सत्ता आणि निर्णय घेणे हे पुरुष आणि स्त्रियांमध्ये असमानपणे केले जाते आणि त्याचे प्रमाण पुरुषांच्या बाजूने झुकलेले आहे; कौटुंबिक हिंसाचाराबाबत तक्रारी केल्या जात नाहीत, त्याची दखल घेतली जात नाही;
- कामाच्या ठिकाणी विनयभंग, बलात्कार, लैंगिक छळ यांसारख्या महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे; घरातील पुरुषांकडून दुहेरी जबाबदाऱ्या स्वीकारल्या जात नाहीत;
- कौटुंबिक आणि सामुदायिक मालमत्ता आणि संसाधनांवर प्रवेश आणि नियंत्रणाचा अभाव, त्यांनी त्यात योगदान दिलेले असले तरीही;
- भारतातील महिलांचे परिस्थीती विश्लेषण करता, समाजातील स्त्रियांची निम्न प्रतिमा सामाजिक दृष्टीकोन आणि पद्धतींद्वारे प्रकट होते.
- स्वातंत्र्याच्या सत्तर वर्षांनंतर, २०१६ पर्यंत पाहता परिस्थिती अशी उभी आहे की, विविध अहवालांच्यानुसार औपचारिक कामगार वर्गात महिलांच्या सहभागाच्या दरात घट होत चाललेली दिसते आणि महिलांचा राजकीय सहभाग हा १०% पेक्षा जास्त नाही.
- विविध पारंपारिक समुदायांमधील विविध जाचक प्रथा स्त्रियांच्या बाबतीत होणारा भेदभाव एकत्रितपणे पुढे आणताना दिसतात. स्त्रियांसाठी समाजात सामान्यपणे नेहमीच एक खालचे स्थान असणे दिसून येते आणि त्याविषयी बहुधा समुदायांमध्ये सुव्यवस्था राखण्यासाठी असणाऱ्या निवडक शास्त्र-आधारित औचित्यांमुळे प्रश्नही विचारले जात नाहीत, हे दिसून येते. भेदभावाच्या या स्वरूपाने कालौघात एखाद्या आदर्श दर्जावत स्थान प्राप्त केले आहे, ज्यात महिलांचे विविध ठिकाणचे स्थान कसे आहे, याची एकूण सांस्कृतिक दृष्टिकोनातून दर्शन घडते.
- घरची काळजी घेण्याबाबतच्या कामातील असमान कार्यभारामुळे, स्त्रियांना बहुतेक वेळा इतर कामांसाठी कमी वेळ असतो - जसे की सशुल्क काम आणि शिक्षण. शिवाय, घरची काळजी घेण्याच्या कामांमुळे हाती उरणाऱ्या कमी वेळेसोबतच, त्यांच्यावर अनेकदा कुटुंबाने लादलेल्या ठराविक आदर्शवत कौशल्यांचाच उपयोग करत राहावा लागतो. याचा परिणाम महिलांना पितृसत्ताकवादी विवाह संस्थेसाठीच तयार करण्यात होतो, नोकरी वा करिअर क्षेत्रासाठी नव्हे!
- महिलांनी स्वेच्छेने नोकरी सोडल्याची उदाहरणेही आहेत कारण, घर सांभाळणे, मूल जन्माला घालणे ही त्यांची प्राथमिक कर्तव्ये आणि भूमिका आहेत,अशी धारणा त्यांच्या जडणघडणीतच केली जाते. हा मुद्दा जितका सांस्कृतिक दबावाचा आहे तितकाच हा मुद्दा सांस्कृतिक गोष्टी बिंबवण्याचा देखील आहे.
- पुरुष आणि स्त्रियांसाठी सांस्कृतिकदृष्ट्या स्वीकृत प्राधान्यक्रम स्थापित करण्यात देखील एक उल्लेखनीय फरक आहे.
- स्त्रियांसाठी, वैवाहिक जीवन टिकवून ठेवण्याचा, घर सांभाळण्याचा, करिअरच्या बरोबरीने मुलांना सांभाळण्याचा आणि वाढवण्याचा असमान दबाव त्यांना त्यांच्या कामाच्या आणि जीवनातील आकांक्षांशी अनेकदा तडजोड करण्यास भाग पाडतो.

- जेव्हा तिला तिच्या कुटुंबाच्या कल्याणाबाबत महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतात, अशा परिस्थितीत तिचे शोषण होण्याची शक्यता जास्त असते. या पैलू व्यतिरिक्त, कठीण परिस्थितीत कुटुंबासाठी कमाई करण्यासाठी कुठेतरी नोकरी करण्याची शक्यता पाहता, तिच्याकडे पुरेसे कौशल्य नसल्यामुळे तिला अनौपचारिक क्षेत्राच्या तावडीत फेकले जाते ज्यामुळे भारतातील गरिबी आणखी वाढते. अनौपचारिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात अनियंत्रित असल्याने, तिच्या नोकरदाराच्या मर्जी आणि आवडीनुसार तिचे जीवनमान आणि उत्पन्नाची पातळी ठरते.

**घटत्या लिंग गुणोत्तराची काही कारणे सामान्यतः (भारताचे रजिस्ट्रार जनरल, २००१) पुढीलप्रमाणे सांगितली जातात :**

- जन्मापूर्वी लिंग निश्चित करणे आणि स्त्री गर्भ नष्ट करणे (स्त्री जन्म) ;
- मुलींची हत्या (स्त्री भ्रूणहत्या) ;
- मुलींकडे दुर्लक्ष – पुरेसे पोषण आणि आरोग्याची उपलब्धता नाकारणे ;
- कोवळ्या वयात घरातील कामे लादणे ;
- बालमृत्यू दर कमी होत असतानाही, स्त्री आणि पुरुष यांच्यातील सापेक्ष अंतर वाढत आहे ; आणि माता मृत्यूचे वेगाने वाढते प्रमाण ;

**महिला सक्षमीकरण :**

महिला सक्षमीकरण हा शब्द अधिकार, किंवा महिलांकडे असणारी वेगळे न करता येणारे अधिकार वाटून घेतलेली शक्ती, याविषयी आहे. या शब्दाचा संदर्भ महिलांच्या सामाजिक-आर्थिक बंधनातून मुक्त होण्याचा आहे. देशाच्या लोकसंख्येच्या सुमारे ५०% महिलांचा समावेश आहे आणि त्यापैकी बहुतेक महिला ह्या रोजगाराशिवाय आर्थिकदृष्ट्या एकमेकांवर अवलंबून आहेत.

**खालच्या स्तरातील महिलांना भेडसावणाऱ्या समस्या :**

**ओळखीची समस्या –** अल्पसंख्याक असलेल्या महिलेची ओळख बहुतेकदा कुटुंबातील पुरुषाशी जोडली जाते आणि ग्रामीण भागात ती तिच्या वडिलांची किंवा पतीची संपत्ती देखील मानली जाते, त्यामुळे ती स्वतःची ठोस ओळख निर्माण करण्यात अपयशी ठरते.

**सुरक्षेची समस्या –** सुरक्षेची समस्या ही देशातील केवळ अल्पसंख्याक समाजातील महिलांनाच नाही तर, सर्व महिलांसाठी समान आहे. मात्र, अल्पसंख्यांक समाजातील महिलांमध्ये अनेकदा शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या असुरक्षिततेची भावना असते आणि त्यांना त्यांचा समुदाय आणि बहुसंख्य समुदाय अशा दोन्हीकडून अत्याचार आणि धमक्या अनेकदा सहन करायला लागतात. समाजातील बहुसंख्य आणि अल्पसंख्याक समुदायांमधील संबंध ताणले जातात किंवा फारसे सौहार्दपूर्ण नसतात, तेव्हा ही असुरक्षिततेची भावना आणखीनच वाईट पद्धतीनं वाढते. जातीय दंगलींच्या काळात अल्पसंख्याक महिलांना विशेष लक्ष्य केले जाते आणि त्यांना दयामाया न दाखवता मारले जाते, लुटले जाते आणि त्यांच्यावर बलात्कार केला जातो.

**समानतेशी संबंधित समस्या :** धर्म आणि लिंग या दोन्हींवर आधारित भेदभावामुळे महिला विकासाच्या विविध संधींपासून वंचित राहतात. अस्मितेतील फरकामुळे अल्पसंख्याक समाजामध्ये विषमतेची भावना निर्माण होते. त्यांना अनेक शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधी सक्तीने गमवाव्या लागतात.

**प्रतिनिधित्वाचा अभाव :** आपल्या देशाचे संविधान विविध कलम आणि तरतुदींद्वारे धार्मिक अल्पसंख्याक आणि महिलांसह सर्व नागरिकांना समानता आणि समान संधी प्रदान करते, परंतु ही संकल्पना काहीवेळा अल्पसंख्याक महिलांना लागू करण्यात अपयशी ठरते आणि त्यांना अनेक क्षेत्रात योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही. उदाहरणार्थ, नागरी सेवा आणि राजकारणात.

**मागासलेपण :** अल्पसंख्याक समाजातील लोक मोठ्या संख्येने समाजाच्या खालच्या स्तरातील आहेत आणि परिणामी संपूर्ण समाज मागासलेला आहे. या समुदायातील महिला आणि मुलींना इतर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते किंवा वर नमूद केलेल्या समस्येइतके त्यांना महत्त्वाचे मानले जात नाही. कामाच्या ठिकाणी, शैक्षणिक संस्थांमध्ये किंवा अगदी सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या पेहराव किंवा बोलण्याच्या पद्धतीमुळे किंवा केवळ त्यांच्या धर्माच्या आधारावर त्यांना तीव्र भेदभावाचा अनुभव येतो. प्रत्यक्षात सत्य परिस्थिती तशी नसतानाही अनेकदा त्यांना सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिकदृष्ट्या गरीब असल्याचे गृहीत धरले जाते. त्यांना बर्याचदा वांशिक अपशब्द, शाब्दिक शिवीगाळ केली जाते आणि बर्याचदा त्या छेडछाडीचे बळी ठरतात.

**महिलांचा कामगार वर्गातील सहभाग कमी असण्यामागील घटक :**

- शिक्षण, प्रशिक्षण आणि जमीन, पत आणि तंत्रज्ञान इ. यासारख्या संसाधनांमध्ये महिलांसाठी उपलब्ध संधी आणि महिलांच्या मुक्तीसाठी सर्वसमावेशक आणि तर्कसंगत धोरणाचा अभाव.
- कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांमध्ये महिलांचे उत्पन्न हे उदरनिर्वाहासाठी महत्त्वाचे असूनही, पुरुष हा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवणारा प्रमुख आहे, असे मानले जाणे. ही धारणा महिलांच्या शिक्षणावर आणि प्रशिक्षणावर विपरित परिणाम करते. नियोक्ते (नोकरदार) हे सुद्धा महिला कामगारांना पूरक कामगार म्हणून पाहतात आणि या समजाचा फायदा घेत महिलांसाठी वेतन कमी ठेवतात. त्यातून ते आपले स्वतःचे भांडवलशाही हेतू साध्य करतात.
- अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल उदा. पारंपारिक ग्रामीण उद्योग किंवा औद्योगिकीकरणातील घट.
- पत आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी महिलांना त्यांच्या स्वतःच्या नावावर मालमत्ता (जमीन, घर) नसणे.
- घरातील विविध कामांसाठी, जसे की बाळंतपण आणि संगोपन इत्यादी कामांसाठी महिलांची मोठ्या प्रमाणात वेळ आणि शक्ती खर्च होत असते. शिवाय, श्रमशक्तीमध्ये सहभागानंतर त्यांना शिक्षण, प्रशिक्षण आणि आत्मविकासासाठी फारसा वेळ मिळत नाही.
- स्त्री आणि पुरुष यांच्यातील लिंगावर आधारित श्रम विभागणी आणि तांत्रिक प्रगती या बाबी स्त्रियांच्या विरोधात काम करतात. नोकरीवर घेताना महिलांचा विचार सर्वांत शेवटी होतो आणि नोकरीवरून काढून टाकताना मात्र त्यांना सर्वांत आगोदर काढून टाकले जाते.
- रोजगार आणि उत्पादकता वाढविण्याचे सरकारी कार्यक्रम हे पुरुषांवर अधिक केंद्रित केले जातात आणि त्यांत सक्रिय सहभागींऐवजी महिलांना लाभार्थी म्हणूनच पाहिले जाते.

**कमी लिंग गुणोत्तराची कारणे, परिणाम आणि उपाय :**

**कारणे :**

**स्त्री भ्रूणहत्या :** अल्ट्रासाऊंड तंत्रज्ञानाचा जलद प्रसार आणि वापर तसेच लिंग निर्धारणासाठी (निदान करण्यासाठी) ॲम्नीओसेन्टेसिस पद्धती हे स्त्री भ्रूण-प्रेरित गर्भपातामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहेत, ज्याला अमर्त्य सेन यांनी 'हाय-टेक' लिंगवाद म्हटले आहे.

**स्त्री अर्भक हत्या :** भारतात अजूनही पुरुष मुलासाठी प्राधान्य आहे आणि देशाच्या काही भागात अजूनही स्त्री अर्भकहत्या होणे हा सामान्य प्रकार आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडानुसार लिंग-निवडक गर्भपातामुळे जगभरातील किमान ११७ दशलक्ष मुली लोकसंख्याशास्त्रीयदृष्ट्या बेपत्ता होतात.

**शिक्षण :** निरक्षरतेमुळे आजच्या युगात स्त्रियांची शक्ती आणि भूमिका याबद्दल लोकांना माहिती नाही. भारतातील लिंग गुणोत्तर परिस्थितीवर शिक्षणाच्या भूमिकेचा मोठा प्रभाव आहे. बालविवाह हा भारतीय समाजाचा एक सामान्य भाग आहे. बहुतेक मुलींचा लहान वयातच विवाह होतो. त्यामुळे त्यांना शिक्षणापासून दूर राहावे लागते आणि घरच्या जबाबदाऱ्या घेणे भाग पडते.

**गरिबी :** तामिळनाडू सारख्या राज्यात उच्च लिंग गुणोत्तर आहे, परंतु गरिबीचे प्रमाण कमी आहे. अशीही राज्ये आहेत जिथे गरिबीमुळे अनेक मुलींना पौष्टिक आहारापासून वंचित ठेवले जाते. यामुळे महिला व बालिका निरोगी जीवन जगण्यापासून वंचित राहतात.

**महिलांची सामाजिक स्थिती :** भारतातील बहुतांश भागात महिलांना केवळ एक वस्तू म्हणून मानले जाते. मुलीच्या जन्माबरोबर हुंड्याच्या प्रश्नाने लोक चिंतेत राहतात. आर्थिक समस्येमुळे ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबे स्त्रीपेक्षा पुरुष मुलाला प्राधान्य देतात.

**महिला सक्षमीकरणाचा अभाव :** विशेषतः ग्रामीण भागात महिलांच्या सक्षमीकरणाचा अभाव आहे. पुरुषांप्रमाणे महिलांना संधी मिळत नाहीत. शिक्षणाअभावी महिला अनेक ठिकाणी आपली भूमिका प्रस्थापित करू शकत नाहीत. उत्तर प्रदेशची अवस्था ही मुलींसाठी एखाद्या थडग्यासारखी झाली आहे.

**पुरुषांचे वर्चस्व :** भारतातील बहुतांश ठिकाणी पितृसत्ताक पद्धतीचे पालन करतात. भारतात, पुरुषांनाच भाकरी कमावणारे मानले जाते. लिंग निर्धारण आणि स्त्री भ्रूणहत्या या पद्धतींचा अवलंब केला जातो, जे स्त्रियांच्या घटत्या संख्येचे प्रमुख कारण आहे.

**अर्भक आणि माता मृत्युदर :** बालमृत्यू दर म्हणजे एक वर्षाच्या वयाच्या आधी बालकांच्या मृत्यूची संख्या. स्त्री भ्रूणहत्येमुळे लिंग गुणोत्तर कमालीचे घसरते.  मातामृत्यूचे प्रमाणही घटत्या लिंग गुणोत्तरामध्ये कारणीभूत ठरते, कारण बहुतेक स्त्रिया प्रसूतीदरम्यान अयोग्य काळजीमुळे मरतात.

**लोकसंख्या धोरणांचा परिणाम :** कुटुंब नियोजन धोरणांतर्गत कुटुंबांना एक किंवा दोन मुले हवी असतात आणि सामान्यत: स्त्री मुलापेक्षा पुरुष मुलाला प्राधान्य देतात.




Figure 1: Reasons for declined child sex ratio

**परिणाम :**

- हे प्राथमिकदृष्ट्या पुरुषांसाठी प्रतिकूल आहे.
- हीच प्रवृत्ती कायम राहिल्यास भविष्यात गुन्हेगारी वाढेल. तिरकस लिंग गुणोत्तरामुळे पुरुष आणि स्त्रिया या दोघांविरुद्ध अधिक हिंसाचार तसेच मानवी तस्करी वाढते, असा चिंताजनक सूर आहे.
- निव्वळ पुनरुत्पादन दर कमी करून समाजाची पुनरुत्पादक क्षमता कमी करा.
- नवीन घरगुती निर्मिती सारख्या घटना कमी होतील.
- प्रतिकूल गुणोत्तरामुळे स्त्री–पुरुषांच्या संख्येत स्थूल असंतुलन होते आणि विवाह व्यवस्थेवर त्याचा अपरिहार्य परिणाम होत तसेच स्त्रियांना इतर नुकसान होते.




Figure 2: Implication of low child sex ratio

**काय करता येईल ? :**

- पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी करून लिंग निवड रोखून आणि बेकायदेशीर गर्भपात करणार्या बनावट केंद्रांवर कायदेशीर कारवाई करून लिंग गुणोत्तर वाढवणे.
- मुलीसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आणि भविष्यातील फायद्यांसाठी बचत करण्यास प्रोत्साहित करणे.
- वर्तणुकीत बदल घडवून आणणे : स्त्री शिक्षण आणि आर्थिक समृद्धी वाढल्याने गुणोत्तर सुधारण्यास मदत होते. या पाठपुराव्यात सरकारच्या बेटी बचाओ बेटी पढाओ मोहिमेने समाजात वर्तनात्मक बदल घडवून आणण्यात उल्लेखनीय यश मिळवले आहे.
- तरुणांना संवेदनशील करणे : प्रजनन आरोग्य शिक्षण आणि सेवा तसेच लैंगिक समानता निकष जोपासण्यासाठी तरुणांपर्यंत पोहोचण्याची नितांत गरज आहे.
- मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्यांच्या (आशा) सेवांचा लाभ घेता येईल, विशेषतः ग्रामीण भागात.

**महिला सक्षमीकरणावर परिणाम करणारे घटक :**

- कौटुंबिक निर्णय घेण्यात महिलांनी सहभागी असण्याचा दर केवळ ग्रामीण ते शहरी भाग असा बदलत नाही तर वय, शैक्षणिक स्थिती, पतीचे शिक्षण, नोकरीची स्थिती इ. यांसारख्या पार्श्वभूमी वैशिष्ट्यांचा देखील त्यावर परिणाम होतो.
- महिलांची मुक्त गतिशीलता हे महिला सक्षमीकरणाचे आणखी एक सूचक आहे. वय, शिक्षण, वैवाहिक स्थिती, कौटुंबिक प्रकार यासारख्या पार्श्वभूमीच्या वैशिष्ट्यांमुळेही महिलांच्या गतिशीलतेवर परिणाम होतो.
- महिलांना मिळणारी शिक्षणाची संधी हा महिला सक्षमीकरणाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे आणि तो देशातील महिला सक्षमीकरणाची सद्यस्थिती दर्शवतो.
- जर स्त्रिया त्यांच्या स्वत: च्या कमाईबद्दल स्वतः किंवा त्यांच्या पतीसोबत निर्णय घेत असतील तर, रोजगार आणि रोख कमाई महिलांना सक्षम बनवण्याची अधिक शक्यता असते. त्यांच्या पतीने एकट्याने निर्णय घेण्याच्या तुलनेत हे अधिक परिणामकारक असते.
- प्रसारमाध्यमांशी ओळख/संपर्क हा सशक्तीकरणाचा एक महत्त्वाचा स्रोत आहे, माध्यमांची ओळख व माध्यमांपर्यंत पोचण्याची संधी नसणाऱ्या स्त्रियांचे मोठे प्रमाण, हे सशक्तीकरणाच्या संदर्भात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची तुलनेने प्रतिकूल स्थिती दर्शवते.
- महिलांचा राजकीय सहभाग हा सशक्तीकरणाच्या संदर्भात महत्त्वाचा मुद्दा आहे. पारंपारिक विश्लेषणामध्ये याचा अर्थ मतदान, प्रचार, पक्ष कार्यालय सांभाळणे आणि निवडणूक लढवणे यासारख्या निवडणुकीच्या राजकारणाशी संबंधित क्रिया आहेत. परंतु व्यापक अर्थाने सार्वजनिक धोरणे तयार करणे, सार्वजनिक व्यवहारांचे प्रशासन आणि सरकारच्या सर्व स्तरांवरील राजकीय नेत्यांची निवड या बाबींवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने यात सर्व ऐच्छिक कृतींचा समावेश होतो.
- भारताने मानवी विकासावर काही उपाययोजना केल्या आहेत, तरीही लैंगिक समानतेवर भारताचे जागतिक स्थान खालचे आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने नियुक्त केलेल्या ग्लोबल जेंडर गॅप रिपोर्टमध्ये भारताचे रँकिंग २०१८ मधील १०८ व्या क्रमांकावरून २०२० मध्ये ११२ व्या स्थानावर घसरले.
- भारतीय कायदेशीर व्यवस्थेलाही धोरण आणि प्रत्यक्ष कृती यांच्यातील अंतराचा सामना करावा लागतो. महिला आणि मुलींच्या संरक्षणासाठी अस्तित्वात असलेले कायदे असूनही, या कायद्यांची अंमलबजावणी आणि कथित गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण कमकुवत आहे. पद्धतशीर नोकरशाही आणि भ्रष्टाचारामुळे या प्रक्रियेतील अंतर वाढले आहे. कुख्यात निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरणात अडकलेल्या गुन्हेगारांना फाशी देण्यासाठी सात वर्षे लागली.
- काही अपवाद वगळता पितृसत्ताक आणि पितृवंशीय चालीरीतींमुळे महिलांची हालचाल, मूलभूत आरोग्यसेवा आणि शिक्षणापर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण झाले आहेत आणि त्यामुळे जबरदस्ती विवाह झाले आहेत.

- लिंग असमानतेवरील भारतातील प्रचलित समस्यांना दक्षिण आशियाच्या व्यापक संदर्भात पाहिले पाहिजे. ग्रामीण भागात, विशेषत: हिंदी भाषक पट्ट्यात, लैंगिक विषमता अजूनही लक्षणीय आहे. स्त्रिया घरातील कामांमध्ये झोकून देत राहतात आणि त्यांचा आर्थिक निर्णयांमध्ये स्वतःचे म्हणून काही मत मांडण्याचा अधिकार नसण्यातच जमा असतो. साक्षरता, पोषण आणि आरोग्य सेवेची उपलब्धता यांच्या पातळी सातत्याने कमी असल्याचे पाहायला मिळते आणि सामाजिक कल्याणाचे मापदंड शेजारच्या बांगलादेशापेक्षाही कमी आहेत.

- भारतासारख्या विकसनशील देशांमधील सामाजिक नियम आणि कौटुंबिक संरचना स्त्रियांची दुय्यम स्थिती प्रकट करतात आणि कायम ठेवतात. अशा नियमांपैकी एक म्हणजे मुलीच्या जन्मापेक्षा मुलाच्या जन्माला सतत प्राधान्य देणे, जे जवळजवळ सर्व समाज आणि समुदायांमध्ये आहे.

- भारतातील बहुसंख्य महिलांसाठी गरिबी हे जीवनाचे वास्तव आहे. हा आणखी एक असा घटक आहे, जो महिला सक्षमीकरण साकारण्यात आव्हान निर्माण करतो. गरीब कुटुंबात मुलीच मुख्य बळी असतात; त्या कुपोषित असतात आणि त्यांना चांगले शिक्षण आणि इतर सुविधांपासून वंचित ठेवले जाते.

- कायदेशीर आणि घटनात्मक तरतुदींबद्दल जागरूकता नसणे आणि ते प्रत्यक्षात आणण्यात अपयश, हा आणखी एक असा घटक आहे, जो सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत अडथळा आणतो. बहुतेक महिलांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती नसते.

**काय करता येईल ? :**

- महिलांच्या पूर्ण विकासासाठी सकारात्मक आर्थिक आणि सामाजिक धोरणांद्वारे वातावरण निर्माण करणे, ज्यामुळे त्यांना त्यांची पूर्ण क्षमता ओळखता येईल.

- राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि नागरी अशा सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना सर्व मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्याचा न्याय्य आणि प्रत्यक्ष उपभोग घेता येणे.

- राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात महिलांचा सहभाग आणि निर्णय घेण्यास समान संधी.

- महिलांना आरोग्य सेवा, सर्व स्तरांवर दर्जेदार शिक्षण, करिअर आणि व्यावसायिक मार्गदर्शन, रोजगार, समान मोबदला, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा आणि सार्वजनिक कार्यालय इत्यादींसाठी समान संधी.

- महिलांवरील सर्व प्रकारचा भेदभाव दूर करण्याच्या उद्देशाने कायदेशीर प्रणाली मजबूत करणे.

- स्त्री आणि पुरुष दोघांच्याही सक्रिय सहभागाने सामाजिक दृष्टिकोन आणि समुदाय पद्धती बदलणे.

- विकास प्रक्रियेत लैंगिक दृष्टीकोन मुख्य प्रवाहात आणणे.

- महिला आणि मुलींवरील भेदभाव आणि सर्व प्रकारच्या हिंसाचाराचे उच्चाटन.

- नागरी समाज, विशेषत: महिला संघटनांसह भागीदारी निर्माण करणे आणि ती मजबूत करणे.

सर्वसाधारणपणे, भारतातील स्त्रिया तुलनेने दुर्बल आहेत आणि त्यांना पुरुषांच्या तुलनेत काहीसा खालचा दर्जा आहे. सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी अनेक प्रयत्न करूनही सध्याचे चित्र समाधानकारक नाही. केवळ शिक्षण आणि रोजगार संधी मिळणे, हे सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत मदत करू शकते. ही साधने किंवा सक्षम करणारे घटक आहेत, ज्याद्वारे प्रक्रिया वेगवान होते. तथापि, या उद्दिष्टाची प्राप्ती वृत्तीवर/दृष्टिकोनावर अधिक अवलंबून असते. समाजाकडून (किंबहुना स्वतः महिलांकडूनही) असमान लिंग भूमिकेचा स्वीकार करण्याचा दृष्टीकोन जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत स्त्रिया घटनात्मक तरतुदी, कायदा इत्यादीद्वारे त्यांना मिळालेल्या संधीचे सोने करू शकत नाहीत. तोपर्यंत भारतात खर्या अर्थाने महिलांचे सक्षमीकरण झाले आहे, असे आपण म्हणू शकत नाही.

***

# लोकसंख्या आणि संबंधी समस्या

**विषयाची ओळख :**


इतर अनेक देशांप्रमाणेच भारताने उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या दिवसांपासूनच दुष्काळाचे दुर्भिक्ष, अपघात, आजारपण, विविध आजारांचे संक्रमण आणि युद्ध यांमुळे उच्च मृत्युदराच्या संदर्भात खूप लांबचा पल्ला गाठला आहे. हा तोच काळ होता जेव्हा प्रजातींच्या अस्तित्वासाठी तुलनेने उच्च पातळीची जननक्षमता आवश्यक होती. जसजशी वर्षे सारत गेली, तसतशी रोग आणि निसर्गाच्या अनिश्चिततेला सामोरे जाण्यासाठीची सुसज्जता वाढत गेली आणि त्यामुळे मृत्यूदरात मोठ्या प्रमाणात घट होण्याबरोबरच आयुर्मानात लक्षणीय वाढ होत गेली. परिणामी, सात अब्ज लोकसंख्येच्या जगात, चीनसह भारताने आधीच 'अब्जाधीश क्लब'मध्ये स्थान पटकावले आहे आणि २०२५ पर्यंत भारत चीनला मागे टाकण्याची शक्यता आहे.

**लोकसंख्येची वाढ :**

संयुक्त राष्ट्रांच्या अंदाजानुसार, २०१०-२०२० दरम्यान जागतिक लोकसंख्या १.२३ टक्के वार्षिक दराने वाढली आणि भारतासारख्या विकसनशील देशांनी त्यात उच्च वाढीचा दर नोंदवला. जपान आणि अमेरिका यांसारख्या विकसित देशांची लोकसंख्या मंद गतीने वाढली आणि रशियामध्येही लोकसंख्या कमी झाली. चीनने खूपच कमी लोकसंख्या वाढीचा दर नोंदवला. (रशिया आणि जपानच्या पाठोपाठ पहिल्या दहा सर्वाधिक लोकसंख्येच्या देशांमध्ये तिसरा सर्वात कमी लोकसंख्या वाढीचा दर नोंदवणारा देश, किंबहुना अमेरिकेपेक्षा तर खूपच कमी!). आता असा अंदाज आहे की, भारत २०२५-३० पर्यंत सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश म्हणून चीनला मागे टाकेल. विशेष म्हणजे, भारताच्या बाबतीतही वाढीचा दर मंदावला असूनही हा अंदाज वर्तविण्यात आला आहे. भारताचा लोकसंख्या वाढीचा ह्या दशकातील दर मागील दशकातील २१.५% च्या तुलनेत १७.७% एवढा होता.

**लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण :**

भारत, सध्या, उच्च मृत्युदर आणि प्रजननक्षमता असलेल्या स्थिर लोकसंख्येपासून कमी मृत्युदर आणि प्रजननक्षमतेसह स्थिर लोकसंख्येकडे वाटचाल दर्शविणाऱ्या लोकसंख्येच्या संक्रमणाच्या चार टप्प्यातील मॉडेल पैकी तिसऱ्या टप्प्यावर आहे. देशातील काही राज्ये/केंद्रशासित प्रदेश आधीच चौथ्या टप्प्यात पोहचली आहेत. लोकसंख्येच्या दशकीय वाढीच्या दराच्या टक्केवारीत १९७१-८१ पासून संपूर्ण भारतीय स्तरावर घसरण होत आहे. तथापि, २०११ च्या जनगणनेदरम्यान प्रथमच ए-ऋ राज्यांच्या (सक्षम कृती गट राज्ये : उत्तरप्रदेश, उत्तराखंड, बिहार, झारखंड,




मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान आणि ओडिशा) बाबतीत लक्षणीय घट दिसून आली आहे.

पहिला टप्पा : कमी विकसित देश, उच्च जन्मदर, प्रतिबंध करण्यायोग्य कारणांमुळे मृत्यूंची मोठी संख्या, स्थिर लोकसंख्या


दुसरा टप्पा : सुधारित सार्वजनिक आरोग्यामुळे मृत्यूचे प्रमाण कमी होते, परंतु आरोग्य आणि गर्भनिरोधक सेवांची उपलब्धता मर्यादित असल्यामुळे उच्च प्रजनन क्षमता, लोकसंख्येतील वाढ

तिसरा टप्पा : जन्मदरही घसरतो, पुनरुत्पादक वयोगटातील लोकांच्या मोठ्या संख्येमुळे लोकसंख्या मोठ्या संख्येने वाढत राहते

चौथा टप्पा : स्थिर लोकसंख्या, परंतु आधीच्या पातळीपेक्षा अधिक, कमी जन्म आणि मृत्यू दर, उच्च सामाजिक आणि आर्थिक विकास

**डेमोग्राफिक ट्रान्झिशन मॉडेल (डीटीएम) अर्थात, लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण मॉडेल/सिद्धांत :**

डेमोग्राफिक ट्रान्झिशन मॉडेल (डीटीएम) हे जन्म दर आणि मृत्यू दर ह्या दोन लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांच्या ऐतिहासिक लोकसंख्येच्या ट्रेंडवर (कल) आधारित आहे. यातून हे सूचित करण्यात आले आहे की, देशाच्या एकूण लोकसंख्या वाढीच्या दराची चक्र जसजसा देश आर्थिकदृष्ट्या विकसित होत जातो तसतशी पुढे जात जातात. प्रत्येक टप्पा हा जन्मदर (दर एक हजार लोकांमागे वार्षिक जन्मांची संख्या) आणि मृत्यू दर (दर एक हजार लोकांमागे वार्षिक मृत्यूंची संख्या) यांच्यातील विशिष्ट संबंधाने दर्शविला जातो. हे दर एकमेकांच्या संबंधात बदलत असल्याने, त्यांचा एकूण प्रभाव देशाच्या एकूण लोकसंख्येवर मोठ्या प्रमाणात परिणाम करतो. या मॉडेलमध्ये, एक देश कालौघात एका टप्प्यापासून दुसऱ्या टप्प्यात पुढे जात राहील कारण, विविध सामाजिक आणि आर्थिक शक्ती जन्म आणि मृत्यू दरांवर कार्य करत असतात. प्रत्येक देश हा ऊढच् च्या परिप्रेक्ष्यात पाहिला जाऊ शकतो, परंतु या मॉडेलच्या प्रत्येक टप्प्यात त्याच्या विशिष्ट व्याख्येची पूर्तता करणारा देश नाही. उदाहरणार्थ, सध्या पहिल्या टप्प्यात कोणतेही देश नाहीत किंवा पाचव्या टप्यात देखील कोणतेही देश नाहीत, परंतु भविष्यात या दिशेने काही घडण्याची शक्यता नक्कीच आहे.




**लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण मॉडेलचे टप्पे कोणते आहेत? :**

- पहिल्या टप्प्यात, जे औद्योगिक क्रांतीपूर्वी जगाच्या बहुतेक भागांना लागू होते, जन्मदर आणि मृत्यू दर दोन्ही उच्च आहेत. परिणामी, लोकसंख्येचा आकार बऱ्यापैकी स्थिर राहतो परंतु युद्धे किंवा साथीच्या रोगांसारख्या घटनांमध्ये मोठे बदल होऊ शकतात.
- दुसऱ्या टप्प्यात, आधुनिक औषधांचा वापर सुरू झाल्यामुळे मृत्यू दर कमी होतो, विशेषत: लहान मुलांमध्ये, तर जन्मदर उच्चच राहतो. याचा परिणाम म्हणजे जलद लोकसंख्या वाढ. अनेक अल्प विकसित देश आज या दुसऱ्या टप्प्यात आहेत.
- तिसरा टप्प्यात जन्मदर हळूहळू कमी होतो, सामान्यत: सुधारित आर्थिक परिस्थिती, स्त्रियांच्या चांगल्या स्थितीत वाढ आणि गर्भनिरोधकांची उपलब्धता, यामुळे हे घडते. याचा परिणाम म्हणून लोकसंख्या वाढ चालू राहते, परंतु कमी दराने. बहुतेक विकसनशील देश सध्या तिसऱ्या टप्प्यात आहेत.
- चौथ्या टप्प्यात जन्म आणि मृत्यू दर दोन्ही कमी असतात, यामुळे लोकसंख्या स्थिर होते. चौथ्या टप्प्यातील देशांत मजबूत अर्थव्यवस्था, उच्च शिक्षण, उत्तम आरोग्यसेवा, काम करणाऱ्या महिलांचे उच्च प्रमाण आणि प्रजनन दर प्रति स्त्री दोन मुलांच्या आसपास पाहायला मिळतो. सर्वाधिक विकसित देश हे या चौथ्या टप्प्यात आहेत.
- संभाव्य पाचव्या टप्प्यात अशा देशांचा समावेश असेल, ज्यांच्यात प्रजनन दर हा प्रतिस्थापन पातळी (२ मुले) च्या खाली लक्षणीयरित्या कमी झाला आहे आणि वृद्ध लोकसंख्या ही तरुण लोकसंख्येपेक्षा जास्त आहे.

**लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण मॉडेलच्या मर्यादा :**

कोणत्याही मॉडेलप्रमाणे, नियमाला बाह्य बाबी आणि अपवाद असतातच. लोकसंख्याशास्त्रीय संक्रमण मॉडेलही यापेक्षा वेगळे नाही. याव्यतिरिक्त, अशा काही गोष्टी आहेत ज्या ऊढच् स्पष्ट करू शकत नाही. जसे : स्थलांतरासारख्या इतर लोकसंख्याशास्त्रीय चलांचा परिणाम यात विचारात घेतला जात नाही, किंबहुना प्रत्येक टप्प्यात एखादा देश किती काळ असेल, याचा अंदाजही हे मॉडेल लावत नाही. पण असे असून सुद्धा, लोकसंख्येची वा इतर कोणत्याही नमुन्यांची चर्चा करताना जन्मदर आणि मृत्यूदर यांच्यातील संबंध ही एक महत्त्वाची संकल्पना ठरते. ऊढच् द्वारे प्रदान केलेले विविध नमुने ही एकूण समज विकसित करताना मदतीचे ठरतात.

**लोकसंख्या वाढीचे परिणाम :**

भारतासाठी लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाचा सध्याचा टप्पा हा कमी अवलंबित्व गुणोत्तर आणि उच्च कार्यरत वयोगटातील लोकसंख्येचा आहे. हा टप्पा आव्हाने आणि संधी या दोन्हींचे प्रतिनिधित्व करतो. या मानवी संसाधनांचा योग्य शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे विकास करणे आणि त्यांना पुरेशा मानधनासह योग्य नोकऱ्या देऊन त्यांचा पुरेपूर वापर करणे हे आताचे आव्हान आहे. हे आव्हान मनुष्यबळ विकास आणि रोजगार निर्मितीसाठीच्या सुनियोजित योजनांद्वारे पेलले गेले आणि त्या प्रभावीपणे राबवल्या गेल्या, तर राष्ट्रीय उत्पादकता आणि वैयक्तिक बचत दर सुधारतील. या बचतीच्या योग्य गुंतवणुकीमुळे देशाला कमी आर्थिक वृद्धी – कमी दरडोई उत्पन्न ते उच्च आर्थिक वृद्धी – उच्च दरडोई उत्पन्न असे आर्थिक संक्रमण साध्य करण्यात मदत होईल. या संधीचा सर्वोत्तम वापर करणे अत्यावश्यक आहे जेणेकरुन देश आणि तेथील नागरिकांना उच्च उत्पन्न–उच्च आर्थिक विकासाची स्थिती प्राप्त करून त्या पातळीवर स्थिरता आणता येईल.

**वाढत्या लोकसंख्येचे संभाव्य फायदे पुढीलप्रमाणे आहेत :**

- जर लोकसंख्या इष्टतम आकारापेक्षा जास्त असेल, तर देश आपल्या संसाधनांचा अधिक चांगला वापर करू शकेल.
- बाजारांचा आकार वाढेल. यामुळे कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थेचा अधिक फायदा घेणे शक्य होईल.
- जन्मदर किंवा 'इमिग्रेशन'मध्ये (बाहेरून येऊन स्थायिक होणे) वाढ झाल्यामुळे लोकसंख्या वाढ झाली असेल तर, घटक गतिशीलतेमध्ये वाढ होऊ शकते. विस्तारणाऱ्या उद्योगांमुळे मनुष्यबळात नवीन कामगारांची भरती होऊ शकते. हे लोक नवीन कल्पना आणि पद्धतींशी परिचित असण्याची शक्यता आहे. असे झाल्यास, फर्मचे प्रशिक्षण खर्च कमी होतील.
- अतिरिक्त मागणी निर्माण होईल. यामुळे गुंतवणुकीला चालना मिळण्याची शक्यता आहे आणि यामुळे नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती होऊ शकते.
- निव्वळ 'इमिग्रेशन'मुळे आणि भविष्यात जन्मदरात वाढ झाल्यामुळे सध्या श्रमशक्तीमध्ये झालेली वाढ. निव्वळ इमिग्रेशनमुळे अधिक कामगार येतील. अधिक मुले जन्माला आल्याने अवलंबित्वाचे प्रमाण अल्पावधीत वाढेल परंतु दीर्घकाळात अधिक कामगार मिळतील.

**पर्यावरणविषयक आणि पर्यावरणशास्त्र विषयक परिणाम :**

- आधीच दाट लोकसंख्या असलेले विकसनशील देश लोकसंख्येच्या ९५% पेक्षा जास्त वाढीमध्ये योगदान देतात आणि जलद लोकसंख्या वाढीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ शकतो.
- विकसित देश कमी दाट लोकवस्तीचे आहेत आणि लोकसंख्या वाढीसाठी फारच कमी योगदान देतात. तथापि, ते विविध गोष्टींचा अपव्यय, अनावश्यक आणि असंतुलित वापरामुळे मोठ्या प्रमाणावर पर्यावरणशास्त्रीय नुकसान करतात, ज्यामुळे विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतात.
- अनेक विकसनशील देशांमध्ये लोकसंख्येच्या सतत वाढीमुळे जमिनीवर तणाव येणे, जमिनीचे तुकडे होणे, मत्स्यव्यवसाय कोसळणे, जंगले कमी होणे, वाढते तापमान, वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होणे या गोष्टी घडत आहेत. जीवाश्म इंधनाच्या वाढत्या वापरामुळे (प्रामुख्याने विकसित देशांद्वारे) होणाऱ्या ग्लोबल वॉर्मिंगचा विकसनशील देशांमधील दाट लोकवस्ती असलेल्या किनारी प्रदेशांवर, त्यांच्या अन्न उत्पादनावर आणि आवश्यक पाण्याच्या पुरवठ्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.
- हरितगृह वायू उत्सर्जनाचा लोकसंख्या वाढ आणि विकास या दोन्हीशी जवळचा संबंध आहे. विकसनशील देशांमधील लोकसंख्येची मंद

वाढ आणि विकसित देशांमधील पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ जीवनशैलीमुळे हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे सोपे होईल आणि हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी अधिक वेळ आणि पर्याय उपलब्ध होतील.

- जलद लोकसंख्या वाढ, वाढती लोकसंख्या किंवा लोकसंख्येच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी विकासात्मक कृती तसेच बदलत्या जीवनशैली आणि उपभोगाच्या पद्धती भारतातील पर्यावरणीय समतोल जतन आणि संवर्धनासाठी मोठे आव्हान उभे करत आहेत.
- संसाधनांच्या वापराचा दर आणि वापराचे स्वरूप या दोन्हीमुळे जंगलांवर तीव्र ताण येतो. जागतिक सरासरी ८२ टनांच्या तुलनेत देशातील दरडोई वन जैवमास केवळ ६ टन आहे.
- प्रजातींच्या विविधतेवर विपरीत परिणाम
- शेती, शहरी विकास, वनीकरण कार्य यासारख्या इतर काही जमिनीच्या वापरामध्ये अधिवासाचे रूपांतर. गेल्या ५० वर्षांत गंगेच्या पूर मैदानातील सुमारे ७०-८०% ताज्या पाण्याच्या दलदली आणि तलाव नष्ट झाले आहेत.
- व्यावसायिक गरजा आणि इंधन लाकडासाठी उष्णकटिबंधीय जंगलतोड आणि खारफुटीचा नाश. देशातील खारफुटीचे क्षेत्र गेल्या ५० वर्षांत ७००,००० हेक्टरवरून ४५३,००० हेक्टरपर्यंत कमी झाले आहे.
- पाळीव पशुधनाच्या चरण्यात झालेली तीव्र वाढ
- वन्यप्राण्यांची शिकार आणि अवैध पैदास.
- कृषी क्षेत्रामध्ये वाढ, रासायनिक खतांचा, कीटकनाशके आणि तणनाशकांचा जास्त वापर; पाणी एकाच जागी थांबणे, मातीची धूप, मातीची क्षारता आणि कमी उत्पादकता.
- बायोमास जाळण्याच्या उच्च पातळीमुळे मोठ्या प्रमाणात घरातील प्रदूषण होते.
- रेल्वे आणि रस्ते बांधकामासाठी अधिवासावर अतिक्रमण होते, ज्यामुळे अधिवासाचे/निवासस्थानाचे तुकडे होतात. खाणकाम आणि टिकाऊ संसाधने उपसून काढण्यासारख्या व्यावसायिक कामांमध्ये होत असणारी वाढ.
- घरगुती सांडपाणी, कीटकनाशके, खते आणि औद्योगिक सांडपाणी यांमुळे होणारा किनारी आणि इतर जलीय परिसंस्थेचा ऱ्हास.
- पाणवठ्यांमध्ये होणारी अधिकची मासेमारी आणि तण आणि विदेशी प्रजातींचा देशी पर्यावरणात प्रवेश.
- घरगुती, औद्योगिक आणि कृषी वापरासाठी पाणी वळवल्याने नद्यांचे प्रदूषण वाढते आणि नद्यांच्या स्व-स्वच्छता गुणधर्मांमध्ये घट होते.
- पाण्याच्या वाढत्या गरजेमुळे आर्सेनिक किंवा फ्लोराईडचे प्रमाण जास्त असलेल्या खोलवरच्या भूजल साठ्यातून पाणी उपसा करणे, यामुळे आरोग्य समस्या निर्माण होतात.
- वाढत्या करमणुकीच्या उपक्रमांमुळे आणि पर्यटनामुळे होणारा त्रास तसेच लोकांनी मागे सोडलेल्या कचऱ्यामुळे नैसर्गिक परिसंस्थेचे प्रदूषण होते.

**शहरीकरण :**

- शहरी लोकसंख्येच्या वाढीने मूलभूत किमान सेवांच्या विकासाला मागे टाकले आहे. गृहनिर्माण, पाणीपुरवठा, सांडपाणी आणि घनकचरा विल्हेवाट व्यवस्था पुरेशा प्रमाणात नाहीत.
- घर, कार्यालये आणि उद्योगांमध्ये कचऱ्याची वाढती निर्मिती, तसेच कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची निकृष्ट सुविधा, यामुळे पर्यावरणाचा जलद ऱ्हास होतो.
- वाढत्या वाहनांमुळे वायू प्रदूषणात भर पडते.

- या सर्वांचा पर्यावरण आणि आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.
- शहरी आणि उपनगरीय भागात दारिद्र्य कायम आहे; जवळच्याच शहरी वातावरणात लख्ख दिसून येणाऱ्या असमानतेबद्दल असणारी जाणीव, सामाजिक अशांततेला कारणीभूत ठरू शकते.

**पाणीपुरवठा :**

- विकसित आणि विकसनशील जगातील अनेक भागांमध्ये, पाण्याची मागणी शाश्वत पाणीपुरवठ्यापेक्षा जास्त आहे.
- भारतात, जलसाठा पुनर्भरणाच्या दुप्पट दराने पाणी उपसण्याचा अंदाज आहे; परिणामी, जलस्तर दरवर्षी एक ते तीन मीटरने खाली जात आहेत; खोलवरून भूजल उपसा केल्याने मोठ्या लोकसंख्येच्या गटांना नवीन आरोग्य धोक्यांचा सामना करावा लागला आहे, जसे की पिण्याच्या पाण्यात उच्च फ्लोराईड किंवा आर्सेनिकचे वाढते प्रमाण.
- दुसऱ्या बाजूस, पाण्याच्या अतिवापरामुळे देशाच्या काही भागांमध्ये पाणी साठण्याच्या प्रमाणात वाढ झाली आहे तसेच क्षारता वाढली आहे.
- अखेरीस, पाण्याची कमतरता आणि पाणी साचणे या दोन्हींचा भारताच्या अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

**अन्न सुरक्षा :**

- ही चिंतेची बाब आहे की, लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा तृणधान्य उत्पादनात सातत्याने वाढ होत असताना, भरड धान्य आणि कडधान्य उत्पादनात मात्र तितकी वाढ झालेली नाही. परिणामी भरड धान्याची दरडोई उपलब्धता घटली आहे.
- चिंतेचे आणखी एक क्षेत्र म्हणजे फलोत्पादनास पुरेसा जोर न लावणे व त्याकडे पुरेसे लक्ष नसणे. यामुळे, शहरी आणि ग्रामीण भागात भाजीपाला विशेषतः हिरव्या पालेभाज्या आणि पिवळ्या/लाल भाज्या वर्षभर परवडणाऱ्या किमतीत मिळणे हे एक अधुरे स्वप्नच राहिले आहे.

**आर्थिक परिणाम :**

- सुरुवातीचा माल्थुशियन मतप्रवाह असा होता की, लोकसंख्या वाढीमुळे आर्थिक वाढीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे कारण यामुळे उपलब्ध संसाधनांवर दबाव येईल, परिणामी दरडोई उत्पन्न आणि संसाधने कमी होतील आणि यामुळे जीवनमानाचा दर्जा खालावेल.
- लोकसंख्या वाढ किंवा लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाचा आर्थिक विकासावर अनुकूल परिणाम तेव्हाच होऊ शकतो, जेव्हा मानव संसाधन विकासाच्या (क्ठऊ) दृष्टीने आणि उपलब्ध मानवी संसाधनांचा योग्य वापर करण्याच्या उद्देशाने इष्टतम प्रयत्न होतील.

**स्थलांतर :**

- उच्च लोकसंख्या वाढ, कमी साक्षरता आणि खराब कामगिरी करणार्या राज्यांमध्ये रोजगाराच्या संधींचा अभाव, यामुळे ग्रामीण ते शहरी स्थलांतर वाढू शकते, तसेच विशेषत: अकुशल कामगारांचे आंतरराज्य स्थलांतर वाढू शकते.
- असे स्थलांतर अल्पावधीत स्थलांतरितांना बेरोजगारीशी संबंधित आर्थिक समस्यांवर मात करण्यास मदत करू शकते. तथापि, स्थलांतरित कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना निवारा, शिक्षण आणि आरोग्य सेवा मिळविण्यात समस्या येऊ शकतात.
- या बदलांवर लक्ष ठेवण्यासाठी एक यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे. असुरक्षित स्थलांतरित लोकसंख्येच्या किमान आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी पावले उचलावी लागतील.

**शिक्षण :**

- वाढत्या संख्येमुळे शालेय शिक्षण सुधारणे कठीण झाले आहे. कमी शैक्षणिक खर्च केल्याने भारतात शिक्षणाची निष्पत्ती निकृष्ट राहिली आहे.
- केवळ निम्म्याहून अधिक लोकसंख्या चार वर्षांपेक्षा जास्त शिक्षण पूर्ण करते आणि शिक्षणाची सरासरी गुणवत्ता कमी आहे.

**बेरोजगारीत वाढ :**

- जेव्हा एखादा देश जास्त लोकसंख्येचा बनतो, तेव्हा तो बेरोजगारीला जन्म देतो, कारण मोठ्या संख्येने लोकांना आधार देण्यासाठी कमी प्रमाणात नोकऱ्या असतात.
- बेरोजगारीच्या वाढीमुळे चोरीसारखे गुन्हे वाढीस लागतात, कारण लोकांना त्यांच्या कुटुंबाचे पोट भरायचे असते आणि त्यांना जीवनाच्या मूलभूत सुविधा पुरवायच्या असतात.

**उच्च जीवनावश्यक खर्च :**

- जास्त लोकसंख्येमुळे मागणी आणि पुरवठ्यातील तफावत वाढत असल्याने, अन्न, निवारा आणि आरोग्यसेवा यासह विविध जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढतात. याचा अर्थ असा आहे की लोकांना जगण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी अधिक पैसे द्यावे लागतील.

**महामारी :**

- दारिद्र्य हे अनेक पर्यावरणीय आणि सामाजिक कारणांशी निगडीत आहे, ज्यात जास्त गर्दी आणि अस्वच्छ राहणीमान, कुपोषण आणि दुर्गम, अपुरी किंवा अस्तित्वात नसलेली आरोग्य सेवा, ज्यामुळे गरीबांना संसर्गजन्य रोगांचा सामना करावा लागण्याची शक्यता वाढते.
- पुढे, लोकसंख्येच्या उच्च घनतेमुळे नवीन साथीचे रोग उद्भवण्याची शक्यता वाढते.

**वाढलेली सघन शेती :**

- वर्षानुवर्षे लोकसंख्येच्या वाढीसह, मोठ्या संख्येने लोकांना खाण्यासाठी आवश्यक असलेले अन्न तयार करण्यासाठी शेती पद्धती विकसित झाल्या आहेत.  तथापि, या सघन शेती पद्धतीमुळे स्थानिक परिसंस्थेचे आणि जमिनीचे नुकसान होते आणि भविष्यात समस्या निर्माण होऊ शकतात.

  शिवाय, सघन शेतीसाठी आवश्यक यंत्रसामग्रीमुळे हवामान बदलात भर पडते. लोकसंख्या सध्याच्या दराने वाढत राहिल्यास हा परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

**उपाय :**

**उत्तम शिक्षण :**

- सर्वांत पहिल्या उपायांपैकी एक म्हणजे सामाजिक बदल दर्शविणारी धोरणे अंमलात आणणे. जनतेला शिक्षित केल्याने त्यांना जास्तीत जास्त एक किंवा दोन मुले असण्याची गरज समजण्यास मदत होते.
- त्याचप्रमाणे, संगणकीय जगात प्रचंड लहरी निर्माण करणाऱ्या नवीनतम तंत्रज्ञानाला समजून घेण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. ज्या कुटुंबांना कठीण जीवनाचा सामना करावा लागतो आणि चार किंवा पाच मुले जन्माला घालणे पसंत करतात त्यांना परावृत्त केले पाहिजे.

**मुलीसाठी शिक्षण :**

- प्रचलित लिंगाधारित पद्धती आणि बालविवाह त्यांच्या शिक्षणाच्या प्रवेशामध्ये व्यत्यय आणतात. कमी शिक्षण घेतलेल्या मुलीला लवकर मुले होण्याची आणि ती शोषणाला बळी पडण्याची शक्यता जास्त असते.

**लोकांना कुटुंबाची जाणीव करून देणे :**

- या जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने, कुटुंब नियोजनाबाबत लोकांमध्ये जागरुकता वाढवणे आणि त्यांना जास्त लोकसंख्येच्या गंभीर परिणामांबद्दल माहिती देणे लोकसंख्या वाढीला आळा घालण्यास मदत करू शकते.
- कोणत्याही अवांछित (नको असलेल्या) गर्भधारणा टाळण्यासाठी उपलब्ध विविध सुरक्षित लैंगिक तंत्रे आणि गर्भनिरोधक पद्धतींबद्दल त्यांना माहिती देणे हा एक उत्तम मार्ग आहे.

**कर लाभ किंवा सवलती :**

- विविध देशांच्या सरकारला अधिक लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कर सवलतींशी संबंधित विविध धोरणे आणावी लागतील.
- त्यापैकी एक म्हणजे आयकराचा काही भाग माफ करणे किंवा एक वा दोन मुले असलेल्या विवाहित जोडप्यांसाठी प्राप्तिकराचे दर कमी करणे.

**लैंगिक शिक्षणाचे ज्ञान :**

- लहान मुलांना प्राथमिक स्तरावर लैंगिक शिक्षण देणे आवश्यक आहे. बहुतेक पालकांना त्यांच्या मुलांशी अशा गोष्टींवर चर्चा करण्यास लाज वाटते ज्यामुळे त्यांची मुले बाहेर जातात आणि इंटरनेटवर अशी माहिती शोधतात किंवा त्यांच्या समवयस्कांशी चर्चा करतात.
- बहुतेकवेळा ही माहिती अपूर्ण असते, ज्याची निष्पत्ती लैंगिकदृष्ट्या सक्रिय किशोरवयीन मुलांना गर्भनिरोधकांविषयी माहिती नसण्यात होते आणि त्याबद्दल माहिती मिळविण्यास त्यांना लाज वाटते. त्यामुळे पालक आणि शिक्षकांनी त्यांच्या जुन्या समजुती दूर करून त्यांच्या मुलांना किंवा विद्यार्थ्यांना योग्य लैंगिक शिक्षणाची जाणीव करून देणे महत्त्वाचे आहे.

**सामाजिक विपणन (सोशल मार्केटिंग) :**


- अती लोकसंख्येच्या परिणामांबद्दल लोकांना शिक्षित करण्यासाठी काही समाजगटांनी आधीच सोशल मार्केटिंग सुरू केले आहे. कमी खर्चात अधिक जनांपर्यंत पोहचणे याने शक्य होते.
- विविध प्रकारचे मुद्रण साहित्य (फ्लायर्स, ब्रोशर, फॅक्ट शीट्स, स्टिकर्स) स्थानिक प्रार्थनास्थळे, क्रीडा स्पर्धा, स्थानिक खाद्य बाजार, शाळा आणि कार पार्क्स यासारख्या ठिकाणी वितरित केले जाऊ शकतात.

**राष्ट्रीय स्तरावरील कृती :**

- उच्च प्रजनन क्षमता विकसनशील देशांमध्ये, सरकारने –
- कुटुंब नियोजन कार्यक्रमांसाठी उदारपणे निधी द्यावा
- आधुनिक गर्भनिरोधक कायदेशीर, मोफत आणि सर्वत्र उपलब्ध करावेत, अगदी दुर्गम भागातही
- अर्भक आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी आरोग्य सेवा सुधाराव्या
- बालविवाह प्रतिबंधित करावे आणि विवाहाचे कायदेशीर वय वाढवावे (किमान १८ वर्षे)
- शक्य तितके अनिवार्य शिक्षण सुरू करावे (किमान १६ वर्षे वयापर्यंत) आणि आवश्यक पायाभूत सुविधांसाठी उदारपणे निधी द्यावा.
- महिलांना सक्षम करावे, दोन्ही लिंगांसाठी समान हक्क, दोन्ही लिंगांसाठी उपचार आणि संधी सुनिश्चित करणे, सर्व प्रकारच्या कमी किमतीच्या, सुरक्षित, प्रभावी गर्भनिरोधकांसह पुनरुत्पादक आरोग्य सेवेची माहिती व उपलब्धता करून देणे.
- पुरुष आणि स्त्रियांसाठी नसबंदी मोफत करावी किंवा किमान सर्व आरोग्य सेवा योजनांतर्गत अंतर्भूत करा, निर्बंध किंवा सामाजिक कलंकांशिवाय गर्भपात कायदेशीर करा
- प्राथमिक आरोग्य सेवा प्रणालींमध्ये कुटुंब नियोजन आणि सुरक्षित मातृत्व कार्यक्रम सामावून घ्या, लोकसंख्या आणि पर्यावरणीय समस्या आणि लैंगिक शिक्षण मूलभूत शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग बनवा, तिसऱ्या आणि त्यापुढील मुलांना प्रतिबंध करा, पहिल्या दोन मुलांपर्यंत सरकारी मदत मर्यादित करून राष्ट्रीय लोकसंख्या धोरण तयार करा, इष्टतम लोकसंख्येच्या आकाराची आखणी करा आणि ते साध्य करण्यासाठी कार्य करा.
- अर्धा राष्ट्रीय भूप्रदेश (लँडस्केप) टोकाच्या विकासापासून मुक्त ठेवा आणि तो जैवविविधता संरक्षणासाठी समर्पित ठेवा.

**भारतात वृद्धांची वाढती लोकसंख्या :**

भारताचा सरासरी राष्ट्रीय वयोगट सुमारे २९ वर्षे आहे. गेल्या जनगणनेनुसार ही आकडेवारी जगातील सर्वात तरुण लोकसंख्येपैकी एक आहे, तर आपल्या लोकसंख्येपैकी ४१ टक्के लोकसंख्येचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आहे. याचा अर्थ असा आहे की, बहुतेक भारतीयांकडे त्यांच्या कामाची बरीच वर्षे पुढे शिल्लक आहेत. ही लोकसंख्या योग्य कौशल्ये, प्रशिक्षण आणि नोकऱ्यांनी सुसज्ज असल्यास राष्ट्र उभारणी आणि अर्थव्यवस्थेत योगदान देऊ शकते. जर एखाद्या राष्ट्राचा प्रजनन दर प्रतिस्थापन दरापेक्षा कमी झाला तर, याचा अर्थ तिथली लोकसंख्या सक्रिय कार्यबलात सामील होण्याच्या वयापर्यंत पोहोचणाऱ्या तरुणांपेक्षा अधिक वेगाने वृद्ध होत आहे. एकदा प्रजननक्षमता कमी होत जायला सुरुवात झाली तर, ती परत मागे येणे कठीण आहे. युरोपची लोकसंख्या सतत वृद्धत्वाकडे झुकत चालली आहे आणि लोकसंख्येच्या वाढीसाठी ते अमलात आणू पाहत




**COMPARATIVE DEMOGRAPHIC FACTS**
**तुलनात्मक लोकसंख्याशास्त्रीय वस्तुस्थिती**

**काही महत्त्वपूर्ण आकडेवारी**

**SOME KEY STATISTICS**

| | 2019 | 2050 |
|---|---|---|
| Population aged 60 and above (total) | 139,610,000 | 319,918,000 |
| Population aged 60 and above (% of total population) | 10.1 | 19.5 |
| Older women aged 60+ (% of total population) | 5.15 | 10 |
| Life expectancy (males) | 68.11 | 73.61 |
| Life expectancy (females) | 70.53 | 77.25 |
| Old-Age Dependency Ratio (Age 65+ / Age 15-64) | 9.8 | 20.3 |
| Rural older people (% of total population) | 3.86 | |
| Urban older people (% of total population) | 1.60 | |
| Older persons living alone aged 60 and above (% of total population aged 60+) | 4.9 | |

असलेले मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहन देऊ पाहणारे उपाय काम करत नाही आहेत. भारतात कोरोनाव्हायरस साथीच्या आजारासारख्या जागतिक आपत्तीशी झुंज देत असताना तरुण लोकसंख्या देशाच्या मदतीलाही धावून आली. या काळात मृत्यूदर ३ टक्क्यांच्या खाली ठेवण्यात ही तरुण लोकसंख्या म्हणजे भारताचे सर्वात मोठे कवच ठरले आहे.

२०१९ पर्यंत, भारतात राहणारे १३९ दशलक्ष लोक ६० पेक्षा जास्त वयाचे आहेत, जे देशाच्या एकूण लोकसंख्येच्या १०% पेक्षा जास्त आहे. ६० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ३१९ दशलक्ष लोकांसह वृद्ध लोकांचे प्रमाण २०५० मध्ये जवळजवळ दुप्पट होऊन १९.५% होईल अशी अपेक्षा आहे. याचा अर्थ असा की, प्रत्येक ५ पैकी १ भारतीय ज्येष्ठ नागरिक असण्याची शक्यता आहे.

**वृद्धत्वाच्या लोकसंख्येशी संबंधित समस्या :**

- कौटुंबिक रचना बदलत आहेत. लोक जास्त काळ जगतात आणि त्यांना मुले कमी असल्याने, कौटुंबिक संरचना बदलल्या जातात. परिणामी वृद्ध लोकांकडे काळजीसाठी कमी पर्याय राहतात.
- कामाच्या आणि निवृत्तीच्या पद्धती बदलत आहेत. कामगार आणि निवृत्तीवेतनधारक आणि आपल्या आयुष्याचा मोठा भाग सेवानिवृत्तीमध्ये घालवणारे लोक यांचे संकुचित जाणारे प्रमाण याचा सध्याच्या आरोग्य आणि पेन्शन प्रणालींवर मोठा ताण पडतो.
- भारताच्या लोकसंख्येची रचना जसजशी बदलत आहे, तसतशी देशाची आरोग्य रचनाही बदलत आहे. लोकसंख्येच्या वयासोबतच मानसिक आजाराचे प्रमाण (अजून एक प्रमुख छउऊ) देखील वाढत आहे.
- भारतीय लोकसंख्येच्या वृद्धत्वासोबत वृद्ध वयोगटातील स्त्रीकरण (स्त्रियांचे प्रमाण) वाढत आहे, जे स्वतःचे स्वतंत्र प्रश्न आणि आव्हाने सोबतीला घेऊन येत आहे. वैधव्यामुळे येणाऱ्या संकटांच्या सोबतच भारतातील वृद्ध स्त्रिया त्यांच्या समकालीन पुरुष आणि तरुण वयोगटातील महिला आणि पुरुष यांच्या तुलनेत शिक्षण आणि साक्षरतेच्या बाबतीत लक्षणीयरीत्या वंचित आहेत.
- भारतातील लोकसंख्येच्या वृद्धत्वाचे आणखी एक मोठे आव्हान म्हणजे वृद्ध प्रौढांसाठी उत्पन्न आणि घरांची सुरक्षा. हे बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिदृश्यामुळे आहे, ज्यामध्ये अनेक वृद्ध प्रौढांच्या घरांमध्ये पारंपारिक कौटुंबिक आधार व्यवस्था खंडित होत आहे.

**काय करता येईल ? :**

- आर्थिक सुरक्षा :
- दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील वृद्ध व्यक्तींना 'नॉन-कंट्रिब्युट्री' निवृत्तीवेतन.
- सक्षम आणि इच्छुक वृद्ध व्यक्तींसाठी उत्पन्न निर्मितीच्या संधी.
- उमेदीच्या काळात ज्यांना बचत करणे शक्य आहे, अशा वृद्ध व्यक्तींसाठी कल्पक योगदानात्मक पेन्शन योजना.
- महिला, दलित, ग्रामीण गरीब, निराधार आणि अपंग वृद्ध व्यक्ती, विधवा यांच्यासाठी विशेष योजना.

**आरोग्य सुरक्षा :**

- सर्व वृद्ध व्यक्तींसाठी सुलभ, उपलब्ध आणि परवडण्याजोग्या आरोग्य सुविधा.
- पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचार्यांची तरतूद.
- गरिबांसाठी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात सुविधांचा विकास.
- पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आणि आरोग्य सेवेसाठी वित्तपुरवठा करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारीचा शोध
- ग्रामीण सुविधांकडे विशेष लक्ष – महिला, गरीब, अपंग, ग्रामीण, दलित, निराधार.
- निरोगी वृद्धत्वाची संकल्पना आणि आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता वाढवणे आणि त्यांचे निवारण करण्याच्या प्रक्रियेत समुदायाला सामील करून घेणे.
- सर्व खाजगी रुग्णालये, ज्यांना सरकारी अनुदान मिळते किंवा अनुदानित दराने जमीन मिळते, त्यांना हे निर्देश दिले जाऊ शकतात. इतरांना केंद्र सरकार/राज्य सरकारे/भारतीय वैद्यकीय संघटनांमार्फत सूचना दिल्या जाऊ शकतात.
- एनडीएमए आपत्कालीन परिस्थितीत वृद्ध व्यक्तींना हाताळण्यासाठी विशेष प्रयत्न करेल. विशेष उत्पन्न मिळवण्याच्या प्रयत्नांद्वारे आपत्कालीन परिस्थितीत वृद्धांचे पुनर्वसन.

आपल्या सर्व वृद्ध व्यक्तींसाठी उत्पन्नाची सुरक्षा सुधारण्यासाठी, भारताला देशाच्या बदलत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी आपल्या निवृत्ती आणि पेन्शन धोरणात सुधारणा करणे आवश्यक आहे.

वाढत्या आयुर्मानामुळे आणि प्रजनन क्षमता कमी झाल्यामुळे भारताला अभूतपूर्व लोकसंख्या-वृद्धत्वाचा सामना करावा लागतो आहे. हा लोकसंख्याशास्त्रीय बदल भारतीय समाजासमोर गैर-संसर्गजन्य रोगांचे वाढते ओझे, असुरक्षित वृद्ध प्रौढ महिलांचे अधिक प्रमाण असणारी लोकसंख्या, बदलती कौटुंबिक रचना आणि सामाजिक सुरक्षा जाळ्याचा अभाव या स्वरूपात मोठी आणि गुंतागुंतीची आव्हाने उभी करत आहे. या आव्हानांना यशस्वीपणे संबोधित करणे निश्चितपणे अशक्य नसले तरी, त्यासाठी आरोग्य, वित्तीय आणि सामाजिक धोरणांमध्ये तितकेच गुंतागुंतीचे आणि महत्त्वाकांक्षी बदल करणे आणि नवकल्पना लागू करणे आवश्यक ठरेल.

**लोकसंख्याशास्त्रीय लाभांश (डेमोग्राफिक डिव्हिडंड) :**

**संकल्पना :**

डेमोग्राफिक डिव्हिडंड म्हणजे अर्थव्यवस्थेतील वाढ, जी देशाच्या लोकसंख्येच्या वयाच्या संरचनेत बदल झाल्यामुळे होते. वयाच्या रचनेतील बदल सामान्यत: प्रजननक्षमता आणि मृत्युदरात घट झाल्यामुळे होतो.

प्रजननक्षमता आणि मृत्युदरात घट झाल्यामुळे कार्यरत लोकसंख्येची उत्पादकता वाढते, ज्यामुळे लोकसंख्याशास्त्रीय लाभांश मिळतो.

लोकसंख्याशास्त्रीय लाभांश मिळतो, कारण कार्यरत लोकसंख्येच्या उत्पादकतेत वाढ होते, ज्यामुळे दरडोई उत्पन्न वाढते. लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा पहिला कालावधी ५० किंवा त्याहून अधिक वर्षे टिकू शकतो आणि नंतर वृद्ध लोकसंख्या विविध गुंतवणूक पर्यायांमध्ये गुंतवणूक करत असताना दुसरा कालावधी अनिश्चित काळासाठी टिकू शकतो. लोकसंख्याशास्त्रीय लाभांश बचत, श्रम पुरवठा, मानवी भांडवल आणि आर्थिक वाढीसह आढळू शकतात.

**भारताची स्थिती :**

भारताची ६२.५% लोकसंख्या १५-५९ वयोगटातील आहे, जी सतत वाढत आहे आणि २०३६ च्या आसपास शिखरावर असेल. त्यावेळी ही लोकसंख्या अंदाजे ६५% पर्यंत पोहोचेल.

हे लोकसंख्या मापदंड भारतातील लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाची उपलब्धता दर्शवतात, जी २००५-०६ मध्ये सुरू झाली आणि २०५५-५६ पर्यंत चालेल. भारतातील मनुष्यबळाने आरोग्यसेवा, शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण आणि शाश्वत रोजगाराच्या संधींची निर्मिती या क्षेत्रांत चांगली कामगिरी केल्यास भारताच्या लोकसंख्येच्या वाढीचे लोकसंख्याशास्त्रीय लाभांशात रूपांतर होऊ शकते. अर्थात, यात अपयश आल्यास अपेक्षित लोकसंख्याशास्त्रीय फायदा हा लोकसंख्याशास्त्रीय आपत्तीतही रुपांतरीत होऊ शकतो.

**फायदे आणि क्षमता :**

डेमोग्राफिक डिव्हिडंड दरम्यान चार यंत्रणा आहेत ज्याद्वारे फायदे वितरित केले जातात.

मजूर पुरवठा : पहिला म्हणजे वाढलेला कामगार पुरवठा. तथापि, या फायद्याची उपयुक्तता ही निव्वळ लोकसंख्याशास्त्रीय भेट नसून, ती अतिरिक्त कामगारांना सामावून घेण्याच्या आणि त्यांना उत्पादनक्षमतेने काम देण्याच्या अर्थव्यवस्थेच्या क्षमतेवर अवलंबून असल्याचे दिसते.

बचतीत वाढ : दुसरी यंत्रणा म्हणजे बचत वाढवणे. अवलंबून असलेल्यांची संख्या कमी झाल्यामुळे व्यक्ती अधिक बचत करू शकतात. राष्ट्रीय बचत दरांमध्ये झालेल्या या वाढीमुळे आधीच भांडवलाची कमतरता असलेल्या विकसनशील देशांमधील भांडवलाचा साठा वाढतो आणि जमा झालेले भांडवल गुंतवले गेल्याने उत्पादकता वाढते.

मानवी भांडवल : तिसरी यंत्रणा म्हणजे मानवी भांडवल. प्रजनन दरात घट झाल्यामुळे स्त्रिया निरोगी होतात आणि घरात आर्थिक ताण कमी होतो. हे पालकांना प्रत्येक मुलासाठी अधिक संसाधने पुरविणे शक्य करते, ज्यामुळे चांगले आरोग्य आणि शैक्षणिक परिणाम प्राप्त होतात.

मागणीत वाढ : दरडोई वाढत्या ऋळ्झमुळे आणि घटत्या अवलंबित्व प्रमाणामुळे वाढती देशांतर्गत मागणी, ही वाढीची चौथी यंत्रणा आहे.

**लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाशी संबंधित समस्या :**

- लोकसंख्याशास्त्रीय लाभांश पूर्णतः तेव्हाच प्राप्त होईल जेव्हा भारत सतत वाढत्या कामाच्या वयाच्या लोकसंख्येसाठी फायदेशीर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यास सक्षम असेल.
- भारतीय कर्मचार्यांमध्ये कौशल्याचा अभाव हे एक मोठे आव्हान आहे. कमी मानवी भांडवल पाया आणि कौशल्याच्या अभावामुळे भारत संधींचा फायदा कदाचित घेऊ शकणार नाही. णछऊझ च्या मानव विकास निर्देशांकात भारताचा १८९ देशांपैकी १३० क्रमांक लागतो, जो

चिंताजनक आहे. म्हणून, भारतीय कामगारांना कार्यक्षम आणि कुशल बनवण्यासाठी आरोग्य आणि शिक्षणाच्या मापदंडांमध्ये लक्षणीय सुधारणा करणे आवश्यक आहे. भारतातील अर्थव्यवस्थेचे अनौपचारिक स्वरूप हे भारतातील लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणाचे फायदे मिळवण्यात असणारा आणखी एक अडथळा आहे.

- अ-औद्योगिकीकरण, अ-जागतिकीकरण, चौथी औद्योगिक क्रांती आणि तंत्रज्ञानातील प्रगती यामुळे भविष्यातील वाढ बेरोजगारी आणू शकते, अशी चिंता वाढली आहे.
- जाती भेदभाव, लिंग असमानता, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील वाढती उत्पन्नातील दरी, धार्मिक भेद, अकार्यक्षम आणि संथ कायदेशीर व्यवस्था- या सर्व गोष्टींमुळे भारतात जनतेच्या राहणीमानाचा दर्जा अधिकाधिक निकृष्ट होत आहे.

**उपाय :**

- आरोग्यसेवा, दर्जेदार शिक्षण, नोकऱ्या आणि कौशल्यांद्वारे लोकांमध्ये गुंतवणूक केल्याने मानवी भांडवल तयार करण्यात मदत होते, जी आर्थिक वाढीस आधार देण्यासाठी, टोकाच्या गरिबीचा अंत करण्यासाठी आणि अधिक समावेशक समाज निर्माण करण्यासाठी महत्त्वाची बाब आहे.
- तरुण लोकसंख्येची रोजगार क्षमता वाढवण्यासाठी कौशल्य विकास. आधुनिक अर्थव्यवस्थेसाठी भारताच्या श्रमशक्तीला योग्य कौशल्याने सक्षम करणे आवश्यक आहे.
- प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणामध्ये योग्य गुंतवणूक करून शैक्षणिक पातळी वाढवणे. तसेच, शैक्षणिक-उद्योग सहयोग आधुनिक उद्योगाच्या मागण्या आणि शैक्षणिक स्तरांमध्ये समन्वय साधण्यासाठी आवश्यक आहे.
- आरोग्यसेवा पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्याने तरुण श्रमशक्तीसाठी अधिक उत्पादक दिवसांची खात्री देईल, त्यामुळे अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढेल.
- कार्यशक्तीमध्ये तरुणांची भर घालण्यासाठी देशाला दरवर्षी दहा दशलक्ष नोकऱ्या निर्माण करण्याची गरज आहे. व्यवसायांच्या हितसंबंधांना आणि उद्योजकतेला चालना दिल्याने मोठ्या श्रमशक्तीला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार निर्मिती करण्यात मदत होईल.
- येत्या काही वर्षांत मोठी तरुण आणि कार्यरत लोकसंख्या त्यांच्या स्वतःच्या आणि इतर राज्यांमधील शहरी भागात स्थलांतरित होईल, ज्यामुळे शहरी लोकसंख्येमध्ये जलद आणि मोठ्या प्रमाणात वाढ होईल. या स्थलांतरित लोकांना शहरी भागात मूलभूत सुविधा, आरोग्य आणि सामाजिक सेवा कशा मिळू शकतात, याकडे शहरी धोरण नियोजनाचे लक्ष केंद्रित होणे आवश्यक आहे.

***

# गरिबी आणि विकासाशी निगडित समस्या

**विषयाची ओळख :**

घरगुती आणि सामाजिक स्तरावर अनुभवलेल्या अनंत प्रकारच्या परिस्थितीजन्य दुर्दैवाचा अनुभव देणारी परिस्थिती म्हणजे गरिबी होय. गरिबीचे अनेक चेहरे आहेत, विविध स्थानांनुरूप आणि काळानुसार ते बदलत जातात आणि त्यांचे अनेक प्रकारे वर्णन केले गेले आहे. जेव्हा घरातील संसाधने सन्मानजन्य जगण्यासाठी गरजेच्या गोष्टी उपलब्ध करण्यात अपुरी पडतात, तेव्हा टोकाची गरिबी अनुभवास येऊ लागते. अतिशय गरीब असे लोक आहेत ज्यांना दिवसातून एकापेक्षा जास्त जेवण परवडत नाही आणि ते केवळ उत्पन्नाच्या एकाच स्रोतावर अवलंबून असतात. या दुर्बलतेची व्याख्या करायची झाल्यास ती शिक्षणाचा अभाव, कामाच्या संधींचा अभाव, घरगुती संसाधने कमी होणे आणि उपयुक्त सामाजिक आणि निर्णय घेण्याच्या गटांतून वगळणे जाणे, याद्वारे केली जाते. कमी शेतीच्या प्रदेशातून स्थलांतराच्या वाढत्या प्रमाणाने शहरी दारिद्र्याचे/गरिबीचे प्रमाण वाढवले आहे, विशेषतः जगातील प्रमुख शहरांच्या झोपडपट्टी भागात हे आढळून येते. असे असले तरी, गरीबी ही विकसनशील देशांमधील कृषी क्षेत्रातील निराशाजनक प्रगतीशीअतूटपणे निगडीत आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य दर शहरांपेक्षा दुप्पट आहेत, बहुतेकदा ग्रामीण लोकसंख्येचा मोठा भाग गरिबीच्या विळख्यात पाहायला मिळतो. वांशिक अल्पसंख्याक, अनुसूचित जाती, ज्यांना सतत भेदभाव अनुभवायास मिळतो असे आदिवासी आणि मूलनिवासी स्थानिक लोक, भटके व गुराखी-धनगर, आणि किरकोळ जमिनीवर कष्ट करणारे भूमिहीन मजूर यांच्यामध्ये सर्वाधिक दारिद्र्य आढळते. बर्याचदा, गरिबी ही अशी परिस्थिती असते ज्यातून लोक सुटू इच्छितात. त्यामुळे गरिबी हे खरंतर गरीब आणि श्रीमंत अशा दोघांसाठी एक कृती करण्याचे आवाहन आहे, ही एक जगाला बदलण्याची हाक आहे, जेणेकरून अनेकांना पुरेसे खाण्यासाठी मिळेल, पुरेसा निवारा मिळेल, शिक्षण आणि आरोग्याची उपलबधता असेल, हिंसाचारापासून संरक्षण आणि त्यांच्या समुदायासाठी एक आवाज मिळू शकेल.

**गरिबीची व्याख्या :**

दारिद्र्य वा गरिबी हे मालमत्ताहीनता, भूमिहीनता, बेरोजगारी, वंचितता आणि असहायता यांचे लक्षण आहे. ही निव्वळ आर्थिक घटना नाही. त्याला सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, ऐतिहासिक आणि भौगोलिक आयाम आहेत. गरिबी हा उपजीविकेच्या सुरक्षेचा आणि अन्नसुरक्षेचा अभाव आहे. ती भूक, उपासमार आणि असुरक्षितता आहे. गरिबी म्हणजे निवाऱ्याचा अभाव, शिक्षणाचा अभाव आणि आरोग्य सेवेचा अभाव. गरिबी म्हणजे आजारी असणे आणि तशा अवस्थेत डॉक्टरांना दाखवता येण्याची परिस्थिती नसणे. गरीबी म्हणजे शाळेत जाता न येणे आणि वाचावे कसे, हे माहित नसणे. गरिबी म्हणजे नोकरी नसणे, भविष्याची भीती, एका वेळी एकच दिवस ढकलणे. गरीबी म्हणजे अशुद्ध पाण्यामुळे होणाऱ्या आजारात आपले मूल गमावणे. गरिबी म्हणजे शक्तीहीनता, प्रतिनिधित्वाचा अभाव आणि स्वातंत्र्याचा अभाव! सर्वसाधारणपणे, गरिबीची व्याख्या अशी केली जाऊ शकते, जेव्हा लोक जीवनाच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाहीत, टेंभा त्यास गरिबी असे म्हणतात.

**गरिबीची वैशिष्ट्ये :**

गरिबीचे अनेक चेहरे, अनेक कारणे आणि अनेक परिणाम आहेत. तिचे अनेक आर्थिक आणि गैर-मौद्रिक परिमाण आहेत. तिची अनेक स्वरूप आहेत. गरिबी ही अनेक अडथळ्यांमुळे येते, हे अडथळे एकमेकांना मजबूत करत असतात.

**खालील वैशिष्ट्यांद्वारे गरिबी मांडता येते :**

- मोजकी मालमत्ता, भूमिहीनता आणि कमी उत्पन्न
- कमी वापर, बचत नाही आणि जास्त कर्ज
- बेरोजगारी, रोजगाराची असुरक्षितता आणि अन्न असुरक्षितता
- निरक्षरता आणि औपचारिक शिक्षण आणि प्रशिक्षणाचा अभाव
- अनारोग्य, तुटपुंज्या स्वरूपाची घरं, अस्वच्छता
- उपेक्षा आणि उच्च अवलंबित्व
- प्रमुख व्यक्ती/संस्थांशी मोजका संपर्क

- प्रभावशाली गटांमध्ये मोजका सहभाग
- गरिबांमध्ये संसाधनांसाठी असणारी स्पर्धा
- आर्थिक असुरक्षा आणि अधीनता
- स्वाभिमानाची कमतरता, कमी स्वरूपाचा सामाजिक दर्जा आणि मान्यता
- तुटपुंजे उपजीविकेचे साधन आणि भविष्यासाठी कोणतीही योजना नाही

**गरिबीचे प्रकार :**

**संपूर्ण दारिद्र्य :** अन्न, सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता सुविधा, आरोग्य, निवारा, शिक्षण आणि माहिती यासह मूलभूत मानवी गरजांपासून गंभीर स्वरूपात वंचित असण्याची ही स्थिती आहे. हे केवळ उत्पन्नावरच नाही तर सामाजिक सेवांच्या उपलब्धतेवर देखील अवलंबून असते. उदाहरणार्थ, एखादे कुटुंब गरीब आहे, जर ते अन्न, पाणी किंवा राहण्यासाठी मूलभूत कच्चे घर देखील मिळवू शकत नाही.

**सापेक्ष गरिबी :** ही घरगुती उत्पन्नाची पातळी आहे जी, देशाच्या सरासरी उत्पन्नापेक्षा खूपच कमी आहे. ही समाजातील इतर सदस्यांच्या तुलनेत संसाधनांची कमतरता आहे. ही एक सापेक्ष संकल्पना आहे म्हणून ती सर्व देशांमध्ये भिन्न आढळते. उदाहरणार्थ, एखाद्या कुटुंबाला अन्न, पाणी, निवारा इत्यादी मूलभूत सुविधा असूनही ते आपल्या मुलांना चांगल्या शाळेत पाठवू शकत नसल्यास गरीब मानले जाऊ शकते.

**परिस्थितीजन्य दारिद्र्य :** हे तात्पुरते स्वरूपाचे असते आणि भूकंप, पूर किंवा काही गंभीर आरोग्य समस्यांसारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे उद्भवते. उदाहरणार्थ, एक कुटुंब दर महिन्याला २०,००० रु. इतके चांगले उत्पन्न मिळवते आणि जीवनाच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यास सक्षम आहे. एके दिवशी शहरात भूकंप येतो आणि त्यांचे घर उद्ध्वस्त होते; कुटुंबातील कमावता सदस्य नोकरी गमावतो. त्यामुळे एक व्यवस्थित जगू शकणारे कुटुंब अचानक रातोरात गरीब होते.

**पिढ्यानपिढ्या किंवा दीर्घकालीन व तीव्र स्वरूपाची गरीबी :** या प्रकारची गरिबी घरातून वारशाने मिळते. गरिबीत जन्मलेल्या दोन ते तीन पिढ्या आणि त्यांच्याकडे या परिस्थितीतून बाहेर पडण्याची साधने नसणे, यातून ही गरिबी येते.

**ग्रामीण गरिबी :** ५०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरी नसलेल्या भागात ही आढळते. कमी लोकसंख्येमुळे, या भागात मूलभूत सेवा आणि सुविधांचा अभाव असतो जे त्यांच्या आर्थिक संघर्षाचे कारण ठरते.

**शहरी दारिद्र्य :** हे ५०,००० पेक्षा जास्त रहिवासी लोकसंख्या असलेल्या भागात आढळते. गर्दीमुळे ही कुटुंबे खूप तणावात राहतात. त्यांना परवडणाऱ्या घरांसारख्या मूलभूत गरजांचा अभाव असतो.

**गरिबी मोजणे :**

गरिबी दूर करण्यासाठी काय मदत करते, काय कार्य करते आणि काय नाही, कालांतराने काय बदलते हे जाणून घेण्यासाठी गरिबीची व्याख्या, मोजमाप आणि अभ्यास करावा लागेल – आणि किंबहुना गरिबी जगूनही पाहावी लागेल. गरिबीला अनेक आयाम असल्याने, तिच्याकडे विविध निर्देशकांद्वारे पाहिली पाहिजे – उत्पन्न आणि उपभोगाची पातळी, सामाजिक निर्देशक आणि आता, वाढत्या प्रमाणात, जोखमींच्या असुरक्षिततेचे निर्देशक आणि सामाजिक/राजकीय बाबींची उपलब्धता. त्यात अनेक गैर-उत्पन्न आणि न मोजता येणारे परिमाण आहेत. गरिबीची व्याख्या किंवा मोजमाप करण्याचे प्रयत्न त्याच्या अनुभवाच्या वास्तवाला न्याय देत नाहीत.

दारिद्र्य आणि असमानता या बहुआयामी आहेत – उपभोग आणि उत्पन्न, शिक्षण, आरोग्य, संधी, आवाज इ. आणि त्याचे अनेक निर्धारक आहेत – भौगोलिक आणि कृषी-हवामान घटक, सेवा, पायाभूत सुविधा इ. याकडे विविध निर्देशकांद्वारे पाहिले पाहिजे. जसे, उत्पन्न आणि उपभोगाचे स्तर, सामाजिक संकेतक, आणि जोखमींच्या असुरक्षिततेचे सूचक आणि सामाजिक/राजकीय उपलब्धता.

संपूर्ण दारिद्र्य हे उत्पन्न किंवा कुटुंबाच्या उपभोग पातळीशी संबंधित नसून, काही किमान जीवनमानाशी संबंधित आहे. संपूर्ण दारिद्र्य ही संकल्पना कमी विकसित देशांसाठी लागू आहे. त्याचे मोजमाप करण्यासाठी, जगण्याचे निरपेक्ष मानदंड प्रथम मांडले जातात. हे उत्पन्न किंवा खर्चाच्या संदर्भात व्यक्त केले जाते. या प्रमाणाच्या खाली असणारी व्यक्ती (ज्याला दारिद्र्यरेषा म्हणतात) गरीब म्हणून वर्गीकृत केली जाते. भारतात, गरिबीचे प्रमाण रोजच्या आहाराच्या संदर्भात आहे. भारतीय नियोजन आयोगाच्या व्याख्येनुसार, दारिद्र्यरेषा ग्रामीण भागात २४०० कॅलरी आणि

शहरी भागात २१०० कॅलरीजच्या सेवनाच्या प्रमाणानुसार काढली जाते. जर एखाद्या व्यक्तीला कॅलरीजची किमान पातळी मिळवता येत नसेल, तर तो किंवा ती, दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत असल्याचे मानले जाते. या कॅलरी सेवनाचे प्रतिनिधित्व करणारी उपभोग पातळी नंतर ग्रामीण आणि शहरी भागांसाठी स्वतंत्रपणे किंमत निर्देशांक वापरून आर्थिक समतुल्य निर्देशांकात रूपांतरित केली जाते.

**भारतातील दारिद्र्यरेषा :**

पूर्वीचे नियोजन आयोग आणि आता नीती आयोग ही भारतातील दारिद्र्यरेषेच्या अंदाजासाठीची नोडल एजन्सी आहे. एनएसएसओने गोळा केलेल्या डेटाच्या आधारे त्याची गणना केली जाते.

आतापर्यंत नियुक्त केलेल्या काही प्रसिद्ध समित्या व त्यांच्या शिफारसी पुढीलप्रमाणे आहेत :

सुरेश तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार २०११–१२ मध्ये दारिद्र्यरेषा ग्रामीण भागात २७ रुपये आणि शहरी भागात ३३ रुपये निश्चित करण्यात आली होती. सुमारे २२% लोकसंख्या या रेषेखाली राहते.

रंगराजन समितीने या मर्यादा अनुक्रमे रु.३२ आणि रु.४७ पर्यंत वाढवल्या आणि ही मर्यादा ३०% च्या जवळपास गेली.

**अंदाज पद्धती :**

भारतामध्ये गरिबीच्या मोजमापाच्या अभ्यासाचा मोठा इतिहास आहे. पूर्वीचे नियोजन आयोग ही भारतातील गरिबीच्या अंदाजासाठी नोडल एजन्सी होती. नियोजन आयोगाने वेळोवेळी स्थापन केलेल्या तज्ञ गट/समित्यांनी सुचवलेल्या कार्यपद्धतीच्या आधारे, भारताने १९६० पासून गरिबीच्या घटनांचे नियतकालिक मूल्यांकन केले आहे.

भारतातील दारिद्र्य प्रमाण एका महिन्यातील दरडोई उपभोग खर्चाच्या संदर्भात निर्धारित केलेल्या बाह्यरित्या निर्धारित दारिद्र्यरेषेवरून मोजले गेले आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाच्या (छडडज) ग्राहक खर्चाच्या डेटाच्या मोठ्या नमुना सर्वेक्षणातून मिळालेल्या व्यक्तींच्या वर्ग वितरणातून ही मोजदाद झाली आहे. दारिद्र्यरेषेखालील उपभोग खर्च असलेल्या कुटुंबांना दारिद्र्य रेषेखालील (इझङ) असे म्हटले जाते आणि त्यांना गरीब मानले जाते. उपभोगाची मोजदाद ही वस्तू आणि सेवांच्या संग्रहाच्या आधारे केली जाते. या संग्रहास संदर्भ दारिद्र्यरेषा बास्केट (झडइ) म्हणून ओळखल्या जाते.

**अशा प्रकारे, भारतातील दारिद्र्याचा अंदाज दोन महत्त्वाच्या घटकांवर आधारित आहे :**

- उपभोग खर्चाची माहिती आणि त्याचे घराघरांत होणारे वितरण छडड उपभोग खर्च सर्वेक्षणाद्वारे प्रदान केले जाते;
- कुटुंबांद्वारे या खर्चाचे मूल्यमापन दिलेल्या दारिद्र्यरेषेच्या संदर्भात केले जाते.

**अ) दारिद्र्यरेषेचा अंदाज :**

दारिद्र्याचा अंदाज लावण्याची पहिली पायरी म्हणजे दारिद्र्यरेषेची व्याख्या आणि परिमाण ठरवणे.

**स्वातंत्र्यपूर्व दारिद्र्य अंदाज :**

i) भारतातील गरीबी आणि ब्रिटिश शासन (१९०१) : दादाभाई नौरोजी यांनी त्यांच्या 'पोव्हर्टी अँड अन–ब्रिटिश रुल इन इंडिया' या पुस्तकात दारिद्र्यरेषेचा सर्वात आधी अंदाज १८६७–६८ दरडोई १६ ते ३५ प्रति वर्ष या दराने मांडला. ही मांडणी स्थलांतरित कुलींच्या प्रवासादरम्यान निर्वाह आहाराच्या खर्चावर आधारित होती.

ii) राष्ट्रीय नियोजन समिती (१९३८) : १९३८ मध्ये, जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या राष्ट्रीय नियोजन समितीने किमान जीवनमानावर आधारित दारिद्र्यरेषा (दरडोई १५ ते २० रुपये दरमहा) सुचविली.

iii) द बॉम्बे प्लॅन (१९४४): बॉम्बे प्लॅन च्या समर्थकांनी दरडोई ७५ प्रतिवर्ष ची दारिद्र्यरेषा सुचवली, जी छझउ च्या तुलनेत खूपच माफक होती.

**स्वातंत्र्योत्तर दारिद्र्य अंदाज :**

नियोजन आयोगाने स्थापन केलेल्या विविध तज्ञ गटांनी भारतात गरिबीत जगणाऱ्या लोकांच्या संख्येचा अंदाज लावला आहे :

**i) कार्यगट (१९६२) :** भारतातील दारिद्र्यरेषेचे प्रमाण १९६२ मध्ये या गटाने प्रथमच निरोगी जीवनासाठी व्यक्तींच्या किमान गरजेनुसार (अन्न आणि गैर-अन्न) ठरवले होते. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (खउचठ) च्या पोषण सल्लागार गटाने १९५८ मध्ये केलेल्या संतुलित आहाराच्या शिफारशी कार्यगटाने विचारात घेतल्याचे दिसून आले. या गटाने ग्रामीण आणि शहरी भागांसाठी (२० आणि २५ दरडोई दरमहा अनुक्रमे १९६०-६१ किमतींनुसार) कोणत्याही प्रादेशिक फरकाशिवाय स्वतंत्र दारिद्र्यरेषा तयार केली. दारिद्र्यरेषेमध्ये आरोग्य आणि शिक्षणावरील खर्च वगळण्यात आले होते, जे दोन्ही राज्याने पुरवले जावेत असे गृहित धरण्यात आले होते. या अधिकृत दारिद्र्यरेषा नसल्या तरी, १९६० आणि १९७० च्या दशकात राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील दारिद्र्य प्रमाणाचा अंदाज लावण्यासाठी त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला गेला.

**ii) व्ही.एम. दांडेकर आणि एन रथ यांचा अभ्यास (१९७१) :** हा नियोजन आयोगाने केलेला अभ्यास नसला तरी, भारताच्या दारिद्र्यरेषेचा उगम व्ही एन दांडेकर आणि एन रथ या दोन अर्थशास्त्रज्ञांच्या अत्यंत महत्त्वाच्या व परिणामकारक कार्यात आहे, ज्यांनी दरडोई प्रतिदिन २,२५० कॅलरी सरासरी कॅलरीजच्या किमान उष्मांकाचे प्रमाण पूर्ण करण्यासाठी आवश्यक वापर पातळी प्रथमतः स्थापित केली. त्यांनी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण (छडड) डेटाच्या आधारे भारतातील गरिबीचे पहिले पद्धतशीर मूल्यांकन केले. हे त्यांच्या पूर्वाश्रमीच्या विद्वानांच्या मांडणीच्या पेक्षा भिन्न होते, ज्या विद्वानांनी पूर्वी निर्वाह जीवन किंवा मूलभूत किमान गरजा हे निकष दारिद्र्यरेषेचे माप मानले होते. त्यांनी ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागात दररोज २२५० कॅलरी पुरवण्यासाठी पुरेशा खर्चातून दारिद्र्यरेषा काढली. खर्चावर आधारित दारिद्र्यरेषेच्या अंदाजाने किमान कॅलरी वापराच्या नियमांवर वादविवाद निर्माण केला. त्यांना १९६०-६१ च्या किमतीनुसार ग्रामीण कुटुंबांसाठी दारिद्र्यरेषा दरडोई दरमहा १५ रु. आणि शहरी कुटुंबांसाठी दरडोई दरमहा २२.५ रु. आढळली.

**iii) डॉ. वाय. के. अलघ यांच्या अध्यक्षतेखालील किमान गरजा आणि प्रभावी उपभोगाच्या मागणीचे अंदाज या विषयावरील टास्क फोर्स (१९७९) :** या टास्क फोर्सची स्थापना १९७७ मध्ये करण्यात आली आणि तिने १९७९ मध्ये आपला अहवाल सादर केला. या टास्क फोर्सच्या दृष्टिकोनावर आधारित भारतात पहिल्यांदाच अधिकृत गरिबीची गणना सुरू झाली. ग्रामीण भागात दरडोई २४०० किलो कॅलरी आणि शहरी भागात दरडोई २१०० किलो कॅलरी अशी सरासरी दरडोई दैनंदिन कॅलरीची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी दरडोई उपभोग खर्चाची पातळी म्हणून दारिद्र्यरेषेची व्याख्या करण्यात आली. १९७१ च्या जनगणनेच्या संदर्भात पोषण तज्ञ गटाने (१९६८) शिफारस केलेल्या वय-लिंग-आधारित ठराविक कॅलरी भत्त्यांची लोकसंख्या-भारित सरासरी म्हणून सरासरी कॅलरी आवश्यकतांचा अंदाज लावला गेला. १९७३-७४ च्या किमतींवर आधारित, टास्क फोर्सने ग्रामीण आणि शहरी दारिद्र्यरेषा अनुक्रमे रु. ४९.०९ आणि रु. ५६.६४ दरडोई प्रति महिना निर्धारित केल्या. या रेषा ग्रामीण आणि शहरी वापरासाठी वेगवेगळ्या 'पीएलबी'च्या गृहीतकावर आधारित होत्या.

**iv) लकडावाला तज्ञ गट (१९९३) :** तज्ञ गटाने १९९३ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्याने दारिद्र्यरेषेस पुनर्परिभाषित केले नाही आणि किमान पोषण आवश्यकतेच्या आधारावर राष्ट्रीय स्तरावर अलघ समितीने शिफारस केलेली स्वतंत्र ग्रामीण आणि शहरी दारिद्र्यरेषा कायम ठेवली.

**v) तेंडुलकर तज्ञ गट (२००९) :** २००५ मध्ये, सुरेश तेंडुलकर यांच्या अध्यक्षतेखालील आणखी एक तज्ञ गट गरिबीच्या अंदाजाच्या पद्धतीचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आला. मागील पद्धतींच्या तीन प्रमुख उणीवा दूर करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते : (ळ) दारिद्र्य अंदाज १९७३-७४ च्या दारिद्र्यरेषेवर (झङइ) वस्तू आणि सेवांच्या दारिद्र्यरेषेशी जोडल्या गेल्याने कालांतराने गरीबांच्या उपभोग पद्धतींमध्ये लक्षणीय बदल दिसून आले नाहीत; (ळळ) महागाईसाठी किंमतींच्या समायोजनाशी संबंधित समस्या, दोन्ही अवकाशीय (प्रदेशात) आणि तात्पुरते (६ वेळा); आणि (ळळळ) केवळ राज्याद्वारे आरोग्य आणि शिक्षणाच्या तरतुदीचा अंदाज. मासिक कौटुंबिक उपभोगाऐवजी, उपभोग खर्च प्रति व्यक्ती प्रतिदिन वापरामध्ये विभागला गेला, परिणामी शहरी आणि ग्रामीण भागांसाठी दिवसाला ३२ आणि २६ रुपये इतका आकडा आला. २०११-१२ साठी राष्ट्रीय दारिद्र्यरेषेचा अंदाज ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा रु. ८१६ आणि शहरी भागांसाठी रु. १,००० एवढा होता.

**vi) रंगराजन समिती (२०१४) :** तेंडुलकर समितीच्या दृष्टिकोनावर व्यापक टीका झाल्यामुळे तसेच बदलत्या काळानुसार आणि भारतातील लोकांच्या आकांक्षांमुळे, रंगराजन समितीची स्थापना २०१२ मध्ये करण्यात आली. या समितीने जून २०१४ मध्ये आपला अहवाल सादर केला. अखिल भारतीय ग्रामीण आणि शहरी दारिद्र्यरेषा स्वतंत्र ठेवण्याच्या पद्धतीस तिने पुनर्स्थापित केले. यात ग्रामीण आणि शहरी भागांसाठी स्वतंत्र उपभोग रचनेची शिफारस केली गेली. ज्यात शिफारस केलेल्या कॅलरी, प्रथिने आणि चरबीचे सेवन आणि कपडे, शिक्षण, आरोग्य, घर आणि वाहतूक यासारख्या गैर-अन्न पदार्थांचा समावेश आहे. या समितीने २०११-१२ च्या किमतीनुसार दैनंदिन दरडोई खर्च शहरी भागासाठी ४७ रुपये आणि ग्रामीणसाठी ३२ रुपये (३२ रुपये आणि २६ रुपयांवरून) एवढा वाढवला. मासिक दरडोई उपभोग खर्च ग्रामीण भागात ९७२ रु. आणि शहरी भागांत १४०७ रु. याची अखिल भारतीय स्तरावर दारिद्र्यरेषा म्हणून शिफारस केली गेली. रंगराजन समितीच्या अहवालावर सरकारने कौल

घेतला नाही.

सहा अधिकृत समित्यांनी आतापर्यंत भारतात गरिबीत जगणाऱ्या लोकांच्या संख्येचा अंदाज लावला आहे – १९६२ चा कार्यरत गट; व्ही एन दांडेकर आणि एन रथ यांनी १९७१ मध्ये; वाय के अलघ यांनी १९७९ मध्ये; १९९३ मध्ये डी टी लकडावाला; २००९ मध्ये सुरेश तेंडुलकर; आणि २०१४ मध्ये सी रंगराजन. रंगराजन समितीच्या अहवालावर सरकारने निर्णय घेतला नाही; त्यामुळे तेंडुलकर दारिद्र्यरेषेचा वापर करून गरिबी मोजली जाते. यानुसार, भारतातील २१.९% लोक दारिद्र्यरेषेखाली जगतात.

**गरिबीचा अंदाज इतर कोणत्या मार्गांनी लावता येईल ? :**

२०११ मध्ये, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या संशोधक सबिना अल्किरे आणि जेम्स फॉस्टर यांनी १० निर्देशकांचा वापर करून गरिबी निर्देशित करण्यासाठी बहुआयामी गरीबी निर्देशांक (एमपीआय) तयार केला : पोषण, बालमृत्यू, शालेय शिक्षणाची वर्षे, शाळेत उपस्थिती, मालमत्तेची मालकी आणि योग्य घर, वीज, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि स्वच्छ स्वयंपाकाचे इंधन. या निर्देशकांपैकी किमान एक तृतीयांश वंचिततेच्या संदर्भात गरिबी मोजली जाते. २०१५-१६ मध्ये, ३६९.५४६ दशलक्ष (जवळपास ३७ कोटी) भारतीय हे वरील १० पैकी तीन किंवा त्याहून अधिक निर्देशकांसाठी वंचित असल्याचा अंदाज आहे. २०१५-१६ मध्ये एकूणच बहुआयामी दारिद्र्याचे प्रमाण २७.९% होते, तर ग्रामीण भागात ही संख्या ३६.८% आणि शहरी भारतासाठी ९.२% होती. सर्व राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत होती – बिहारमध्ये गरिबी ही सर्वाधिक (५२.५%) होती, त्यानंतर झारखंड (४६.५%), मध्य प्रदेश (४१.१%) आणि उत्तर प्रदेश (४०.८%) असे आकडे होते. केरळमध्ये गरिबी ही सर्वांत कमी (१.१%) होती. दिल्ली (४.२%), पंजाब (६.१%), तामिळनाडू (७.३%) आणि हिमाचल प्रदेशमध्ये (८.१%) असे आकडे होते. चझख हे गरिबीचे अधिक व्यापक मोजमाप आहे, कारण त्यात जीवनमानाचा दर्जा अधिक प्रभावीपणे समाविष्ट करणारे घटक आहेत. तथापि, हे मोजमाप खर्चाऐवजी परिणाम वापरते – उदा– एखाद्या घरात एखादी कुपोषित व्यक्ती असल्यास पौष्टिक अन्नावरील खर्चाची पर्वा न करता ते घर गरीब म्हणून वर्गीकृत केले जाईल.

**भारतातील गरिबीची कारणे :**

**–. गरिबीची आर्थिक कारणे :**

**१. मंद आर्थिक वाढ आणि विकास :** चुकीच्या सरकारी धोरणांमुळे ज्या देशाची आर्थिक वाढ मंद आहे, त्या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर गरिबी पसरते. रखडलेला किंवा मंद गतीचा आर्थिक विकासही गरिबीला कारणीभूत ठरतो.

**२. वाढती बेरोजगारी :** लोकसंख्या आणि नोकर्यांचे प्रमाण हे असंतुलित असल्यास ते जनसामान्यांमधील बेरोजगारीला कारणीभूत ठरू शकते आणि हे गरिबीचे प्रमुख कारण आहे. कोणत्याही देशात वाढलेली आणि अनियंत्रित लोकसंख्या हा बेरोजगारीशी संबंधित गरिबीचा सर्वात मोठा धोका आहे.

**३. घटलेले कृषी उत्पादन :** हे बेभरवशाच्या हवामान पद्धतीमुळे असू शकते. कृषी उत्पादनात घट झाल्यामुळे महागाईच्या काही गंभीर समस्या निर्माण होतात. मजबूत कृषी कण्याच्या मदतीशिवाय कोणताही देश आर्थिकदृष्ट्या संतुलित होऊ शकत नाही. वार्षिक कृषी उत्पादन हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक प्रमुख भाग असते आणि गरिबी दूर ठेवण्यासाठी ते अतिरिक्त प्रमाणात असणे आवश्यक आहे.

**४. निम्नविकसित पायाभूत सुविधा :** पायाभूत सुविधांचा विकास देखील आर्थिक वाढीला चालना देतो आणि त्यामुळे कोणत्याही ठिकाणची गरिबीची परिस्थिती निर्धारित करते.

**५. काही भागात असणारे अपुरे औद्योगिकीकरण :** उद्योग स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. कोणत्याही एका राज्यात किंवा ठिकाणी उद्योगांचे केंद्रीकरण निश्चितपणे त्या विशिष्ट ठिकाणी रोजगार वाढवते. परंतु, वंचित भागांना मात्र तीव्र गरिबीचा सामना करावा लागतो. अपुरे औद्योगिकीकरण असलेल्या भागात गरिबी निर्माण होते कारण या क्षेत्रात रोजगाराच्या संधी मर्यादित होतात. तात्पुरत्या नोकऱ्यांच्या तुलनेत उद्योग चांगल्या पगाराच्या नोकऱ्याही देतात.

**६. अत्यावश्यक वस्तूंचे अपुरे उत्पादन :** मुलभूत गरजांच्या उत्पादनातील कोणत्याही अपुरेपणामुळे देशभरात गरिबी येते. दारिद्र्य टाळण्यासाठी अन्न तसेच अन्नाव्यतिरिक्त आवश्यक वस्तूंचे उत्पादन नेहमीच पुरेसे असणे आवश्यक आहे.

**७. संसाधनांची वंचितता :** नैसर्गिक संसाधनांची वंचितता तसेच सक्तीने किंवा परिस्थितीजन्य आलेल्या वंचितपणामुळे गरिबी येऊ शकते. योग्य संसाधने आणि संधींच्या अभावामुळे लोक त्यांच्या लक्ष्यित जीवनशैली आणि रोजगाराच्या पर्यायांपासून वंचित राहतात आणि गरिबीकडे

ढकलले जातात.

**८. संपत्ती आणि संसाधनांचे असमान केंद्रीकरण :** ज्या राष्ट्रात संपत्ती आणि संसाधनांचे असमान केंद्रीकरण असते, अशा राष्ट्रास समान वितरण असलेल्या राष्ट्रापेक्षा गरिबीचा धोका जास्त आहे. असमान केंद्रीकरणामुळे अतिशय टोकाची परिस्थिती निर्माण होते, ज्यात लोक एकतर नवश्रीमंत असतात किंवा दारिद्र्यरेषेखालील असतात! हे असंतुलन देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेसाठी आणि विकासासाठी हानिकारक आहे.

**९. नैसर्गिक संसाधनांचा कमी वापर :** नैसर्गिक संसाधने ही महत्त्वाची देणगी आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणची नैसर्गिक संसाधने पूर्णपणे शोधून त्यांचा संपूर्ण आर्थिक फायदा मिळविण्यासाठी त्यांचा वापर करणे आवश्यक आहे. कोणत्याही ठिकाणी नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आवश्यक त्यापेक्षा कमी प्रमाणात होत असल्यामुळे त्या ठिकाणी गरीबीला वाव तर राहत नाही ना, याची खातरजमा करण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यायला हवा.

**१०. आर्थिक चलनवाढ :** आर्थिक चलनवाढीचा परिणाम केवळ गरीबांवरच होत नाही तर समाजातील मध्यमवर्गावरही होतो. याचा अर्थ असा की अधिक लोक सीमारेषेवरील गरिबीखाली येतात. आर्थिक चलनवाढ ही राष्ट्रासाठी अत्यंत हानिकारक असते आणि त्याचा फटका समाजातील सर्व घटकांना बसतो. तसेच, एखाद्या देशाला आर्थिक चलनवाढीतून सावरण्यासाठी अनेक वर्षे लागू शकतात आणि अनेक वर्षांच्या गरिबीला सामोरे जावे लागू शकते.

**इ. गरिबीची सामाजिक कारणे :**

**१. अस्पृश्यते सारखी सामाजिक दुष्कृत्ये :** अस्पृश्यता ही देशाच्या काही मागासलेल्या भागांमध्ये असणारी एक अन्याय्य सामाजिक रूढी आहे, जी विशिष्ट खालच्या जातीतील लोकांना त्यांच्या लोकशाही अधिकारांपासून मर्यादित करते. त्यांना समाजापासून दूर ठेवले जाते आणि गरिबीकडे ढकलले जाते. सामान्य रोजगार संधींमध्ये प्रवेश करण्याची त्यांना परवानगी नसते आणि आणि तुटपुंज्या नोकऱ्या करण्यास त्यांना भाग पाडले जाते.

**२. सत्तेचा अनैतिक दुरुपयोग :** जेव्हा सत्तेचा दुरुपयोग केला जातो तेव्हा त्याचा पक्षपाती दृष्टीकोन असतो आणि तो कधीही दीन आणि गरीबांना मदत करत नाही. भ्रष्ट सरकार जनतेवर अधिक नियंत्रण ठेवण्यासाठी समाजातील गरीब वर्गाला नेहमी यथास्थित ठेवू इच्छित असते. भ्रष्ट देशांमधील गरिबीचे हे आणखी एक प्रमुख कारण आहे.

**३. व्यापक अज्ञान आणि निरक्षरता :** निरक्षरता हे गरिबीचे आणखी एक प्रमुख कारण आहे. अशिक्षित लोक त्यांच्या पूर्ण क्षमतेचा वापर करू शकत नाहीत आणि त्यामुळे त्यांचे कमाईचे स्रोत मर्यादित राहतात. स्पर्धाशील सामाजिक परिस्थितीत ते समाजातील सुशिक्षित असणाऱ्यांशी स्पर्धा करू शकत नाहीत आणि म्हणून गरिबीतच राहतात. निरक्षरता हे देखील लोकांच्या अज्ञानाचे एक कारण आहे. कोणत्याही आधुनिक समाजाने देऊ केलेल्या सर्व संभाव्य संधींबद्दल ते अनभिज्ञ असतात आणि त्यांचे जीवन अज्ञानातच व्यतीत करतात.

**४. जास्त लोकसंख्या :** कोणत्याही ठिकाणी जास्त लोकसंख्या ही रोजगार क्षेत्रात स्पर्धा वाढवते. परिणामी, स्पर्धा वाढल्यामुळे आणि संधी कमी झाल्यामुळे कोणत्याही जास्त लोकसंख्येच्या ठिकाणी गरिबी शिरकाव करू लागते.

**५. जातिव्यवस्थेचे पालन करणे :** जातिव्यवस्था समाजातील लोकांना (त्यांच्या नोकरीच्या आधारे) वेगळे करते आणि त्यांना त्यांच्या जातीबाहेर नोकरी शोधण्याची परवानगी देत नाही. उदाहरणार्थ, खालच्या जातीतील व्यक्तीला व्यापारी बनू दिले जाणार नाही. या व्यवस्थेमुळे गरीब अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. ही असंतुलित आणि अन्यायकारक व्यवस्था गरिबीचे आणखी एक प्रमुख कारण आहे.

**६. घटस्फोटाचे वाढते प्रमाण आणि दारिद्र्याचे स्त्रीकरण :** दारिद्र्याचे स्त्रीकरण नष्ट करण्यासाठी समाजातील स्त्रीलिंगींना समान रोजगाराच्या संधी दिल्या पाहिजेत. तसेच, वाढत्या घटस्फोटाच्या दरांमुळे स्त्रीवर्गामध्ये दारिद्र्य निर्माण होते, जे लैंगिक असमानतेमुळे स्वतःचे समर्थन करू शकत नाहीत.

**७. उपलब्ध संधींची असमानता :** कुठल्याही कारणांनी समाजात असमानता असणे, यामुळे गरिबी येऊ शकते. उपलब्ध संधी समाजातील सर्वांना समान रीतीने दिल्या पाहिजेत. असमानतेमुळे समाजातील दुर्बल घटकांना संधी मिळण्यात अन्याय होतो.

**उ. भौगोलिक घटक :**

**१. लोकसंख्येची घनता :** क्षेत्रफळ लोकसंख्येची घनता देखील त्या ठिकाणच्या गरिबीचा आलेख ठरवते. दाट लोकवस्तीची ठिकाणे गरिबीच्या बाबतीत लाल रंगाची दिसतात.

**२. जमिनीची निवडक सुपीकता :** देशाच्या प्रत्येक प्रदेशात मातीची सुपीकता सारखी नसते आणि ठिकाणानुसार बदलते. सुपीक क्षेत्रांनी कृषी उत्पादनाला वरदान दिले आहे, तर नापीक जमिनी नैसर्गिकरित्या गरिबीकडे ढकलल्या जात आहेत.

**३. सुपीक जमिनीचे असमान वितरण :** भौगोलिकदृष्ट्या, सुपीक जमिनीचे वितरण असमान पद्धतीने केले जाते आणि हे नैसर्गिकरित्या नापीक जमिनींमध्ये गरिबीचे एक प्राथमिक कारण आहे. सुपीक जमिनींमुळे स्थानिक लोकांना शेतीसाठी रोजगार मिळतो आणि त्यांना उदरनिर्वाहासाठी नोकरीच्या संधीसाठी धडपड करावी लागत नाही. नापीक जमिनी मूळ रहिवाशांना कृषी क्षेत्रापासून पूर्णपणे वंचित ठेवतात आणि ही रोजगाराची व्याप्ती हिरावून घेतात, जी अशिक्षित गावकऱ्यांमध्ये रोजगाराची सर्वाधिक मागणी आहे.

**४. बदलते शेती उत्पादन :** शेतीचे उत्पादन हंगामानुसार आणि वर्षानुसार बदलते. एक चांगले वर्ष भरीव उत्पादन देऊन जाईल तर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्ती काही वेळा उत्पादन मर्यादित करू शकतात. या बदलामुळेही आव्हानात्मक काळात गरिबीचा सामना करावा लागतो.

**५. ग्रामीण आणि शहरी गरिबीत फरक :** ग्रामीण आणि शहरी गरिबी अनेक पातळ्यांवर भिन्न आहे. ग्रामीण आणि शहरी जीवनशैलीतील फरक त्यांच्या गरिबीच्या परिस्थितीवर वेगवेगळे परिणाम करतात. उदाहरणार्थ : गरीबांचे जगणे शहरी भागांपेक्षा ग्रामीण भागात अधिक शाश्वत आहे कारण शहरी भागांत जगण्यासाठी येणारा खर्च जास्त असतो.

**ऊ पर्यावरणीय आणि हवामान घटक :**

**१. जमिनीची धूप :** पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतजमिनी पूर्णपणे नष्ट होऊ शकतात आणि शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. यामुळे गरिबीची परिस्थिती निर्माण होईल ज्याचा देश क्वचितच सामना करू शकेल.

**२. दीर्घकालीन दुष्काळ :** गरिबीला कारणीभूत असणारी आणखी एक हवामानाची प्रतिकूलता म्हणजे दुष्काळ. दीर्घकालीन दुष्काळामुळे शेतजमिनी आणि एकूणच कृषी उत्पादनाला हानी पोहोचते. दुष्काळ हे बहुतेक राष्ट्रांमध्ये गरिबीचे कायमचे कारण आहे.

**३. मोसमी पर्जन्यमानाचा अभाव :** मोसमी पावसाची कोणतीही विसंगती देखील काही गंभीर गरिबीच्या समस्यांना कारणीभूत ठरू शकते. पावसाचा अंदाज न आल्याने कृषी उत्पादन विस्कळीत होते आणि त्यामुळे महागाईशी संबंधित दारिद्र्य निर्माण होते.

**ए. इतर कारणे :**

**१. योग्य शिक्षणाचा अभाव :** वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी शिक्षण निश्चितच आवश्यक आहे, परंतु योग्य स्वरूपाचे शिक्षण अधिक महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, ग्रामीण भागातील लोकांना पुस्तकी ज्ञानापेक्षा तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण दिले पाहिजे. यामुळे त्यांना तांत्रिक नोकऱ्या सहज उपलब्ध होतील आणि जनतेतील गरिबी दूर होईल.

**२. वाढती स्पर्धा :** उच्च पात्रता निकष असणाऱ्या समाजात नोकरी मिळण्याच्या बाबतीत मोठ्या स्पर्धेचा सामना करावा लागतो. यामुळे सुशिक्षित लोकांमध्येही स्पर्धा वाढते आणि परिणामी गरिबी वाढते. विशेषत: शहरांमध्ये वाढलेल्या शैक्षणिक दर्जाचा हा एक दुष्परिणामही म्हणता येईल.

**३. मागणी जास्त आणि पुरवठा कमी :** गरिबीमुक्त राष्ट्र साध्य करण्यासाठी मागणी–पुरवठा संबंध संतुलित असणे आवश्यक आहे. समतोल मागणी–पुरवठा राज्याची गुरुकिल्ली म्हणजे लोकसंख्या नियंत्रण. तुम्ही गरिबीमुक्त राष्ट्र शोधत असाल तर, लोकसंख्या व्यवस्थापनापासून सुटका नाही!

**४. ग्रामीण लोकसंख्येच्या अनुकूल स्वभावाचा अभाव :** ग्रामीण लोकसंख्येची सामान्यतः मागासलेली मानसिकता असते आणि ते आधुनिकीकरणाशी जुळवून घेण्यास नकार देतात. यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती बदलण्यात आणि गरिबी दूर करण्यात त्यांना फारशी मदत होत नाही. मोठ्या प्रमाणावर लोकसंख्येची मुक्त विचारसरणी आणि अनुकूलता ही गरिबी मुळापासून दूर करण्याचा एक महत्त्वाचा गुण आहे.

**५. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर :** शहरांमध्ये जास्त गर्दी मर्यादित करणे महत्वाचे आहे. गावकऱ्यांचे शहरांकडे मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर थांबवल्यासच हे शक्य आहे. बहुतांश ग्रामीण लोक मोठ्या रोजगाराच्या शोधात गाव सोडून शहरांमध्ये स्थलांतरित होतात. जर सरकार ग्रामीण भागाचा पुरेसा विकास करू शकले आणि ग्रामीण जनतेला चांगले रोजगार तसेच शैक्षणिक संधी उपलब्ध करून देऊ शकले, तर ते

समाधानी राहतील आणि त्यांच्या गावातच राहतील. यामुळे शहरी गरिबीचा निर्देशांक कमी होईल आणि शहरांची लोकसंख्याही नियंत्रणात राहील.

**गरिबीचे परिणाम :**

**आरोग्यावर परिणाम –** गरिबीचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे अनारोग्य वा खराब आरोग्य. गरिबीने ग्रासलेल्यांना पुरेसे अन्न, पुरेसे कपडे, वैद्यकीय सुविधा आणि स्वच्छ परिसर उपलब्ध नसतो. या सर्व मूलभूत सुविधांच्या अभावामुळे आरोग्य बिघडते. अशा व्यक्ती आणि त्यांचे कुटुंब कुपोषणाने ग्रस्त असतात.

**समाजावर होणारे परिणाम –**

- बेरोजगारी आणि उपेक्षिततेमुळे, गरीब लोक अनेकदा वेश्याव्यवसाय, चोरी आणि साखळीचोरी यांसारख्या गुन्हेगारी कृत्यांमध्ये गुंततात.
- गरीब लोक सहसा बेघर असतात. ते रात्री रस्त्याच्या कडेला झोपतात. यामुळे संपूर्ण परिस्थिती महिला आणि मुलांसाठी असुरक्षित बनते.
- पैशाच्या कमतरतेमुळे, गरीब लोकांना खूप तणावाचा सामना करावा लागतो ज्यामुळे व्यक्तींची उत्पादकता कमी होते, ज्यामुळे गरीब लोक अधिक गरीब होतात.
- गरिबीमुळे गरीब लोकांना त्यांच्या मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी कामावर पाठवावे लागते. याचे कारण असे की कुटुंबे त्यांच्या मुलाचा/मुलांचा भार उचलण्यात अपयशी ठरतात.
- गरीब कुटुंबातील तरुणांना सहसा लक्ष्य केले जाते आणि त्यांना दहशतवादी कारवायांमध्ये सामील केले जाते. या लोकांना मोठ्या रकमेची ऑफर दिली जाते आणि त्यासाठी त्यांच्यावर दहशतवादाचे विनाशकारी काम सोपवले जाते.

गरिबी ही अर्थव्यवस्थेच्या यशाशी समप्रमाणात असते. गरिबीत जगणाऱ्या लोकांची संख्या ही अर्थव्यवस्था किती शक्तिशाली आहे हे दर्शवते.

**गरिबीवरील उपाय :**

**गरिबी दूर करण्यासाठी विविध उपाययोजना आहेत. ते पुढीलप्रमाणे :**

**i) बचतीमध्ये वाढ :** देशातील पुरवठा बाजूच्या दुष्टचक्रापासून मुक्त होण्यासाठी, बचत वाढवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत जेणेकरून उत्पादक मार्गांमध्ये गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळू शकेल. बचत वाढवण्यासाठी विवाह, सामाजिक समारंभ इत्यादींवर होणारा खर्च कमी केला पाहिजे. कमी विकसित देशांमध्ये, ऐच्छिक बचतीची शक्यता कमी आहे. त्यामुळे या संदर्भात सरकारी हस्तक्षेप आवश्यक आहे. सरकार आपल्या वित्तीय धोरणात बदल करून बचत वाढवू शकते. सरकार चैनीच्या वस्तूंवर भारी कर लावू शकते. शिवाय, ते थेट करांची भूमिका वाढवू शकते. अशा प्रकारे, सरकार कर प्रणालीत बदल करून चैनीच्या वस्तूंचा वापर कमी करू शकते.

**ii) गुंतवणुकीत वाढ :** गरिबीचे दुष्टचक्र मोडून काढण्यासाठी बचत वाढवण्याबरोबरच उत्पादक वाहिन्यांमध्ये बचतीची गुंतवणूक ही देखील मोठी उपयोगाची ठरते. अल्पकालीन आणि दीर्घकालीन गुंतवणुकीची धोरणे यांचा समन्वय असावा. अल्प कालावधीच्या गुंतवणुकीद्वारे, लोकांना आवश्यक वस्तू रास्त दरात मिळू शकतात, ज्याचा त्यांच्या कौशल्यावर अनुकूल परिणाम होईल. शिवाय, अल्प कालावधीच्या गुंतवणुकीबरोबरच लोखंड आणि रासायनिक खतांसारख्या बहुउद्देशीय प्रकल्पांच्या उभारणीत गुंतवणुकीला योग्य प्रोत्साहन दिले पाहिजे. णऊळ मध्ये, योग्य चलनविषयक आणि बँकिंग धोरणे अवलंबली पाहिजेत ज्यामुळे लहान बचतींना सुविधा आणि प्रोत्साहन मिळू शकेल.

**iii) समतोल वाढ :** कमी विकसित देशांमधील मागणीच्या दुष्टचक्राचे निराकरण करण्यासाठी, बाजारपेठेची व्याप्ती वाढवली पाहिजे जेणेकरून लोकांना गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करता येईल. याबाबत प्रा. नुरकसे यांनी समतोल वाढीचा सिद्धांत मांडला. संतुलित वाढीच्या तत्त्वानुसार, अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात गुंतवणूक केली गेली पाहिजे जेणेकरून एका क्षेत्राची मागणी दुसऱ्या क्षेत्राकडून पूर्ण करता येईल. अशाप्रकारे, मागणीत वाढ झाल्यामुळे बाजाराचा विस्तार व्यापक होईल आणि त्यामुळे गुंतवणूक करण्यास लोक प्रवृत्त होतील. दुसरीकडे, हिर्शमन, सिंगर आणि फ्लेमिंगसारखे अर्थशास्त्रज्ञ मात्र संतुलित वाढीचे धोरण प्रभावी मानत नाहीत. त्यांच्या मते असंतुलित वाढीचे धोरण अधिक उपयुक्त ठरेल. णऊळ मध्ये, मागणी वाढण्याची सर्व प्रकारची शक्यता असते आणि आर्थिक उत्पन्न वाढण्याची गरज असते. बहुसंख्य णऊळ ने नियोजित विकासाचे धोरण स्वीकारले आहे. त्यानुसार सार्वजनिक क्षेत्रात अधिक गुंतवणुकीमुळे पैशाचा पुरवठा वाढतो. आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्यामुळे बाजाराचा

आकार वाढतो. हे देश आपली निर्यात वाढवून परदेशी बाजारपेठेचा आकार वाढवण्याचा प्रयत्न करतात.

**iv) मानवी भांडवल निर्मिती :** कमी विकसित देशांमध्ये, आर्थिक वाढीचा मुख्य अडथळा म्हणजे मानवी भांडवलाचे मागासलेपण होय. मानवी भांडवलाकडे यापुढे दुर्लक्ष होता कामा नये. मनुष्यबळाचे कौशल्य वाढवण्यासाठी अनेक सूचना करता येतील. उदाहरणार्थ, या देशांमध्ये शिक्षण, तांत्रिक ज्ञान आणि व्यावसायिक प्रशिक्षण वाढवले पाहिजे. आरोग्य सुविधा वाढवल्या पाहिजेत, ज्यामुळे कामगारांची कार्यक्षमता वाढू शकेल. वाहतूक आणि दळणवळणाचा विकास झाला पाहिजे.

**v) औद्योगिकीकरण :** औद्योगिकीकरणाच्या स्वयं-शाश्वत प्रक्रियेद्वारे गरिबीचे उच्चाटन केले जाऊ शकते. सहायक उद्योग आणि व्यवसायांची शक्तिशाली प्रक्रिया तयार करण्यासाठी सर्व उद्योगांना जोडणी असली पाहिजे. सहायक उद्योगांच्या स्थापनेद्वारे उद्योगांना मोठी मदत मिळू शकते. उद्योगधंदे शेतीच्या वाढीशी जोडले गेले पाहिजेत. खेड्यातील लोकांना रोजगार देण्यासाठी कृषी-आधारित उद्योग वाढले पाहिजेत कारण ते खूप कष्टकरी असतात. औद्योगीकरणामुळे विकास प्रक्रियेत हातभार लागू शकतो आणि लोकांच्या जीवनमानाच्या दर्जात सुधारणा होऊ शकते.

**गरिबी कमी करण्यासाठी इतर उपाय :**

**i) अधिक रोजगाराच्या संधी :** अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करून गरिबी दूर केली जाऊ शकते, जेणेकरून लोक त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकतील.

**ii) किमान गरजा कार्यक्रम :** गरीब लोकांना किमान गरजा पुरवणे गरिबीची समस्या कमी करण्यास मदत करू शकते.

**iii) सामाजिक सुरक्षा कार्यक्रम :** विविध सामाजिक सुरक्षा योजना, जसे की कामगार नुकसान भरपाई, मातृत्व लाभ, भविष्य निर्वाह निधी इत्यादी गरिबीवर थेट हल्लाबोल करू शकतात

**iv) लघुउद्योग :** लघु उद्योगांची स्थापना केल्याने आणि त्यांना प्रोत्साहन दिल्याने ग्रामीण भागात रोजगार निर्माण होऊ शकतो, ज्यामुळे गरिबी कमी होऊ शकते.

**v) शिक्षणाचा प्रसार :** शिक्षणामुळे जागृती निर्माण होऊ शकते आणि गरिबीवर मात करण्यासाठी लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.

**vi) गरिबांचे सक्षमीकरण :** विकासाच्या निर्दयी व्यवस्थेमुळे गरीब लोकांचा आवाज कुणीही ऐकत नाही. त्यामुळे गरीब लोकांचे सक्षमीकरण झाल्यास गरिबी कमी होईल.

**vii) जमीन सुधारणा :** भारतात जमीन ही अनेक ठिकाणी अनुपस्थित जमीनदारांच्या मालकीची आहे. त्यामुळे जमिनीची खरी मशागत करणाऱ्यांना हक्क देण्यासाठी जमीन सुधारणा आवश्यक आहे.

**viii) मालमत्ता निर्मिती :** उत्पादक मालमत्ता निर्माण करणे आवश्यक आहे जे गरीब लोकांसाठी नियमित उत्पन्न सुनिश्चित करेल.

**ix) राजकीय इच्छाशक्ती :** गरिबीच्या आव्हानाला तोंड देण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची आणि मुसंडीची गरज आहे. दारिद्र्यमुक्त देश होण्याच्या निर्धाराने सरकारी धोरण आखले पाहिजे

**x) सामाजिक बदल :** सामाजिक स्तर आणि पारंपारिक मूल्ये कट्टरतेपासून मुक्त असावीत. जातिव्यवस्थेने कोणत्याही लोकांमध्ये कोणत्याही गोष्टीसाठी भेदभाव करू नये. खालच्या जातीतील आणि महिलांमधील गरिबी दूर करण्यासाठीही सामाजिक सुधारणांची गरज आहे.

**गरीबी आणि भूक यांच्यातील संबंध :**

- गेल्या दोन दशकांत लोकांच्या वास्तविक उत्पन्नात वाढ झाली असली तरी, एकूण कॅलरी वापर आणि पौष्टिक आहारात मात्र त्या बरोबरीने वाढ झालेली नाही. ग्लोबल हंगर इंडेक्सनुसार, मुलांमध्ये उंचीच्या तुलनेत कमी वजन असण्याच्या प्रमाणात भारत दक्षिण सुदाननंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. तसेच, लाखो मुले आणि प्रौढ हिडन हंगर (छुपी भूक) ग्रस्त आहेत.

- गरीब लोक शिक्षण, आरोग्यसेवा, वाहतूक, इंधन आणि दिवाबत्ती यावर अधिकाधिक खर्च करत आहेत. या वस्तूंसाठी वाहिलेल्या मासिक खर्चाचा वाटा इतक्या वेगाने वाढला आहे की गेल्या दशकांतील वास्तविक उत्पन्नातील सर्व वाढ त्याने शोषून घेतली आहे. यामुळे 'फूड बजेट स्क्विज' (प्रत्यक्ष आहारावरील खर्च आखडला गेला) झाले आहे.

- शक्यतो, याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारद्वारे होणारा सामाजिक खर्च कमी होत जाणे, हे आहे. शहरी आणि ग्रामीण गरिबांचे गैर-

खाद्य जीवनावश्यक वस्तूंच्या बाजारभावांवर अवलंबून असणे, यावरून स्पष्ट दिसूनही येते. जसे की शिक्षण, आरोग्यसेवा इत्यादीचे खर्च सामान्यत: उच्च आहेत.

- इतर देशांच्या तुलनेत भारतात सामाजिक क्षेत्रावरील खर्च नेहमीच कमी राहिला आहे. नॅशनल हेल्थ प्रोफाईल २०१८ नुसार, भारत सार्वजनिक आरोग्य सेवेवर सकल देशांतर्गत उत्पादनाच्या १.०२% खर्च करतो, तर मालदीव ९.४%, श्रीलंका १.६%, भूतान २.५% आणि थायलंड सुमारे २.९% खर्च करतो. शिक्षणात, भारताची सार्वजनिक गुंतवणूक सकल देशांतर्गत उत्पादनाच्या सुमारे २.७% आहे. तर श्रीलंकेत ३.४% आणि भूतानमध्ये ७.४% आहे.

- दुसरे कारण म्हणजे, ग्रामीण भागात काम करणारे लोक कामाच्या शोधात मोठ्या प्रमाणात शहरी केंद्रांमध्ये किंवा इतर ग्रामीण भागात स्थलांतरित होत आहेत. असे बहुतेक स्थलांतर तात्पुरते आणि हंगामी स्वरूपाचे असते आणि त्यात तुलनेने मोठ्या अंतराचा प्रवास करणे समाविष्ट असते. श्रमांच्या या मोठ्या परिसंचरणाचा घरांच्या खर्चाच्या पद्धतींवर लक्षणीय परिणाम होतो. उदाहरणार्थ, वाढत्या संख्येने असलेल्या फिरत्या मजुरांचा अर्थ असा आहे की कष्टकरी गरिबांच्या एका मोठ्या वर्गाला वाहतुकीचा जास्त खर्च सहन करावा लागतो, कामाच्या ठिकाणांशी संवाद साधावा लागतो (ज्यापैकी बरेच काही हंगामी असते) आणि ते घरापासून दूर असताना अन्नाच्या पारंपरिक गैर–बाजार स्रोतांपासून वंचित राहतात.

- अर्थशास्त्रज्ञ अभिजित बॅनर्जी यांनी त्यांच्या 'पुअर इकॉनॉमिक्स' या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे, 'बाजारात नसलेल्या अन्न स्रोतांमध्ये घट झाल्यामुळे, अधिक महागड्या कॅलरी चाखण्याला प्राधान्य, आणि रेडिओ, टीव्ही आणि मोबाईल फोन यांसारख्या लक्झरी वस्तूंवर होणारा खर्च वाढल्यामुळेही भारतात भूक कायम आहे.'

- अलीकडच्या काळात, युनिव्हर्सल बेसिक इनकम आणि अन्न अनुदानाच्या जागी डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफरच्या चर्चा जोर धरत आहेत. हे 'उपाय' गरीबांना बाजारातील अस्थिरतेशी सामना करावयास लावून त्यांच्यासमोर उपासमारीचे संकट आणखी वाढवू शकतात.

***


# शहरीकरण आणि समस्या

शहरीकरण म्हणजे शहरी भागात राहणाऱ्या लोकांच्या संख्येत वाढ होण्याची प्रक्रिया आणि लोकसंख्येने विविध बदलाशी जुळवून घेण्याचे विविध मार्ग होय. औद्योगिकीकरणाबरोबर शहरीकरण वाढते. जसजसे शहरीकरण वाढते, तसतशी गावं आणि शहरं वाढत जातात आणि लोक मध्यवर्ती भागात राहायला लागतात आणि काम करू लागतात. शहरीकरण हा मानवी समाजाच्या ऐतिहासिक परिवर्तनाचा परिणाम आहे, जिथे ग्रामीण संस्कृतीची जागा शहरी संस्कृतीने घेतली आहे. ग्रामीण संस्कृतीत समाजातील सदस्यांमध्ये नातेसंबंधांची जवळीक असते आणि समाजात जातीय वर्तनही असते. तथापि, शहरी संस्कृतीमध्ये हे संबंध दुरावलेले दिसून येतात आणि परस्परांमध्ये स्पर्धा असते. शहरांची जीवनशैली सांस्कृतिक आणि आर्थिक घटकांच्या दृष्टीने खूप फायदेशीर आहे. ग्रामीण भागात उद्योग आणि सुविधा नसल्यामुळे लोकसंख्या ही केवळ शेतात काम करण्यासाठी उरली आहे. परंतु, शहरांमध्ये, उद्योग आणि इतर विशेष सेवांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या अधिक संधी आहेत ज्यामुळे भरपूर नोकऱ्या निर्माण होतात. शहरांमध्ये, लोकांना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध असतात, ते त्यांच्या मुलांच्या चांगल्या शिक्षणासाठी चांगल्या शाळा शोधू शकतात आणि त्यांचा जीवनमानाचा दर्जाही उंचावू शकतो. या कारणांमुळे ग्रामीण लोक शहरांमध्ये स्थायिक होतात. शहरी भागातील आधुनिक वातावरणात लोक शहरांकडे जाण्याचे हे अजून एक कारण आहे. लोकांना भुरळ घालणारी फॅशन, खाद्यपदार्थ, प्रवास आणि ट्रेंडची विविधता इथे आहे. लोक जीवनातील सर्व सुखसोयी मिळवण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शहरांमध्ये त्यांचे नशीब आजमावण्यासाठी येतात. या घटकांव्यतिरिक्त, दुष्काळ आणि पाऊस यांसारख्या पर्यावरणीय घटकांमुळे देखील शहरीकरण वाढू शकते, कारण खेड्यातील लोकांचे जीवनमान प्रामुख्याने जमीन आणि लागवडीवर अवलंबून असते.


तथापि, शहरीकरणाशी निगडित असंख्य समस्याही आहेत. सर्व ग्रामीण लोक शहरांकडे जाऊ लागल्याने त्याचा परिणाम जास्त गर्दीत होतो. नोकऱ्या मर्यादित असल्याने आणि मागणी वाढल्याने मोठ्या संख्येने लोक बेरोजगार होतात. संधींचा तुटवडा आहे आणि प्रत्येक क्षेत्र हे स्पर्धेने व्यापलेले आहे. बेरोजगारीमुळे स्वाभाविकपणे गरिबी येते. यामुळे शहराच्या सीमेवर झोपडपट्ट्या निर्माण होतात, कारण लोकांना घरे परवडत नाहीत. शहरीकरणामुळे पर्यावरणावरही अनेक परिणाम होतात. वाहने, कारखाने आणि उद्योगांमुळे निर्माण होणारे हानिकारक वायू पर्यावरणाची स्थिती बिघडवतात. अधिक लोकसंख्येमुळे अधिक कचरा निर्माण होतो, ज्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. शहरीकरणामुळे मानसिक आरोग्यही बिघडते. इथे लोकांमध्ये सामाजिक संबंध आणि जातीय वर्तनाचा अभाव असतो आणि स्पर्धात्मक स्वरूप अधिक असते. माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे, जो एकमेकांत न मिसळल्यास आणि परस्परसंवादाशिवाय जगू शकत नाही, हे विसरून इथे प्रत्येक व्यक्ती कमाई करण्यात आणि आपले जीवन विलासी बनविण्यात व्यग्र आहे.

**भारतातील शहरीकरण :**


भारत हा झपाट्याने शहरीकरण होत असणारा देश आहे. भारतात, शहरी लोकसंख्या ही ४६१ दशलक्ष एवढी आहे. हा आकडा दरवर्षी २.३ टक्क्यांनी वाढत आहे. २०३१ पर्यंत, भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नापैकी ७५ टक्के उत्पन्न हे शहरांमधून येण्याचा अंदाज आहे. आवश्यक शहरी पायाभूत सुविधा पुरवणे हे एक मोठे आव्हान आहे. २०५० पर्यंत आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांपैकी ७० ते ८० टक्के सुविधा अद्याप उभारल्या गेलेल्या नाहीत आणि अंदाजे गुंतवणुकीचे अंतर हे अंदाजे ८२७ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतके आहे.




२०१८ मध्ये भारतातील मोठ्या संख्येने शहरांची लोकसंख्या ३००,००० ते १ दशलक्ष एवढी होती. अशा लोकसंख्येच्या आकाराची १२० मध्यम आकाराची शहरे आहेत आणि २० दशलक्ष किंवा त्याहून अधिक रहिवासी असलेल्या फक्त पाच शहरी वसाहती आहेत.




२०३० पर्यंत भारतातील सात सर्वात मोठी शहरे आणखी मोठी होतील. एक शक्यता अशीही दर्शविते की, भारताची राजधानी दिल्लीची लोकसंख्या वाढ पुढील दशकात सुमारे एक तृतीयांश वाढेल जी वाढ ३८.९ दशलक्ष लोकांएवढी असू शकेल.




पुढील ग्राफिक भारताच्या शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येची १९५० पासूनची स्थिर वाढ दर्शविते. २०३० च्या आसपास, प्रथमच, ग्रामीण लोकसंख्या कमी होत असताना शहरी लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, असे दिसेल.



**शहरीकरणाचा स्तर (गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या मते) :**

सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये, देशाच्या राजधानी दिल्लीचा भाग आणि चंदीगडचा केंद्रशासित प्रदेश हे अनुक्रमे ९७.५ टक्के आणि ९७.२५ टक्के शहरी लोकसंख्येसह सर्वाधिक शहरीकरण झालेले देशातील भाग आहेत. त्यानंतर दमण आणि दीव (७५.२ टक्के) आणि पुदुचेरी (६८.३ टक्के) आहेत. राज्यांमध्ये, गोवा हे आता ६२.२ टक्के शहरी लोकसंख्येसह सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे. २००१ पासून झालेली ही लक्षणीय वाढ आहे. त्यावेळी गोव्याची शहरी लोकसंख्या ही ४९.८ टक्के होती. जलद शहरीकरणाचे आणखी एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे केरळ होय. केरळची शहरी लोकसंख्या आता ४७.७ टक्के आहे, जी दशकापूर्वी केवळ २५.९ टक्के होती. ईशान्येकडील राज्यांमध्ये, मिझोरम हे सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य असून, त्याची शहरी लोकसंख्या ही ५१.५ टक्के आहे. अर्थात, देशातील एकूण शहरी लोकसंख्येच्या पूर्ण योगदानाचा विचार करायचा झाल्यास, मिझोरामचे योगदान फक्त ०.१ टक्के एवढेच आहे. त्याचप्रमाणे सिक्कीम, जेथे एक दशकभरापूर्वी केवळ ११ टक्के शहरीकरण होते, तेथे २०११ मध्ये जवळपास २५ टक्के शहरीकरण झाले. प्रमुख राज्यांमध्ये, तामिळनाडू हे सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य आहे आणि इथली ४८.४ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते, त्यानंतर आता केरळ (४७.७ टक्के) आहे. महाराष्ट्र ४५.२ टक्के आहे. शहरी लोकसंख्येचे सर्वांत कमी प्रमाण हिमाचल प्रदेशमध्ये (१० टक्के) आढळते. त्यानंतर बिहारमध्ये (११.३ टक्के), आसाम (१४.१ टक्के) आणि ओडिशा (१६.७ टक्के) ही कमी प्रमाणाची राज्ये येतात. शहरी भागात राहणा-या व्यक्तींच्या पूर्ण संख्येच्या बाबतीत, महाराष्ट्र ५०.८ दशलक्ष लोकांसह देशात आघाडीवर आहे, जे देशाच्या एकूण शहरी लोकसंख्येच्या १३.५ टक्के आहे. उत्तर प्रदेशमध्ये सुमारे ४४.४ दशलक्ष, त्यानंतर तामिळनाडूमध्ये ३४.९ दशलक्ष आहेत.

**भारतातील शहरीकरणाची कारणे :**

शहरीकरण हे भारतीय समाजाचे सर्वसामान्य वैशिष्ट्य बनले आहे. उद्योगांच्या वाढीमुळे शहरांच्या वाढीला हातभार लागला आहे. औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या शोधात लोक औद्योगिक क्षेत्राकडे वळू लागले आहेत. त्याचा परिणाम छोटी शहरं आणि शहरांच्या वाढीवर झाला आहे. विविध कारणांमुळे शहरांची वाढ होत आहे. ती खालीलप्रमाणे आहेत :

**औद्योगिकीकरण :** औद्योगिकरण हा एक कल (ट्रेंड) आहे, जो जुन्या कृषी अर्थव्यवस्थेपासून नव्या गैर-कृषी अर्थव्यवस्थेच्या दिशेने होणाऱ्या बदलांकडे निर्देश करतो. या बदलामुळे आधुनिक समाजाची निर्मिती होते. औद्योगिक क्रांतीमुळे, रोजगाराच्या सुधारित संधींमुळे अधिकाधिक लोक ग्रामीण भागातून शहरी भागात जाण्यासाठी आकर्षित झाले आहेत. औद्योगिकरणामुळे लोकांना आधुनिक क्षेत्रांमध्ये नोकरीच्या श्रेणींमध्ये काम करण्याची संधी मिळत रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत, ज्यामुळे आर्थिक घडामोडींना चालना मिळते.

**व्यापारीकरण :** शहरीकरणात व्यापाराचा मोठा वाटा आहे. आधुनिक युगातील वस्तू आणि सेवांचे वितरण आणि व्यावसायिक व्यवहारांनी आधुनिक विपणन संस्था आणि देवाणघेवाण पद्धती विकसित केल्या आहेत, ज्यांनी लहान व मोठ्या शहरांच्या वाढीस प्रचंड हातभार लावला आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरे अधिक चांगल्या व्यावसायिक संधी आणि परतावा देतात, ही सर्वसामान्य धारणा व्यापारीकरणाच्या मागे आहे.

**सामाजिक फायदे आणि सेवा :** शहरांमधील जीवनाचे अनेक सामाजिक फायदे आहेत. उदाहरणांमध्ये उत्तम शैक्षणिक सुविधा, उत्तम राहणीमान, उत्तम स्वच्छता आणि गृहनिर्माण, उत्तम आरोग्य सेवा, उत्तम मनोरंजन सुविधा आणि सर्वसाधारणपणे चांगले सामाजिक जीवन यांचा समावेश होतो. या कारणांनी अधिकाधिक लोकांना शहरांत स्थलांतरित व्हायला चालना मिळते. ग्रामीण भागात अनुपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या सामाजिक सुविधा आणि लाभ मिळविण्यासाठी हे स्थलांतर घडत असते.

**रोजगाराच्या संधी :** शहरांमध्ये रोजगाराच्या भरपूर संधी असतात, ज्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना अधिक चांगली उपजीविका शोधण्यासाठी सतत आकर्षित केले जाते. त्यामुळे, बहुसंख्य लोक चांगल्या पगाराच्या नोकऱ्यांसाठी शहरी भागात स्थलांतर करतात. शहरी भागात सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, वाहतूक, क्रीडा आणि मनोरंजन, उद्योग आणि व्यावसायिक उपक्रम यासारख्या सर्व विकासात्मक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या असंख्य संधी असतात. सेवा आणि उद्योग उच्च मूल्यवर्धित नोकऱ्या निर्माण करतात आणि वाढवतात आणि यामुळे रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतात.

**आधुनिकीकरण आणि राहणीमानात होणारे बदल :** आधुनिकीकरण हे शहरीकरणाच्या प्रक्रियेत खूप महत्त्वाची भूमिका बजावते. अत्याधुनिक संपर्क व संवादाच्या पद्धती, पायाभूत सुविधा, वैद्यकीय सुविधा, ड्रेसिंग कोड, प्रबोधन, उदारीकरण आणि इतर सामाजिक सुविधांच्या उपलब्धतेसह शहरी भाग आता अधिक तंत्रज्ञानस्नेही झाल्यामुळे, लोकांचा असा विश्वास आहे की, ते शहरांमध्ये आनंदी जीवन जगू शकतात.

शहरी भागात लोक राहण्याच्या पद्धतींमध्ये बदल स्वीकारतात– जसे की निवासी सवयी, वृत्ती, पेहराव, अन्न आणि श्रद्धा. परिणामी, लोक शहरांमध्ये स्थलांतरित होतात आणि दिवसेंदिवस वाढणारी ही लोकसंख्या स्वतःत सामावून घेत शहरेही वाढत राहतात.

**ग्रामीण–शहरी स्थित्यंतर :** खनिजांच्या शोधामुळे, संसाधनांच्या उपलब्धतेमुळे किंवा कृषीविषयक प्रक्रियांमुळे परिसर हे जसजसे अधिक फलदायी आणि समृद्ध होत जातात, तसतसे ग्रामीण भागांचे शहरीकरणात स्थित्यंतर होत जाते आणि शहरे उदयास येऊ लागतात. उत्पादकता वाढल्याने आर्थिक वृद्धी आणि उच्च मूल्यवर्धित रोजगार संधी निर्माण होतात. यामुळे चांगल्या पायाभूत सुविधा, उत्तम शिक्षण संस्था, उत्तम आरोग्य सुविधा, उत्तम वाहतूक नेटवर्क, बँकिंग संस्थांची स्थापना, उत्तम प्रशासन आणि उत्तम गृहनिर्माण विकसित करण्याची गरज निर्माण होते. हे घडत असताना, ग्रामीण समुदाय शहरी संस्कृतीशी जुळवून घ्यायला सुरवात करतात आणि शेवटी शहरी केंद्रे बनतात, जे अधिकाधिक लोक चांगल्या जीवनाच्या शोधात अशा ठिकाणी जातात म्हणून वाढतच जातात.

**शिक्षणाचा प्रसार :** ग्रामीण भागातील लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. ते अधिक आधुनिक झाले आहेत.

**भारतीय शहरीकरणाची वैशिष्ट्ये :**

- भारतातील शहरीकरणाचा इतिहास खूप जुना आहे, कारण इसपू २५०० च्या आसपास सिंधू खोऱ्यात शहरे आणि शहरी ठिकाणे विकसित झाली. प्राचीन आणि मध्ययुगीन काळात भारतातील शहरीकरण हे प्रशासन, राजधानी आणि व्यापारी केंद्रांच्या जागांशी संबंधित होते. भारतात युरोपीय लोकांच्या आगमनानंतर शहरीकरणाचा वेग वाढला तो मुख्यत: आधुनिक कारखाने आणि उद्योगांच्या स्थानामुळे आणि स्थापनेमुळे!
- भारतीय शहरीकरण हे उपजिविकाधारित स्वरूपाचे आहे. ग्रामीण भागातील स्थलांतरित हे शहरी वातावरणासाठी नव्हे तर रोजगारासाठी शहरी केंद्रांकडे आकर्षित होत असल्याचे सूचित होते. ते निकृष्ट प्रतीचे अन्न खात असतील किंवा निकृष्ट दर्जाच्या घरांत राहत असतील, मात्र ते नोकरीसाठी शहरांना चिकटून राहतात. याचा शहरी भागातील जीवनमानावर वाईट परिणाम होतो, विशेषत: मेगा वर्ग ख आणि महानगर शहरांमध्ये.
- भारतीय शहरीकरणास एक बहु–महानगरीय शिखर असल्याचे म्हणता येईल, ज्यामध्ये संपूर्ण शहरी योजनेवर दशलक्ष लोकसंख्येच्या काही शहरांचे वर्चस्व आहे. भारताच्या एकूण शहरी लोकसंख्येच्या एक तृतीयांशपेक्षा जास्त एवढा हा भाग आहे. मुंबई, कोलकाता आणि दिल्ली या तीन 'मेगा शहरां'सह दशलक्ष लोकसंख्येची ३ शहरे आहेत.
- भारतीय शहरी व्यवस्था ही कार्यात्मक आणि अवकाशीय अशा दोन्हीही स्वरूपांत एकत्रित केली गेलेली नाही. परिणामी, शहरी पदानुक्रम तसेच ग्रामीण–शहरी प्रोफाइलमध्ये खूपसे तुकडे आणि असमतोल आहेत. भारतातील शहरी व्यवस्थेचे शिखर हे एकतर्फी आहे. ग्रामीण भागातील शहरी पाया हा दर्जाहीन आहे आणि बाजारपेठेतील शहरांमधील मध्यस्थ दुवा कमकुवत आहे.
- दक्षिण भारताचे उत्तर आणि पूर्व भारतापेक्षा अधिक शहरीकरण झाले आहे. हे ऐतिहासिक, सामाजिक–सांस्कृतिक आणि संसाधन घटकांमुळे आहे.
- शहर नियोजन केवळ वैध क्षेत्रावर केंद्रित आहे.
- स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर वाढता प्रादेशिकतावाद.
- गरीबी, बेरोजगारी, शोषण, असमानता, जीवनाचा दर्जा खालावल्यानंतर होत जाणारी झोपडपट्ट्यांमध्ये वाढ.
- ग्रामीण भागाकडून येणाऱ्या रेट्यामुळे शहरीकरण होते.
- काही भागात लोकसंख्याशास्त्रीय स्फोट. हे फारसे औद्योगिकीकरणाशिवाय झाले आहे. (सेवा क्षेत्रातील वाढ).

**भारतातील शहरीकरणातील समस्या :**

अनियंत्रित स्थलांतरामुळे भारतात शहरीकरण अनियोजित स्वरूपाचे आहे. अनियोजित शहरीकरणामुळे भारताला बेरोजगारी, विजेची समस्या, प्रदूषण, सामाजिक समस्या, अयोग्य स्वच्छता सुविधा इत्यादींचा सामना करावा लागत आहे. भारतातील शहरी लोकसंख्येच्या झपाट्याने होत असलेल्या वाढीमुळे झोपडपट्ट्या वाढणे, शहरी भागांतील राहणीमानाचा दर्जा कमी होणे यासारख्या अनेक समस्या निर्माण होत आहेत.

पर्यावरणाची हानी देखील होते. पुढील समस्या अधोरेखित करणे आवश्यक आहे –

**१. शहरी विस्तार :** लोकसंख्या आणि भौगोलिक क्षेत्र या दोहोंमध्ये होत असणारा शहरांचा खरा विस्तार, झपाट्याने वाढणारी शहरे हे शहरी समस्यांचे मूळ कारण आहे. बहुतेक शहरांमध्ये त्यांचा आर्थिक पाया हा त्यांच्या अत्यधिक आकारामुळे व विस्तारामुळे निर्माण झालेल्या समस्यांना तोंड देण्यास असमर्थ आहे. ग्रामीण भागातून तसेच लहान शहरांमधून मोठ्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर जवळजवळ सातत्याने होतच चालले आहे; त्यामुळे शहरांच्या आकारमानात भर पडते आहे.

**२. गर्दीचे वाढते प्रमाण :** वाढती गर्दी ही अशी परिस्थिती आहे की, ज्यामध्ये खूप लोक अतिशय कमी जागेत राहतात. जास्त गर्दी हा शहरी भागात वाढत असलेल्या लोकसंख्येचा तार्किक परिणाम आहे. लहान जागेत मोठ्या प्रमाणात लोकसंख्या पिळवटून टाकलेल्या शहरांना गर्दीचा त्रास सहन करावा लागतो, हे स्वाभाविकपणे अपेक्षित आहे. भारतातील जवळपास सर्वच मोठ्या शहरांमध्ये या परिस्थितीचे दर्शन घडते.

**३. गृहनिर्माण :** वाढत्या शहरी लोकसंख्येसाठी घरांची तरतूद करणे, हे सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान असेल. शहरी मध्यमवर्गाच्या उत्पन्नाच्या तुलनेत घरांच्या वाढत्या किमतीमुळे बहुसंख्य अल्प उत्पन्न गटांसाठी घरं घेणे अशक्य झाले आहे आणि परिणामी ही लोकं दाटीवाटीच्या ठिकाणी राहत आहेत. त्यापैकी बरेच लोक योग्य वायुवीजन, प्रकाश, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था इत्यादींपासून वंचित आहेत. उदाहरणार्थ, दिल्लीत, सध्याच्या अंदाजानुसार येत्या दशकात ५,००,००० घरांची कमतरता भासणार आहे. युनायटेड नेशन्स सेंटर फॉर ह्यूमन सेटलमेंट्स (णछउक्ढ) ने गृहनिर्माण गरिबी ही संकल्पना मांडली आहे. या संकल्पनेत अशा व्यक्ती आणि कुटुंबांचा समावेश आहे ज्यांना सुरक्षित आणि निरोगी निवारा नाही, ज्यामध्ये नळाद्वारे पाणी आणि स्वच्छता, सांडपाणी व्यवस्था आणि घरगुती कचरा व्यवस्थापनेची पुरेशी तरतूद नाही.

**४. स्वच्छता :** शहरी भागात आणि विशेषतः झोपडपट्ट्या आणि शहरी भागातील अनधिकृत वसाहतींमध्ये स्वच्छतेची बिकट स्थिती हे आणखी एक निराशाजनक वास्तव आहे. अनेक असंघटित वसाहती आणि झोपडपट्ट्यांमधील सांडपाणी व्यवस्था एकतर अस्तित्वातच नाही आणि अस्तित्वात असल्यास ती अतिशय खराब स्थितीत असते, ज्यात अनेकदा सांडपाणी अडते. या अस्वच्छ परिस्थितीमुळे डायरिया आणि मलेरियासारखे अनेक स्वच्छताविषयक आजार होतात. असुरक्षित कचरा विल्हेवाट ही शहरी भागातील गंभीर समस्यांपैकी एक आहे आणि कचरा व्यवस्थापन हे नेहमीच एक मोठे आव्हान राहिले आहे.

**५. अनधिकृत वस्त्या :** झोपडपट्ट्या आणि अनधिकृत वस्त्या यांत कोणताही स्पष्ट फरक करता येत नाही, शिवाय झोपडपट्ट्या तुलनेने अधिक स्थिर असतात आणि त्या तुलनेने तात्पुरत्या आणि अनेकदा विखुरलेल्या अनधिकृत वस्त्यांच्या तुलनेत शहरांच्या जुन्या, अंतर्गत भागात वसलेल्या असतात. सामान्यतः, अनधिकृत वस्त्या म्हणजे अधिकृत परवानगीशिवाय (म्हणजे अनधिकृत जमिनीवर) बांधलेली तात्पुरती निवासस्थाने असतात.

**६. पर्यावरणाविषयक चिंता :** वाढत्या मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्तींमुळे निर्माण होणारे धोके – णछऊझ नुसार ७०% भारतीय लोकसंख्येला पुराचा धोका आहे आणि ६०% लोकांना भूकंपाचा धोका आहे. घनता आणि गर्दीमुळे शहरी भागात हा धोका अधिक असतो. शहरी भाग हे उष्णतेची बेटे बनत आहेत, भूजल पुनर्भरण होत नाही आणि पाण्याचे संकट कायम आहे. येथे पाणी अडवणे व जिरवणे हे सक्तीचे करणे फायदेशीर ठरेल.

**७. गरिबी :** आज शहरी लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोक दारिद्र्यरेषेखाली जगतात. शहरी भागात 'आहे रे' आणि 'नाही रे' वर्गांमध्ये स्पष्ट असमानता दिसून येते. शहरी आव्हानांपैकी सर्वात मोठे आव्हान हे निर्विवादपणे गरिबीने उभे केलेले आव्हान आहे. तसेच शोषण कमी करण्याचे आव्हान, लोकांची दुःख दूर करणे आणि शहरी गरिबांसाठी जगण्याची अधिक चांगली मानवी परिस्थिती निर्माण करण्याचे आव्हानही आहेच. शहरी असमानतेत वाढ होत आहे. णछ निवासी अहवाल, २०१० नुसार, १९९५ ते २००५ या कालावधीतील उपभोगाच्या आधारे भारतातील शहरी असमानता ३४ वरून ३८% पर्यंत वाढली आहे.

**८. वाहतूक/दळणवळण :** उच्च उत्पन्न असलेल्या व्यक्ती अधिक खाजगी वाहन खरेदी करत आहेत आणि सार्वजनिक वाहतूक कमी वापरत आहेत. याचा परिणाम हा शहरांमध्ये एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या वाहनांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीत होतो, ज्यामुळे सार्वजनिक वाहतुकीची कार्यक्षमता कमी होते. तसेच सार्वजनिक वाहतुकीचे प्रमाणही कमी असल्याने लोक खाजगी वाहनाचा वापर करतात. सार्वजनिक वाहतूक ही अपंगांसाठी अनुकूलही नसते. पायाभूत सुविधांचा अभाव आणि सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक वाहतूक पायाभूत सुविधांची निकृष्ट देखभाल या देखील समस्या आहेत.

**९. बेरोजगारी :** वर नमूद केलेल्या घरांच्या समस्येपेक्षा बेरोजगारीची समस्या कमी गंभीर नाही. भारतातील शहरी बेरोजगारीचा अंदाज

श्रमशक्तीच्या १५ ते २५ टक्के इतका आहे. सुशिक्षित लोकांमध्ये ही टक्केवारी अधिक आहे.

**१०. पाणी :** जगण्यासाठी निसर्गाचा सर्वात आवश्यक घटक म्हणजे पाणी होय. नागरी सभ्यतेच्या सुरुवातीपासूनच, निवासासाठी पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊनच माणसे स्थिर होत गेली. तथापि, शहरांचा आकार आणि संख्या वाढल्याने मागणीच्या तुलनेत पाणीपुरवठा कमी होऊ लागला.

**११. कचऱ्याची विल्हेवाट :** भारतीय शहरांची संख्या आणि आकारमान जसजसे वाढत आहे तसतसे कचरा विल्हेवाटीची समस्या चिंताजनक प्रमाणात पुढे येत आहे. आपल्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण झाल्याने आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. बहुतेक शहरांत कचरा विल्हेवाट लावण्यासाठी योग्य व्यवस्था नाही आणि सध्याच्या कचरा साठवण्याच्या जागा काठोकाठ भरलेल्या आहेत. हे कचरा डेपो रोगाचे अड्डे झाले आहेत आणि त्यांच्या सभोवतालच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर विष पसरत असल्याची स्थिती आहे.

**१२. शहरी गुन्हे :** आधुनिक शहरे म्हणजे जीवनाच्या विविध क्षेत्रातील लोकांच्या भेटीचे असे ठिकाण आहे, जेथे कुणालाही एकमेकांविषयी कोणतीही आस्था नाही. इतर समस्यांप्रमाणेच शहरीकरण वाढल्याने गुन्ह्यांची समस्याही वाढत आहे. किंबहुना, शहरी गुन्ह्यांमधील वाढते प्रमाण हे शहरांची शांतता आणि स्थिरता बिघडवते आणि विशेषत: महिलांसाठी तेथे राहणे असुरक्षित बनवते.

**भारतातील शहरी समस्यांवरील उपाययोजना :**

**शाश्वत आणि पर्यावरणपूरक शहरे निर्माण करणे :** लोकांनी असुरक्षित आणि प्रदूषित भागात राहू नये हे लक्षात घेऊन सरकारने पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य शहरे आणि शहर वाढीचे स्मार्ट तंत्र तयार करणारे कायदे केले पाहिजेत. सुधारित पर्यावरणीय परिस्थिती आणि सर्व शहरी लोकसंख्येसाठी सुरक्षित निवास उपलब्ध करून देणारी शाश्वत शहरे तयार करणे हे याठिकाणी उद्दिष्ट आहे. सरकारने शहरी संसाधनांचा शाश्वत पद्धतीने वापर करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे आणि शाश्वत पर्यावरणावर आधारित अर्थव्यवस्थेला पाठिंबा दिला पाहिजे, जसे की हरित पायाभूत सुविधा, टिकाऊ उद्योग, पुनर्वापर आणि पर्यावरण मोहिमेतील गुंतवणूक, प्रदूषण व्यवस्थापन, अक्षय ऊर्जा, हरित सार्वजनिक वाहतूक आणि पाण्याचा पुनर्वापर अशा शाश्वत पद्धती.

**अत्यावश्यक सेवांची तरतूद :** शहरी भागधारकांनी हे सुनिश्चित केले पाहिजे की, शहरी भागातील सर्व लोकसंख्येला शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि शुद्ध पाणी, तंत्रज्ञान, वीज आणि अन्न यासारख्या आवश्यक सामाजिक सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. रोजगाराच्या संधी आणि संपत्ती निर्मिती उपक्रम प्रदान करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे हे येथे उद्दिष्ट आहे, जेणेकरुन लोक जगण्यासाठी आणि सेवांच्या देखभालीसाठी पैसे कमवू शकतील. मूलभूत आरोग्यसेवा, मूलभूत शिक्षण, ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक, दळणवळण प्रणाली आणि तंत्रज्ञान यावरील खर्च कमी करण्यासाठी सरकारकडून अनुदान देखील मिळू शकते.

**अधिक नोकऱ्यांची निर्मिती :** जलद शहरीकरणाचे नकारात्मक परिणाम कमी करण्यासाठी आणि त्याच वेळी नैसर्गिक परिसंस्थांचे संरक्षण करण्यासाठी, नैसर्गिक संसाधनांचा वापर करण्यासाठी आणि अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले पाहिजे. पर्यटन प्रोत्साहन आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत उपयोग हे शहरी लोकसंख्येसाठी अधिक रोजगार निर्माण करू शकतात. रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणाऱ्या पर्यावरणपूरक विकास प्रकल्पांमध्ये परदेशी आणि खाजगी गुंतवणुकीसाठी अनुदाने देखील दिली जाऊ शकतात.

**लोकसंख्या नियंत्रण :** शहरी भागातील प्रमुख भागधारकांनी लोकसंख्या वाढीचा उच्च दर कमी करण्यात मदत करण्यासाठी प्रभावी वैद्यकीय आरोग्य दवाखाने आणि कुटुंब नियोजनासाठी मोहिमा आणि समुपदेशन प्रदान करणे आवश्यक आहे. रोग आणि लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने संपूर्ण शहरी भागात कुटुंब नियोजनाच्या पर्यायांकडे लक्ष देणारे वैद्यकीय आरोग्य दवाखाने सुलभरित्या उपलब्ध केले पाहिजेत.

**शहरी कॉरिडॉर :** वाहतूक आणि शहरीकरण एकमेकांना मजबूत करतात. महत्त्वाच्या शहरी केंद्रांमध्ये जोडणी प्रदान करणारे वाहतूक कॉरिडॉर, ज्यांच्या मार्फत बाजारमाल आणि प्रवाशांचा प्रवाह वाढता असतो, त्यांची उपलब्धता.

**सार्वजनिक वाहतूक :** शहरांसाठी शहरी वाहतुकीच्या मागणीचे पुनर्परीक्षण करणे आणि त्यानुसार नवीन धोरणे आखणे आवश्यक आहे, जसे की, जमिनीचा वापर व त्याआधारित वाहतूक नियोजन, मागणी व्यवस्थापन, स्वच्छ इंधन आणि तंत्रज्ञान, रहदारी पद्धतींचे एकत्रीकरण आणि वाहतूक व्यवस्थापन. कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त प्रवेश प्रदान करणे हा उद्देश असावा. वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर उपक्रमांमध्ये अनलीडेड इंधनाचा वापर, जुनी वाहने टप्प्याटप्प्याने काढून टाकणे आणि सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देणे, हे आहेत.

**खाजगी क्षेत्राचा सहभाग :** शहरी पायाभूत सुविधांसाठी मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता असते. शिवाय शहरी सुविधांच्या देखभालीसाठीही ते

आवश्यक असते. इतका मोठा वित्तपुरवठा हा शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षमतेपलीकडे आहे. त्यासाठी खाजगी क्षेत्र किंवा संस्थात्मक वित्तपुरवठ्याकडे वळण्याची गरज आहे.

**सरकारी उपक्रम :** भारताचा सेव्हन मिशन प्रोग्राम – भारतातील शहरीकरणात झपाट्याने वाढ होत असल्याने विविध क्षेत्रांमध्ये सर्वांगीण विकास होत आहे. यामुळे 'सेव्हन मिशन प्रोग्राम'ची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट शहरांना अपेक्षित टप्पे गाठण्यासाठी निधी देण्याचे आहे.

**सेव्हन मिशन प्रोग्राममध्ये खालील योजनांचा समावेश आहे –**

- १०० स्मार्ट सिटी मिशन
- MRUT म्हणजे 'अटल मिशन फॉर रिजुवनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन'
- HRID-Y (राष्ट्रीय वारसा शहर विकास आणि संवर्धन योजना)
- सरदार पटेल राष्ट्रीय नागरी गृहनिर्माण अभियान
- शाश्वत अधिवासावर राष्ट्रीय मिशन
- स्वच्छ भारत मिशन
- राष्ट्रीय शहरी माहिती प्रणाली

शहरांच्या उत्तम आणि कार्यक्षम व्यवस्थापनामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर, समाजावर आणि विकासावर अनेक चांगले परिणाम होऊ शकतात. यामुळे संसाधनांचे योग्य दिशेने वाटप होऊ शकते आणि लोक आणि सरकारसाठी देखील परिस्थिती सुलभ होऊ शकते.

**शहरीकरणाची जलद प्रक्रिया (फायदे आणि समस्या) :**

**फायदे :**

- सातत्याने घडत असणाऱ्या जलद शहरीकरणामध्ये समाजाचे जीवनमान सुधारण्याची क्षमता आहे.
- जरी जगातील केवळ निम्मे लोक शहरांमध्ये राहत असले तरी, ते जागतिक देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) ८० टक्क्यांहून अधिक उत्पन्न निर्माण करतात.
- शहरे ही तरुणही आहेत. ग्रामीण भागांपेक्षा तुलनेने अधिक तरुण आणि काम करणार्या प्रौढांचे घर म्हणजे शहरं आहेत. यामुळे लोकसंख्याशास्त्रीय लाभांश मिळवण्यासाठी शहरे ही महत्त्वाचे स्थान ठरतात.
- जगभरात शहरे ही गरिबी दूर करणे, पायाभूत सुविधा सुधारणे आणि प्रदूषणाचा सामना करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम सुरू करत आहेत.

**समस्या :**

- शहरीकरणामुळे मानवी विकासाची अनेक आव्हाने देखील निर्माण झाली आहेत. असा अंदाज आहे की, जगातील सुमारे ४० टक्के शहरी विस्तार हा झोपडपट्ट्यांमध्ये असू शकतो, ज्यामुळे आर्थिक विषमता आणि अस्वच्छ परिस्थिती वाढू शकते.
- जलद गतीने होत असणारे शहरीकरण हे पर्यावरणासंबंधी असणाऱ्या विविध समस्यांशीही जोडले गेले आहे. किनारी भागांतील किंवा नदीकाठावरील अनेक शहरांना वादळ, चक्रीवादळ आणि महापूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा फटकाही बसू शकतो. त्याचप्रमाणे, निकृष्ट शहरी पायाभूत सुविधा – जसे की ज्यावर विसंबून राहता येणे शक्य नाही अशी वीज व्यवस्था, गजबजलेले रस्ते आणि खराब सार्वजनिक वाहतूक, अकार्यक्षम बंदरे आणि अपुर्या शाळा – यामुळे शहरांची स्पर्धात्मकता आणि आर्थिक वाढ होण्याच्या शक्यता कमी होतात.
- तथापि, सर्व शहरी रणनीती कुठच्याही एकाच आकारात बसू शकणाऱ्या नाहीत. शहरी धोरणांचे प्राधान्यक्रम आणि निवडी विविध घटकांवर अवलंबून असतात, ज्यांत शहरीकरणाचे प्रमाण, गती आणि स्रोत, शहरांचा आकार आणि शहरी विकासाचा टप्पा यासह अनेक गोष्टींचा समावेश आहे.

- १ अब्जाहून अधिक लोक अशा घरांमध्ये राहतात, जी राहणीमानाच्या बाबतीत आराम आणि स्वच्छतेच्या किमान मानकांपेक्षाही कमी आहेत आणि २०३० पर्यंत ३ अब्ज लोकांसाठी नवीन घरे बांधावी लागतील.
- अधिक औद्योगिक प्रक्रियांमुळे अधिक जलप्रदूषण होते. उदा – जसा नोएडाच्या पाण्याचा दर्जा खालावला. जलद शहरीकरणामुळे जैवविविधतेला धोका निर्माण होत आहे. जंगलतोड, कम्युनिकेशन टॉवरच्या किरणोत्सर्गामुळे पक्षी आणि इतर प्राण्यांचे प्रचंड नुकसान होत आहे.

अत्यावश्यक पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केल्याने मानवी विकासाला चालना मिळते. अलिकडच्या दशकांमध्ये पायाभूत सुविधांची तूट कमी करण्यासाठी काही प्रमाणात प्रगती झाली आहे, परंतु अजून बरेच काही करणे आवश्यक आहे. याचे व्यवस्थापन करण्यासाठी उत्तम नियोजन आणि योग्य व्यवस्थापन आवश्यक आहे. जलद शहरीकरणामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांपुढे आणि संधींसमोर उभे राहण्यासाठी राष्ट्रीय आणि स्थानिक सरकारांनी अधिक धोरणात्मक रणनीती बनविण्याची गरज आहे. शहरी विकासाचे प्राधान्यक्रम ओळखण्यासाठी, त्याच्या आराखड्याला आकार देण्यासाठी आणि खाजगी क्षेत्रासह सहभागी असलेल्या सर्व घटकांच्या कृतींचे उत्तम समन्वय साधण्यास मदत करण्यासाठीचे पहिले पाऊल म्हणून राष्ट्रीय शहरीकरण धोरण तयार करून हे केले जाऊ शकते.

**'आयटी हब' म्हणून शहरांची वाढ – (फायदे आणि समस्या) :**

भारताच्या २०१९–२० च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार, भारताच्या आयटी–बीपीओ क्षेत्राने भारताच्या अर्थव्यवस्थेत सुमारे १६२ अब्ज अमेरिकी डॉलर (२०१८–१९) चे योगदान दिले आहे. हैदराबाद, बेंगळुरू, नोएडा, गुडगाव आणि पुणे यांसारख्या शहरांमध्ये असलेल्या आयटी हब्समुळे भारत आयटी उद्योगांचा केंद्रबिंदू म्हणून उदयास आला आणि त्यातून रोजगाराचे नवीन मार्ग खुले झाले.

**फायदे :**

- परदेशातील ग्राहकांच्या गरजांना अनुसरून उद्योगांनी स्वतःची कर्तव्ये प्राधान्यक्रम बदलल्याने नोकरभरतची संख्या वाढली.
- इतर अनेक लहान उद्योगांना आयटी उद्योगांचा फायदा झाला. उदा – सुविधा व्यवस्थापन, तृतीय पक्ष सुरक्षा प्रदाता, देखभाल, निवास, बांधकाम उद्योग इ.
- कौशल्य प्रदान करणाऱ्या संस्था, ऑटोमोबाईल उद्योग आणि ई–कॉमर्स उद्योगाला अप्रत्यक्षपणे चालना मिळाली.

**समस्या :**

- फक्त मोजक्या काही शहरांमध्ये आयटी कंपन्यांचे केंद्रीकरण झाल्यामुळे शहरी लोकसंख्या वाढली ज्यामुळे कधीही न संपणारी वाहतूक कोंडी, गजबजलेली सार्वजनिक वाहतूक इ. समस्या वाढल्या.
- मॉल, दुकाने आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कार्यालयांनी शहरांची भरभराट होत आहेत, परंतु या वाढीला पूरक ठरणाऱ्या पायाभूत सुविधांचा मात्र पूर्णपणे अभाव आहे.
- शहरांच्या मध्यवर्ती भागांमध्ये वाढ होत गेली आणि बाहेरील भाग मात्र मूलभूत सुविधांपासून वंचित राहत गेले.
- मुख्य शहरी भागांच्या व्यतिरिक्त इतर भागांत नव्या बांधकामांच्या बाबत अनेक पायाभूत समस्या निर्माण होत गेल्या.
- पुरेशा सार्वजनिक वाहतुकीचा अभाव, खाजगी वाहतुकीवर वाढलेले अवलंबित्व, वाढलेले प्रदूषण, कार्बन फूटप्रिंट.
- विसंगत नियोजन आणि तदर्थ उपाय, जलद शहरी वाढीमुळे सामाजिक तणाव वाढण्यास हातभार लागतो.
- महिलांच्या सुरक्षेशी संबंधित समस्या वाढत आहेत.

शहरी भागात शाश्वत जीवन पद्धतीच्या संदर्भात नियोजन महत्त्वाची भूमिका बजावते. राहण्यासाठी अशा जागा तयार होण्याची गरज आहे, जी आयटी क्षेत्रासारख्या चांगल्या कार्यक्षमतेच्या क्षेत्रांना उपयुक्त ठरू शकेल, ज्यामुळे या क्षेत्रांची कार्यक्षमताही उंचावू शकेल. कोणत्याही शहराला मोठी गर्दी हाताळण्यासाठी (विशेषत: आयटी क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर असणारी गर्दी) निवासी क्षेत्र, वाहतूक इत्यादींचा समावेश असलेली पायाभूत सुविधा योग्यरित्या विकसित करणे आवश्यक आहे, जेणेकरून शहरीकरण अधिक चांगल्या प्रकारे हाताळता येईल.

***

# भारतीय समाजावर जागतिकीकरणाचे होणारे परिणाम

**विषय–परिचय :**

सध्याच्या स्पर्धेच्या जगात जागतिकीकरण हा एक महत्त्वाचा घटक आहे. जागतिक स्तरावर लोकांच्या सांस्कृतिक मूल्यांना एकत्र आणण्याचे तसेच गतिशील करण्याचे कार्य जागतिकीकरण करते. वेगवान तांत्रिक प्रगतीच्या युगात, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनेक देश एकसंध झाले आहेत आणि त्यांच्यात स्थित्यंतर घडून आले आहे. देशांच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सामुदायिक जीवनावर जागतिकीकरण मोठा परिणाम करते. पारंपारिक पद्धतीच्या रूढ अशा कामगार–व्यवस्थापन संबंधांना पूर्णपणे नवीन आणि अतिशय गतिमान अशा परिस्थितींशी जुळवून घ्यावे लागत असल्यामुळे जागतिकीकरण हे सहकार कार्यपद्धतीच्या एकूण दृष्टिकोनावावर देखील मोठा प्रभाव टाकते. राजकीय क्षेत्रात, जागतिकीकरण हे गरिबी, कुपोषण, निरक्षरता, अनारोग्य तसेच सीमेपल्याडचा दहशतवाद आणि जागतिक दहशतवाद यांच्याशी लढा देण्यात मदत करते. याप्रकारच्या आधुनिक घडामोडींमुळे समाजाची रचना आणि बांधणी बदलत चालली आहे. औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण हे नेहमीच औद्योगिक गुंतवणूक आणि आर्थिक विकास प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करत आहेत. आजचे जग हे जागतिक (सर्वंकष) पातळीवर जोडले गेले आहे. सध्याचे कल पाहता, जागतिकीकरण ही राष्ट्र समृद्धीची आणि प्रगतीची प्रक्रिया आहे. जागतिकीकरण ही समाजाच्या सर्व टप्प्यांमध्ये घडणारी सामाजिक, आर्थिक, तंत्रज्ञानविषयक, सांस्कृतिक आणि राजकीय बदलांची मालिका आहे. या ठिकाणी प्रामुख्याने भारतीय समाजाच्या संदर्भात शहरीकरण, आधुनिकीकरण आणि जागतिकीकरण प्रक्रियेचे परिणाम आणि निष्पत्ती यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

**व्याख्या :**

जागतिकीकरण म्हणजे राष्ट्रीय सीमांच्या आणि संस्कृतींच्या पल्याड जात होणारा उत्पादनांचा, तंत्रज्ञानाचा, माहितीचा आणि रोजगाराचा प्रसार होय. अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून, जागतिकीकरण हे मुक्त व्यापार याद्वारे वृद्धिंगत होत जाणारे जगभरच्या राष्ट्रांचे परस्परावलंबन म्हणता येईल. जागतिकीकरण ही एक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि कायदेशीर घडामोड/घटना आहे.

**जागतिकीकरणास मदत करणारे घटक :**

- सुधारित वाहतूक/दळणवळण : जागतिक प्रवास सुलभ करणे. उदाहरणार्थ, हवाई प्रवासात वेगाने वाढ झाली आहे, ज्यामुळे जगभरातील लोक आणि वस्तूंची वाहतूक मोठ्याला प्रमाणावर होऊ लागली आहे.
- कंटेनरचा वाढता वापर : १९७० पासून, पोलाद वाहतुकीमध्ये कंटेनरचा वापर वेगाने सुरु झाला. यामुळे बहुपर्यायी अंतर्गत वाहतुकीचा (इंटरमोडल) खर्च कमी झाला, ज्यामुळे व्यापार अधिक स्वस्त आणि अधिक कार्यक्षम झाला.
- सुधारित तंत्रज्ञान: ज्यामुळे जगभरातील माहिती संप्रेषण आणि माहितीची देवाणघेवाण करणे अधिक सोपे होते. उदा. इंटरनेट. उदाहरणार्थ, 'अमुक एका वेबसाइटवरील सुधारणांवर काम करण्यासाठी, मी शश्ररपलश.लो सारख्या एखाद्या जागतिक ऑनलाइन समुदायाकडे (कम्युनिटी) जाईन. तेथे, कोणत्याही देशातील लोक सेवा प्रदान करण्याच्या अधिकारासाठी बोली लावू शकतात. याचा अर्थ असा की, या सुविधेमुळे अनेकदा काम करण्यासाठी तुलनेने स्वस्त दरांत लोक शोधणे मला सहज शक्य होते. कारण, भारतीय उपखंडात मजुरीचा/कामाचा खर्च तुलनेने कमी आहे.'
- बहुराष्ट्रीय कंपन्यांची वाढ: जागतिक स्तरावर विविध अर्थव्यवस्थांमध्ये आपले अस्तित्व दाखवून देत.
- जागतिक व्यापारउदिम अधिक सुलभ व्हावा यासाठी जागतिक 'ट्रेडिंग ब्लॉक्स'ची वाढ– ज्यामुळे व्यापारासाठीचे देशपातळीवरील अडथळे कमी केले गेले आहेत. (उदा. युरोपियन युनियन, नाफ्ता (N-FT-), आसिआन (-SE-N)).
- जागतिक व्यापाराला उत्तेजन मिळावे यासाठी विविध शुल्कांचे (जकातीचे) अडथळे दूर करणे. बहुतांश वेळा हे जागतिक व्यापार संस्थेच्या (WTO) पाठबळामुळे घडले आहे.
- जागतिक स्तरावर माध्यमांची वाढ.
- जागतिक व्यापार चक्र: आर्थिक वाढ जागतिक स्वरूपाची असते. याचा अर्थ विविध देश हे एकमेकांशी अधिकाधिक प्रमाणात जोडले जात आहेत. (उदा. एका देशातील आर्थिक मंदीचा जागतिक व्यापारावर परिणाम होतो आणि याची परिणती दरवेळी प्रमुख व्यापारी भागीदारी

देशांमध्येही मंदी निर्माण होण्यात होते.)

- आर्थिक प्रणाली आता अधिकाधिक जागतिक स्वरूपाच्या: जेव्हा अमेरिकी बँकांना तारण कर्जाच्या घटनांमध्ये मोठ्या आर्थिक नुकसानाच्या संकटाला सामोरे जावे लागले होते, तेव्हा त्याचा परिणाम ज्यांचे अमेरिकी बँका आणि तारण कंपन्यांशी विविध प्रकारचे आर्थिक हितसंबंध/करार होते, अशा इतर देशांतील प्रमुख बँकांवरही झाला होता.

- भांडवलाची सुधारलेली चलनशीलता: गेल्या काही दशकांमध्ये, भांडवलाच्या विविध अडथळ्यांमध्ये घट झाली आहे, ज्यामुळे विविध अर्थव्यवस्थांमध्ये भांडवलाचा प्रवाह सुलभ झाला आहे. यामुळे कंपन्यांची वित्तपुरवठा मिळविण्याची क्षमता वाढली आहे. यामुळे जागतिक वित्तीय बाजारांचा जागतिक परस्परसंबंधही वाढला आहे.

- कामगारांची वाढलेली चलनशीलता: लोक कामाच्या शोधात वेगवेगळ्या देशांमध्ये जाण्यास अधिक इच्छुक आहेत. विकसित देशांकडून विकसनशील देशांमध्ये कामगारांचे हस्तांतरण होण्यात आता जागतिक व्यापार व आर्थिक संबंधांची (ग्लोबल ट्रेंड रेमिटन्स) मोठी भूमिका आहे.

- इंटरनेट: हे कंपन्यांना जागतिक स्तरावर आदानप्रदान करण्यास सक्षम करते, यामुळे कंपन्यांच्या व्यवस्थापनातील अनेक अंतर्गत आव्हानांवर मात केल्या जाऊ शकते. व्यापारासाठी मोठ्या प्रमाणावर कंपन्यांच्या निवडीची उपलब्धता असल्यामुळे कंपन्यांना स्वस्त पुरवठा मिळवण्याची शक्यता असते. ग्राहक देखील अधिक वस्तू ऑनलाइन ऑर्डर करू शकतात. उदा. 'डेल कम्प्युटर्स' ऑनलाइन ऑर्डर घेते आणि ग्राहकांच्या संदर्भातील विशिष्ट गोष्टींची पूर्तता करू शकते.

- सीमापार राजकीय प्रभाव: विविध देशांच्या सरकारांनी सीमापार व्यापार आणि राजकीय प्रभाव सुलभ करणारे धोरण तयार केले आहे. उदाहरणार्थ, चीनचा प्रभाव विशेषतः आफ्रिकेत वाढत आहे, जेथे चीन देशांना दीर्घकालीन कर्जाचे प्रस्ताव देत आहे. झांबिया हे एक प्रमुख उदाहरण आहे, जिथे चीनने आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कामकाज जवळपास ताब्यातच घेतले आहे. हे दर्शविते की, विकसित देश विकसनशील देशांमधील राजकीय आणि आर्थिक घडामोडींवर स्वतःचा प्रभाव टाकण्याची भूमिका घेत आहेत.

- तीव्र स्पर्धा: कंपन्यांमधील तीव्र स्पर्धेमुळे, कंपन्या सीमा ओलांडून नवीन बाजारपेठा शोधत आहेत. वृत्त माध्यमांसारख्या काही क्षेत्रात जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यातून स्पर्धा आहे. स्थानिक आणि परदेशी वृत्त संस्थांकडून माहिती सहज उपलब्ध होत आहे आणि त्यामुळे कंपन्यांना स्पर्धात्मक राहण्यासाठी आणि/किंवा टिकून राहण्यासाठी नवनवीन पद्धतीचा शोध सुरू ठेवण्यास भाग पाडले जात आहे. तीव्र स्पर्धेमुळे, कंपन्या आता परदेशी बाजारपेठा शोधत आहेत.

**जागतिकीकरणाचा परिणाम :**

जागतिकीकरणाचे संपूर्ण जगभरात सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम होत आहेत. ते व्यवसाय, व्यापार आणि इतर कुठचे कार्यक्षेत्र असो किंवा देशाची आर्थिक आणि वित्तीय स्थिती असो; जागतिकीकरणाच्या व्याप्तीपासून कोणतेही क्षेत्र विलग राहिलेले नाही. प्रत्येक नाण्याच्या जशा दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे जागतिकीकरणाचेही सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात.

**आर्थिक परिणाम :**

**सकारात्मक :**

- जगभरातील खुल्या आणि मुक्त बाजारपेठांचा फायदा उचलण्यात सहाय्यक ठरणारी व्यवसाय भरभराट तसेच आयात-निर्यातीची भरभराट.

- रेस्टॉरंट्सची ग्लोबल फूड चेन लोकांना विविध पर्याय देते. ते सोबतीला संस्कृती आणि परंपरा घेऊन येतात.

- किफायतशीर दरात उपलब्ध होणारी माणसे, पैसा, श्रम, साहित्य, तंत्रज्ञान इत्यादींचा ओघ वाढल्यामुळे देशांच्या औद्योगिक आणि आर्थिक समृद्धीला मदत होईल.

- विदेशी भागीदारांच्या प्रवेशासह होत जाणारा बाजारपेठेचा विस्तार, ज्यामुळे बाजारपेठ अधिक स्पर्धात्मक होते.

- सॉफ्टवेअर उद्योगाची वाढ, जी सरतेशेवटी रोजगार निर्मितीमध्ये मदत करेल आणि आर्थिक तसेच तंत्रज्ञानाच्या प्रगतीला मदत करेल.

- दर्जेदार वस्तू आणि सेवा मिळण्याची वाढती संधी मानवी जीवन अधिक आनंददायी बनवते.

- दळणवळणाच्या विविध साधनांच्या मदतीने जागतिक बाजारपेठांशी जोडले जाण्याची संधी.
- शेअर बाजार, रोखे उत्पन्न, फंड मार्केट यांद्वारे जागतिक भांडवली संसाधनांमध्ये प्रवेशाची संधी.
- विविध कायदेशीर मार्गांद्वारे बौद्धिक संपदा अधिकारांचे (आयपीआर) संरक्षण.
- अर्थशास्त्राचे प्राथमिक, दुय्यम, तृतीयक अशा क्षेत्रांमध्ये विस्थापन होत जाणे.
- छुप्या बेरोजगारीस समाप्त करणे.
- किरकोळ व्यापाराच्या साखळीची सुसंघटित वाढ, जी कालबद्ध आणि कार्यक्षम वितरणास मदत करते.
- वाढलेली स्पर्धा, त्यामुळे अधिक ग्राहक हक्क संरक्षण, उच्च दर्जाची आणि कमी किमतीची उत्पादने मिळणे शक्य .

**नकारात्मक :**

- श्रीमंत–गरीब विभाजन अधिक तीव्र असेल.
- व्यवसायाची नैतिक जबाबदारी कमी होत जाईल, कारण ते दावे वाटेल त्या दिशेने वळवू शकतात आणि उद्भवलेल्या समस्यांसाठी एकमेकांना दोष देऊ शकतात.
- विकासाच्या एकूण प्रक्रियेत आदिवासी जमाती एकत्र येऊ शकल्या नाहीत आणि त्यामुळे औद्योगिक विस्तारामुळे त्यांच्या जमिनी हडपल्या गेल्या, त्यांची उपजीविका नष्ट झाली.
- वाढता विकास परंतु बेरोजगारीची समस्या, हे समीकरण काळासोबत कमी होणार नाही.
- विकसनशील आणि अविकसित देशांतील मूळ (देशी) उद्योगांवर वाईट परिणाम झाला.
- सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना फटका बसला आणि त्यामुळे खाजगीकरण झाले.
- असमान विकास – प्रादेशिक विषमता.
- पैशाचा अधिक प्रवाह भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरला.

**सांस्कृतिक परिणाम :**

**भाषा :**

- लोक बहुभाषिक आणि द्विभाषिक बनतात
- सहज उपलब्ध वाङ्मय साधनांमुळे काही भाषांना जागतिक मान्यता मिळाली
- नव्याने विविध भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या वाढू लागल्यामुळे भाषांचे पुनरुज्जीवन
- इंग्रजीचे महत्त्व वाढले आणि इतर भाषांचे कमी झाले.
- काही भाषा नष्ट झाल्या. उदाहरणे– संस्कृत, गॉथिक, आदिवासी इ. जागतिकीकरणाच्या लाटेत पारंपारिक भाषांना सर्वाधिक फटका बसतो.
- पारंपारिक भाषांतून व्यक्त होणारे ज्ञान लुप्त झाले

**संगीत, नृत्य इ. :**

- अनेक विदेशी संगीत वाद्यांचा संगीतावर प्रभाव पडला
- भारतीय शास्त्रीय संगीताला जगभर मान्यता मिळाली
- परदेशी चित्रपट आणि भारतीय चित्रपट उद्योग यांची देवाणघेवाण
- भारतीय आणि पाश्चात्य कला प्रकारांचे एकत्रीकरण ('फ्युजन') (उदा– पंडित रविशंकर आणि नोरा जोन्स)

- पारंपारिक आणि लोक कला प्रकारांची उपेक्षा होऊ लागली
- आदिवासी संगीत जवळजवळ नामशेष झाले
- उपभोगवादाच्या अतिक्रमणामुळे पारंपारिक कलाप्रकारांची अधिकच अधोगती होत गेली. त्यांची अस्सलता गमावली गेली

**खानपान आणि पोशाख :**

- परदेशी ब्रँड
- परदेशी पोशाख शैली आणि पेहराव
- स्त्री–पुरुष पेहरावातील फरक पुसट झाला
- खानपानाच्या आणि वेशभूषेच्या सवयींचे आंतरराष्ट्रीयीकरण झाले
- भारतीय खाद्यपदार्थांना जगभरात मान्यता मिळाली आणि त्यामुळे पर्यटनाला चालना मिळाली
- पाश्चात्य 'फास्ट फूड'च्या अतिप्रमाणामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि लठ्ठपणा वाढला

**धर्म :**

- ख्रिस्ती, यहुदी अशा नवीन धर्मांचा प्रवेश झाला
- धर्माला नवीन जागतिक मूल्ये मिळाली
- जागतिक नागरिकत्व

**सण :**

- नवीन पाश्चात्य सण, जसे की व्हॅलेंटाईन डे, फ्रेंडशिप डे इ साजरे होऊ लागले
- पारंपरिक सणांचे महत्त्व कमी झाले
- सणांचे पावित्र्य हा घटक कमी होऊन सण फॅशन म्हणून साजरे केले जाऊ लागले
- समाज आपली सामाजिक नैतिकता आणि आदर्श आणि सौहार्द व शांततेचे आनंदी क्षण गमावत चालला आहे. सध्याची पिढी ही होळी आणि दिवाळीपेक्षा व्हॅलेंटाईन डे आणि फ्रेंडशिप डे साजरा करण्यात अधिक आनंदी आहे. पारंपारिकपणे नमस्ते, नमस्कार किंवा वडीलधाऱ्यांच्या पायाला स्पर्श करणे ही भारतीय उपखंडात अभिवादन करण्याची एक सर्वसामान्य पद्धत आहे. पण आधुनिक काळात लोक अभिवादन करण्यासाठी वा नमस्कार करण्यासाठी 'हाय, 'हॅलो' वापरतात.

**सामाजिक परिणाम :**

**सकारात्मक :**

- प्रेमविवाहांत वाढ होऊ लागल्याने विवाहसंस्था बदलली
- आंतरधर्मीय आणि आंतरजातीय विवाह वाढले
- एकत्र कुटुंब पद्धतीतील छुपी बेरोजगारी संपुष्टात आली
- साक्षरता दर मोठ्या प्रमाणात वाढला
- परदेशी विद्यापीठांशी करार झाल्यामुळे शिक्षणाचे नवीन मार्ग खुले झाले
- वैज्ञानिक आणि तांत्रिक नवकल्पना आणि त्यांचा आधार सहज उपलब्ध होऊ लागला आणि त्यास प्रोत्साहन दिले जाऊ लागले
- ग्रामीण भागात इंटरनेट सुविधांचा विस्तार झाला आणि त्यामुळे ग्रामीण जागरुकताही वाढीस लागली
- तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षणाची गुणवत्ता सुधारली

- असंघटित क्षेत्रातून संघटित क्षेत्रात लोकांचे स्थलांतर
- शिक्षणाद्वारे झालेल्या जागृतीमुळे जातिव्यवस्था कमकुवत झाली
- सामाजिक विधिनिषेध कमकुवत झाले
- स्वतःची सांस्कृतिक निवड करून जगण्याचे प्रमाण वाढले
- लोकांचा दृष्टीकोन आणि जीवनशैली बदलली

**नकारात्मक :**

- ग्रामीण–शहरी विभागणी वाढेल
- स्थलांतर आणि शहरीकरण
- टोकाच्या यांत्रिकीकरणामुळे अंगमेहनतीची मागणी कमी झाली आहे
- स्वस्त मजुरांची मागणी वाढल्याने बालकामगारांमध्ये वाढ झाली आहे
- वाढत्या आरोग्य–सेवा खर्चाचा भार मध्यम आणि निम्न वर्गावर पडला आहे
- वाढती समाजमाध्यमे लोकांना अधिकाधिक आत्मकेंद्री बनवतात, यामुळे वृद्ध आणि अपंग लोकांच्या आरोग्य आणि भावनिक अस्थिरतेचे प्रमाण वाढले
- ज्याला कुठलाही 'आत्मा' वा 'सत्व' नाही तसेच उद्दिष्ट नाही, अशा शिक्षणाचे व्यापारीकरण वाढले
- जागतिकीकरणानंतरच्या दुनियेत स्पर्धेत टिकून राहण्याचे दडपण मुलांवर वाढले
- शेरे देण्यावर भर दिला जाऊ लागला
- विभक्त कुटुंबे
- 'डे–केअर सेंटर्स'मध्ये वाढ होत गेली, परिणामी मुलांवरील नियंत्रण गमावले गेले
- कुटुंब हे उत्पादनाचे केंद्र राहिले नाही
- कुटुंबातील वडीलधाऱ्यांचा आवाज आणि त्यांची निर्णय घेण्याची क्षमता कमी झाली
- घटस्फोटाचे प्रमाण वाढले
- विवाहसंस्था ही पवित्र धाग्यापासून नागरी करारामध्ये बदलत गेली
- लिव्ह इन रिलेशनशिप
- मॅकडोनाल्डायझेशन आणि वॉलमार्टायझेशन
- लहान आकार, विषम गट, पैसा हे कुटुंबाचे केंद्र बनले. पिढीतील अंतर, दुय्यम संबंध वाढीस लागले
- जागतिकीकरणाने उपेक्षिततेला जन्म दिला आहे

**राजकीय परिणाम :**

- राजकीय सहभाग
- मतदानाबाबत जनजागृती
- दबाव गट अधिक प्रभावशाली होतात
- जबाबदारी आणि पारदर्शकता

- आंतरराष्ट्रीय दायित्वे आणि वित्त
- कंपू-भांडवलशाही
- राजकारणाचे गुन्हेगारीकरण
- राजकीय पाठिंब्याने संघटित गुन्हेगारी वाढली

**पर्यावरणीय परिणाम :**

- जागरूकता आणि चिंता वाढल्या
- शमन आणि अनुकूलनासाठी निधी आणि तंत्रज्ञान
- संवर्धनातील जागतिक सर्वोत्तम पद्धती
- कमी विकसित देशांकडून संसाधनांचे अतिशोषण
- पश्चिमेकडील देशांचे 'डंपिंग ग्राउंड'
- 'वापरा आणि फेका' संस्कृतीसोबत चंगळवाद वाढला
- अवैध प्रजाती आणि वस्तूंचा व्यापार वाढला

**असुरक्षित घटकांवर :**

- नोकरीच्या संधी वाढल्या
- आत्मविश्वास वाढला तसेच वाटाघाटी करण्याची क्षमताही वाढली
- कर्मठ परंपरांविरुद्ध लोकांच्या दृष्टिकोनात बदल
- कमी झालेला भेदभाव आणि वाढती समता
- नवीन कल्पनांचा आणि विकासाचा प्रसार
- मानव संसाधन संस्थांमध्ये वाढ
- शोषणात घट
- कौशल्याच्या अभावामुळे अनौपचारिक क्षेत्राकडे दुर्लक्ष
- पारंपारिक उत्पन्नाच्या स्त्रोताचे नुकसान
- महिलांचे कमोडिफिकेशन किंवा ऑब्जेक्टिफिकेशन (महिलांना उपभोग्य वस्तू म्हणून मानण्याचे वाढते प्रमाण)
- गुन्ह्यांच्या वाढत्या घटना

**कौटुंबिक रचना, विवाह व्यवस्था आणि मूल्ये :**

- विभक्त कुटुंबांचा विस्तार आणि संयुक्त कुटुंबात समतोल साधण्यासाठीचे सातत्य नाहीसे होत जाणे
- मुलांनी आजी-आजोबांना पाहुण्यांसारखे वागवणे सुरू केले आहे. मुलांचे असे संगोपन, हे वृद्धाश्रमांच्या वाढीचे एक प्रमुख कारण आहे
- स्त्री आणि पुरुष यांना शिक्षणाचा, कमाईचा आणि स्वतःची मते मांडण्याचा समान अधिकार मिळत आहे
- पूर्वीच्या काळाच्या तुलनेत विवाहांनी त्यांची मूल्ये आणि नैतिकता गमावली आहे. विभक्त होण्याचे, घटस्फोटाचे आणि विवाहबाह्य संबंधांचे प्रमाण वाढत आहे. आज विवाह एखाद्या कौशल्यपूर्ण करारनाम्यासारखे भासतात, किंवा ते एखाद्या कथित वचनासारखे तरी भासतात, ज्यात एकमेकांच्या सोबत राहणे असले तरी स्वतःच्या हितसंबंधांची किंमत लावावी लागत नाही. भारतीय तरुणाईत असणारी

'सेल्फ फॅक्टर'ची भावना हा जागतिकीकरणाचाच परिणाम आहे.

- पूर्णपणे भिन्न सामाजिक व्यवस्था असलेले आंतरजातीय विवाह वाढत आहेत

**शिक्षण क्षेत्र :**

- जागतिकीकरण- जसे उच्च साक्षरता दर आणि विदेशी विद्यापीठांनी विविध भारतीय विद्यापीठांशी सहयोग करणे
- विकासात्मक शिक्षणात नवीन प्रतिमान बदल घडवून आणण्याच्या संधी जागतिकीकरण देत असले तरीही, भारतीय शैक्षणिक व्यवस्थेला माहिती-तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे
- जागतिकीकरण नवीन साधने आणि तंत्रांना प्रोत्साहन देते जसे की ई-लर्निंग, लवचिक शिक्षण, दूरस्थ शिक्षण कार्यक्रम आणि परदेशी प्रशिक्षण कार्यक्रम

**भारतीय व्यवसाय संस्कृती :**

- भारतीय संघटनांनी आंतरराष्ट्रीय लेखा मानके स्वीकारली आहेत, 'जस्ट-इन-टाइम' आणि स्टॉक नियंत्रणाच्या इतर अधिक प्रभावी पद्धती, लवचिक वेळा आणि मानवी कौशल्य प्रशासनाच्या नवीन पद्धती, सामाजिक कर्तव्य आणि व्यवसाय-नैतिक विचार, कॉर्पोरेट गव्हर्नन्स पद्धतींमध्ये सुधारणा, ग्राहक संबंध व्यवस्थापन पद्धती, बाहेरील कौशल्यांची आवक आणि परदेशी उत्पादनांशी निकोप स्पर्धा
- जागतिकीकरणाच्या परिणामामुळे मानसशास्त्र, सुलभीकरण, नाविन्य, दृष्टीकोन, कार्यसंस्कृती आणि इतर बाबतीत भारतातील व्यवसाय प्रणाली बदलली आहे
- जागतिकीकरणाच्या परिणामामुळे भारतीय उद्योग नवीन आव्हानांशी जुळवून घेत आहेत आणि नवीन आणि चांगल्या संधींचा लाभ घेत आहेत आणि भविष्यातील वाढीच्या शक्यतांच्या दिशेने त्यांचा व्यवसाय अधिक फायदेशीर बनवत आहेत
- शहरीकरण वाढत आहे आणि ग्रामीण भागातील लोक शहरी भागात स्थलांतरित होण्यास प्राधान्य देत आहेत, कृषी कामगार उद्योग क्षेत्राकडे स्थलांतरित होत आहेत, व्यापार बाजारपेठ खुली होत आहे, आंतरराष्ट्रीय आयात आणि निर्यातीत तेजी, उत्पादनांसाठी संपूर्णतः तयार अशी मोठी खुली बाजारपेठ, उच्च गुणवत्ता आणि कमी किंमतीच्या उत्पादनांसाठीची वाढती बाजारपेठ, संघटित किरकोळ साखळीची हळूहळू वाढ, विलीनीकरण आणि अधिग्रहणांची वाढती कक्षा आणि परदेशी बहुराष्ट्रीय कॉर्पोरेशनसाठी सुकर परवाना धोरणे

**अनौपचारिक क्षेत्रावर जागतिकीकरणाचा परिणाम :**

- अनौपचारिक क्षेत्र म्हणजे एक मोठे आणि आडवेतिडवे पसरलेले क्षेत्र. यात स्वयंरोजगार करणारे, रोजंदारी करणारे मजूर आदींचा समावेश होतो. तसेच जे पगारदार कर्मचारी आहेत परंतु त्यांना नोकरीची सुरक्षा, वेतन सुधारणा आणि इतर फायदे नाहीत, अशांचाही समावेश होतो
- जागतिकीकरण अनेकदा सुरक्षित स्वयंरोजगारातून अधिक अनिश्चित स्वयंरोजगाराकडे वळते. उत्पादक आणि व्यापारी त्यांचे बाजारातील स्थान गमावतात
- जागतिकीकरणामुळे मोठ्या कंपन्यांना फायदा होतो, ज्या त्वरीत आणि सहजपणे सीमा ओलांडून जाऊ शकतात, परंतु यात कामगारांचे नुकसान होते. विशेषतः कमी-कुशल कामगार जे सहजपणे किंवा अजिबात स्थलांतर करू शकत नाहीत. यामुळे कमी कुशल कामगार आणि क्षुल्लक उत्पादकांवर एक दबाव निर्माण होतो, त्यांची सौदेबाजीची शक्ती कमकुवत करत त्यांना स्पर्धेत उतरण्यास भाग पडले जाते
- जसजसे अधिकाधिक पुरुष अनौपचारिक अर्थव्यवस्थेत प्रवेश करतात, तसतसे स्त्रियांना अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या सर्वात कमी उत्पन्नाच्या टोकाकडे ढकलले जाते

  अशा प्रकारे, अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण गरिबी, अनौपचारिकता आणि लिंग यांच्यातील दुवे अधिक मजबूत करते
- परंतु जागतिकीकरणामुळे अनौपचारिक अर्थव्यवस्थेत काम करणाऱ्यांसाठी नवीन संधी देखील मिळू शकतात. मजुरीसाठी नवीन नोकऱ्या किंवा स्वयंरोजगारासाठी नवीन बाजारपेठ उपलब्ध होऊ शकते
- जागतिक कमोडिटी साखळीद्वारे आऊटसोर्सिंग किंवा उपकंत्राटीद्वारे अनेक प्रमुख क्षेत्रांमध्ये उत्पादन आणि वितरणाची मूलगामी पुनर्रचना झाली आहे.  याचा निव्वळ परिणाम असा आहे की, अधिकाधिक कामगारांना अत्यंत कमी वेतन दिले जात आहे आणि त्यापैकी बर्याच

कामगारांना उत्पादनाच्या वेतनेतर खर्चाचा भार उचलावा लागतो

**भारतातील महिलांवर जागतिकीकरणाचा परिणाम :**

**सकारात्मक परिणाम :**

- उच्च आणि दर्जेदार शिक्षण ज्यांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या परवडू शकेल, अशा महिलांना ते घेणे शक्य झाले आहे
- ज्यांकडे जागतिक कल आहे, असे तंत्रज्ञानविषयक आणि इतर प्रगत क्षेत्रातील रोजगार हे योग्य पात्र महिलांसाठी खुले झाले
- महिलांबद्दलच्या बदलत्या वृत्तीमुळे, विशेषतः शहरी भागात, स्त्रियांना अधिक समतावादी स्त्री-पुरुष संबंधांची मुभा मिळाली
- आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापक दृष्टिकोनाच्या माध्यमातून स्त्री चळवळींत झालेली वाढ महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात मोठे बदल घडवून आणण्यात मदत करील
- लैंगिक असमानता कमी केल्याने सामाजिक-आर्थिक संदर्भात महिला सक्षमीकरणावर सकारात्मक परिणाम होईल
- चांगले शिक्षण, कुटुंब नियोजन आणि आरोग्य सेवा, मुलांची काळजी, नोकरीच्या चांगल्या संधी इत्यादींमुळे कुटुंबातील स्त्रियांच्या भूमिकेबद्दलच्या दृष्टिकोनातील बदल अधिक आत्मविश्वासपूर्ण आणि निरोगी महिलांच्या विकासास नक्कीच मदत करतील
- आर्थिक आणि सांस्कृतिक स्थलांतराबाबत सकारात्मक दृष्टीकोन महिलांना आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगल्या संधी उपलब्ध करून देईल

**नकारात्मक परिणाम :**

- कृषी, पशुधन आणि पशुपालन, खादी आणि ग्रामोद्योग यासह हस्तकला, हातमाग मत्स्यव्यवसाय इत्यादींमध्ये महिलांची पारंपारिक भूमिका कमी होत आहे कारण, बाजार आधारित अर्थव्यवस्थेत यांत्रिकीकरण आणि ऑटोमेशन प्रचलित होत आहे, ज्यामुळे ग्रामीण पारंपारिक अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होईल
- खाजगीकरण आणि सार्वजनिक सेवा कमी केल्याने महिलांसाठी नियमित रोजगाराच्या संधी कमी होतील
- जागतिकीकरणामुळे कमी पगाराच्या, अर्धवेळ आणि शोषण करणाऱ्या नोकऱ्यांची संख्या वाढली आहे
- व्यावसायिक संधींची लिंगाधारित उपलब्धता हे खुल्या अर्थव्यवस्थेत एक कठोर वास्तव असेल. यामुळे कामाची स्थिती खराब होईल, कमी वेतन आणि निकृष्ट करिअरच्या संधी समोर राहतील
- बाल संगोपन, सामुदायिक काळजी आणि सामाजिक सुरक्षेतील राज्याच्या तरतुदींमध्ये कपात केल्याने सर्वसाधारणपणे महिलांसाठी रोजगार आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे दुहेरी ओझे वाढेल
- ग्रामीण भागातून शहरी क्षेत्राकडे पुरुषांचे स्थलांतर वाढत असल्याने, महिलांना ग्रामीण क्षेत्रातील निगा, शेती आणि पगाराच्या रोजगाराचा तिहेरी भार सहन करावा लागतो
- नवउदारमतवादी कार्य पद्धती, कंत्राटी कार्य, कामाचे असामाजिक तास, सहकारी पद्धती, परिणामानुसार देयके यामुळे स्त्रियांना त्यांच्या बहुविध जबाबदाऱ्या पेलणे खूप कठीण जाते
- सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा जाळ्या आणि सरकारी अनुदान गायब झाल्यामुळे, दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम, सार्वत्रिक शिक्षण आणि महिलाभिमुख आरोग्य कार्यक्रमांवर प्रतिकूल परिणाम होईल
- व्यापार उदारीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांना अन्न प्रक्रिया आणि इतर स्त्रीसुलभ उद्योगांमध्ये प्रवेश करण्यास मुभा मिळेल, ज्यामुळे कमी कुशल महिला कामगारांमध्ये घट होईल
- शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या खाजगीकरणामुळे शिक्षित होण्याचा खर्च वाढेल. जेव्हा कुटुंबाचे आर्थिक गणित नव्याने रचले जाईल, तेव्हा कुटुंबातील मुलींना त्याचा सर्वाधिक फटका बसेल कारण, बहुतेक संसाधने मुलग्यांच्या (मुलांच्या) शिक्षणासाठी खर्च केली जातील
- विशेषत: आर्थिक कारणांसाठी महिलांचे स्थलांतर अनेकदा स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर महिलांचे शोषण आणि तस्करीला जन्म देते

- खुल्या बाजाराच्या अर्थव्यवस्थेमुळे अन्न आणि इतर मूलभूत गरजांच्या किंमती वाढतात. ज्या महिलांना थेट कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो त्यांना अशा बदलांना सामोरे जावे लागते

**जागतिकीकरणाचा तरुणांवर परिणाम :**

**सकारात्मक परिणाम :**

- जागतिक किशोरवयीन : भारतावर परिणाम करणाऱ्या गतिमान, जागतिक, आर्थिक शक्तींव्यतिरिक्त, जागतिकीकरणाने भारताच्या संस्कृतीत बदल घडवून आणला आहे. तरुण स्वतःला स्वतःला जागतिक किशोरवयीन म्हणून पाहतात. तरुण पिढी पाश्चिमात्य लोकप्रिय संस्कृती स्वीकारत आहे आणि ती त्यांच्या भारतीय ओळखीचा भाग ते बनावट आहेत. पाश्चात्य आणि भारतीय मूल्यांचे सूक्ष्म पातळीवर परंतु शक्तिशाली संकरीकरण दिसून येत आहे– विशेषतः भारतीय तरुणांमध्ये हे स्पष्टपणे आढळून येते. त्याचा त्यांच्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक जीवनावर मोठा प्रभाव पडतो.
- सांस्कृतिक बदल : सध्याच्या काळातील तरुणाई, तिच्या अधिक भौतिकवादी महत्त्वाकांक्षा आणि अधिक जागतिक स्तरावर तयार झालेल्या मतांसह आता हळूहळू साधेसरळ मार्ग आणि पारंपारिक भारतीय बाजारपेठा सोडून देत आहेत. आजचे तरुण हे जागतिक अर्थव्यवस्थेशी पूर्णपणे समान असलेल्या महानगरीय (कॉस्मोपॉलिटन) समाजाची मागणी करत आहेत
- धर्माकडे पाहण्याचा दृष्टीकोन : बहुतेक धार्मिक कार्ये तरुणांसाठी असंबद्ध ठरत चालली आहेत. त्यांना धर्मात बदल बघायचा आहे. जरी त्यांना धर्माचे काही अप्रत्यक्ष मूल्य आढळत असले, तरी ते पारंपारिक विचारांचे आंतरिकीकरण करत नाहीत; उलट, ते फक्त सहन करत आहेत

**नकारात्मक प्रभाव :**

- वाढलेली शहरी गरिबी : आर्थिक जागतिकीकरणामुळे शहरी गरिबीत वाढ झाली आहे कारण, लोक संधींच्या शोधात ग्रामीण भागातून शहरांकडे जात आहेत. शहरी स्थलांतरितांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. परंतु शहरी केंद्रांमध्ये तरुणांना मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीचा सामना करावा लागतो.
- चंगळवादी वृत्ती : चंगळवादाने भारतीय लोकांच्या पारंपारिक समजुती आणि पद्धती बदलल्या आहेत. तरुण गरीब लोकसंख्या ही विशेषतः जाहिरातींमध्ये दिसणार्या महाग उत्पादनांच्या मोहाला बळी पडते आणि जेव्हा ते या जाहिरातींना प्रतिसाद देऊ शकत नाहीत तेव्हा ते निराश होतात
- कुटुंबातील तरुणांची स्थिती : जागतिकीकरणामुळे कुटुंब संस्था देखील बदलत आहेत आणि विभक्त कुटुंब हे प्रमाण वाढत आहे. पूर्वीच्या पिढ्यांप्रमाणे तरुण त्यांच्या आजी–आजोबांच्या जवळ नसतात आणि जुन्या पिढीसोबत कमी वेळ घालवतात, परिणामी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या अन अनुभवातून आलेल्या ज्ञानाची हानी होते
- नैराश्य आणि आत्महत्येची वाढलेली प्रकरणे : जागतिकीकरणामुळे तरुणांमध्ये अनिश्चितता वाढली आहे; ही अंतर्निहित अस्थिरता त्यांना दररोज अनुभवत असलेला तणाव आणि नियंत्रणाचा अभाव वाढवण्यास कारणीभूत ठरू शकते. अनिश्चिततेचे कारण म्हणजे पारंपारिक नियम–पद्धतींचे भंजन होणे, कौटुंबिक आणि विवाहासारखे सामाजिक संबंध कमकुवत होत जाणे, बाजारातील अर्थव्यवस्थेमुळे करिअरमधील अनिश्चितता

**जागतिक विरुद्ध स्थानिक विवाद :**

- जागतिकीकरण विरुद्ध स्थानिकीकरण समजून घेताना, दोघांमधील फरक जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जागतिकीकरण म्हणजे विशिष्ट सामग्री ही अनेक बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करू शकते, याची खात्री देणारी प्रक्रिया आहे, तर स्थानिकीकरण म्हणजे आपली संसाधने एका विशिष्ट श्रोत्यांच्या आवश्यकतांवर केंद्रित आहेत, याची हमी देण्याची प्रक्रिया आहे

जेव्हा या दोघांमधील फरक पहिला जाईल, तेव्हा पुढील तीन घटक लक्षात ठेवणे गरजेचे ठरते :

- स्थानिकीकरण ही विशिष्ट संस्कृती, स्थान किंवा श्रोत्यांवर लक्ष केंद्रित करण्याची प्रक्रिया आहे. जागतिकीकरण ही अनेक संस्कृती, स्थाने किंवा श्रोत्यांकडे पाहण्याची प्रक्रिया आहे.

- स्थानिकीकरण हा व्यापक जागतिकीकरण प्रक्रियेचा एक भाग आहे, तर जागतिकीकरण आपल्या एकूण व्यवसाय धोरणाचा भाग आहे
- जागतिकीकरण हा बव्हंशी मोठ्या दीर्घकालीन व्यवसाय धोरणाचा भाग असतो, तर स्थानिकीकरणाचा वापर अधिक अल्पकालीन कृतींसाठी केला जातो

**जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे :**

- ग्लोबलायझेशन व्यवसायांना मोठ्या प्रमाणात लाभ प्रदान करण्यास सक्षम आहे, त्यांना मोठ्या श्रोत्यांपर्यंत/ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत करते. हे केवळ तुमचा ग्राहक आधार वाढवून महसूल वाढवण्यास मदतच करत नाही, तर ते तुमची एकूण ब्रँड प्रतिष्ठा आणि जागतिक प्रतिमा लक्षणीयरीत्या वाढवण्यास सक्षमही आहे. यामुळे, आर्थिक आव्हानांना तोंड देताना तुमचा व्यवसाय अधिक लवचिक असल्याची खात्री करून, एकाच बाजारावरील अवलंबित्व कमी करण्यात मदत होऊ शकते

  तथापि, जागतिकीकरण ही एक वेळखाऊ प्रक्रिया असू शकते आणि त्यासाठी व्यवसायाचा विस्तार करण्याच्या अनेक आव्हानांसह अतिरिक्त संसाधनांची आवश्यकता भासते

**स्थानिकीकरणाचे फायदे आणि तोटे :**

- जर तुम्ही विशिष्ट नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करू इच्छित असाल, तर हे सुलभ करण्यासाठी स्थानिकीकरण आवश्यक आहे. हे ग्राहकांकडून लक्षणीय ब्रँड निष्ठा निर्माण करण्यात मदत करू शकते, तुमच्या कंपनीबाबतचा त्यांचा एकूण अनुभव सुधारू शकते. एकनिष्ठ ग्राहक तयार करून, तुम्ही कमाई वाढवू शकाल आणि त्या मार्केटमध्ये अधिक स्पर्धात्मक फायदा मिळवू शकाल
- ागतिकीकरणाप्रमाणेच, स्थानिकीकरणासाठीही वेळ आणि संसाधनांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण गुंतवणूक आवश्यक आहे. हे योग्य रीतीने न केल्यास, त्याचा तुमच्या ब्रँड प्रतिमेवरही नकारात्मक प्रभाव पडू शकतो, त्यामुळे तुम्हाला मदत करू शकणार्या व्यावसायिक भागीदारासोबत काम करण्याची शिफारस नेहमी केली जाते
- यशस्वी स्थानिकीकरणासाठी, तुम्ही तुमचा ग्लोबल ब्रँड आणि तुम्ही प्रत्येक ठराविक बाजारपेठेसाठी तयार केलेल्या स्थानिक स्वरूपांमध्ये संतुलन शोधले पाहिजे. सामायिक सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या देशांशी व्यवहार करणे सोपे आहे. जेव्हा तुम्ही जीवनाबाबत भिन्न दृष्टी बाळगणाऱ्या राष्ट्रांसोबत व्यवहार करू पाहता, तेव्हा ते अधिक क्लिष्ट होते
- तुमच्या जागतिकीकरण मोहिमेमध्ये तुम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी विश्वसनीय भागीदार आणि साधने शोधणे – उदा. भाषांतर व्यवस्थापन प्रणाली – यामुळे तुमच्या विपणन प्रयत्नांना गती देण्यास आणि त्यावर परतावा वाढविण्यात मदत होऊ शकते

**ग्लोकलायझेशन :**

जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) आणि स्थानिकीकरण (लोकलायझेशन) या दोन शब्दांपासून बनलेला शब्द म्हणजे ग्लोकलायझेशन होय. हा एक असा शब्द आहे, जो अधिकाधिक वाढत चाललेल्या व्यवसायासाठी वापरला जातो तसेच जागतिक स्तरावर वितरीत असणाऱ्या पण त्याचवेळी स्थानिक गरजा पूर्ण करण्यासाठीही सज्ज असणाऱ्या व्यवसायासाठी वापरला जातो.

विशिष्ट परिसर वा संस्कृतीमध्ये जे विकले जाऊ शकेल, असे उत्पादन वा सेवा, यासाठी उपयोगात येणारी व्यावसायिक संज्ञा म्हणजे ग्लोकलायझेशन होय. हे आंतरराष्ट्रीयीकरणासारखेच आहे. जागतिकीकरणाची कल्पना पण तिला स्थानिकीकरणाचे कोंदण, म्हणजे ग्लोकलायझेशन. दुस–या शब्दांत सांगायचे झाल्यास, हे स्थानिक बाजारपेठेसह जागतिक बाजारपेठेचे एकत्रीकरण आहे. अनेक विकसनशील देश हे जागतिक अर्थव्यवस्थेशी समाकलित होत आहेत आणि स्थानिक सरकारे आणि समुदायांना सत्ता हस्तांतरित करत आहेत. जागतिकीकरण आणि स्थानिकीकरणाच्या या एकत्र येण्यालाच 'ग्लोकलायझेशन' म्हणतात. केंद्रीकृत राष्ट्र–राज्य सुप्र–नॅशनल आणि उप–राष्ट्रीय संस्थांचा मार्ग प्रशस्त करत आहे

सांस्कृतिक 'ग्लोकलायझेशन'मध्ये वाढ होताना दिसत आहे. स्थानिक संस्कृतीसह जागतिक संस्कृतीच्या मिश्रणाचे हे द्योतक मानायला हवे. हे सांस्कृतिक एकरूपीकरण पुढील काही क्षेत्रांमध्ये दिसून येते :

अन्न/आहार : 'मॅकडोनाल्डायझेशन' अर्थात– चवीचे एकसंधीकरण आणि चवीतील विविधतेस दाबून टाकणे

खरेदीच्या सवयी : 'वॉलमार्टायझेशन' अर्थात– चंगळवादाचा प्रचार, कृत्रिम गरजा

विचार प्रक्रिया : 'वेस्टॉक्सिकेशन' अर्थात– पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण, कनिष्ठतेची भावना

भाषा : मिश्र भाषा म्हणून इंग्रजीवर जोर

समाज : व्यक्तिवादाच्या उदारमतवादी कल्पना भारतीय समाजात झिरपत आहेत; विभक्त कुटुंबे; लिव्ह–इन संबंध वाढत आहेत

संस्कृती : हॉलिवूड चित्रपटांची लोकप्रियता, भांगडा पॉप, इंडी पॉप, इत्यादी हे भारतीय समाजावर जागतिकीकरणाचे काही एकसंध प्रभाव आहेत. तथापि, जागतिकीकरण म्हणजे केवळ एकजिनसीकरण नाही तर, ते भारतातील सांस्कृतिक वैशिष्ट्यांना बळकटही करत आहे. भारतीय शास्त्रीय नृत्य आणि संगीताला अलीकडच्या वर्षांत 'स्पिक मॅके'सारख्या आणि इतर संस्थांच्या प्रयत्नांमुळे उत्तेजन मिळाले आहे. काही आदिवासी गट, विशेषत: ईशान्य भारतात पूर्वीपेक्षा जास्त उत्साहाने स्थानिक प्रथा आणि सण साजरे होताहेत.

भारतीय संस्कृतीनेही आपला प्रभाव जगभर पसरवला आहे. योग परंपरा आणि प्रथा केवळ भारतीयच पाळत नाहीत, तर जगभरातील लोक त्यांचा स्वीकार करत आहेत.

पाश्चिमात्य पद्धतीच्या वैद्यक आणि उपचार पद्धतीने होणाऱ्या नुकसानाच्या पार्श्वभूमीवर समाजातील एका मोठ्या वर्गाकडून आयुर्वेदाच्या भारतीय पद्धतीचा प्रचार केला जात आहे. अशा प्रकारे, जागतिकीकरण आणि संस्कृती यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे असतात आणि ते एकमेकांवर परिणाम करतात. वरील उदाहरणे खरोखरच सिद्ध करतात की, भारतीय समाजात सांस्कृतिक वैशिष्ट्ये दृढ होताना दिसताहेत

वाढत्या ग्लोकलायझेशनसह आपण स्थानिक बाजारपेठा जागतिक नियंत्रणासाठी उपलब्ध करून देत आहोत. स्थानिक समुदाय कधीकधी उत्पादन आणि सेवांच्या जागतिक अभिमुखतेवर समाधानी नसतात. काहीवेळा, जागतिक मानकांऐवजी स्थानिक गरजांची काळजी घेतली जाणे, ही एक अत्यावश्यक गोष्ट ठरते. त्यामुळे, जागतिक बाजारपेठेशी खूप जास्त एकीकरण हे स्थानिक समुदायासाठी समस्यांचे कारण ठरू शकते. ग्लोकलायझेशन हे काही प्रमाणात आवश्यक ठरते कारण, ते जागतिकीकरणाच्या अधिक नकारात्मक परिणामांविरुद्ध संरक्षण प्रदान करण्यासाठी ठोस प्रत्युत्तर देते

***

# सांप्रदायिकता/जातीयवाद

**विषयाची ओळख :**

सामाजिक परंपरांचे राजकीय एकत्रीकरणाचे माध्यम म्हणून जातीपातींच्या तुकड्यांत केले जाणारे शोषण, असे वर्णन सांप्रदायिकतेचे किंवा जातीयवादाचे केले जाते. विविध परंपरांत घट्ट रुतलेल्या विविध गटांच्या हितसंबंधांसाठी हे केले जाते. अशा प्रकारे, सांप्रदायिकता ही एक अशी विचारधारा आहे, जी समाजाच्या सामाजिक-आर्थिक-राजकीय आशा पूर्ण करण्यासाठी वापरली जाते. सांप्रदायिकतेला आपले अस्तित्व सुनिश्चित करण्यासाठी विविध प्रस्ताव आणि कार्यक्रम राबवणे आवश्यक ठरते. हे कार्यक्रम सामाजिक बदलाच्या टप्प्यात सक्रिय होतात. भारतात सांप्रदायिकता ही वसाहती काळात उद्भवली. सांप्रदायिकता ही धर्म आणि परंपरेवर आधारित राजकारण करण्याचे धोरण आखते. इतिहासाचे अर्थही एकत्रीकरणाच्या उद्देशाने लावले जातात. जातीयवादी संघटनांमध्ये लोकशाहीस फारसा वाव नसतो. दुसरे म्हणजे या संघटना वर्णद्वेषास स्थान देऊ शकतात आणि अशी दुष्कृत्ये करतात देखील. म्हणून सांप्रदायिकता ही एक विश्वास प्रणाली आणि सामाजिक घटना आहे.

**जातीयवादाची संकल्पना आणि व्याख्या :**

सांप्रदायिकता म्हणजे एका व्यापक अर्थाने स्वतःच्या समुदायाशी असणारी घट्ट जोडणी होय. भारतात, संप्रदायिकता म्हणजे स्वतःच्या धर्माशी असणारी टोकाची आसक्ती समजली जाते.

ही एक विचारधारा आहे जी समाजाला एकत्र आणण्यासाठी, समाजातील भेदांना दडपून टाकते आणि इतर समुदायांविरुद्ध एखाद्या समुदायाने एकत्र येण्यावर जोर देते.

अशा प्रकारे संप्रदायिकता ही रूढीवादी सिद्धांत आणि तत्त्वांवर विश्वास, असहिष्णुता आणि इतर धर्मांबद्दल द्वेष वाढवते आणि अशा प्रकारे, समाजात फूट पाडते.

सांप्रदायिकतेचा सकारात्मक पैलू म्हणजे एखाद्या व्यक्तीची त्याच्या स्वतःच्या समुदायाप्रती असलेली आत्मीयता, ज्यामध्ये त्याच्या समुदायाच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नांचा समावेश होतो. तथापि, नकारात्मक अर्थाने, ही एक विचारधारा आहे जी धार्मिक गटांची स्वतंत्र ओळख असण्यावर भर देते आणि इतरांच्या पेक्षा स्वतःचे हितसंबंध जपण्यावर भर देते.

**जातीयवादाची वैशिष्ट्ये व स्वरूप :**

i) हे धर्माने प्रेरित असण्याच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या अधिक प्रेरित आहे.

iI) राजकीय हितसंबंधांबरोबरच आर्थिक हितसंबंधही जातीय संघर्षाला खतपाणी घालण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

iii) ज्या गावात एक किंवा दोनदा जातीय दंगली झाल्या असतील अशा गावात जातीयवादाच्या पुनरावृत्तीची संभाव्यता अशा दंगली कधीही न झालेल्या शहरापेक्षा जास्त असते.

iv) बहुतेक वेळा धार्मिक सणांच्या वेळी सांप्रदायिकता उफाळून येते.

**जातीयवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

शतकानुशतके भारतातील हिंदू आणि मुस्लिम शांततेत आणि सौहार्दाने राहत होते. इंग्रजांच्या आगमनापूर्वी धर्म आणि धार्मिक समुदायाला राजकीय महत्त्व नव्हते. समाज शासक वर्ग आणि शासित वर्गात विभागला गेला होता. ब्रिटीशांनीच समुदायांमधील धार्मिक आणि सांस्कृतिक भेदांवर जोर दिला आणि त्यांना एकमेकांच्या विरोधात उभे करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दुर्भावनापूर्ण रीतीने इसवी सन १२०० ते १७५७ हा संपूर्ण काळ हिंदूंवरील मुस्लिम राजवटीचा काळ म्हणून ठरवला, शिवाय, युरोपियन इतिहासकारांनी हा प्रदीर्घ काळ हिंदूंच्या अधीनतेचा आणि त्यांच्यावरील अत्याचारांचा म्हणून मांडला. अशा प्रकारे, १७५७च्या प्लासीच्या लढाईनंतर, त्यांनी असा दावा केला की ब्रिटीश राजवट ही हिंदूंसाठी एक दैवी देणगी आहे, कारण यामुळे मुस्लिम शासकांच्या जुलमी राजवटीपासून त्यांची सुटका झाली होती. हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील धार्मिक आणि सांस्कृतिक भिन्नता आणि विभक्त सांप्रदायिक ओळखांचे एकत्रीकरण याला केवळ एकोणिसाव्या शतकातील आक्रमक धार्मिक पुनरुज्जीवन चळवळींनीच मदत केली नाही तर एका समुदायाला प्रोत्साहन देण्याच्या आणि दुसर्या समुदायाला अवनत करण्याच्या हेतुपुरस्सर ब्रिटीश धोरणामुळेही मदत झाली. विशेषतः १८५७ च्या उठावानंतर हे अधिक ठळकपणे घडले. हा उठाव अयशस्वी झाल्यानंतर, हिंदूंनी ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या आधुनिक शिक्षण आणि रोजगाराच्या संधींचा पुरेपूर फायदा घेतला आणि त्यांनी प्रगती केली तर, मुस्लिमांनी

इंग्रजांपासून अलिप्तपणाचे धोरण अवलंबले आणि ते अधोगतीला आणि मागासलेपणाला सामोरे गेले. दोन समुदायांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असमतोल हे मुस्लिमांच्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसपासून दुरावण्याचे एक कारण होते. हिंदू मध्यमवर्गाच्या वाढत्या राष्ट्रवादातून इंग्रजांना त्यांच्या वर्चस्वाला आव्हान मिळत असल्याचे दिसू लागले तेव्हा त्यांनी 'फूट पाडा आणि राज्य करा' हे पारंपरिक धोरण अवलंबले आणि मूळनिवासी लोकांना एकमेकांपुढे उभे करण्याचे धोरण आखले. १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणांतर्गत मुस्लिम समुदायाला काही सुरक्षितता (वेगळे मतदार आणि सुविधा) मंजूर केल्याने हिंदू-मुस्लिम संघर्षाचे नवीन पर्व सुरू झाले, कारण बहुसंख्य समुदायाने अल्पसंख्याक समुदायाचा कोणताही फायदा हा बहुसंख्यांचे नुकसान मानला. १९१६ च्या काँग्रेस-लीग लखनौ कराराने आणि खिलाफत आणि असहकार चळवळीने (ज्या चळवळीने खिलाफत कमिटी, मुस्लिम लीग, जमियत-उल-उलामा आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस एकत्र आले होते) हिंदू-मुस्लिम राजकीय ऐक्याचे आणि सहकार्याचे पाऊल उचलले गेले. तथापि, खिलाफत आणि असहकार चळवळीचे पतन, अतिरेकी राजकारणाची वाढ आणि क्षुल्लक मुद्द्यांवर हिंदू-मुस्लिम संघर्षांची मालिका यामुळे आंतर-समुदाय संबंध बिघडले. १९१७ च्या मॉन्टेग घोषणेने भारतीय राजकारणात एक महत्त्वाचे वळण आले, ज्याने अल्पसंख्याकांकडे पाहण्याचा बहुसंख्यांचा दृष्टीकोन पूर्णपणे बदलला. १९१६ च्या काँग्रेस-लीग कराराच्या मोतीलाल नेहरू कमिटी रिपोर्ट (१९२८) मध्ये हे दिसूनही येते. त्यानंतर १९३७ मध्ये पुढचा महत्त्वाचा टप्पा आला जेव्हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने भारत सरकार कायदा, १९३५ अंतर्गत प्रांतिक विधानसभेसाठी झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका जिंकल्या. अल्पसंख्याक पक्षाला त्यांच्या मंत्रिपदांमध्ये घेण्यास त्यांनी ठाम आणि स्पष्ट नकार दिल्याने काँग्रेस-लीग संघर्षाच्या युगाची सुरुवात झाली परिणामी हिंदू-मुस्लिम संबंध बिघडले. कदाचित याच टप्प्यावर आंतर-पक्षीय आणि आंतर-समुदाय विरोधाचे वर्णन करण्यासाठी सांप्रदायिकता हा शब्द तयार केला गेला होता. १९३७-१९४७ या काळात आंतर-पक्षीय समजूतदारपणा आणि जातीय समझोता करण्याचे कोणतेही प्रयत्न पुढे येऊ शकले नाहीत. परिणामी, १९४७ मध्ये देशाच्या फाळणीसह भारताला स्वातंत्र्य मिळाले.

**सांप्रदायिकतेचे प्रकार :**

कल्याणकारी सांप्रदायिकतेचा उद्देश एखाद्या विशिष्ट समुदायाच्या कल्याणासाठी आहे. उदा- ख्रिश्चनांसाठी शिक्षण आणि आरोग्यासाठी सुविधा पुरवणे आणि राहणीमान सुधारणे, यासाठी कार्य करणाऱ्या ख्रिश्चन संघटना किंवा पारसींच्या उत्थानासाठी कार्य करणार्या पारसी संघटना अशा सांप्रदायिक एकत्रीकरणाचा उद्देश केवळ स्वतःच्या समुदायातील सदस्यांसाठी कार्य करणे हा असतो.

माघार घेणारा जातीयवाद असा आहे, ज्यामध्ये एक लहान धार्मिक समुदाय स्वतःला राजकारणापासून दूर ठेवतो. उदाहरणार्थ, बहाई समुदाय, जो आपल्या सदस्यांना राजकीय कृतींमध्ये भाग घेण्यास प्रतिबंधित करतो. प्रतिशोधात्मक (सूडवादी) सांप्रदायिकता इतर धार्मिक समुदायांच्या सदस्यांना इजा करण्याचा, दुखावण्याचा प्रयत्न करते.

अलिप्ततावादी सांप्रदायिकता असा आहे ज्यामध्ये एक धार्मिक किंवा सांस्कृतिक गट आपली सांस्कृतिक विशिष्टता टिकवून ठेवू इच्छितो आणि देशात स्वतंत्र प्रादेशिक राज्याची मागणी करतो, उदाहरणार्थ, ईशान्य भारतातील काही मिझो आणि नागांची किंवा आसाममधील बोडो किंवा झारखंडमधील आदिवासींची मागणी. बिहारमध्ये, किंवा पश्चिम बंगालमधील गोरखालँडसाठी गोरखा, किंवा उत्तर प्रदेशातील उत्तराखंडसाठी किंवा महाराष्ट्रातील विदर्भातील पहाडी लोकांची वेगळे होण्याची मागणी.

फुटीरतावादी सांप्रदायिकता असा आहे ज्यामध्ये धार्मिक समुदायाला स्वतंत्र राजकीय ओळख हवी असते आणि स्वतंत्र राज्याची मागणी असते. खलिस्तानची मागणी करणारा शीख लोकसंख्येचा एक अतिशय लहान अतिरेकी वर्ग किंवा स्वतंत्र काश्मीरची मागणी करणारे काही मुस्लिम अतिरेकी अशा प्रकारच्या सांप्रदायिकतेत गुंतले होते. या सहा प्रकारच्या सांप्रदायिकतेपैकी, शेवटच्या तीन प्रकारांमुळे आंदोलने, जातीय दंगली, दहशतवाद आणि बंडखोरी अशा समस्या निर्माण होतात.

**जातीयवादाची कारणे :**

समकालीन भारतातील सांप्रदायिकतेच्या वाढीस उत्तेजन देणार्या मुख्य शक्ती पुढील आहेत :

- धार्मिक समुदायांचे आर्थिक मागासलेपण
- सांप्रदायिक पक्ष आणि संघटनांची वाढ
- राजकीय पक्षांची निवडणूक सक्ती
- सांप्रदायिक माध्यमे, साहित्य आणि पाठ्यपुस्तके

- अलिप्ततावाद आणि विलगतावादी धार्मिक समुदाय
- हिंदू आणि मुस्लिम पुनरुत्थानवादी चळवळी
- जातीयवादी आणि मूलतत्त्ववादी पक्षांचा उदय.

**जातीयवादाचे परिणाम :**

जवाहरलाल नेहरूंनी एकदा सांप्रदायिकतेचे वर्णन फॅसिझमचे भारतीय रूप म्हणून केले होते. ते म्हणाले होते की, सर्व जातीयवाद वाईट असला तरी आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अल्पसंख्याक जातीयवाद हा भीतीतून जन्माला येतो, तर बहुसंख्य जातीयवाद हा वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी राजकीय प्रतिक्रियेचे रूप घेतो. पण ते पुढे म्हणाले: 'जातीयवाद, हिंदू सांप्रदायिकता किंवा मुस्लिम जातीयवाद या मुद्द्यावर कोणतीही तडजोड होऊ शकत नाही, कारण हे भारतीय राष्ट्रीयत्व आणि भारतीय राष्ट्रवादाला आव्हान आहे.'

- यामुळे समाजातील विविध धार्मिक वर्गांमध्ये द्वेष निर्माण होतो आणि आपल्या समाजाच्या शांततापूर्ण सामाजिक बांधणीत व्यत्यय येतो.
- जातीय दंगली अनेकदा देशाच्या अनेक भागात भडकतात आणि सामाजिक जडणघडणीला हानी पोहोचवतात आणि यातून सावरायला अधिक वेळ लागतो.
- आर्थिक वाढ शांतता आणि शांततेच्या वातावरणातच होऊ शकते, जातीयवाद असहिष्णुता आणि हिंसाचाराचे वातावरण निर्माण करतो ज्यामुळे वस्तू आणि भांडवलाच्या प्रवाहात अडथळा येतो.
- उत्पादक कृतींकडून श्रमाचा प्रवाह अनुत्पादक कृतींकडे वळवला जातो; विचारधारा पसरवण्यासाठी सार्वजनिक मालमत्तेची मोठ्या प्रमाणात नासधूस केली जाते. परकीय गुंतवणूकदारांकडून देशाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सावध असेल; त्यांची गुंतवणूक गमावण्याची जोखीम न घेतल्याने ते अत्यंत सांप्रदायिक देशांत गुंतवणूक करायचे शक्यतो टाळतात.
- मतदार सामान्यतः जातीय आधारावर मतदान करतात. निवडून आल्यानंतर, प्रतिनिधी आपल्या समुदायाच्या हिताचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात आणि राष्ट्रीय हितांकडे दुर्लक्ष करतात. या परिस्थितीमुळे देशातील लोकशाहीच्या प्रगतीला बाधा येते
- समाजातील प्रचलित सांप्रदायिकतेमुळे व्यक्ती कधीही शांततेत नसतात आणि एक आध्यात्मिक शक्तीस्थान असलेल्या भारताचे चैतन्य हरवलेले दिसते.

**सांप्रदायिकतेला सामोरे जाण्यासाठी दीर्घ आणि अल्पकालीन दृष्टीकोनात्मक उपाय :**

सांप्रदायिकता आणि जातीय हिंसाचाराचे आव्हान पेलण्यासाठीचे उपाय दोन प्रकारचे असू शकतात : दीर्घकालीन आणि अल्पकालीन.

**दीर्घकालीन उपाय असे आहेत :**

- सर्व स्तरांवरील लोकांना जातीयवादमुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करताना, सांप्रदायिक गृहीतके कशी खोटी आहेत, हे त्यांच्यापर्यंत पोहोचवणे. त्यांना जातीयवादाची सामाजिक-आर्थिक आणि राजकीय मुळे समजावून सांगणे इ.
- राज्याचे आणि राजकीय अभिजात वर्गाचे सांप्रदायिकीकरण तपासले पाहिजे. कारण यामुळे जातीय हिंसाचाराच्या विरोधात निष्क्रियता वाढते. तसेच राज्य यंत्रणेद्वारे जातीयवादाला गुप्त किंवा उघड राजकीय आणि वैचारिक पाठिंबा मिळतो.
- नागरी समाजाचे सांप्रदायिकीकरण देखील तपासले जाणे आवश्यक आहे कारण, यामुळे अधिक जातीय दंगली होतात. सांप्रदायिक विचार आणि विचारसरणी असलेले लोक सरकारवर अशा पद्धतीने कृती करण्यासाठी दबाव आणतात, जे नेहमीच धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांच्या विरोधात असते.
- शिक्षणाची भूमिका, विशेषत: शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मूल्याभिमुख शिक्षणावर भर देणे, जातीय भावना रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.
- जातीय भावना रोखण्यासाठी प्रसारमाध्यमेही महत्त्वपूर्ण ठरू शकतात. सांप्रदायिक प्रेसवर बंदी आणली जाऊ शकते आणि जातीयवादी

लेखकांवर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

- आपल्या देशातील सांप्रदायिक पक्षांचे उच्चाटन : आपल्या देशात, राजकीय पक्ष विविध धार्मिक आणि सांस्कृतिक संघटनांच्या बुरख्याखाली जातीयवादाला चालना देण्यासाठी प्रामुख्याने जबाबदार आहेत. सरकारने त्यांच्यावर करडी नजर ठेवली पाहिजे आणि राष्ट्रहिताला बाधक आढळल्यास ते रद्द करावेत.

- भूतकाळातील वारशाचा प्रसार : देशवासियांना इतिहासाच्या त्या गौरवशाली क्षणांची आठवण करून देण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे ज्यामध्ये हिंदू, मुस्लिम आणि शीख राष्ट्रहिताच्या रक्षणासाठी एकत्र आले होते. हे आपल्या देशवासीयांना राष्ट्रवादी आवेशाने प्रेरित करेल.

- आंतरधर्मीय विवाह : विविध समुदायांमध्ये जवळचा संपर्क राखण्यासाठी, प्रत्येक परिसरात युवक संघटना स्थापन केल्या पाहिजेत ज्यामध्ये विविध समाजातील तरुणांना एकमेकांच्या संपर्कात येण्यास आणि विविध विकासात्मक कार्यक्रमांमध्ये एकत्र काम करण्यास वाव मिळू शकेल. प्रत्येक समाजातील लोकांना एकमेकांच्या जवळ येण्याची आणि जाणून घेण्याची संधी देण्यासाठी इतर प्रकारच्या संघटना देखील स्थापन केल्या जाऊ शकतात. यामुळे त्यांना आंतरधर्मीय विवाह करण्यास मदत होऊ शकते. आंतरधर्मीय विवाहांमुळे विविध धार्मिक गटांमधील सामाजिक अंतर कमी होईल.

- राष्ट्रीय सणांची घोषणा : प्रत्येक समुदायाचे सर्वांत जास्त साजरे केले जाणारे सण राष्ट्रीय सण म्हणून घोषित केले जावेत, ज्यामुळे प्रत्येक धार्मिक गटातील सदस्यांना भाग घेण्याची आणि परस्पर संपर्क साधण्याची संधी मिळेल आणि त्याद्वारे जातीय सलोख्याला चालना मिळेल. जातीय संघर्ष निर्मूलन किंवा शमन करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती असूनही, सरकार आणि जनता या दोघांच्या एकत्रित प्रयत्नांची खरोखरच गरज आहे. संस्थात्मक आणि मनोवृत्तीतील बदल यांचा एकत्रित प्रयत्नच अपेक्षित परिणाम आणू शकतो.

**जातीयवाद आणि जातीय दंगली रोखण्यासाठी काही तात्काळ उपाय आवश्यक आहेत :**

- शांतता समित्या स्थापन केल्या जाऊ शकतात ज्यामध्ये विविध धार्मिक समुदायातील व्यक्ती दंगलग्रस्त भागात सद्भावना आणि सहकारी भावना पसरवण्यासाठी आणि भीती आणि द्वेषाच्या भावना दूर करण्यासाठी एकत्र काम करू शकतात. व्यक्ती आणि गटांसह सामाजिक कार्य हस्तक्षेप केला जाऊ शकतो.

- राज्याला जातीय हिंसाचाराचा सामना करण्यासाठी योजना आखून नवीन धोरणे वापरावी लागतील. जेव्हा जेव्हा मजबूत आणि धर्मनिरपेक्ष प्रशासकांनी कठोर पावले वापरली किंवा वापरण्याची धमकी दिली तेव्हा दंगली एकतर घडल्या नाहीत किंवा अल्प कालावधीच्या होत्या.

- सांप्रदायिक हिंसाचाराच्या काळात प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते आणि अधोरेखित केली जाते. वृत्तपत्रे, रेडिओ आणि टीव्हीने लोकांच्या चिडलेल्या मज्जातंतूंना (भावनांना) शांत करण्यासाठी अनुकूल अशा घटनांचे अहवाल दिल्यास भीती आणि द्वेष थोपवला जाऊ शकतो.

- शेवटी, सत्तेत असलेल्या सरकारने अतिरेकी सांप्रदायिक संघटनांना त्यांचे तात्काळ लक्ष्य मानले पाहिजे आणि कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याची त्यांची क्षमता कमी केली पाहिजे. काश्मीरमधील फुटीरतावादी, पंजाबमधील अतिरेकी, आता केरळमध्ये बंदी घालण्यात आलेली आयएसएस आणि हिंदू, मुस्लिम आणि शीख जातीयवादाच्या इतर अतिरेकी संघटनांना राज्याने कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेद्वारे रोखले पाहिजे.

- निरोगी सार्वजनिक मत : इतर समुदायांबद्दलचा लोकांचा दृष्टीकोन बदलण्यासाठी मास मीडियाद्वारे लोकांना आवाहन केले पाहिजे. कोणत्याही स्वरूपातील जातीय प्रचारावर बंदी घातली पाहिजे.

**धार्मिकता आणि सांप्रदायिकता (संक्रमण आणि तुलना) :**

**धार्मिकता :**

धार्मिकता ही धर्म आणि संस्कृती एवढीच जुनी संकल्पना आहे. हे जगभर आढळू शकते. धार्मिकतेचा संबंध देवाच्या उपासनेशी आहे. एखादी व्यक्ती आपल्या समस्या सोडवण्यासाठी अलौकिक शक्तीची मदत घेण्यासाठी सहसा धार्मिकतेमध्ये गुंतलेली असते. धार्मिकता म्हणजे जीवन आणि वातावरणातील त्या घटकांना मानवी प्रतिसाद जे त्याच्या सामान्य आकलनाच्या पलीकडे आहेत.

धार्मिकतेला वाहून घेतलेल्यांनी स्वतःहुन मानव किंवा प्राणी बलिदान देण्याची आवश्यकता निर्माण करण्याचे प्रसंग सोडता, धार्मिकतेचा हिंसेशी कुठलाही थेट संबंध नाही.

**जातीयवाद :**

धार्मिकतेच्या तुलनेत सांप्रदायिकता ही एक नवीन घटना आहे. याचा जन्म वसाहती काळात झाला, जेव्हा ब्रिटिशांनी विविध समुदायांवर राज्य करण्यासाठी समुदायांमधील धार्मिक विरोधाभासांचा वापर केला. सांप्रदायिकता ही एक विश्वास प्रणाली आणि एक सामाजिक घटना आहे ज्यामध्ये लोकांच्या एकत्रीकरणासाठी इतिहासाचा अन्वयार्थ लावला जातो. यात एका विशिष्ट धर्माच्या अनुयायांना राजकीय क्षेत्रात एकत्र आणण्यासाठी पवित्र चिन्हे, धार्मिक नेते, भावनिक आवाहन आणि साधा भय यांचा वापर केला जातो. धर्मनिरपेक्षता आणि समतावाद अस्वाभाविक म्हणून उल्लेखले गेले आहेत. इतर धर्माचे लोक विरोधी म्हणून चित्रित केले जातात. सांप्रदायिकतेमध्ये धार्मिक ओळख इतर सर्व गोष्टींपेक्षा अधिक महत्त्वाची ठरते. जो कोणी ही ओळख सामायिक करत नाही त्याच्यावर शाब्दिक किंवा शारीरिक हल्ला केला जाऊ शकतो. जेव्हा जातीयवाद जातीय दंगलीत वाढतो तेव्हा लोक आपापल्या समुदायाचे चेहरे नसलेले सदस्य बनतात. त्यांचा अभिमान जपण्यासाठी, त्यांच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी किंवा त्यांच्या सह-धर्मवाद्यांकडून झालेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी ते इतर समुदायातील सदस्यांना मारण्यास, बलात्कार करण्यास आणि लुटण्यासही तयार असतात!

राजकीय नेते आणि सर्व प्रमुख नागरिकांनी जातीयवादाचा निषेध केला पाहिजे. अल्पसंख्याक समाजाचे आर्थिक स्तर उंचावण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतील. एकंदरीत नैतिकता निर्माण केली पाहिजे ज्यामुळे समुदायांमध्ये शांतता निर्माण होईल आणि जातीय हिंसाचाराचा अंत होईल. समुदायाच्या नेत्यांनी समाजाला परिस्थिती समजावून सांगावी आणि तणाव निवळावा.

***

# प्रादेशिकता/प्रदेशवाद

**विषयाची ओळख :**

प्रादेशिकता समजून घेण्यासाठी त्या-त्या प्रदेशाचे विविध आयाम जाणून घेतले पाहिजेत. एक भौगोलिक एकक म्हणून प्रदेश हे एकमेकांच्या पासून मर्यादित असतात. एक सामाजिक प्रणाली म्हणून प्रदेश हे विविध माणसं आणि गटांमधील संबंध प्रतिबिंबित करतात. प्रदेश हे सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय किंवा लष्करी क्षेत्रातील संघटित सहकार्यस्थान असतात. प्रदेशास एक स्वतंत्र व वेगळी ओळख, भाषा, संस्कृती आणि परंपरा असते. प्रादेशिकता ही एक विचारधारा आणि राजकीय चळवळ आहे, जी प्रदेशांच्या निर्मिती आणि अस्तित्वाची कारणे पुढे नेण्याचा प्रयत्न करते. एक प्रक्रिया म्हणून प्रदेश हा देशामध्ये तसेच देशाबाहेर म्हणजेच आंतरराष्ट्रीय स्तरावर एक भूमिका बजावत असतो. दोन्ही प्रकारच्या प्रादेशिकतेचे वेगवेगळे अर्थ आहेत आणि त्याचा समाज, राजनैतिक, मुत्सद्देगिरी, अर्थव्यवस्था, सुरक्षा, संस्कृती, विकास, वाटाघाटी इत्यादींवर सकारात्मक तसेच नकारात्मक प्रभाव पडतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर, प्रादेशिकता म्हणजे एक समान उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केले गेलेले आंतरराष्ट्रीय सहकार्य किंवा परस्परांच्या सामायिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी उचलले गेले पाऊल किंवा ते भूगोल, इतिहास किंवा आर्थिक वैशिष्ट्यांद्वारे जोडल्या गेलेल्या पश्चिम युरोप किंवा दक्षिणपूर्व आशिया सारख्या देशांच्या समूहाचा संदर्भ देते. या अर्थाने वापरलेली प्रादेशिकता या देशांच्या आर्थिक वैशिष्ट्यांमधील दुवे मजबूत करण्याच्या प्रयत्नांना संदर्भित करते. या शब्दाचा दुसरा अर्थ राष्ट्रीय स्तरावर असणारी प्रादेशिकता असा आहे, ज्या प्रक्रियेमध्ये उप-राज्य घटक अधिकाधिक शक्तिशाली बनतात, केंद्र स्तरावरून प्रादेशिक सरकारांकडे सत्ता हस्तांतरित होते. हे देशामधील प्रदेश असतात, जे संस्कृती, भाषा आणि इतर सामाजिक-सांस्कृतिक घटकांमध्ये वेगळेपण दर्शवितात.

**प्रादेशिकतेची संकल्पना आणि व्याख्या :**

प्रादेशिकता ही विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील लोकांच्या ओळखीची आणि उद्दिष्टाची सर्वसामान्य व एकसमान भावना व्यक्त करते. त्यांची विशिष्ट भाषा, संस्कृती इत्यादींद्वारे प्रादेशिकता एकी दर्शवत असते. सकारात्मक अर्थाने पाहायचे झाल्यास प्रादेशिकता लोकांमध्ये बंधुत्व आणि एकतेची भावना विकसित करण्यास प्रोत्साहित करते. विशिष्ट प्रदेशाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि राज्य आणि तेथील लोकांच्या कल्याण आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी ती प्रोत्साहित करते. नकारात्मक बाजू बघायची झाल्यास, प्रादेशिकता म्हणजे एखाद्याला त्याच्या प्रदेशाशी असणारी अत्याधिक आसक्ती आहे, जी देशाची एकता आणि अखंडतेसाठी मोठा धोका आहे.

भारतीय संदर्भात सामान्यतः 'प्रादेशिकता' हा शब्द नकारात्मक अर्थाने वापरला जातो.

**प्रादेशिकतेचे विविध प्रकार :**

**तथाकथित प्रादेशिकता :**

प्रादेशिकतेचा हा पहिला आणि सर्वात वैध प्रकारचा प्रकार म्हणता येईल. यात अनेकदा स्वतंत्र जागेची वा राज्याची मागणी असते आणि भारताच्या संघराज्यात सुरक्षितपणे स्थान अपेक्षित असते. पूर्वीच्या मद्रास प्रेसिडेन्सीच्या तेलगू भाषिक रहिवाशांनी या विचाराच्या स्वरूपास व मागणीस पुढे नेले होते. त्यात झालेल्या निषेधाच्या स्वरूपांत शासकीय मालमत्तेवर हल्ले आणि आपल्या मागण्यांसाठी केले गेलेले उपोषण होते. यातील सर्वांत महत्त्वाचे आंदोलन हे पोटी श्रीरामुलू यांचे होते, ज्यांचा १९५२ मध्ये ५२ दिवसांच्या उपोषणास मृत्यू झाला. या आंदोलनातून आंध्र प्रदेश राज्याची निर्मिती झाली आणि नंतर भाषिक धर्तीवर भारताच्या नकाशाची पुनर्रचना झाली.

**संकोचवाद/संकुचित वृत्ती :**

प्रादेशिकतेच्या दुसर्या प्रकाराला संकोचवाद वा संकुचित वृत्ती संबोधले जाते. जसे की बंगाली भद्रलोक असा दावा करतात की त्यांचे साहित्य, संगीत, पोशाख आणि पाककृती भारतातील इतरांपेक्षा श्रेष्ठ आहेत. तथापि, काहीवेळा या वृत्तीने रक्तपात देखील घडवल्याचे दिसून येते. जसे की, उल्फा केडरने बिहारी मजुरांवर केलेले हल्ले! या हल्ल्यांमागे 'आसाममध्ये फक्त आसामी भाषिकांना राहण्याचा अधिकार आहे' हा विश्वास कारणीभूत होता.

**भारतीय संघराज्यातून अलिप्ततावाद :**

हे प्रादेशिकतेचे सर्वात हिंसक आणि धोकादायक स्वरूप म्हणून वर्गीकृत केले जाऊ शकते कारण, ते भारतीय प्रजासत्ताकाचे विभाजन करून स्वतःचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याच्या इच्छेवर, किंवा आशा किंवा कल्पनेवर आधारित आहे. १९८० च्या दशकात शीख अतिरेक्यांनी

चालवलेल्या खलिस्तानच्या चळवळीला देखील त्यांचे स्वतःचे राष्ट्र–राज्य निर्माण करण्याची आशा होती. किंबहुना, द्रविड चळवळीनेही अनेक वर्षे भारताबाहेर स्वतंत्र राष्ट्राची मागणी केली होती.

**आंतरराज्य वाद :**

भारतातील प्रादेशिकतेचे आणखी एक रूप आंतरराज्यीय विवादांच्या रूपात व्यक्त झाले आहे. पंजाब आणि हरियाणामध्ये चंदीगडवरून वाद सुरू आहे. उदाहरणार्थ, बेळगाव येथे महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात सीमा विवाद आहेत, जिथे मराठी भाषिक लोकसंख्या ही कर्नाटक आणि केरळ दरम्यानच्या कासारगोड सारख्या ठिकाणी कन्नड भाषिक लोकांनी वेढलेली आहे. तसाच प्रकार आसाम आणि नागालँडमधील अनेक सीमावर्ती भागांमध्ये जसे की, राम पगनी भागातील रंगमा राखीव जंगलांच्या प्रदेशात दिसून येते.

**भारतातील प्रादेशिकता : ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

भारतातील प्रादेशिकतेची मुळे भाषा, संस्कृती, वांशिक गट, समुदाय, धर्म इत्यादींच्या विविधतेमध्ये दडलेली आहेत. या ओळख चिन्हकांच्या प्रादेशिक केंद्रीकरणामुळे तिला प्रोत्साहन दिले जाते आणि दुसरीकडे प्रादेशिक वंचिततेच्या भावनेनेही तिला चेतवले जाते. अनेक शतके भारत हा अनेक भूप्रदेश, संस्कृती आणि परंपरांचा देश राहिला. उदाहरणार्थ, दक्षिण भारत (द्रविड संस्कृतींचे माहेरघर), जो स्वतः अनेक प्रदेशांचा प्रदेश आहे आणि तो स्पष्टपणे उत्तर, पश्चिम, मध्य आणि ईशान्येपेक्षा वेगळा आहे. भारताचा पूर्व भाग देखील ईशान्य भारतापेक्षा वेगळा आहे, ज्यात आज भारतीय महासंघाचे सात घटक आहेत ज्यात आदिवासी लोकांची संख्या सर्वाधिक आहे.

स्वातंत्र्यानंतर (१९४७) भारतीय राजकारणात प्रादेशिकता ही कदाचित सर्वात शक्तिशाली शक्ती राहिली आहे. १९६० च्या उत्तरार्धापासून अनेक राज्यांवर शासन करणाऱ्या अनेक प्रादेशिक राजकीय पक्षांचा हा मुख्य आधार राहिला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या विविध टप्प्यांमध्ये प्रादेशिक अस्मितेचे तीन स्पष्ट आकृतिबंध दिसून येतात.

प्रथम, १९५० आणि १९६० च्या दशकात अनेकदा हिंसक स्वरूप धारण करणारे असे तीव्र (वांशिक) जनसंघटन ही राज्यत्वासाठी संस्थात्मक एकीकरणासाठी राज्याच्या प्रतिसादामागील मुख्य शक्ती होती. भारताच्या दक्षिणेतील आंध्र प्रदेशने यासाठी मार्ग दाखवला. १९५२ मध्ये दिग्गज (तेलुगू) नेते पोट्टी श्रीरामुलू यांनी संयुक्त मद्रास प्रेसिडेन्सीमधून तेलगू भाषिकांच्या राज्यासाठी आमरण उपोषण केले, ज्यामुळे एरवी अनिच्छुक असणाऱ्या जवाहरलाल नेहरूंसारख्या एका सर्वोच्च राष्ट्रवादी नेत्याला धक्का दिला आणि त्यानंतर फजल अली यांच्या नेतृत्वाखाली राज्य पुनर्रचना आयोगाची निर्मिती झाली. यामुळे राज्य पुनर्रचना कायदा, १९५६ साठी मार्ग मोकळा झाला.

दुसरे म्हणजे, १९७० आणि १९८० च्या दशकात, पुनर्रचनेचे मुख्य केंद्र भारताच्या ईशान्येकडे होते. पुनर्रचनेचा आधार हा विभक्त होण्यासाठी आणि राज्यत्वासाठी आदिवासी लोकांनी केलेले बंड होते. यावर केंद्र सरकारचा मुख्य संस्थात्मक प्रतिसाद म्हणजे ईशान्य राज्य पुनर्रचना कायदा, १९७१ होय. या कायद्याने मणिपूर आणि त्रिपुरा या केंद्रशासित प्रदेशांना श्रेणी सुधारत राज्याचा दर्जा दिला आणि मेघालयच्या उप–राज्यालाही पूर्ण राज्याचा दर्जा दिला. तसेच मिझोराम आणि अरुणाचल प्रदेश (तत्कालीन आदिवासी जिल्हे) यांना श्रेणीसुधारित करत केंद्रशासित प्रदेश केले. नंतर ते १९८६ मध्ये राज्य बनले. गोवा (कोंकणी भाषेवर आधारित (८वी अनुसूची)), जे १९८७ मध्ये राज्य बनले, हा एकमेव अपवाद होता.

तिसरे म्हणजे, तीन नवीन राज्ये (२००० मध्ये निर्माण झाली) निर्माण होण्यासाठी चळवळ झाली – मध्य प्रदेशातून छत्तीसगड, बिहारमधून झारखंड आणि उत्तर प्रदेशातून उत्तरांचल – या चळवळी दीर्घकाळ चाललेल्या होत्या पण १९९० च्या दशकात त्या जोमात होत्या. आणि आपण बघितलेले सर्वात अलीकडील म्हणजे आंध्र प्रदेशचे विभाजन, ज्यातून स्वतंत्र तेलंगणा निर्माण झाला. हा लढा १९५० च्या दशकात सुरू झाला होता.

**प्रादेशिक विषमता अजूनही का कायम आहे? :**

**आर्थिक वाढीचा कमी दर :** भारताच्या आर्थिक विकासात स्वातंत्र्यानंतर चढ–उतार होत आहेत. परंतु लोकसंख्येच्या उच्च वाढीच्या संदर्भात, आर्थिक वाढ पूर्ण गतीने विकासाला पकडण्यासाठी पुरेशी नाही. गेल्या दशकात, आर्थिक वाढ प्रगतीशील होती, परंतु आता ती जागतिक आर्थिक संकट आणि देशांतर्गत स्तरावरील इतर अडथळ्यांच्या प्रभावाखाली आहे.

**राज्यांचे सामाजिक–आर्थिक आणि राजकीय संघटन :** राज्ये पुरेशा भू–सुधारणा करू शकली नाहीत आणि सरंजामशाही मानसिकता अजूनही कायम आहे. स्वातंत्र्यानंतर भूदान आणि ग्रामदान चळवळी उत्साहाने पार पाडल्या गेल्या नाहीत आणि जमिनी बँकांखालील जमिनीचेही कार्यक्षमतेने वाटप झाले नाही. मागासलेल्या राज्यांतील राजकीय घडामोडी केवळ मतपेटीचे राजकारण आणि घोटाळे यांच्यापुरत्या मर्यादित होत्या.

**मागासलेल्या राज्यांमध्ये पायाभूत सुविधांची खालची पातळी :** वीज वितरण, सिंचन सुविधा, रस्ते, कृषी उत्पादनांसाठी आधुनिक बाजारपेठा यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा स्तर मागासलेल्या टप्प्यावर आहे. हे सर्व राज्य सूचीचे विषय आहेत.

**शिक्षण, आरोग्य आणि स्वच्छता यावर राज्यांद्वारे सामाजिक खर्चाची निम्न पातळी :** हे विषय मानव संसाधन विकासासाठी महत्त्वाचे आहेत. ज्या राज्यांनी या विषयांवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे, ती विकसित आणि प्रगत राज्यांतर्गत येतात, उदाहरणार्थ तामिळनाडू, जिथे प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवा इतर राज्यांसाठी मार्गदर्शक (बेंचमार्क) आहे.

**राजकीय आणि प्रशासनातील अपयश :** हा तणावाचे स्रोत असतो आणि स्वतंत्र राज्यांसाठी उपप्रादेशिक हालचालींना जन्म देतो. झारखंड, छत्तीसगड, उत्तराखंड आणि अलीकडे तेलंगणा हे या अपयशाचेच परिणाम आहेत. विदर्भ, सौराष्ट्र, दार्जिलिंग आणि बोडोलँड इत्यादीसारख्या अनेक मागण्या समोर आजही उभ्या आहेत. या अपयशांमुळे खाजगी कंपन्यांचा आत्मविश्वास देखील कमी होतो आणि राज्यांकडे गुंतवणूकदार आकर्षित होत नाहीत.

'भूमिपुत्र सिद्धांत' प्रादेशिकतेचा एक प्रकार स्पष्ट करतो. हा सिद्धांत १९५० पासून चर्चेत आहे. त्यानुसार, राज्य हे विशेषत: मुख्य भाषिक समूहाचे असते ज्यामध्ये हे समूह व लोक राहतात. किंवा राज्य हे केवळ ठराविक मुख्य भाषिक समूहांची जन्मभूमी असते. हे लोक भूमिपुत्र किंवा स्थानिक रहिवासी असतात.

**प्रादेशिकतेच्या समस्येचे निराकरण करणाऱ्या रणनीती :**

- जर कोणत्याही राज्याला/प्रदेशाला असे वाटले असते की त्यांना सांस्कृतिकदृष्ट्या वर्चस्व किंवा भेदभावाचा सामना करावा लागत आहे, तर भारतामध्ये प्रादेशिकता वाढू शकली असती. प्रादेशिक आर्थिक विषमता हा राष्ट्रीय एकता आणि राजकीय स्थिरतेपुढे मोठे आव्हान उभे करणारा शक्तिशाली टाईम बॉम्ब आहे. परंतु, समतोल प्रादेशिक विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या आणि राज्यांच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या सरकारी पावलांमुळे या संभाव्य कारणाने प्रादेशिकतेचे स्वरूप घेतले नाही. त्यापैकी काही पावले अशी आहेत – औद्योगिक धोरण, १९५६, राष्ट्रीय एकात्मता परिषद, १९६१. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार आर्थिक संसाधनांचे गरीब राज्यांना हस्तांतरण इ.

- नियोजन आयोग आणि पंचवार्षिक योजनांद्वारे नियोजन हे महत्त्वाचे साधन बनले. परंतु नवीन सरकार संबंधित राज्यांना नियोजन शक्ती हस्तांतरित करण्याची योजना आखत आहे, जेणेकरून ते त्यांच्या संबंधित गरजा आणि आवश्यकतांनुसार प्रत्यक्ष त्यावेळचा दृष्टिकोन ठेवून नियोजन करू शकतील.

- केंद्र सरकारने मागासलेपणाच्या आधारावर राज्यांचे वर्गीकरण केले आहे आणि त्यानुसार अनुदान आणि कर्जे दिली जातात. कोणत्या राज्याला केंद्र सरकारकडून विशेष मदतीची आवश्यकता आहे, हे ठरविण्यासाठी सप्टेंबर २०१३ मध्ये रघुराम राजन यांनी मागासलेपणाच्या नवीन निर्देशांक सूचीची शिफारस केली. ही सूची १० समान भारित निर्देशकांनी बनलेली आहे. त्यानुसार ओडिशा आणि बिहार ही सर्वात मागासलेली राज्ये आहेत.

- केंद्र सरकार पुरस्कृत योजनांद्वारे केंद्र सरकारद्वारे केल्या जाणाऱ्या नियमित सार्वजनिक गुंतवणुकीने आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासावर आणि दारिद्र्य निर्मूलन, एकात्मिक ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य, कुटुंब नियोजन इत्यादींवर लक्ष केंद्रित केले आहे. उदाहरणार्थ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मध्यान्ह भोजन, मनरेगा इ.

- केंद्र आणि राज्यांमधील सरकार खाजगी क्षेत्राला अनुदान, कर आकारणी इत्यादीद्वारे मागासलेल्या राज्यांमध्ये विकास करण्यासाठी प्रोत्साहन देते. बँकांचे राष्ट्रीयीकरण, नवीन बँकिंग परवाने देणे, बँकांना ग्रामीण शाखा उघडणे अनिवार्य करणे ही सर्वसमावेशक विकास आणि संतुलित प्रादेशिक विकासासाठी काही इतर पावले आहेत.

- या योजनांच्या अंमलबजावणीत काही विसंगती आहेत. सिंचनासारखे क्षेत्र दुर्लक्षित राहिले आहे, ज्यामुळे कृषी विषमता निर्माण झाली आहे. पावसावर आधारित आणि कोरडवाहू शेतीकडेही दुर्लक्ष केले गेले आहे, जे विविध राज्यांतील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण बनले आहे. (पी. साईनाथ यांचे वार्तांकन आपल्याला अशा मुद्द्यांवर अधिक अंतर्दृष्टी देते.) प्रत्यक्षात, आंतरराज्यीय औद्योगिक विषमता, कृषी विषमता, दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या कमी होत आहेत. परंतु, विषमता पूर्णपणे नष्ट करण्यासाठी आणखी कृती आवश्यक आहेत.

**भारतातील प्रादेशिकतेचा परिणाम :**

**सकारात्मक :**

- विद्वानांना असे वाटते की, जर देशाच्या राजकीय व्यवस्थेने प्रदेशांच्या मागण्या पूर्ण केल्या असतील तर, राष्ट्राच्या उभारणीत प्रादेशिकता महत्त्वाची भूमिका बजावते.

- राज्यत्व किंवा राज्य स्वायत्ततेच्या दृष्टीने प्रादेशिक मान्यता त्या त्या विशिष्ट प्रदेशातील लोकांना आत्मनिर्णयाचे स्वातंत्र्य देते आणि त्यांना सशक्त आणि आनंदी वाटते. समुदायाचे अंतर्गत स्वयंनिर्णय – मग ते भाषिक, आदिवासी, धार्मिक, प्रादेशिक किंवा त्यांचे संयोजन असो – भारतातील प्रादेशिकतेने ऐतिहासिकदृष्ट्या तसेच सध्याच्या काळातही स्वतःला व्यक्त करण्याचा प्रयत्न या स्वरूपाद्वारेच प्रामुख्याने केला आहे.

- भारतातील प्रादेशिक अस्मिता नेहमीच स्वत: ला राष्ट्रीय अस्मितेच्या विरोधात परिभाषित करत नाहीत वा त्या राष्ट्रीय अस्मितेशी मारक ठरत नाहीत. या संदर्भात भारताची लोकशाही आताशा अधिक लोकाभिमुख होत गेलेली आहे. त्यामुळे लोकांना स्थानिक आणि प्रादेशिक प्रशासन संस्थांच्या कारभाराविषयी महत्त्व वाटू लागते. उदाहरणार्थ– त्रिपुरा आदिवासी स्वायत्त जिल्हा परिषद (टीटीएडीसी) ही १९८५ मध्ये स्थापन करण्यात आली. या परिषदेने राज्यात एरवी धोक्यात असलेल्या आदिवासी अस्मितेचे संरक्षण करण्यासाठी पूर्वाश्रमीच्या फुटीरतावाद्यांना राज्यकारभाराचा भाग बनण्यासाठी लोकशाही व्यासपीठ उपलब्ध करून दिले आणि त्याद्वारे राज्यातील राजकीय अतिरेकास लक्षणीयरीत्या कमी करण्यात यश आले.

- अशा राजकीय रचनेमध्ये नेहमीच संतुलित प्रादेशिक विकासाला वाव असतो. सामाजिक–सांस्कृतिक विविधतेला योग्य आदर दिला जातो आणि यामुळे प्रादेशिक लोकांना त्यांची स्वतःची संस्कृती देखील आचरणात आणण्यास मदत होते.

**नकारात्मक :**

- प्रादेशिकतेला अनेकदा राष्ट्राच्या विकास, प्रगती आणि एकात्मतेसाठी गंभीर धोका म्हणून पाहिले जाते. देशाच्या मुख्य प्रवाहातील राजकीय–प्रशासकीय रचनेच्या विरोधात प्रादेशिकतेच्या भावनांचा प्रचार करणाऱ्या बंडखोर गटांद्वारे अंतर्गत सुरक्षेसाठी प्रदेशकतेमुळे अनेकदा आव्हान निर्माण होते.

- प्रादेशिकता निश्चितपणे राजकारणावर परिणाम करते, कारण सध्या युतीचे दिवस सुरू आहेत. प्रादेशिक मागण्या राष्ट्रीय मागण्या बनतात, प्रादेशिक मागण्या पूर्ण करण्यासाठी धोरणे आखली जातात आणि सामान्यत: ती देशाच्या सर्व भागांत विस्तारली जातात. त्यामुळे राष्ट्रीय धोरणांवर आता प्रादेशिक मागण्यांचे वर्चस्व आणि प्रभाव आहे. उदा. उसाला दिलेला किमान हमीभाव हा महाराष्ट्रातील शेतकर्यांसाठी उपयुक्त होता, परंतु तो सर्व राज्यांमध्ये लागू करण्यात आला, परिणामी उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरियाणातील शेतकर्यांची आंदोलने झाली. दरम्यान, यामुळे मंत्र्यांमध्ये पक्षांतराचे बीज पेरले गेले आणि संबंधित मंत्र्यांना लक्ष्य केले गेले.

- काही प्रादेशिक नेते भाषा, संस्कृतीच्या आधारे मतपेटीचे राजकारण करतात, हे नक्कीच निरोगी लोकशाही प्रक्रियेच्या विरोधात आहे. यामुळे नेहमी वेगळ्या राज्याची मागणी होते आणि असे दिसून आले आहे की, लहान राज्ये निर्माण केल्यानंतर केवळ काही राजकीय नेते कार्यक्षम सरकार चालवू शकतात अन्यथा आघाडी सरकार चालवते ज्यामुळे प्रशासन यंत्रणा अप्रभावी बनते.

- ज्या प्रदेशात जास्त राजकीय वजन असलेले नेते आहेत, अशांसाठी विकासात्मक योजना असमानपणे अंमलात आणल्या जातात. यामुळे या नेत्यांचा व प्रदेशांचा फायदा होतो, मात्र त्यामुळे उर्वरित प्रदेशांमध्ये अशांतता निर्माण होते. कायदा व सुव्यवस्था बिघडते, प्रचंड हिंसाचारासह आंदोलने होतात. शेवटी सरकारला कठोर पावले उचलावी लागतात; त्यामुळे सरकारी अधिकाऱ्यांबद्दल चुकीचे संकेत दिले जातात.

- प्रादेशिकता ही आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीमध्ये देखील अडथळा बनते. जसे की २०१३ मध्ये श्रीलंकेतील राष्ट्रकुल प्रमुखांच्या बैठकीत (उकजत्रङ्घ्) उपस्थित असताना तामिळनाडूचे प्रादेशिक पक्ष भारताच्या पंतप्रधानांच्या विरोधात कसे होते, हे आपण पाहिले. या कृतींचा थेट परिणाम भारताच्या श्रीलंका किंवा त्या मंचातील इतर देशांशी असलेल्या संबंधांवर होतो.. किंवा दुसऱ्या उदाहरणात – केंद्र सरकारमधील नेते तयार असतानाही ममता बॅनर्जी यांनी भू–सीमा करार आणि तिस्ता नदीच्या पाणी वाटपासाठी सहमत नसण्याची घटना बघता येईल.

- प्रादेशिकता प्रेरित हिंसेमुळे संपूर्ण समाज अस्वस्थ होतो, लोक मारले जातात, विद्यार्थी शाळा–महाविद्यालयांमध्ये जाऊ शकत नाहीत,

पर्यटनाला चालना देता येत नाही, इ. याचा मानव संसाधनाच्या विकासावर परिणाम होतो, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारला अतिरिक्त सैन्य तैनात करणे आवश्यक ठरते. देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा थेट परिणाम होतो. यामुळे प्रभावित समाज मुख्य प्रवाहाच्या विकासापासून अलिप्त राहतात आणि नंतर प्रादेशिक फरक आणि मागासलेपण स्पष्टपणे दिसून येते.

- व्यापक स्तरावर पाहिल्यास, यामुळे जागतिक पातळीवर भारताच्या प्रतिमेस हानी पोहोचते आणि जागतिक महासत्ता किंवा जागतिक नेता बनण्यात भारतास अडथळा निर्माण होतो.

**सूचना :**

**प्रादेशिकता दूर करण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी खालील सूचना दिल्या जाऊ शकतात. :**

**प्रादेशिक असमतोल दूर करणे :** प्रादेशिक असमतोल हे विशिष्ट प्रदेशातील रहिवाशांमध्ये प्रादेशिकतेबद्दलच्या असंतोषाचे मुख्य कारण असल्याचे अनुभवास आले आहे. राष्ट्रीय संसाधनांचे समतोल पद्धतीने वाटप झाल्यास प्रादेशिकतेची समस्या कमी होईल.

**प्रादेशिक पक्षांचे उच्चाटन :** प्रादेशिक पक्ष लोकांच्या प्रादेशिक भावनांचा गैरवापर करण्याचे घाणेरडे राजकारण करतात. यामुळे प्रादेशिकतेचा पाया मजबूत होतो. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण करणाऱ्या सर्व प्रादेशिक पक्षांवर बंदी घालण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**वंचित क्षेत्रांच्या आर्थिक विकासाला सर्वोच्च प्राधान्य :** देशाच्या विविध क्षेत्रांच्या असमान विकासामुळे, राजकीय समस्या निर्माण झाल्या आहेत (आंध्र प्रदेशातील तेलंगणा आणि महाराष्ट्रातील विदर्भाप्रमाणे) आणि विविध प्रदेशांमधील वैर वाढले आहे. त्यामुळे ज्या भागांमध्ये लोकांमध्ये सापेक्ष वंचिततेची (उपेक्षेची) भावना निर्माण झाली आहे, त्या भागांच्या आर्थिक विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिल्यास, परिस्थिती सुधारेल आणि त्यांना राष्ट्रीय मुख्य प्रवाहात आणता येईल.

**समाजाची पुनर्रचना :** राष्ट्रीय किंवा प्रादेशिक पातळीवर विकसनशील समाजांची सामाजिक रचना मूलत: विकासविरोधी असते. भारतही त्याला अपवाद नाही.  या समाजातील आर्थिक आणि सामाजिक उपक्रमांमध्ये वाढलेल्या गुंतवणुकीचा फायदा बहुतेकदा अशा लोकांना होतो ज्यांना त्यांची सर्वात कमी गरज असते आणि बहुसंख्य वंचित वर्ग असतो. पण उपरोध असा की, लाभार्थी हे प्रादेशिकतेची सबब पुढे करून वंचित जनतेला राष्ट्राविरुद्ध उभे करतात. त्यामुळे आपल्या समाजरचनेची पुनर्रचना होणे गरजेचे आहे.


**संवर्धन :** लोकांचे प्रादेशिक गट देखील त्यांचे सांस्कृतिक वेगळेपण राखतात. यामुळे भिन्न भिन्न प्रादेशिक आणि सांस्कृतिक गटांमधील श्रेष्ठत्वाच्या मुद्यावरून परस्परसंवाद मर्यादित होतो. प्रादेशिक अडथळे दूर करण्यासाठी आणि राष्ट्रीय भावना विकसित करण्यासाठी वारंवार सांस्कृतिक संपर्कांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

**वाहतूक आणि दळणवळणाची विकसित साधने :** देशातील बहुतांश मागास प्रदेश वाहतूक आणि दळणवळण व्यवस्थेद्वारे देशाच्या इतर भागांशी योग्य प्रकारे जोडले गेलेले नाहीत. या कारणास्तव त्यांचा इतर प्रादेशिक गटांशी संवाद आणि संपर्क मर्यादित होतो आणि त्यांच्यात परकेपणाची भावना निर्माण होते. त्यामुळे आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी मागासलेल्या भागात वाहतूक व दळणवळण व्यवस्था विकसित केली पाहिजे.

**योग्य शिक्षण :** अलिप्ततावादी प्रवृत्ती दूर करण्यासाठी आणि देशातील लोकांमध्ये राष्ट्रीय भावना वाढवण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत शक्तिशाली घटक म्हणून समजले जाऊ शकते.

**प्रसारमाध्यमांद्वारे आवाहन :** आज प्रसारमाध्यमे हे परिवर्तनाचे अत्यंत शक्तिशाली घटक बनले आहेत. 'मेरा भारत महान' सारख्या विविध कार्यक्रमांद्वारे प्रत्येक क्षेत्राच्या विकासासाठी समान संधीची संकल्पना आणि राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना ठळकपणे मांडणारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन्ही प्रकारचे आवाहन केले गेले, तर लोक प्रादेशिक सीमा ओलांडून राष्ट्रीय विकासासाठी पुढे येण्यास प्रवृत्त होतील.

**भारतातील राज्यांची मागणी :**




**छोटी राज्ये विरुद्ध मोठी राज्ये वाद :**

लहान राज्यांपेक्षा मोठी राज्ये चांगली आहेत का?... हा कधीही न संपणारा वाद आहे, जो तेलंगण समर्थक चळवळीदरम्यान आणि २९ व्या राज्याच्या निर्मितीनंतर केंद्रस्थानी होता. ही एक लोकप्रिय धारणा आहे की लहान राज्यांमध्ये विकासाच्या चांगल्या संधी असतात. एक दशकाहून अधिक काळापूर्वी भारताने दीर्घकालीन मागण्या आणि निषेधांनंतर छत्तीसगड, झारखंड आणि उत्तराखंड या तीन नवीन राज्यांची निर्मिती केली. पण लहान आकार हा खरोखरीच विकासाची आवश्यक हमी देतो का?

**लहान राज्ये :**

**फायदे :**

- स्थानिक समस्यांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय अधिक नजीक अंतरावर घेतले जातील. उदा: छत्तीसगड, आंध्रप्रदेश, विदर्भ इ. मधील अन्नटंचाई आणि शेतकरी आत्महत्यांवर उपायांचा विचार दिल्ली, हैदराबाद किंवा मुंबईमध्ये बसून केला जाऊ शकत नाही. सरकार जितके घराजवळ राहील, तितके प्रादेशिक समस्यांचे व्यवस्थापन करणे सोपे होईल.
- जेव्हा लोकसंख्या आणि प्रशासकीय क्षेत्र आटोपशीर प्रमाणात असते, तेव्हा सरकारी आणि नोकरशाहीचे कामकाज एकाग्रतेने व्यवस्थितपणे व्यवस्थापित केले जाऊ शकते.
- लहान राज्ये सर्वसामान्य लोकांचे सक्षमीकरण दर्शवतात.
- जनसांख्यिकी आणि मानसशास्त्रातील काही संबंधित तज्ज्ञ मानतात की भारतात, अनेक मोठ्या राज्यांचे पुनर्विभाजन आवश्यक आहे –

उत्तर प्रदेशचे चार राज्यांमध्ये विभाजन केले जाऊ शकते, आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटक आणि जम्मू आणि काश्मीर तीन राज्यांमध्ये (खोरे, जम्मू आणि  लडाख), आणि गुजरात, तामिळनाडू आणि केरळ प्रत्येकी दोन.

- विशेषत: दुर्लक्षित क्षेत्राकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे, मागासलेल्या प्रदेशांचा विकास करण्यावर अधिक चांगले लक्ष केंद्रित करणे, नवीन विधानसभा आणि केंद्राकडून आर्थिक मदत नवीन/लहान राज्यांसाठी फायदेशीर ठरते.
- नवीन राज्यांना सामान्यतः राज्यासाठी स्वतंत्र संस्था मिळतात – राज्य निवडणूक आयोग, मानवाधिकार/महिला/अनुसूचित जाती/जमाती/बाल आयोग, लोकसेवा आयोग, UPSC अंतर्गत I-S/IPS/IFS साठी स्वतंत्र संवर्ग आणि उच्च न्यायालय – जे राज्यासाठी फायदेशीर ठरेल.
- अल्पसंख्याकांसाठी अधिक चांगले प्रतिनिधित्व – जात, धर्म, जमाती इ. संदर्भात
- आजवर दुर्लक्षित क्षेत्रे आणि तेथील लोकांसाठी उत्तम प्रशासन आणि चांगल्या विकासासाठी संधी
- कर आणि इतर संसाधनांचे पुनर्वितरण हे सुनिश्चित करते की, काही मोजक्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी संपूर्ण राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी पैसा आणि संसाधने वापरली जात आहेत.

**तोटे :**

- भारत ही प्रामुख्याने कृषीप्रधान अर्थव्यवस्था असल्याने, विभाजनानंतर लगेचच छोट्या राज्यांना फायदा होईल याची शाश्वती नाही. बहुतांश राज्ये मोठ्या प्रमाणावर शेतीवर अवलंबून आहेत आणि त्यामुळे त्यांचे भवितव्य मान्सूनने ठरवले आहे.
- विविध संस्थांची स्थापना (वर उल्लेख केलेली), सरकारी कार्यालये आणि निवासस्थाने, विद्यापीठे आणि संशोधन संस्था, स्टेडियम, दुर्गम ठिकाणी रुग्णालये इत्यादी मूलभूत सुविधांसाठी मोठ्या रकमेची आवश्यकता आहे. एक नवीन राज्य नेहमीच निधीसाठी युनियनवर (केंद्रावर) अवलंबून असते – जे सहज उपलब्ध असू शकते किंवा नसूही शकते.
- संसाधन वितरण आणि व्यवस्थापनाच्या दृष्टीने नदीचे पाणी वितरण आणि इतर नवीन समस्या उद्भवू शकतात आणि दोन राज्यांमधील वादाचा मुख्य मुद्दा बनू शकतात.
- नैसर्गिक संसाधनांचे वितरण आणि नियंत्रण हे विभाजनानंतर सोपे नसते. काही प्रदेशांची भरभराट होऊ शकते, तर काही संसाधनांपासून वंचित राहतात आणि हे वंचित राहणारे प्रदेश सौदेबाजीत आपले हक्क गमावू शकतात.
- नवीन राजकीय पक्ष पुढे येतात ज्यामुळे अधिक वाद निर्माण होतात आणि प्रादेशिक आधारावर लोकांमध्ये आणखी फूट पडते आणि 'स्थिर केंद्रीकृत सत्ता' हे एक दूरचे स्वप्नच राहण्याची स्थिती निर्माण होऊ शकते कारण युती हीच तेथील लोकांचे भागधेय ठरते.
- एका राज्याच्या मागण्या मान्य झाल्यास, ते इतर राज्यांना त्यांचे अनुसरण करण्यास प्रोत्साहित करेल.

**मोठी राज्ये :**

**फायदे :**

- जरी एखाद्या राज्याची कामगिरी त्याच्या आकारमानावरुन फारशी निश्चित केली जात नसली, तरी आकाराने फरक नक्कीच पडतो – विशेषत: जेव्हा उपलब्ध नैसर्गिक संसाधने आणि मनुष्यबळाच्या वापराचा विचार केला जातो, तेव्हा राज्य जितके मोठे असेल तितके सर्वांगीण प्रगतीसाठी चांगले असते.
- 'एकी हेच बळ, विभाजनाने पराभव' हे नेहमीच खरे असेल किंवा नसेल पण जेव्हा राज्याची बहुसंख्य लोकसंख्या एकत्र उभी राहते आणि काहीतरी मागणी करते, तेव्हा सरकारला उठून बसणे आणि त्यांच्या आवाजाची आणि मतांची दखल घेणे/ऐकणे भाग पडते.
- एखाद्या राज्याच्या सरकारची राजकीय इच्छाशक्ती आणि अभिमुखता त्याच्या लोकांचा विकास निर्धारित करते आणि काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये केंद्रित असणारा राजकीय अजेंडा कधीकधी मोठ्या राज्यांमध्ये लोकांना एकत्र आणण्यास मदत करू शकतात.

- अर्थव्यवस्थेचे प्रमाण आणि विकास दराच्या दृष्टीने, मोठी राज्ये लहान राज्यांपेक्षा चांगली कामगिरी करतात.

**तोटे :**

- मोठ्या आणि विविधतेने भरलेल्या राज्यांचे प्रशासन करणे अधिक क्लिष्ट आहे आणि यामुळे हे सरकार आणि नोकरशाहीच्या अकार्यक्षमतेला कारणीभूत ठरते.
- भारतातील बहुसंख्य राज्ये ही एवढी मोठी आहेत की, विविध बाबींमधील गुंतागुंत आणि हितसंबंधांमुळे उद्भवणारे संघर्ष ह्या गोष्टी घडण्यावाचुन गत्यंतर राहत नाहीत.
- विविधता केवळ भाषेबद्दलच नाही तर अर्थव्यवस्था आणि संस्कृतीबद्दल देखील आहे. एखाद्या राज्यातील विशिष्ट प्रदेशांच्या आर्थिक संस्कृतीमुळे अशी पोकळी निर्माण होते, जी प्रत्यक्षात भरून काढता येत नाही. उदा : किनारपट्टी असणारा आंध्र विरुद्ध तेलंगणा; विदर्भ विरुद्ध मराठवाडा विरुद्ध मुंबई (या प्रत्येकाच्याच बाबतीत विविधता, लोकसंख्या आणि व्यावसायिक भरभराटीमुळे एक स्वतंत्र कथा आहे, असे म्हणता येते.)
- राजकारण्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी निर्माण केलेल्या विसंगत आणि तरीही प्रभावी अशा सत्तास्थानांमुळे मोठ्या राज्यांमध्ये संसाधनांचे वाटप सोपे नाही.
- 'सत्ताकेंद्र' (सामान्यत: राजधानीचे शहर) आणि राज्यातील एका प्रदेशातील लोक आणि दुसर्या प्रदेशातून आलेले शक्तिशाली/श्रीमंत राजकारणी यांच्यात भौतिक अंतर असणे, कुठलाही संबंध/संपर्क नसणे, याचा सार्वजनिक भावनेवर प्रभाव पडतो आणि त्यातून राज्याचे विभाजन होते.

भारतातील प्रत्येक प्रदेशाचा विकास, स्थानिक सरकारांना अधिकार देऊन आणि निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग घेऊन त्यांना सक्षम बनवणे ही काळाची गरज आहे. राज्य पातळीवरील सरकारांनी ऊर्जेचे पर्यायी स्त्रोत, स्थानिक लोकांसाठी रोजगाराचे स्त्रोत, प्रशासन, नियोजन आणि कृषी विकासासाठी तंत्रज्ञानाचा वापर शोधणे आवश्यक आहे. १२व्या पंचवार्षिक उद्दिष्टांप्रमाणे वेगवान, शाश्वत आणि अधिक समावेशक वाढ ही समतोल प्रादेशिक वाढीसाठी उपयुक्त ठरेल.

***

# धर्मनिरपेक्षता

**विषयाची ओळख :**

धर्मनिरपेक्षता हे एक तत्व आहे, जे धर्माला राजकारणापासून वेगळे करते. या ठिकाणी 'वेगळे करणे' ही संज्ञा फार महत्त्वाची आहे. वरकरणी पाहता हे एक साधे, फार गुंतागुंतीचे नसणारे तत्त्व भासते. पण, अधिक जवळून बघितल्यास लक्षात येईल की ते तसे नाही. वेगळे किंवा विभक्त, या संज्ञेचे अनेक अर्थ असू शकतात आणि कुठच्यातरी एकाच अर्थाने गोष्टींकडे पाहात राहिल्यास त्याने अर्थाचा अनर्थ देखील होऊ शकतो. विविध समाजांमध्ये याचे विविध अर्थ असू शकतात. भारताच्या संदर्भात असणाऱ्या अडचणी अधिक वेगळ्या आहेत.

धर्मनिरपेक्षता ही सर्व नागरिकांना त्यांच्या धार्मिक श्रद्धा बाळगण्याचे आणि आचरण करू देण्याचे स्वातंत्र्य सुनिश्चित करते. त्याचे रक्षण करते. धर्मनिरपेक्षतावाद्यांना विचार स्वातंत्र्य मान्य असते. विचार स्वातंत्र्य हे सर्वांना समान लागू असावे, असे त्यांना वाटते. धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा त्यांचा विचार नसतो. धर्म आणि इतर श्रद्धांचे पूर्ण स्वातंत्र्य धर्मनिरपेक्षता मान्य करते. त्याबाजूने ठामपणे उभी राहते. धार्मिक श्रद्धा अंगिकारण्याचे अधिकार संरक्षित करते आणि इतरांच्या अधिकारांत वा स्वातंत्र्यात हस्तक्षेपही करत नाही. व्यक्तीचा धर्मस्वातंत्र्याचा अधिकार आणि धर्मापासून मुक्त असण्याचा अधिकार, अशा दोहोंचा समतोल देखील धर्मनिरपेक्षतेत अंतर्भूत असतो.

धर्मनिरपेक्ष लोकशाहीत कायदा आणि संसदेसमोर सर्व नागरिक समान असतात. कुठल्याही धार्मिक वा राजकीय संलग्नतेचे फायदे किंवा तोटे येथे गृहीत धरले जात नाहीत. किंबहुना सर्वप्रकारच्या धार्मिक श्रद्धा मानणारे हे इतर कुणाही इतकेच सामान अधिकार आणि कर्तव्य असणारे नागरिक आहेत, असे हे तत्व मानते. एखाद्या धर्माला मानणाऱ्यांना असणाऱ्या अधिकारांच्या इतकेच अधिकार हे कुठल्याही धर्माला न मानणाऱ्यांना देखील असतात, हे समानता कायदे सुनिश्चित करतात.

निरीश्वरतावाद अर्थात नास्तिकता म्हणजे ईश्वरावर विश्वास नसणे. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना लोकशाही मार्गाने जाणाऱ्या समाजासाठी जगण्याची एक चौकट उपलब्ध करून देते. निरीश्वरतावाद्यांना धर्मनिरपेक्षतेचे समर्थन करण्यात स्वारस्य असणे साहजिकच आहे, परंतु धर्मनिरपेक्षता स्वतः मात्र कोणत्याही विशिष्ट धर्माच्या तत्त्वांना वा विश्वासांना आव्हान देऊ इच्छित नाही. किंबहुना कुणावरही नास्तिकता लादण्याचा प्रयत्नही धर्मनिरपेक्षता करत नाही. संपूर्ण समाजात राजकारण, शिक्षण, कायदा आणि इतरत्र समानता प्रस्थापित राहावी, याची खातरजमा करणारी जगण्याची एक चौकट म्हणजे धर्मनिरपेक्षता होय. ही धर्म मानणारे आणि न मानणारे या दोहोंनाही सामान लागू होते.

धार्मिक लोकांना त्यांच्या श्रद्धा सार्वजनिकरित्या व्यक्त करण्याचा अधिकार आहे, तसाच अधिकार त्या श्रद्धांना प्रश्न विचारणाऱ्यांना वा विरोध कारण्यांनाही आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारापासून धार्मिक श्रद्धा, कल्पना आणि धार्मिक संघटनांना कुठलेही विशेष संरक्षण असता कामा नये. लोकशाहीमध्ये सर्व कल्पना आणि श्रद्धा हे चर्चेसाठी खुले असले पाहिजेत. लोकशाहीमध्ये व्यक्तींना अधिकार बहाल केले आहेत, कल्पनांना नव्हे!

**धर्मनिरपेक्षतेची व्याख्या :**

याचा अर्थ धर्माला जीवनाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलूंपासून वेगळे करणे होय. धर्म ही पूर्णपणे वैयक्तिक बाब आहे.

धार्मिक संस्थांना राज्य संस्थांपासून आणि सार्वजनिक क्षेत्रापासून वेगळे करणे, जेथे धर्म सहभागी होऊ शकतो, परंतु धर्माचे वर्चस्व नसेल.

स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार इतरांना त्रास न होऊ देता स्वतःच्या श्रद्धांचा अंगीकार करणे, किंवा त्या श्रद्धा बदलणे किंवा कुठल्याही श्रद्धा नसणे. नासाने आचरणात आणण्याचे किंवा ते बदलण्याचे किंवा न ठेवण्याचे स्वातंत्र्य

अशी समानता, ज्यात आपल्या धार्मिक श्रद्धा किंवा त्यांच्या अभावामुळे आपल्यापैकी कोणालाही अधिकचा फायदा किंवा नुकसान होणार नाही.

**धर्मनिरपेक्षतेचा पाश्चात्य संदर्भ :**

- धर्मनिरपेक्षतेच्या पाश्चात्य मॉडेलनुसार, राज्य आणि धर्म यांचे स्वतःचे स्वतंत्र असे स्थान असते, क्षेत्र असते आणि एकमेकांच्या कुठच्याही व्यवहारांत राज्य किंवा धर्म हस्तक्षेप करणार नाही
- अशाप्रकारे, धर्मनिरपेक्षतेच्या पाश्चात्य संकल्पनेनुसार राज्य आणि धर्म यांचे परस्परांपासून पूर्णतः वेगळे असणे गरजेचे आहे.
- पाश्चिमात्य मॉडेलनुसार, धार्मिक समुदायांद्वारे चालवल्या जाणार्या शैक्षणिक संस्थांना राज्य कोणतेही आर्थिक सहाय्य देऊ शकत नाही.

- पाश्चिमात्य नुसार, जोपर्यंत धर्म कायद्याच्या मर्यादेत कार्य करत आहे, तोपर्यंत राज्य धर्माच्या बाबतीत कुठलाही हस्तक्षेप करत नाही.
- धर्मनिरपेक्षतेच्या पाश्चिमात्य संकल्पनेत, धर्म ही पूर्णपणे खाजगी स्वरूपात अंगिकारण्याची बाब मानण्यात आली आहे आणि धर्मास सार्वजनिक जीवनात व सार्वजनिक व्यवहारांत कोणतेही स्थान नाही.
- पाश्चिमात्य मॉडेल धर्माच्या आधारावर कोणत्याही सार्वजनिक धोरणाचा मसुदा तयार करण्यास प्रतिबंधित करते. त्यामुळे, राज्य हे त्याच्या नागरिकांच्या धार्मिक कार्य आणि प्रथांपासून पूर्णपणे दूर असते.

**भारतातील धर्मनिरपेक्षता :**

**धर्मनिरपेक्षतेचे भारतीय मॉडेल :**

- यात केवळ व्यक्तींना त्यांच्या धार्मिक श्रद्धांचा अंगीकार करण्याचाच अधिकार नसून, विविध धार्मिक समुदायांनाही त्यांच्या शैक्षणिक संस्था स्थापनेचा आणि चालविण्याचा अधिकार आहे.
- सामुदायिक विशिष्ट अधिकारांची स्वीकृती आपल्याला भारतीय धर्मनिरपेक्षतेच्या तिसर्या महत्त्वाच्या वैशिष्ट्याकडे नेते. भारतीय सेक्युलॅरिझमचा जन्म एका सखोल बहुधार्मिक समाजात झाला असल्यामुळे, त्याचा आंतर-धार्मिक (विविध धर्मांतील) वर्चस्वाशी तितकाच संबंध आहे, जितका की एकाच धर्मातील (धर्मांतर्गत) वर्चस्वाशी आहे.
- ते राज्य आणि धर्म यांच्यात परस्परांना वेगळे करणारी भिंत उभे करत नाही. यामुळे राज्याला धर्माच्या व्यवहारांत हस्तक्षेप करण्याची मुभा मिळते. अर्थात, ही मुभा धर्मास मदत करण्यासाठी असते, त्यास नियंत्रित करण्यासाठी वा नष्ट करण्यासाठी नव्हे!
- हे धर्माच्या सार्वजनिक चारित्र्याच्या पूर्णपणे विरोधात नाही. राज्य हे जरी एखाद्या विशिष्ट धर्मासाठी ओळखले जात नसले, तरी येथे विविध धार्मिक समुदायांना अधिकृत आणि त्यामुळेच सार्वजनिक मान्यता आहे.
- एकापेक्षा अधिक मूल्ये आणि तत्त्वानुसार असणारे अंतर म्हणजे, राज्य हे भिन्न, अस्पष्ट परंतु तितकीच महत्त्वाची मूल्ये यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करते.

भारतीय संदर्भात धर्मनिरपेक्षतेने संपूर्ण इतिहासात आपला मार्ग बदलला आहे आणि ती अद्यापही उत्क्रान्त होत आहे. परस्परविरोधी बदलत जाणाऱ्या सांप्रदायिक समीकरणांच्या अशा परिस्थिमुळे धर्मनिरपेक्षतेस काळजीपूर्वक आणि लवचिकपणे पुढे जाणे गरजेचे ठरते.

भारतात अंगिकारली जाणारी धर्मनिरपेक्षता आणि तिचा पाश्चात्य धर्मनिरपेक्षतेच्या प्रथेपेक्षा असणारा फरक, हा भारतात एक वादग्रस्त विषय आहे. धर्मनिरपेक्षतेच्या भारतीय संकल्पनेचे समर्थक असा दावा करतात की, भारतातील धर्मनिरपेक्षता ही अल्पसंख्याक आणि बहुसंख्याकांचा आदर करते. दुसरीकडे, भारतीय धर्मनिरपेक्षतेचे टीकाकार हे तिला 'छद्म-धर्मनिरपेक्षता' (स्युडो सेक्युलॅरिझम) म्हणून टीका करतात. भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या पाठीराख्यांना असे वाटते की, देशात सामान नागरी कायदा आणण्याचा (ज्यात प्रत्येक नागरिकास, तो कुठल्याही धर्माचा असला तरी, सामान कायदा लागू असणार) कुठल्याही स्वरूपाचा प्रयत्न हा देशात बहुसंख्यांकवादी हिंदू संवेदना आणि आदर्श लादले जाण्यास कारणीभूत ठरेल.

**भारतातील धर्मनिरपेक्षतेची गरज/धर्मनिरपेक्षतेचे महत्त्व :**

धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही या स्वतंत्र भारताच्या दोन उल्लेखनीय कामगिरी आहेत. भारतासारख्या बहुसांस्कृतिक राष्ट्रामध्ये धर्मनिरपेक्षतेला पर्याय नाही, त्यामुळेच भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षता स्वीकारली. विविध भाषा आणि धर्माचे लोक भारतीय संघराज्यात राहतात. त्यांना एकत्र ठेवण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज होती. म्हणून, स्वातंत्र्याच्या अधिकारासह धर्मनिरपेक्षता स्वीकारणे आवश्यक होते. धार्मिक जबाबदाऱ्यांपासून मुक्त राज्य हे प्रत्येक धर्माबद्दल सहिष्णु दृष्टी ठेवू शकते आणि जात, पंथ, धर्म यांच्या पलीकडे जात लोकांचे कल्याण साधण्याचा आदर्श जोपासू शकते.

भारतामध्ये विविधतेत एकता आणण्याचा प्रयत्न होत असला तरी, अल्पसंख्याक समाजावर अन्याय, अत्याचार होत आहेत. अर्थात, धर्मनिरपेक्ष राज्याच्या निर्मितीनंतरही राष्ट्रवादाची भावना निर्माण होऊ शकली नाही. देशातील अल्पसंख्याक गटांत राष्ट्रवादाची जाणीव निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज आहे. अल्पसंख्यांकांमध्ये सामाजिक असहिष्णुतेचि जागरूकता निर्माण होणे, हा राष्ट्रीय एकात्मतेसाठी धोका आहे. देशात

अल्पसंख्याक गटांमध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेची गरज आहे.

धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना भारताने स्वीकारली असली तरी, प्रत्यक्षात धर्माचे राजकारण केले जात आहे. मतदानाच्या राजकारणासाठी धार्मिक संस्थांचा वापर केला जातो. म्हणून, सांप्रदायिकता वाढल्याने धर्मनिरपेक्षतेचे तत्व मागे पडत आहे. सांप्रदायिकता लोकशाहीविरोधी आहे, त्यामुळे धर्मनिरपेक्षतेची संकल्पना ही लोकशाही मूल्यांच्या प्रसारात रुजली पाहिजे. भारतासारख्या बहुलवादी समाजात धर्मावर आधारित राजकारण हे राष्ट्रीय अखंडतेला मारक आहे. त्यामुळे सशक्त लोकशाही निर्माण करण्यासाठी धर्माचा आदर करतानाच धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांचा समाजात आदर केला पाहिजे!

आपण वैश्विक बंधुत्वाच्या ध्येयाच्या दिशेने पुरेशा वेगाने वाटचाल करत आहोत. या वैश्विक बंधुत्वाच्या युगात धर्मशास्त्राच्या संकुचित संकल्पनेला अजिबात स्थान नाही.

**धर्मनिरपेक्षता आणि भारताची राज्यघटना :**

**भारतीय राज्यघटनेने विचारात घेतलेल्या धर्मनिरपेक्षतेमध्ये पुढील ठळक वैशिष्ट्ये आहेत :**

- राज्य स्वत:ची ओळख कोणत्याही धर्माने करणार नाही किंवा त्यावर कुठल्याही धर्माचे नियंत्रण असणार नाही.
- राज्य कोणत्याही धर्माचा स्वीकार व अनुसरण करण्याचा अधिकार प्रत्येकाला देतो.
- धर्माच्या वा श्रद्धेच्या कारणाने कोणत्याही व्यक्तीसोबत राज्याकडून कोणताही भेदभाव केला जाणार नाही.
- कुठल्याही कार्यालयात धार्मिक सहिष्णुतेच्या अंतर्गत प्रवेश करण्याचा प्रत्येक नागरिकास प्राप्त असणारा अधिकार हा धर्मनिरपेक्षतेचे हृदय आणि आत्मा आहे, हे संविधानाद्वारे परिकल्पित करण्यात आले आहे. हे भारतातील नागरिकांमध्ये बंधुत्व निर्माण करण्याच्या परिस्थिती निर्माण करते. यामुळे व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेची खात्री मिळते.

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे उद्दिष्ट हा भारताला सार्वभौम, समाजवादी, लोकशाही प्रजासत्ताक बनविण्याचे आहे. समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे दोन शब्द संविधानाच्या ४२ व्या घटनादुरुस्तीच्या वेळी जोडले गेले. संपूर्ण संविधानाचा सारांश या प्रस्ताविकेत आहे. तो संविधानाच्या आत्म्याचा आरसा आहे. प्रस्ताविकेतील शब्दांची मांडणीही खूप महत्त्वाची आहे. भारतीय समाज हा बहुधार्मिक समाज असून, त्यात विविध जाती आहेत, अनेक धर्म आहे. तसेच, धार्मिक विविधीकरणही आहे. त्यामुळे, कोणत्या ना कोणत्या प्रकारे तरी हे सर्व विभाजक घटक आहेत. ते काळजीपूर्वक हाताळले गेले नाहीत तर, राष्ट्राची एकता आणि अखंडतेला धोका निर्माण होऊ शकतो

**भारतातील धर्मनिरपेक्षतेसमोरील आव्हाने :**

- राजकारणात धर्माचा वाढता हस्तक्षेप हे धर्मनिरपेक्ष राज्यासमोरील एक मोठे आव्हान आहे. निवडणुकीसाठी निवडलेले उमेदवार हे धर्माच्या आधारावर दिले जातात.
- प्रत्येकाला त्याच्या धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचा अधिकार आहे. असे असूनही, धार्मिक अल्पसंख्याकांमधील असुरक्षिततेची भावना अजूनही कमी होताना दिसत नाही. यामुळे धर्मनिरपेक्ष समाज निर्माण करणे कठीण होते. भारतातील वाढता वर्णद्वेष हा धर्मनिरपेक्ष समाजासमोरील प्रमुख आव्हानांपैकी एक आहे.
- धार्मिक कायद्याचा आदर करण्याच्या प्रयत्नामुळे भारतात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, जसे की बहुपत्नीत्वाची स्वीकार्यता, असमान वारसा हक्क, काही पुरुषांना अनुकूल ठरणारे अतिरिक्त न्यायिक एकतर्फी घटस्फोट अधिकार, आणि धार्मिक ग्रंथांचे परस्परविरोधी अन्वयार्थ.
- न्याय्य आर्थिक व्यवस्था विकसित करण्यात आणि गरिबी दूर करण्यात सरकारला आलेले अपयश, यामुळेही धर्मनिरपेक्षतेलाही मोठा धक्का बसला.
- धर्माला राजकारणापासून वेगळे न करणे – भूतकाळातील काही घटना– जसे की, बाबरी मशीद पाडणे, १९८४ मध्ये शीखविरोधी दंगली, डिसेंबरम १९९२ आणि जानेवारी १९९३ मध्ये झालेल्या मुंबईतील दंगली, २००२ मधील गोध्रा दंगल या सर्व घटनांनी हे दाखवून दिले आहे की, समाजात घट्ट झालेली सांप्रदायिकतेची समस्या सातत्याने डोके वर काढत आहे.

- वाढणारा मूलतत्त्ववाद– धार्मिक मूलतत्त्ववाद म्हणजे विशिष्ट धार्मिक विश्वासांबाबत आणि श्रद्धांबाबत असणारे कुठलेही प्रश्न न विचारता केले जाणारे अंधानुकरण होय. हे रूढी–परंपरांमध्ये गुरफटलेल्या, पुराणमतवादी, आणि आधुनिकतावादाच्या आणि बहुविधतेच्या लोकशाही निकषांच्या विरूद्ध एकारलेपणा असणाऱ्या समाजाचे लक्षण ठरते.

**धर्मनिरपेक्षतेची समीक्षा :**

- धर्मनिरपेक्षतेच्या भारतीय संकल्पनेचे समर्थक असा दावा करतात की, भारतातील धर्मनिरपेक्षता ही अल्पसंख्याक आणि बहुसंख्याकांचा आदर करते. दुसरीकडे, भारतीय धर्मनिरपेक्षतेचे टीकाकार हे तिला 'छद्म–धर्मनिरपेक्षता' (स्युडो सेक्युलॅरिझम) म्हणून टीका करतात.

- भारतातील धर्मनिरपेक्षतेच्या पाठीराख्यांना असे वाटते की, देशात सामान नागरी कायदा आणण्याचा (ज्यात प्रत्येक नागरिकास, तो कुठल्याही धर्माचा असला तरी, सामान कायदा लागू असणार) कुठल्याही स्वरूपाचा प्रयत्न हा देशात बहुसंख्यांकवादी हिंदू संवेदना आणि आदर्श लादले जाण्यास कारणीभूत ठरेल.

- टीकाकार असे म्हणतात की, भारताने शरिया आणि धार्मिक कायद्यांचा स्वीकार केल्याने कायद्यासमोर सर्व समानतेचे तत्व भंग पावते.

- धर्मविरोधी : धर्मनिरपेक्षता ही धर्मविरोधी असल्याची मांडणी अनेकदा केल्या जाते. आपण हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे की, धर्मनिरपेक्षता ही संस्थात्मक धार्मिक वर्चस्वाच्या विरोधात आहे. हे म्हणजे 'धर्मविरोधी' असणे नव्हे! याचप्रमाणे, काहींकडून असाही युक्तिवाद केला जातो की, धर्मनिरपेक्षतेमुळे धार्मिक अस्मिता धोक्यात येते.

- पाश्चात्य आयात : दुसरी टीका अशीही केली जाती की, धर्मनिरपेक्षता ही पाश्चिमात्य आहे आणि म्हणून भारतीय परिस्थितीत ती अनुपयुक्त आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की, धर्मनिरपेक्षतेला पाश्चिमात्य आणि पाश्चिमात्य नसणारी अशी दोन्ही स्वरूपाची मूळे आहेत. पश्चिमेमध्ये, धर्मनिरपेक्षतेचे मूळ उद्दिष्ट हे चर्चपासून राज्य वेगळे करणे हे होते आणि भारतासारख्या देशांमध्ये विविध धार्मिक समुदायांच्या शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या कल्पना महत्त्वाच्या राहिल्या आहेत.

- अल्पसंख्याकता : तिसरा आरोप हा अल्पसंख्याकपणाचा केला हातो. अल्पसंख्यांकांच्या साठी वेगळी व्यवस्था करणे म्हणजे त्यांना कोणतीही विशेष वागणूक देणे नव्हे. याचा खरा उद्देश त्यांना इतरांप्रमाणेच सामान आदर आणि सन्मानाने वागविणे हा आहे. यातून हे समजून घेणे गरजेचे आहे की, अल्पसंख्यांकांचे अधिकार हे कुठलेही विशेषाधिकार म्हणून पाहिले जाण्याची काहीही आवश्यकता नाही.

- हस्तक्षेपवादी : चौथी टीका अशी आहे की, धर्मनिरपेक्षता ही एकप्रकारची जबरदस्ती आहे आणि ती विविध समुदायांच्या धार्मिक स्वातंत्र्यामध्ये अधिकच हस्तक्षेप करते. भारतातील धर्मनिरपेक्षता ही 'तत्वनिष्ठ अंतर राखणारी' आहे आणि ती कुठलाही हस्तक्षेप करत नाही. याशिवाय, हस्तक्षेप म्हणजे नेहमीच जबरदस्ती असण्याचे काही कारण नाही.

- व्होट बँकेचे राजकारण : काही अभ्यासकांच्या मते धर्मनिरपेक्षता ही मतपेटीच्या राजकारणाला प्रोत्साहन देते. आपली मते सुरक्षित करण्यासाठी ठराविक गटाच्या लोकांचा पाठपुरावा करण्याचा किंवा एखाद्या धोरणाबाबत वचन देण्याचा आरोप एखाद्या राजकारण्यावर करणे, त्याला दोष देणे हे योग्य नाही. जर धर्मनिरपेक्ष राजकारणी अल्पसंख्याकांची मते मागून अल्पसंख्यांकांना जे हवे ते देत असतील तर, हे धर्मनिरपेक्ष समाजाचे यश आहे, ज्याचे उद्दिष्टच मुळी अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करणे हे देखील आहे.

**सेक्युलॅरिझमचा (धर्मनिरपेक्षतेचा) भारतीय ब्रँड कसा विकसित करायचा ? :**

- बहुविधतावादी समाजात, धर्मनिरपेक्षतेचे भरणपोषण करण्याचा सर्वोत्तम दृष्टीकोन– राज्य तटस्थतेचे काटेकोरपणे पालन करण्यापेक्षा धार्मिक स्वातंत्र्याचा विस्तार करणे, हा आहे.

- सामाजिक सुधारणेसाठी चळवळी संघटित कराव्या लागतील आणि जनमत तयार करावे लागेल. अल्पसंख्याकांना देशाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे लागेल.

- धर्मनिरपेक्षतेचे समाजात चर्चा तसेच प्रत्यक्ष अंगीकार सुरु होण्यासाठी दोन पावले आवश्यक ठरतील– एक म्हणजे, न्यायासाठी राजकीय नेतृत्वाखालील मुद्द्यांवरून लक्ष हटवून सामाजिक चळवळींच्या कडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे ठरेल. दुसरे म्हणजे, आंतर–धार्मिक (धर्माधर्मांतील) मुद्द्यांवर दिला जाणारा जोर हटवून तो एकेका धर्मांतर्गत मुद्द्यांवर आणि सुधारणांवर देणे गरजेचे ठरेल.

विविध संस्कृतींचा इतिहास आणि सांप्रदायिकतेमुळे जाणवलेले वेदनादायक अनुभव, यामुळे धार्मिक विसंगतींवर व समस्यांवर मात करण्यासाठी धर्मनिरपेक्षता ही अपरिहार्य असल्याची जाणीव आपल्याला करून दिली आहे. बहुसंख्याकांच्या अधिकारावर अंकुश ठेवण्यासाठी धर्मनिरपेक्षता महत्त्वाची आहे. धर्म आणि धार्मिक आधारावर राजकीय प्रभावाचा वापर प्रतिबंधित करण्यासाठीही धर्मनिरपेक्षता आवश्यक आहे. ती व्यक्तींचे स्वातंत्र्य रक्षित करण्यासाठीही आहे (म्हणजे, त्यांना हवे असल्यास आपला धर्म सोडून त्यातून बाहेर पडणे, दुसरा कुठला धर्म स्वीकारणे किंवा धार्मिक शिकवणींचा अर्थ लावण्याचे स्वातंत्र्य होय.)

***

# PRAYAAS - Pramaan Comprehensive Batch



- Continuous Evaluation through Regular Tests
- Separate Batch for Marathi and English Medium
- Special Focus on Current Affairs
- Daily Mains Answer Writing Practice
- Personal Mentorship and Counselling
- Comprehensive Coverage of Optional Subjects
- Comprehensive Notes in Marathi and English for Nonconventional part of Syllabus

Get started your preparation with
PRAYAAS FREE NCERT TEST SERIES now!!!!!

\- Address -

Ramashree, Near Muralidhar Veg, No. 279,
N. C. Kelkar Road, Narayan Peth, Pune - 030
+91 98949 98421 | www.prayaas.in